अं: 23

पिशाच्य

(३२१५०

रामचंद्र विनायक कुलकर्णी

तासगाव

प्रस्तावना

शिवराम महादेव परांजपे

व०क व०त

श्रीराम प्रसन्न.

पिशाच.

लेखकः

रामचंद्र विनायक कुलकर्णी,

तासगांव.

(स्वभावपरिज्ञान, स्वप्नमीमांसा, उपासनाशास्त्र, मेस्मेरिझम अथवा मोहिनीविद्या, ब्रह्मचर्य, मोहिनीविद्येचा शिक्षक इ. पुस्तकांचे कर्ते.)

आवृत्ति पहिली.

हें पुस्तक पुणें येथें शि. म. परांजपे यांच्या **'गोवर्धन'** छापखान्यांत छापून कर्त्यानें प्रसिद्ध केलें असे.

शके १८३३.] [सन १९१२.

किंमत १२ आणे.

पुढें काय होतें, याच्याबद्दल कोणालाच कांहीं प्रत्यक्ष रीतीनें कळत नसल्या कारणानें, त्या संबंधानें प्रत्येकजण आपले तर्क चालवूं लागतो; आणि त्या तर्कांचें परीक्षण करून त्यांतील सत्य कोणतें आणि असत्य कोणतें, हें ठरविण्याला कांहीं प्रत्यक्ष साधन नसल्यामुळें, सामान्य मनुष्य असल्या बाबतींत मोठ्या बुचकळ्यांत पडल्यासारखे होतात. ही मनुष्याच्या मनाची स्थिति फार पुरातन काळापासून चालत आलेली आहे. हल्लींच्या उपलब्ध असलेल्या प्रत्येक धर्मांतील पुरातन धर्मग्रंथ पाहिले, तर त्यांतून मृतांच्या भावी स्थित्यंतरांसंबंधाच्या कल्पनांचीं अनेक स्वरूपें आपल्या दृष्टोत्पत्तीस येतात. आणि त्यांना आधार धरून दुसऱ्याही अनेक कल्पना लोकांमध्यें प्रचलित झालेल्या असतात.

असल्या संबद्ध आणि असंबद्ध कल्पनांचा सुळसुळाट इतर समाजांप्रमाणें आपल्याही समाजामध्यें फार आहे. किंबहुना आपल्या समाजामध्यें तो अधिक प्रमाणावर आहे. पाश्चिमात्य लोकांपेक्षां शास्त्रीय शोधांसंबंधीच्या ज्ञानामध्यें आपण जितके मागें आहों, त्या मानानें आपल्यामध्यें या मृत्युसमुद्भव पैशाचिक कल्पनांचें प्राबल्य जास्त आहे, ही गोष्ट नाकबूल करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जेथें विचारशक्ति कमी, जिज्ञासेचा प्रादुर्भाव बेताबाताचा, आणि सृष्टविषयासंबंधीच्या नियमांचें ज्ञान अगदीं तात्पुरतें, तेथें अशी स्थिति असणारच. आपल्यामधील सुशिक्षित लोक या पिशाचविषयक भ्रमांनीं फारसे भ्रमित होत नाहींत, हें खरें; परंतु आपल्यांतील अडाणी लोकांची या बाबतींत किती वाईट स्थिति आहे, हें कोणाला सांगावयाला पाहिजे असें नाहीं. काळोखी मैदानामध्यें त्यांच्या कल्पनेचे घोडे बेलगाम आणि बेफाम होऊन जमिनीवर आणि अंतरिक्षांत चोहोंकडे सैरावैरा उधळत सुटलेले असतात. मग त्या अशा कल्पनेच्या साम्राज्यामध्यें कशाची उणीव पडणार आहे! हा कल्पनारूपी जादूगार अनेक प्रकारचे गारुडी देखावे दाखविण्याला सुरवात करितो. कल्पनाच उत्पादक, कल्पनाच उपादानकारण, आणि कल्पनाच

कार्य, अशा या त्रिपुटीपासून काय काय उद्भवणार नाहीं! जेथें वस्तुतः कदाचित् कांहींही नाहीं, तेथें भुतें नाचूं लागतात, पिशाचें ओरडूं लागतात, ब्रह्मसमंध वेदाचे मंत्र ह्मणूं लागतात, जखिणी किंकाळ्या फोडूं लागतात, हडळी दिवट्या नाचवूं लागतात, आणि वेताळाच्या स्वारीच्या मिरवणुकीचा थाटदार समारंभ नजरेस पडूं लागतो. व याला उपाय ह्मणून मग आंगारे, धुपारे, उतारे, लिंबें, अंडी, कोंबडीं, ताईत, दोरे, पंचाक्षरी, देवऋषि इत्यादि गोष्टींचीं प्रस्थें माजतात; व धर्मभोळेपणाला आणि फसवेगिरीला समाजामध्यें जास्त जास्त अवसर सांपडूं लागतो.

अशी स्थिति कोणालाही इष्ट नाहीं. वर सांगितलेल्या प्रकारांच्या मुळाशीं कांहीं थोड्याबहुत प्रमाणानेंही मुळींच तथ्य नसेल, असें नाहीं. परंतु चौकस बुद्धीनें त्याची शहानिशा करण्याची प्रवृत्ति लोकां-मध्यें उत्पन्न झाली पाहिजे. ती तरी निदान आपल्या समाजामध्यें जितकी असावयाला पाहिजे, तितकी असलेली दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. ही या विषयासंबंधाची अनिष्ट स्थिति नष्ट करण्याला प्रस्तुतच्या पुस्तकासारखीं पुस्तकें पुष्कळ उपयोगी पडतील. अशीं पुस्तकें आपल्या मराठी भाषेमध्यें क्वचित्च असल्यामुळें रा. रा. रामचंद्र विनायक कुलकर्णी यांनीं लिहिलेलें हें पुस्तक या बाबतींतील समाज-शिक्षणाच्या कार्याला पुष्कळ मदत करील, यांत शंका नाहीं. शास्त्रीय विषयांवर जीं पुस्तकें लिहावयाचीं तीं शास्त्रज्ञ माणसांकडून-च लिहिलीं गेलेलीं असलीं पाहिजेत, ह्मणजे त्यांच्यामध्यें खरी उप-युक्तता उत्पन्न होते. अशा प्रकारचा अधिकार रा. रा. रामचंद्र विना-यक कुलकर्णी यांचें अंगीं निःसंशय रीतीनें वसत आहे. असल्या विषयांचा त्यांचा अभ्यास फार दिवसांचा आहे. किंबहुना, दीर्घ व्यासंगामुळें असल्या विषयांमधील तल्लीनता हा त्यांचा स्वभावच बनून गेलेला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शिवाय त्यांनीं असल्या विषयांसंबंधानें आजपर्यंत अनेक पुस्तकें लि-हून प्रसिद्ध केलेलीं आहेत. स्वप्नमीमांसा, उपासनाशास्त्र, मोहिनी विद्या वगैरे त्यांचीं पुस्तकें हल्लीं महाराष्ट्र वाचकांच्या वाचन

मननाला व आदराला पुष्कळ ठिकाणीं पात्र झालेलीं आहेत. अशा रीतीनें स्वाभाविक कल, सतत परिश्रम, सूक्ष्म अवलोकन, निर्दोष विचिकित्सा, आणि सप्रमाण ग्रंथकर्तृत्व, इत्यादि अनेक गुण रा. कुलकर्णी यांच्या अंगीं एकवटलेले असल्यामुळें प्रस्तुतच्या विषयावरील त्यांचा हा लेख अधिकारयुक्त झालेला आहे, यांत संशय नाहीं.

मृत मनुष्यापासून पिशाचाच्या कल्पनेची उत्पत्ति आहे, हें वर दर्शविण्यांत आलेलेंच आहे. तेव्हां या पैशाचिक प्रश्नासंबंधानें पुष्कळसा उलगडा होण्याला मरणोत्तरकालीन स्थितीचें कांहीं तरी निश्चयात्मक ज्ञान अवश्यक आहे, हें उघड आहे. त्या स्थितीबद्दलचीं शास्त्रीय वर्णनें आपल्या कित्येक प्राचीन धर्मग्रंथांतून दिलेलीं आहेत. आणि अर्वाचीन शास्त्रज्ञांनीं अर्वाचीन शास्त्रीय पद्धतीनें अलीकडे जे अनेक शोध केले आहेत, त्यांच्या योगानें आपल्या योगशास्त्रांतील आणि वेदांत शास्त्रांतील सिद्धांतांवर पुष्कळ प्रकाश पडून दोहोंची अनपेक्षित एकवाक्यता आढळून येऊं लागल्यामुळें त्या आपल्या पुरातन प्रमेयांचें प्रामाण्य आपल्या मनावर चांगल्या रीतीनें प्रतिबिंबित होतें. ह्मणून मरणोत्तरकालीन अवस्थेसंबंधानें आपलीं जुनीं मतें आणि थिऑसफीच्या द्वारें हल्लीं प्रकट होत असलेलीं नवीन शास्त्रीय मतें देऊन रा. कुलकर्णी यांनीं मेलेल्या माणसाचें वासनात्मक शरीर कसें व कां अवशिष्ट राहतें, आणि त्याच्यावरून भुतांबद्दलच्या कल्पना कसकशा वाढत गेल्या आहेत, याबद्दलचें चांगले विवेचन केलेलें आहे. भुतांसंबंधाच्या खोटया कल्पना कोणकोणत्या आहेत हें त्यांनीं निवडून काढिलें आहे, आणि खरे पैशाचिक संबंध जेथें जडलेले असतील तेथून ते घालवून लावण्यासाठीं त्यांनीं मानसिक, आध्यात्मिक आणि वैद्यकीय असे अनेक प्रकारचे उपाय सांगितलेले आहेत. पिशाच या विषयासंबंधानें जितक्या बाबी निघण्यासारख्या आहेत, तितक्या सगळ्या विचाराकरितां पुढें घेऊन त्यांचें वर्गीकरण आणि परीक्षण, खंडण आणि मंडण, भ्रमाविष्करण आणि सत्यशोधन, या गोष्टी रा. कुलकर्णी यांनीं या पुस्तकांत फार व्यापक

दृष्टीनें आणि निर्दोष पद्धतीनें करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या प्रयत्नांत त्यांना कितपत यश आलें आहे, हें पाहण्यासाठीं या 'पिशाच' सृष्टीमध्यें प्रत्यक्ष प्रवेश करूं इच्छिणाऱ्या वाचकांकरितां हें या प्रस्तावनारूपी 'मेडियम' (मध्यस्थ) चें इतकें साहाय्य पुरें आहे.

पुणें,
५।२।१९१२.

शि. म. परांजपे.

अनुक्रमणिका.

श्रीराम समर्थ.

पिशाच.

मंगल.

स्मशानेष्वाक्रीडा स्मरहर पिशाचाः सहचरा-
श्चिताभस्मालेपः स्रगपि नृकरोटीपरिकरः ।
अमंगल्यं शीलं तव भवतु नामैवमखिलं
तथापि स्मर्तॄणां वरद परमं मंगलमसि ॥

—महिम्न—

हे चंद्रचूड मदनांतक शूलपाणे
स्थाणो गिरीश गिरिजेश महेश शंभो ।
भूतेश भीतिभयसूदन मामनाथं
संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ॥

भीतीची कल्पना हेंच भीतीचें मूळ आहे.

सर्व मानवी प्राण्यांच्या मनोवृत्तींचा विचार केला, तर कोणत्याही प्रत्यक्ष प्रसंगापेक्षां त्या प्रसंगाची कल्पना हीच फार भयप्रद असते; पण त्या प्रसंगांत खुद्द तितकें दुःख असत नाहीं. असें कल्पनेच्या अंगीं मनुष्याला छळण्याचें अतिशय सामर्थ्य आहे. अशा या छळणाऱ्या कल्पनेंत मनुष्याला अतिशय घाबरवून सोडणारी. भूत, **पिशाच**, यांच्या कल्पनेसारखी दुसरी भयंकर कल्पनाच नाहीं. मनुष्याच्या मनाला, त्यांतून भिग्या मनुष्याच्य

मनाला, हा एक भयंकर हृद्रोगच लागलेला असतो. हा नाहींसा होण्यासाठीं, हा खरा आहे का काल्पनिक आहे, याचा विचार केला पाहिजे. हा काल्पनिक असेल, तर या कल्पना निवळ खोट्या आहेत, अजिबात मनाचेच भ्रम आहेत, किंवा या कल्पना दुसऱ्या न भिण्यासारख्या कांहीं गोष्टींमुळें भासमान खोट्या उत्पन्न झाल्या आहेत, याचा विचार केला पाहिजे. आणि हा खरा असेल, तर याला नाहींसा होण्यास काय उपाय आहे, तो शोधला पाहिजे.

समाजांतील या भूतपिशाचांसंबंधानें चालू असलेल्या भाषणांतील व विचारांतील कल्पनांचें पृथक्करण केलें, तर दोन भाग दृष्टीस पडतात. एक मोठा अज्ञानजनसंघ जिकडे तिकडे भूतपिशाचांचेंच साम्राज्य मानणारा आहे, व एक अगदीं लहान सुशिक्षित ह्मणविणारा व सृष्टिशास्त्राचें कांहीं ज्ञान मिळविलेला जनसंघ भूत किंवा पिशाच ह्मणून या सृष्टींत कांहींही अस्तित्वांत नाहीं, असें मानणारा आहे.

भूतपिशाचांचें अस्तित्व मानणाऱ्या वर्गाची समजूत अशी आहे कीं:—ज्याप्रमाणें आह्मी माणसें आहों, त्याप्रमाणेंच वायूच्या द्रव्याच्या जातीचे देह असणारी व वाटेल तेव्हां वाटेल तें रूप धरून प्रकट किंवा गुप्त होतां येणारी एक विलक्षण शक्तिमान् योनि आहे, व तिच्यांत निरनिराळ्या प्रती, वर्ग, किंवा जाति असून त्यांना पिशाच, भूत, हडळ, समंध, ब्रह्मसमंध, इत्यादि नांवें आहेत, अशा कल्पना ते गृहीत धरतात. व शिकलेले लोक वरील शब्दाचा वरील अर्थच गृहीत धरून अशा तऱ्हेनें कल्पना केलेली भूतपिशाचांची व्यक्ति नाहीं, किंवा त्यांचें अस्तित्व मुळींच नाहीं, असें ह्मणतात.

याप्रमाणें दोन तऱ्हेचीं मतें विचारासाठीं आपणापुढें आहेत. त्यांपैकीं पिशाच नाहीं ह्मणणारांना आपल्या बाजूची माहिती किंवा पुरावा देण्याचें कारणच पडत नाहीं. कारण जें नाहीं त्याची माहितीही नाहीं ! ह्मणून या बाजूवर पुराव्याचा बोजाही

नाहीं. पण भूत किंवा पिशाच आहे ह्मणणारांना मात्र भूत-पिशाचाबद्दल सर्व माहिती व त्याच्या अस्तित्वाबद्दलचा सर्व पुरावा देणें भाग आहे.

ही भूतांचें अस्तित्व मानणाऱ्या बाजूची माहिती काय आहे, आणि त्यांचा पुरावा कोणता आहे, हें साग्र समजून घेऊन न्यायाच्या कसोटीवर घासून त्याला कांहीं किंमत आहे कीं काय, हें पाहून मग शास्त्राच्या ताजव्यांत घालून त्याला खरोखरी कांहीं महत्त्व आहे किंवा नाहीं, हें निःपक्षपात बुद्धीनें धर्माच्या काट्यावरून टीप करूनच ठरविलें पाहिजे. तरच दोन पक्षांमधील भेद नाहींसा होऊन खऱ्याचा पत्ता लागेल. यासाठीं पिशाच आहे ह्मणणाऱ्यांच्या बाजूच्या माहितीचा व अनुभवाचा विचार करूं.

पिशाच आहे म्हणणाऱ्या अज्ञ समाजाची माहिती व अनुभव.

या बाजूच्या लोकांना प्रत्यक्ष प्रमाणानें भूत आणून दाखवा ह्मटलें, तर कोणी हें कबूल करीत नाहींत. पुष्कळ लोक ह्मणतात, आह्मांला भुताचे अनुभव आले आहेत खरे, आमची तुह्मी प्रतिज्ञेवर साक्ष घ्या, व आमच्यावर भरंवसा ठेवण्याला योग्य असे आह्मी खरे वाटत असूं तर भरंवसा ठेवा. असे आपले अनुभव सांगणारे सर्वच म्हणजे खोटें किंवा लबाड सांगत असतील, असें मी म्हणत नाहीं. यांतील पुष्कळ जण अगदीं खरें सांगतात; ह्मणजे ते आपल्या समजुतीप्रमाणें खोटें बोलत नाहींत, हें खरें; तरी या अनुभवाचा त्यांनीं विचार केलेला नसतो. आपणास आलेले अनुभव आपल्यापुढें विचारास घेऊन व त्यांचे कारणाचा धिमेपणानें तपास करून काय निष्पन्न होतें, हें पहाण्याचें धाडस करणारे लोकच मुळीं फार थोडे आहेत. पिशाचासंबंधानें भोळेपणानें विश्वास ठेवणारे व निष्कारण जेथें तेथें त्याची भीति बाळगणारेच लोक फार आहेत. यामुळें ते या तपासाच्या

मुळीं पंचायतींतच कधीं पडत नाहींत. म्हणून त्यांना खऱ्याचा पत्ता लागत नाहीं.

धारिष्टाचा व सत्य शोध करणारा एखादा मनुष्य या पिशाचाच्या शोधास तयार झाला, तर त्यास पिशाचाची शोधापुरती तरी माहिती मिळाली पाहिजे. भुताचें नांव, राहण्याचें ठिकाण, लपण्याचें ठिकाण, त्याच्या स्वरूपाचें वर्णन, त्याचें सामर्थ्य, व शोधास साह्य करणाऱ्या इतर कांहीं गोष्टी, यांची माहिती असल्यावांचून त्यानें शोध तरी कसा करावा? अशी संगतवार माहिती तरी कोण सांगण्यास तयार असणार? सर्वांची माहिती गोळा केली, तरी त्यांत एकूण एक माहिती येईलच, असा नियम नाहीं. तरी पण पूर्वापार समजुतीप्रमाणें अगदीं खालच्या वर्गाच्या लोकांच्या भुताखेतांपासून तपास करून काय माहिती मिळते, तें पाहूं.

पिशाचाबद्दलची माहिती.

१ भूत किंवा पिशाच:—साधारण स्थितींतील लोक जसे असतात, त्याप्रमाणें या वर्गांतील सर्व साधारण समाजाला भूत किंवा पिशाच हें नांव आहे. तीं शक्तीनें, अधिकारानें व कर्तबगारीनें कमी असतात. तीं स्वतंत्र नसतात. त्यांचे पाय उफराटे असतात. तीं कांहीं तरी शुष्क पदार्थाची इच्छा पूर्ण करून घेण्यासाठीं माणसांना पछाडतात, आजारी करतात, व त्यांना तिखट, शिळी भाकरी, अंडीं, इत्यादि पदार्थ दिले ह्मणजे सोडून जातात.

२ समंध:—हे भुतांतील अधिक शक्तिमान् वर्गांतील असतात. त्यांचीं स्वरूपें दांडगीं, भयंकर व काळीं असतात. ते बहुशः दांडग्या झाडावर, मोठ्या वाड्यांतील ओसाड भागांत वगैरे असतात, व त्यांची इच्छा फार मोठी असते. ते पुरलेल्या पैशावर राहतात.

३ ब्रह्मसमंध:—हे रात्रीं दिवसा केव्हां वाटेल तेव्हां अगदीं मनुष्यासारखें रूप धरून मोठ्या विस्तीर्ण वाड्यांतील एखाद्या बाजूच्या भागांत, किंवा पुष्कळ दिवस ओस पडलेल्या वाड्यांत, किंवा जुनाट

पिंपळाचे पारावर, अथवा विस्तीर्ण वडावर बसून स्नानसंध्या करतात, व ह्मणणें ह्मणतात. ते फारसे कोणाच्या वाटेस जात नाहींत.

४ **मुंजा**:—हा ब्रह्मचारी मुलाच्या स्वरूपाचा लंगोटी घालणारा व सदा पिंपळावर राहणारा भूतवर्गांतील आहे.

५ **पितर**:—ही भुताची लहान व ठेंगणी जात असून ते सदोदित जमावानें फिरत असतात. ते बहुशः आपल्यांतील कोणाच्या तरी हितासाठीं थोडासा त्रास देतात, तरी बहुशः कल्याणही करितात.

६ **ईर** किंवा **वीर**:—हीं भुतें फार शूर असतात. तीं शिपायाच्या वेषानें ढाल तलवार इत्यादि घेऊन फिरतात.

७ **बीर**:—हीं फार शक्तीचीं भुतेंच असून या भूतवर्गांतील सत्ताधारी अधिकाऱ्यांचे ते सेवक असतात.

८ **वेताळ**:—हा विरांचा अधिकारी व भुतांवरील सेनापति आहे असें मानतात. याला सर्वांनीं रोज हजिरी द्यावी लागते.

अशी पुरुष वर्गांतील भुतांची माहिती इकडे मिळते. आतां स्त्री वर्गाची माहिती पाहूं.

९ (१) **हडळ**:—ही यांच्यांतील स्त्रियांची जात आहे. ही फार दुष्ट असते. ही माणसांना चांगलीं चांगलीं रूपें दाखवून फसविते, व मुलांना पछाडते.

१० (२) **येड मकडताई**:—ही भूतांतील पुष्कळ मुलें असणारी स्त्रीजात आहे. ही बहुशः खेड्यापाड्यांत व लोकांच्या परड्यांत आपलीं मुलेंबाळें घेऊन असते, आणि आपल्या चिल्यापिल्यांस भाकरी तुकडा मिळावा म्हणून त्या घरच्या किंवा शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या मुलांस पछाडून आजारी करून आपल्या मुलाबाळांच्या इच्छा तृप्त करून घेते.

११ (३) **डाकिणी**:—या भयंकर जातीच्या निर्दय स्त्रीवर्गांतील असतात. या प्रेतें व मेलेलीं मुलें उकरून खातात.

१२ (४) **शाकिणी**:—याही भूतांतीलच जरा श्रेष्ठ वर्गांतील स्त्रिया आहेत.

१३ (५) जखीण किंवा **जाखीण**:—हीही भूत वर्गातील स्त्री आहे. ही बहुशः वृद्ध स्त्रीच्या रूपानें फ़िरते. हिचे केस शुभ्र रुपेरी व विसकटलेले असतात. हिची गांठ पडली, तर ही भल्या माणसास कल्याणकारक साधन देते.

१४ (६) आसरा:—ही पाण्यांत राहणारी, पाण्यांतून खालीं पाताळांत जाणारी भूत वर्गातील स्त्रीजात आहे. या नेहमीं सुस्वरूप स्त्रियांच्या रूपानें असतात.

या १४ वर्गांखेरीज आणखीही कांहीं वर्गाचीं पिशाचें आहेत. हीं सर्व रात्रीचीं फिरतात. हीं निर्मनुष्यस्थळीं भर दोन प्रहरीं, तिनीसांजा, मध्यरात्रीं, अंधारांत, नाना तऱ्हेच्या रूपानें दिसतात. हीं पशुपक्ष्यांचींही रूपें धरतात. एकट्या दुकट्या माणसास पकडतात, भय दाखवितात, नाना तऱ्हेच्या चेष्टांनीं भेडसावतात, ओरडतात, जाळ, दिवट्या दाखवितात, व अमावास्या पौर्णिमांना तीं फार फिरतात. माणसांना पछाडून त्यांच्या शरीरांत शिरतात,रात्रीं उरावर येऊन बसतात, आणि अंगांत येऊन छळतात. त्यांची सांवली पडत नाहीं. तीं वायुरूप असतात. सर्व भुतें किंवा पिशाचें मेलेल्या मांणसांचींच झालेलीं असतात.

सर्व साधारण लोक भूत किंवा पिशाच होतात. पैसेवान, कृपण किंवा लोभी मनुष्य समंध होतो. विद्येबद्दल अभिमान बाळगून मरणारा विद्वान ब्रह्मसमंध होतो. ब्रह्मचारी मेल्यास मुंजा होतो. मुलाबाळांवर प्रेम करणारा सदाचारी कुटुंबी पितर होतो. लढाईंत अगर भांडणांत मेला तर वीर-ईर होतो. कजाग बायको हडळ बनते. दुष्ट बायका डाकिणी बनतात. बाळंतीण येडमकड-ताई होते. तिलाच ताई आई ह्मणतात.

याप्रमाणें मिळणाऱ्या माहितींत बहुशः सर्व तऱ्हेच्या मरणारांच्या गळ्यांत भुतांचें कोणतें तरी रूप घेण्याचें लिगाड अडकाविलेलें आहे. वीर व वेताळ हे भुतांवर अधिकार चालविणारे अधिकारी असून भुतांच्या वर्गातील देवदूत आहेत, वेताळ सेनापतीवर मारुति या प्रधानाचा

ताबा आहे, व या सर्वांवर कुल अधिकारी राजे स्मशानवासी श्री-शंकर आहेत, अशी या भूत व पिशाच साम्राज्याची हिंदूंतील माहिती लागते.

सर्व तऱ्हेच्या लोकांत अशाच किंवा किंचित् कमी जास्ती फरकाच्या भूतपिशाचांसंबंधानें पूर्वींपासून कांहीं तरी दंतकथांची माहिती चालत आलेली आढळते.

या कल्पनांनीं मनें भित्रीं केलीं.

प्रत्येक गांव म्हटला कीं,त्या ठिकाणीं माणसें हीं मेलेलीं असतातच. अर्थात् वरील कल्पनांप्रमाणें कोणत्या तरी एका वर्गांत तो भूत झाला असेल, अशा तऱ्हेच्या समजुती धारण करणारे लोक अधिक आढळतात. व ते ज्याचा कधीं अनुभव नाहीं, जें कधीं प्रत्यक्ष पाहिलें नाहीं, त्याच्या कल्पनेवरच ओसाड स्थळीं, निर्मनुष्य स्थळीं, स्मशानांत, रात्रीचे वेळीं, व काळोखांत एकटे जाण्यास विनाकारण भितात.

प्रसंगीं अशा स्थितींत सांपडलें असतां घाबरतात, दचकतात, आजारी पडतात, व निष्कारण कल्पनेच्या भीतीनें मरतात देखील. कोणी कोणी दिवसादेखील एकटे एखाद्या ओसाड घरांत जात नाहींत, आणि कोणी कोणी तर आपल्या स्वतःच्या मोठ्या घरांत देखील रात्रीं अंधारांत जाण्यास, एकटे रहाण्यास, किंवा दिवा घेऊन देखील एकटें फिरण्यास भितात. हा भित्रेपणा व भोळेपणा केवळ खऱ्याचा शोध करण्याच्या इच्छेच्या अभावामुळें उत्पन्न झालेला असून यानें या समाजाचें फार नुकसान झालें आहे, होत आहे, व पुढें होणार. यानेंच आमचीं मनें भित्रीं केलेलीं आहेत, व आह्मी खऱ्या ज्ञानापासून दूर जाऊन उलट मूर्ख बनत चाललों आहों. यासाठीं या विषयाचे काल्पनिक समज सोडून अनुभवानें सत्य ज्ञान मिळवावें, व या भीतीपासून मोकळें व्हावें, हें खरें; पण सर्वांच्या अंगीं खरें ज्ञान मिळविण्याइतका त्याचा पिच्छा पुरविण्याचें धारिष्ट असतें, असें नाहीं. ज्या कोणांस धारिष्ट असतें, त्यांस ज्ञान असतें असें नाहीं.

ज्यांना ज्ञान व धारिष्ट असतें, त्यांना तरी सर्व तऱ्हेनें अनुकूल परिस्थिति असतेच, असाही नियम नाहीं. तरी होतां होई तों खरें समजून घेण्याची खरी इच्छा तरी प्रत्येक जणानें धारण करावी, अशी मी सविनय प्रार्थना करतों. कारण भुताखेताबद्दल भिणारांना व त्यांच्यासंबंधीं चमत्कारांवर विश्वास ठेवणारांना आंधळा व परंपरेचा विश्वास ठेवूं नका, असें सांगून आपल्यापुढें भुताच्या अनुभवाच्या ह्मणून येणाऱ्या किंवा आलेल्या शेकडों गोष्टी किती खोट्या व निवळ भ्रमाच्या असतात, हें मी दाखवून देतों.

साधारणपणें नेहमीं पिशाचासंबंधीं ह्मणून पुढें आलेल्या अनुभवांत केवळ १ **कल्पना**, २ **एखाद्या विशिष्ट सत्य गोष्टीवरून उत्पन्न झालेला भ्रम**, व ३ **सत्य वस्तुस्थितीचें शास्त्रीय अज्ञान**, हींच मुख्यत्वेंकरून पिशाचाची भीति उत्पन्न करणारीं आहेत, असें आढळून येतें. हें कसें तें पुष्कळांना येणाऱ्या अनुभवाचें स्पष्टीकरण व पृथक्करण करूनच मी आपणाला दाखवून देतों. पण त्यापूर्वीं ही भीतीची मूळ कल्पना कशी उत्पन्न झाली, तें आपण पाहूं.

भीतीचा उगम.

प्राणिसृष्टीचें व मनोवृत्तींच्या वाढीचें सूक्ष्म अवलोकन केलें, तर असें आढळून येतें कीं, मनुष्यप्राणी या जगांत अवतीर्ण झाल्यानंतर अगदीं लहान मूल असतांना देखील त्याला बऱ्या वाईट गोष्टींचें कांहीं ज्ञान उत्पन्न झालेलें नसतें, तरी त्याला भीतीची कल्पना असते. ही अगदीं आरंभींची भीतीची कल्पना या जगांतील वस्तूंचें ज्ञान ग्रहण करण्यास सुरवात झाल्याबरोबर उत्पन्न होते.

प्रकाशानें प्रसन्नता येते व अंधकारानें असमाधान होतें, या लहानपणच्या अनुभवामुळें अंधाराबद्दल भीति उत्पन्न होते; अंधार व काळे देखावे यांबद्दल या लहानपणच्या स्थितींत कांहीं फरक दिसत नाहीं; चार पांच महिन्याचें मूल असतांना त्याच्यासमोर काळ्या वर्णाची एखादी मोठी वस्तु एकदम नेली तर तें दचकतें;

असें मी पुष्कळ मुलांवर व पुष्कळ ठिकाणीं सहज व बेतानें अनुभव घेऊन पाहिलें आहे. उजेड हा वनस्पति व प्राणी यांना स्वाभाविकच आवडणारा व हितकर आहे. आणि अंधार हा स्वाभाविकच न आवडणारा व अहितकर आहे. हें प्रमाण ज्याच्या त्याच्या प्रकाशग्रहणेंद्रियावर अवलंबून आहे. त्यांतच संवयीची भर पडलेली असल्यामुळें लहानपणींच अंधाराविषयीं स्वाभाविक भीति उत्पन्न होते, व पुढें हळू हळू त्या भीतीलाच भुतांच्या आख्यायिका ऐकण्यानें व कल्पनांनीं दुजोरा मिळतो. अशा रीतीनें लहानपणापासूनच अंधार व भूतें यांच्या परस्पर संबंधाची भीति उत्पन्न करणारा संस्कार मनावर दृढ झालेला असतो. आणि हा संस्कार पिशाचाच्या सत्य शोधाच्या आड येत असतो. पुढें मोठेपणाबरोबर परिस्थितीची अनुकूलता व व्यावहारिक आणि शास्त्रीय ज्ञान वाढत वाढत ही भूतांची कल्पना जरी कमजोर होत जाते, तरी अंधार व एकटेपणा या दोन्हींच्या मेळांत भुताबद्दलची काल्पनिक भीति मात्र मनाला स्पर्श केल्याशिवाय रहात नाहीं. फार काय, पण नवीन शिक्षणानें भूत पिशाच हें निवळ खोटें आहे, अशी पक्की खातरी उत्पन्न झालेल्या माणसालासुद्धां हा पूर्व संस्कार अंधारांत व एकट्या वेळीं पिशाचाबद्दल भीतीच्या कल्पनेची सूचना केल्याशिवाय रहात नाहीं. तथापि ज्ञानी व धारिष्टवान माणसें त्याला भीक घालीत नाहींत, आणि भीति उत्पन्न करणाऱ्या कारणांचा योग्य तपास करतात.

पैशाचिक ह्मणून येणाऱ्या अनुभवांचीं दुसरीं कारणें.

१ भुताची योनि नाहीं:—भुताची किंवा पिशाचाची योनि आहे असें मानलें, तर त्याचे पणजे, आजे, बाप, मुलगे, मुली, असें कुटुंबच असलें पाहिजे, व त्यांच्यांत नवरा बायको असून त्यांना संतति होऊन त्यांची वाढ झाली पाहिजे. असें होतें ह्मटलें

तर प्रत्येक मरणाऱ्याच्या गळ्यांतील भूत होण्याचें लिगाड आयतेंच मोकळें होईल. पण असें मानण्यास कोणीच कबूल नाहींत. ह्मणून प्राणिसृष्टीसारखी परंपरेनें वाढणारी ही भूतयोनि नाहीं, हें ओघानेंच आलें.

२ भूत उरावर बसणें:—पुष्कळ लोक ह्मणतात, रात्रीं अमुक ठिकाणीं निजलों असतां माझ्या उरावर भूत बसलें होतें, माझ्या अंगावर चार मणांचें ओझें पडलें होतें. कोणी ह्मणतात, मी जागा होतों, पण माझे हात पाय सुद्धां हालेनात. कोणी ह्मणतात, माझे डोळे मी उघडण्याची खटपट केली, तरी देखील ते उघडेनात. कोणी ह्मणतात, मी डोळे उघडून उठून बसलों, तरी काळोखांत त्या भूताला जातांना पाहिलें. इत्यादि लोकांचें सांगणें, नव्हे—अनुभव सांगणें केवळ खोटें आहे, व असें सांगणारे सारे लबाड आहेत, असें सरसकट विधान करणें म्हणजे चूक आहे. ते आपआपल्या समजुतीप्रमाणें जें सांगतात तें खरें सांगतात, त्यांचे अनुभव खरे असतात, व असे ते पुष्कळांना येतात. पण ते भुतांचे किंवा पिशाचांचे असतात असें मात्र नाहीं.

१ झोपेंत उरावर हात पडले असतां छातीवर अति ओझें पडलें आहे असें वाटतें, हात उचलून निघत नाहीं, व मनुष्य चावळतो, असें आपण पुष्कळ वेळां पाहतों. खालच्या वर्गांतील मनुष्यांना या स्वप्नांची कल्पना नसते. त्यांना हा शरीरावरील सर्व परिणाम भूतपिशाचांचा आहे, असें मानण्याची लहानपणापासूनच संवय असते. फार कशाला, ताप आला तरी भुतानें, खोकला आला तरी पिशाचानें, अशीच त्यांची समजूत असते. निजलेल्या माणसाच्या उरावर झोपेंत कांहीं पदार्थ ठेवून अशा तऱ्हेचीं स्वप्नें पाडतां येतात. (स्वप्नमीमांसा पान २५, स्वप्नें कशीं पाडावीं, हें पहा.)

२ कित्येक वेळेला झोपेंत डोळ्यावर व डोक्यावर बारीक व गार वायूचा प्रवाह वाहूं लागला असतां अंग जड होऊन त्या वेळीं कांहीं

जागृति असते, तरी पूर्ण जागृति यावी अशी इच्छा असतांना देखील ती येत नाहीं, डोळे उघडत नाहींत, व हातपायही जड होतात.

या अनुभवासाठीं निजलेल्या एखाद्या मनुष्याच्या टाळूवर बारीक नळीनें गारसा वायूचा प्रवाह सोडण्यास सुरवात करावी, व त्यापूर्वी त्याच्या मिटलेल्या डोळ्यांवर पातळसा कागद त्या बेतानें कापून पाण्यांत भिजवून दोन्ही पापण्यांवर साफ चिकटून बसेल असा बसवून तो किंचित् ओला राखावा. याप्रमाणें केलें असतां पुष्कळ मनुष्यांना वरप्रमाणें अनुभव येतात.

सूचनाः—भितरे व मुलें यांवर हा अनुभव पाहूं नये.

३ कोणी ह्मणतात, हे तुमचे येणारे अनुभव भुतांचे नसतील; पण त्या गोमाजीच्या घरांत अमुक खणांत जाऊन निजून पहा, ह्मणजे वाटेल त्याला भुताचे अनुभव येतात! तेथें कांहीं गार वारा येत नाहीं नी फारा येत नाहीं! तेव्हां ते तरी भुताचेच नव्हेत काय? बरें, तेथें जाऊन कोणी निजून पहावें व सावध राहण्याचा विचार करून निजावें, तों लागलेंच अंग जड होण्यास लागतें. मग या स्थितींतून कोणी जोरानें हांक मारून किंवा हालवूनच उठवावें, अगर आपलीच जोराची धडपड होऊन उठावें, तेव्हांच जागृति येते. आणि ती सुद्धां समाधानकारक असत नाहीं. अंग गळलेलें, निरुत्साह आलेला, अशी स्थिति अनुभवास येते. तेव्हां हें कसें घडतें, याचा विचार करूं. वारखंडकराचे घरांत असा एक खण होता. तो एका कडेस होता. त्याच्या भिंतीला लोणा चढलेला होता. व त्या भागाला ओलावा होता. त्या ठिकाणीं मी स्वतः अनुभव पाहण्यासाठीं निजलों असतां मला अनुभव येऊं लागला. तेव्हां मी जमिनीपासून उत्पन्न होणाऱ्या दूषित वायूनें ही स्थिति येत असेल असें समजून लायकर आमोनियाची बाटली जवळ घेऊन निजलों, व अंगाला जडपणा व गुंगी वाटूं लागली कीं मी ती हुंगीत असें. याप्रमाणें दोन तीन वेळ मी ती हुंगली. यायोगें मजवर कांहींच परिणाम झाला नाहीं. असेच मी तेथें आणखी दोन तीन जणां-

वर अनुभव घेतले. ओलसर, दमट व खाताड जमिनींच्या जवळ दूषित वायु उत्पन्न होत असतात. ते वायु श्वासांत जातांना ऑक्सीजन वायूचा ह्मणजे प्राणवायूचा पुरवठा फार कमी पडतो. अशा वेळीं वरील स्थिति अनुभवास येते. तिला भूत किंवा पिशाच कसें ह्मणतां येईल? नुकत्याच उघडलेल्या पेवांतील वायूनें माणसें गुदमरतात. क्लोरोफार्म वायूनें मनुष्यें बेशुद्ध होतात. असे जर अनुभव आहेत, तर अशा वायूंनीं उरावर बसल्याच्या अनुभवाला पिशाच किंवा भूत मानणें निव्वळ चुकीचें नव्हे काय? कोणी ह्मणतील, हें एक असो; पण कित्येक वेळेला जागें झाल्यानंतर उरावर बसलेलें भूत आपण उठून बसलों असतां सुद्धां जात असलेलें दिसतें, असे जे अनुभव येतात, त्यास तरी पिशाच ह्मणण्यास काय हरकत आहे? या ह्मणण्याचें स्पष्टीकरण करूं.

झोपेंत ज्यांना असा भास होतो, त्यांना अशा रीतीचें एखादें स्वप्न पडतें, किंवा अर्धवट झोपेंत अशा जोराच्या कल्पनेमुळें त्या वेळीं डोळ्याच्या रसावर एखाद्या आकृतीचा ठसा उठलेला असतो. त्यामुळें बाहेर कांहीं वेळ एखादी आकृति स्पष्ट दिसून तो ठसा नाहींसा होण्याबरोबर ती आकृति तेथल्या तेथेंच नाहींशी होते. अशा तऱ्हेच्या अनुभवाची माहिती व त्याचें शास्त्रीय सोपपत्तिक स्पष्टीकरण वाचण्याची इच्छा असेल, त्यांनीं याच लेखकाच्या "स्वप्नमीमांसा" पुस्तकांत पहावें. याप्रमाणें वरील येणारा अनुभव हा दृग्भ्रम आहे, तो पिशाचाचा अनुभव नव्हे. भूत उरावर बसण्याच्या ह्मणून पुढें येणाऱ्या गोष्टी अशा रीतीच्या स्पष्टीकरणावरून यांत भुताचा कांहीं संबंध नाहीं हेंच सिद्ध करितात.

पिशाचाच्या रात्रीच्या चेष्टा.

कोणी ह्मणतील, हे झोपेंतील अनुभव असोत, ते सोडून द्या; पण रात्रीं जागेपणीं रानांत भूत भेटतें, व त्याच्या इतर चेष्टा होतात, असे जे आमचे अनुभव आहेत, ते तरी भुताचेच आहेतना?

असें जे कोणी म्हणतील, त्यांच्या त्या अनुभवांचा विचार करूं.

३ रात्रीं भुताचें दिसणें:—मनुष्यें रात्रीं अंधारांत जाऊं लागलीं असतां आधींच भीत असतात. त्यांच्या मनांत भुताच्याच कल्पना येत असतात. अशा स्थितींत पुढें एखादी वस्तु अस्पष्टशी दिसली कीं, त्यावर कल्पना चालू होतात, आणि मग तेंच भुताचें स्वरूप दिसूं लागतें. अशा वेळीं त्या माणसास त्याचा पुरा तपास करण्याचा धाडसी व करारी निश्चय नसल्यामुळें त्याला त्या गोष्टी भुताच्या ह्मणून वाटणें भाग पडतें. उदाहरणासाठीं एक दोन नमुने सांगतों.

रात्रीं एखाद्या झाडीकडे पाहिलें असतां किंवा पुष्कळ झाडें दिसत असतील अशा भागाकडे पाहिलें असतां किंचित् अंतर असलेल्या दोन झाडांच्या मधून क्षितिजावरील आकाशाचा दिसणारा भाग उंच उभे राहिलेल्या पांढऱ्या मनुष्याप्रमाणें दिसतो, व तोच किंचित् रुंद असल्यास पासोडी पसरल्याप्रमाणें दिसतो. अशा वेळीं वाटेनें जाणारे दोन चार इसम जातां जातां त्या भागाजवळ आले असतां जसजसें जवळ यावें, तसतसा हा भास आपोआपच नाहींसा होतो, आणि त्यामुळें तें उभें राहिलेलें पांढरें गुप्त झालें असें वाटतें, व यालाच पुष्कळ लोक भितात.

चांदण्या रात्रीं एखाद्या गर्द सावलीच्या झाडाखालीं त्या झाडाच्या पानांतून जमिनीवर पडलेले चांदण्याचे कवडसे लांबून पहाणाराला झाडाखालीं कोणी बसलें आहे, असा भास जमिनीच्या किंचित् उंचवट्यामुळें होतो. यालाच पुष्कळ लोक भूत समजून भितात. कोणी जवळ जाऊन पाहूं लागला, तर हे भास आपोआपच नाहींसे होतात; पण अडाण्यास भूत नाहींसें झालें असें वाटतें. अशा रीतीनें विनाकारण कशास तरी भिऊन घाबरणाऱ्याच्या पुष्कळ गोष्टी प्रत्येकाच्या कानावर आलेल्या असतीलच. तरी माझ्या अनुभवाच्या कांहीं मजेदार गोष्टी मी आपणास सांगून याचा उलगडा करितों.

एके वेळीं मला अमावास्येस रात्रीं दहा वाजतां चिंचणीहून तासगांवीं येण्याची पाळी आली. त्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां मी चिंचणीस गेलों होतों. जातांना ज्या वाटेनें गेलों, त्याच वाटेनें परत येण्यास निघालों. वाटेंत खडखिरा ह्मणून एक ओघळ आहे. त्या ठिकाणीं भुतांचा आस्करा आहे, अशी लोकवार्ता आहे. मी त्या ठिकाणाजवळ येई तोंपर्यंत मला कांहींच कल्पना नव्हती. पण तें ठिकाण जवळ येतांच त्या ठिकाणच्या कांहीं आख्यायिका माझ्या स्मरणांत आल्या. व तेथेंच एका कडेस जें मुसलमानांचें स्मशान आहे, तिकडे माझें लक्ष गेलें. त्याबरोबर मनाची समता नाहींशी होऊन तें चंचल झालें. तेव्हां मी चहूंकडे निरखून लक्ष देत चालूं लागलों. मला वाटलें, उगीच पुढें कशास जावें ? कदाचित् थोड्या वेळांत कोणी एखादा शेतकरी भेटला, ह्मणजे मग पुढें जावें; ह्मणून अर्धा तास तेथेंच गुटमळलों. पण कोणीही आलें नाहीं. रात्रीचे ११ वाजले. मग तसाच धारिष्टानें पुढें निघालों. तों वाटेवर खडखिऱ्यांतच कोणी उभें राहिलेलें दिसलें. त्यास पाहतांच मीही तेथेंच उभा राहिलों. मागें फिरेन तर न जाणो मागून त्यानें मिठी घातल्यास काय करावें ? तेव्हां धारिष्ट न सोडतां त्याजकडे पहात उभा राहिलों. बराच वेळ उभा राहिलों, तरी त्याची हालचाल दिसेना. मग पायानें २।४ खडे उचलून घेऊन ते थोडथोड्या अंतरानें फेंकले. शेवटीं एक खडा त्यावर जाऊन लागला व खट्ट आवाज झाला. त्याबरोबर सर्व भ्रम गेला. तें एक उभें केलेलें झाडाचें खोड होतें, व गाडा मोडल्यामुळें लोक सायंकाळीं तें उभें करून गेले होते.

४ भुतांचे आवाज व भाषणः—मी बेंदरी गांवीं कुलकर्णीपणाचे कामावर असतां एकदा सांगलीहून कचेरींतील काम आटपून येण्यास मला रात्र झाली. आह्मी चार पांचजण येत होतों. रात्रीचे ११ वाजले होते. शिरगांवच्या ओढ्यांत आलों, तेव्हां जवळ १०।५ हातांवर घांटी वाजल्याचा आवाज आला. ह्मणून ' घांटी कसली वाजली ? ' असें बचाराम पाटलाना मीं विचारलें. तेव्हां धोंडी रामोशी ह्मणला, ' मुकाट्यानें चला ! पंचाईत करूं नका ! येथें असेच

भास होतात! ' इतक्यांत पुन्हां तो आवाज ऐकला, तेव्हां मी त्या मंडळींना ह्मणालों, ' तुह्मी मजबरोबर या, मी पुढें होतों. ' असें ह्मणून मी आवाज आलेल्या बाजूकडे जाऊं लागलों. आह्मी तिकडे निघाल्यावर बरेंच लांब गेलों. तरी आवाजही तिकडेच लांब सरकत चालला होता. अर्धा मैल गेलें, तरी जवळ आवाज ऐकूं येतच होता. इतक्यांत दुसरा एक चमत्कारिक असा मोठा आवाज ऐकूं आला. पण जवळपास तर कोणीच दिसत नव्हतें. या वेळीं सर्व मंडळी ह्मणाली, हा नाद सोडून देऊन वाटेनें चला. पण माझा शेवटपर्यंत तपास करण्याचा निश्चय झाला होता, व या वेळीं चंद्र मोहरण्याचा समयही आला होता. ह्मणून तसाच त्या आवाजाकडे मी निघालों. तेव्हां बाकीची मंडळी तेथेंच बसतों ह्मणाली, व फक्त एकटा पाटील मात्र मजबरोबर निघाला. आह्मी जसे पुढें जाऊं लागलों, तसा घाट्यांचा आवाजही तिकडे लांब सरकूं लागला. याप्रमाणें सुमारें मैलभर लांब वेरळेंत वसगडे वाटेकटे आलों. चंद्र उगवला, तेव्हां वाळवंटात गळ्यांत भली मोठी घांटी असलेला बैल उभा आहे, असें दिसलें. इतक्यांत रामोशी व सनदी मंडळीही हळू हळू आमचे मागें आली. त्या बैलास पाहतांच एक जण ह्मणाला, बघा, इतका वेळ कांहीं दिसलें नाहीं, आणि आतां बैल झालें! तेव्हां, हें असें नाहीं, ह्मणून त्यांना मी किती तरी सांगितलें; पण पटेना. शेवटीं त्यांची खात्री करण्याकरितां सारी रात्र त्या बैलावर राखण करीत राहून सकाळीं तो बैल जेथें गेला तेथें जाऊन तो खरोखरीचा बैल होता, याबद्दल सर्वांची खात्री करून दिली. रात्रीं रानांत लांबचे आवाज स्पष्ट ऐकूं येतात, व ते अगदीं जवळ झाले असें वाटतें. त्यामुळें कोणी नसतां आवाज झाले, अर्थात् ते भुताचे, असा अडाणीपणाचा समज होतो. याप्रमाणेंच कांहीं कांहीं ठिकाणीं रात्रीं दोनदोन तीन तीन मैलांवरील माणसांचीं भाषणेंही स्पष्ट ऐकूं येतात. खाड्याचे वाडीचे नजीक पूर्व बाजूस ओढ्याच्या उतरेच्या दरडीवर बसलें असतां नागांवचे चावडीवर मोठ्यानें बोललेलें कोणी माणूस जवळ बोलत आहे, असें स्पष्ट ऐकूं येतें. या दोन स्थळांत अंतर २।२॥

मैल आहे. असेंच पुष्कळ ठिकाणीं होत असतें, व त्यालाच भुताचें बोलणें मानून फसणारे पुष्कळ लोक असतात. रात्रीं एकाद्या गांवां-तील कुत्र्याचें भोंकणें ऐकलें असतां तो आवाज अगदीं जवळून आला, गांव अगदीं जवळ आलें, असें वाटतें. पण वास्तविक तसें नसतें, असे प्रवाशांना पुष्कळ अनुभव येतात.

रात्रीं अंधारांत किंवा चांदण्यांत उंच सखल प्रदेशांत जेव्हां ढगाची सावली येते व जाते, तेव्हां लहान पदार्थ फार मोठे दिसतात, व कुत्रे, शेळ्या हीं जनावरें गाढवासारखीं, ह्मशीसारखींही भासतात. यालाही पुष्कळ मंडळी भितात.

५ दिवट्या दिसणें, जाळ दिसणें, व प्रकाश दिसणें:— रात्रीं अंधारामध्यें रानांत गेलें असतां जवळपास दिवट्या पेटलेल्या दिसतात, व त्याकडे जाऊं लागलों असतां जसजसें जवळ जावें, तसतशा त्या लांब जातात. एकादे जागीं नित्य ज्वाळा दिसतात. तसेंच माणसें पुरतात, त्या ठिकाणीं किंवा स्मशानांत कित्येक वेळीं कांहीं प्रज्वलित प्रकाश दिसतात. हें खरें; पण त्यावरून पिशाचाचें अस्तित्व मानण्याचें किंवा भिण्याचें कारण नाहीं. याच्याशीं पिशाचाचा संबंध अडाणी लोकांनीं विनाकारण जोडला आहे.

मी एकदा पौर्णिमेच्या दिवशीं रात्रीं सांगलीहून तासगांवीं येत असतां तासगांवच्या माळावर जवळ जवळ चार पांच प्रकाशित दिवट्या दिसताहेत असें वाटलें, ह्मणून निरखून पाहूं लागलों, तों जमिनीपासून कांहीं उंचीवर दिवटीच्या दिव्याप्रमाणें प्रकाश दिसतो आहे, असें स्पष्ट दिसलें. ज्या प्रदेशांत या दिवट्या दिसत होत्या असें वाटलें,त्या प्रत्यक्ष जागेंत मी गेलों, तों दिवट्या लांब मागें सरकल्या.त्या फारच लांब गेल्याचें दिसलें,तेव्हां मी एका दिवटीमागें निघालों. जातां जातां शेवटीं दोन मैलांवर जों आलों, तों ती एक शेत-कऱ्याची पेटलेली आगटी असून तीच माळावरून थेट दिवटीप्रमाणें दिसत होती, अशी खात्री पटली. दुसरे दिवशीं रात्रीं पुन्हां माळा-वर जाऊन पाहिलें. आणि या दिसणाऱ्या चार पांच दिवट्या

नसून त्या अशाच लांबच्या आगट्या आहेत, अशी खात्री करून घेतली. पण त्या आगट्या त्या माळावर मात्र उगीच दिवट्यांसारखा भास उत्पन्न करीत होत्या. याप्रमाणेंच रात्रीं लांबचा दिवा किंवा प्रकाश दोन चार मैलांवरचा अगदीं जवळ दिसतो. व ज्या मानानें जवळ दिसतोसा वाटतो, त्या मानानें खरोखरी तो फार दूर असतो.

स्मशानांत व माणसें पुरल्या जागीं जे प्रकाश दिसतात, ते त्या ठिकाणीं हाडांतील फास्फरसाचें आक्सीजन वायूशीं ज्वलन चालू झाल्यामुळें उत्पन्न झालेले असतात. याची खात्री करून घेण्यासाठीं लाल बोंडाच्या व वाटेल त्यावर ओढल्या असतां पेटणाऱ्या आगकाड्यांचे पुष्कळ गूल एका स्वच्छ सफेत बाटलींत घालून त्यांत थोडें पाणी घालावें, व मग रात्रीं अंधारांत ती बाटली हालवावी, ह्मणजे प्रकाश दिसतो. हा प्रकाश उत्पन्न करणारा फास्फरस हाडांतूनच काढतात. यावरून स्मशानांत दिसणारा जाळ किंवा प्रकाश हे पिशाचाचे नसून हाडांतील पदार्थामुळें उत्पन्न झालेले असतात, हें निर्विवाद आहे. ही माहिती नसल्यामुळें अडाणी लोक त्याला भुताच्या चेष्टा असें म्हणतात.

दलदलीच्या जागीं एक जातीचे उत्पन्न होणारे वायु (ग्यास) पेटून तेथें सतत जळत असल्यामुळें ज्वाळा दिसते. तिच्याकडे जाऊं लागलें असतां ती वायूच्या हालचालीनें आपल्या शरीराच्या जाण्यानेंच लांब जाते. फार काय, आपल्या श्वासोच्छ्वासाच्या सूक्ष्म वायूनें देखील ती पलीकडे सरकते. जपून जाऊन श्वासही बंद करून तिजवर कागदाचा कपटा धरून पेटविला असतां पेटतो, असे शोधक लोकांनीं अनुभव घेतले आहेत. याला पिशाचदीपिका (इग्नीस फॅच्युअस) ह्मणतात.

६ ओसाड विहिरींतील घुमणें:—ओसाड विहिरींत कोणी विवळतें आहे, हूं—हूं करतें आहे, इत्यादि जे आवाज ऐकूं येतात, त्यास पुष्कळ लोक भितात. पण हें विवळणें जरी कित्येक वेळेस रात्रीं अगदीं माणसासारखेंच ऐकूं येतें, तरी तो आवाज अगदीं पक्ष्यांचाच असतो, अशी मी खात्री करून घेतली आहे.

याप्रमाणें पिशाचांच्या व भुतांच्या अस्तित्वाबद्दल ह्मणून पुढें येणाऱ्या या अनुभवांचा तपास करूं लागलें असतां यांत भुतांचा किंवा पिशाचांचा मुळींच पत्ता लागत नाहीं.

कोणी म्हणतीलः " या पिशाचांच्या क्रिया नसतील तर नसोत, पण पिशाच मनुष्याच्या अंगांत येतें, तें मनुष्य नाचतें, झाडावर चढतें, कांहीं अद्भुत वाटणाऱ्या सत्य गोष्टी सांगतें, अमावास्या व पौर्णिमा या तिथींलाच तें येतें, या गोष्टी पुष्कळांच्या अनुभवाच्या आहेत. अशा या खरोखरी पिशाचाच्या प्रत्यक्ष पुराव्याच्या गोष्टी पुढें असतांना पिशाचाच्या अस्तित्वाबद्दल शंका घेणें रास्त नाहीं. " या लोकांच्या म्हणण्याचा आतां विचार करूं.

अंगांत येणें.

अंगांत येतें, तेव्हां नेहमींच्या अशक्त मनुष्याच्या अंगांत ताकत आलेली दृष्टीस पडते. ऊद घातला असतां त्याच्या पुन्हा अंगांत येतें. तें आपलें नांव गांव सांगून ओरडतें. अशा क्रिया अमावास्या व पौर्णिमा या कालीं नियमित घडतात,व कित्येक वेळीं अंगांत आलेलें माणूस घडलेल्या व घडणाऱ्या गोष्टी बरोबर सांगतें. यामुळें हा भुतांचाच परिणाम आहे, अशी ज्यांची समजूत आहे, त्यांनीं सृष्टशास्त्रांतील कांहीं गोष्टी समजून घेण्याची थोडी दगदग सहन केली, तर ह्या त्यांच्या पैशाचिक क्रियांचा व अमावास्यापौर्णिमेचा शास्त्रीय संबंध त्यांच्या ध्यानांत येईल. आणि यांतील अद्भुत वाटणाऱ्या गोष्टींचे कार्यकारणभावही कळून त्यांच्या निष्कारण भोळेपणाच्या समजुतीही दूर होतील. आणि त्या तशा दूर झाल्यावांचून विशिष्ट तऱ्हेचें धाष्टर्यही त्यांना येणार नाहीं.

नियमित वेळीं शरीरांतील कांहीं क्रियांत बदल होणें ही क्रिया खरोखरी पिशाचाचीच आहे कीं काय, हें प्रथम पाहून मग अमावास्येचा संबंध पाहूं. रोज आपणाला नियमित वेळीं झोंप येते, भूक नियमित वेळीं लागते, व शौचासहि नियमित वेळीं होतें. या क्रिया आह्मी भुतांच्या ह्मणून कधीं समजतों काय ! अशा नियमित

वेळीं होणाऱ्या क्रिया नेमल्या वेळीं त्या त्या क्रिया दर्शविणाऱ्या अंतींरिंद्रियांत विशिष्ट तऱ्हेची चेतना किंवा जागृति अगर शैथिल्य उत्पन्न झाल्यामुळें भासतात. या उत्पन्न होण्याला ज्ञानतंतु किंवा, ज्यांना पूर्वीच्या लोकांनीं नाड्या अशी संज्ञा दिली आहे, त्या शरीरांतील मज्जारज्जूच कारण आहेत. हींवही नियमित काळीं येत असतें. तें एक दिवसाआड, दोन दिवसांआड, तीन दिवसांआड किंवा चातुर्थिक (चवरें) असतें; पण हींव ह्मणजे कांहीं पिशाच नव्हे. अर्धशिशीनें मनुष्याचें डोकें दुखतें, तें नियमित वेळीं सुरू होतें व नियमित वेळीं थांबतें. तें कांहीं पिशाचाचें नव्हे ! याचप्रमाणें अमावास्यापौर्णिमांना येणारें फेंपरें, बेशुद्धि, किंवा उन्माद हे कांहीं पिशाचाचे विकार नव्हेत. यांच्या कारणांचा उलगडा येणेंप्रमाणें आहेः—

अमावास्या व पौर्णिमा या तिथींला द्रवाधिक्य असलेल्या सर्व स्थावर जगंम वस्तूंत विशिष्ट तऱ्हेचें क्रियांतर होत असतें. व तें विशिष्ट परिस्थितींतच ज्ञात होतें. या सर्वांला सूर्य व चंद्र हेच कारण आहेत. समुद्रांत हा फरक सर्वांना स्पष्ट समजतो. समुद्राला भरती व ओहटी येते. सूर्य व चंद्र यांचे हे आकर्षणाचे परिणाम द्रवरूप पदार्थांवर सारखे घडत असतात. आणि सर्व द्रवपदार्थांप्रमाणें मनुष्याच्या शरीरांतील रक्ताला देखील अशी भरती व ओहटी येत असते. आणि त्यामुळें पैणीसारख्या विकारांत त्यांतून द्रव (लस) वाहण्याचें प्रमाण चंद्राच्या तिथीशीं आपला संबंध दाखवितें. भरती ओहटीप्रमाणें रुधिराच्या गतींतही बदल होतो, व शरीरांतील उष्णतामानांतही फरक पडत असतो.

रक्ताप्रमाणें चंद्रसूर्यादिक आकाशस्थ गोलांच्या आकर्षणाचा व प्रकाशकिरणांचा परिणाम मनुष्याच्या ज्ञानतंतूंमधून वहात असणाऱ्या सूक्ष्म द्रव्यावरही घडतो. पण तो नेहमीं आपल्या अनुभवांत येत नाहीं. आपलें हृदय केवढ्यानें तरी रोज उडत असतांना डब् डब् असा सारखा आवाज करितें; पण तें सुद्धां आपणास कळत नाहीं. दुसऱ्याच्या छातीजवळ कान लावून

पाहिला, ह्मणजे याची खात्री पटते, किंवा धांवून पळून आलें असतां आपणास भासतें, किंवा धडधडीचा (पाल्पिटेशन ऑफ दी हार्ट) विकार झाल्यास समजतें. याप्रमाणेंच ज्ञानतंतूंवर घडलेला परिणाम समजण्यास सुद्धां तो घडला हें अगदीं स्पष्टपणानें समजण्यासारखी त्याची उत्तेजकता किंवा ग्रहणशक्ति जागृत झालेली असावी लागते. उदाहरणानेंच हें आपण पाहूं. दहा मंडळी जर भुयारांत कोंडून ठेविली, तर त्यांना सूर्योदय झाला हें कांहीं समजणार नाहीं. पण त्यांतच अर्धशिशीचा मनुष्य असेल, तर त्याला मात्र सूर्योदयाबरोबर ठणका उठेल. येथें सर्वांवर सूर्योदयाचा जरी सारखा परिणाम झाला आहे, तरी एकाच्या ज्ञानतंतूंच्या ग्राहक शक्तीमुळें तो त्याला असह्य वेदना उत्पन्न करीत आहे. व बाकीच्यांच्या ज्ञानतंतूंस त्याची दादही नाहीं. कारण सर्वांच्या ज्ञानतंतूंची स्थिति सारखी नाहीं. एकाच्या ज्ञानतंतूंजवळ असा कांहीं विकार—किंवा तेथें नको असें कांहीं तरी—आलें असल्यामुळें त्या ठिकाणच्या ज्ञानतंतूला आपली सर्व शक्ति एकवटून त्याच्या प्रतिकाराकरितां सदोदित जागृत रहावें लागत असल्यामुळें त्या मनुष्याला मात्र हे परिणाम अनुभवास आले. याचसारखे सूर्यचंद्रांचे जे परिणाम मेंदूवर व ज्ञानतंतूंवर अनुभवास येतात, त्यांलाच आपण पिशाच समजतों. पुरुषांपेक्षां बायकांच्या अंगांत जास्त येतें. ह्मणजे बायका असे विकार होण्यास जास्त पात्र असतात. कारण त्यांच्या गर्भाशयाशीं चंद्राच्या गतीचा विशेष संबंध असतो. ज्या स्त्रियांना असा अंगांत येण्याचा विकार झालेला असतो, त्यांच्या गर्भाशयांतील ज्ञानतंतु उत्तेजित झालेले असतात, किंवा मस्तकांतील कांहीं ज्ञानतंतु उत्तेजित झालेले असतात. अंगांत येण्याचा दिवस नसतांनाही ओटीपोटावरील भागाला घर्षण झाल्यानें किंवा दुसऱ्या कांहीं उपायांनीं त्यांत जागृति येईल असें केल्यानें ताबडतोब अंगांत येतें. तसेंच मस्तकांतील विकारानें जागृत असलेले ज्ञानतंतु उत्तेजित होतील अशी थोडी क्रिया झाली, तरी देखील त्यांच्या अंगांत येतें. विशिष्ट तऱ्हेचा आवाज किंवा वास

यांना उत्तेजकता देतो, व त्यामुळें आरतीच्या वेळच्या झांजेसारखे व ढोलासारखे सतत होणारे आवाज आणि उदासारखे धूपाचे वास स्वाभाविकपणेंच त्यांच्या अंगांत आणतात.

वरील पद्धतीनें किंवा दुसऱ्या उपायांनीं एखाद्याची ज्ञानतंतूंची शक्ति अपरिमित उत्तेजित झाली असतां कित्येक प्रसंगीं स्वाभाविकपणेंच अतींद्रिय किंवा अद्भुत शक्ति उत्पन्न होऊन जें इतरांना ऐकूं येत नाहीं तें त्याला ऐकूं येतें, किंवा जें लोकांना दिसत नाहीं तें त्याला दिसतें. तो भिंतीच्या पलीकडील घरांतील बंद केलेल्या पेटींतीलही वस्तु पाहूं शकतो, किंवा दहा पांच मैलांवरील लोकांची माहिती अगर भाषणही प्रसंगोपात्त अगदीं बरोबर जसेंच्या तसेंच सांगतो. अशा तऱ्हेची शक्ति मनुष्याच्या मेंदूंतच आहे. (त्याबद्दल स्वप्नमीमांसा पुस्तकांत पान ३४ ते ४२, मोहिनीविद्येचा शिक्षक या पुस्तकांत पान ५३ व १४६ ते १५६, व मेस्मेरिझम या पुस्तकांत पान ११० ते १४० यांत मी विवेचन केलें आहे, तें पहा.) याप्रमाणें असतां, या गोष्टीला नसतें पैशाचिक कारण जोडून त्याचा बाऊ करणें हें ठीक नाहीं.

अंगावर बिब्बा पडणें.

कोणी ह्मणतील, अंगांत येण्यासंबंधानें तुमचें वरील ह्मणणें ठीक आहे. पण रात्रीं बिछान्यांत ओळीनें चार पांच माणसें निजलीं असतां अंगावर बिब्बा पडतो, तें तरी खरेंना ? जर पिशाच्च नाहीं, तर बिब्बा कसा पडतो ? या बिब्याच्या गोष्टीचा आतां विचार करूं. आपणाला स्वतः कष्ट घेऊन या गोष्टींचा शोध लावण्याची इच्छाच नसते, यामुळें खऱ्याचा पत्ता लागत नाहीं. मजसमोर अशा केसेस आल्या असतां मी जें कांहीं पाहिलें, मला जो कांहीं तपास लागला, व जे कांहीं अनुभव आले, त्यांचा सारांश याखालीं दिला आहे.

१ एखाद्या घरांतील अडाणी व मतलबी बायकांना एखाद्यावर आपला कांहीं विशेष धाक किंवा दाब ठेवावयचा असल्यास त्या चोरून

निजलेल्याला बिब्बा घालतात, व एखाद्या साथीदार बाईकडून अगर स्वतः बंदोबस्त करविल्याचें ढोंग करतात.

२ कित्येक वेळेला मतलबी माणसें कांहीं विशिष्ट हेतूनें आपले आपणच मुकाट्यानें बिब्बा घालून घेऊन भुतानें रात्रीं घातला ह्मणून सांगून भुताचें स्तोम माजवितात.

३ कित्येकांस निद्राभ्रमाची संवय असते. त्या भ्रमांत ते बिब्बा घालून घेतात, आणि सकाळीं भुतानें बिब्बा घातला असा बोभाटा होतो!

४ मजकडे एक गरीब मुसलमानीन औषधास येत होती. ती व तिच्या घरची सर्व मंडळी साळसूद होती. तिनें आपल्या अंगावर बिब्बा पडत असल्याचें सांगितलें, तेव्हां मी तिच्या पाळतीवर एकसारखा चार रात्रीं दिवा ठेवून जागत बसत होतों. त्या खोलींत ती बाई, तिचा नवरा, व तिची ह्मातारी सासू, इतके निजत असून मी जागत बसणारा चवथा एवढींच माणसें होतों. चवथे दिवशीं शनिवार व अमावास्या होती. त्या दिवशीं दुपारींच ती बाई बिब्बा पडेल ह्मणून भ्याली होती. रात्रीं सुमारें एक वाजतां ती झोपेंतच चुळबुळ करूं लागली. यानंतर ती आपल्या पोटाला कोठें तरी उठलेली खाज चोळते आहे असें दिसलें. थोडयाच वेळानें ती आग झाली ह्मणून उठली, व तिच्या वात्यावर तीन ठिकाणीं बिब्बा पडल्याचे डाग दिसले. तेव्हां मी याचा बंदोबस्त करतों ह्मणून सांगून तिला जवळ ठेवण्यास उगीच एक मुळी दिली, व पोटांत घेण्यास सल्फर व सीपिया हीं औषधें दिलीं. त्यानंतर असा डाग तिला पडला नाहीं. त्या बाईच्या वात्या पोटाला झोपेंत खाज उठे, व त्या ठिकाणीं ती अंगावरच्या चिरगुटानेंच सडकून खूप जोरानें झोपेंतच घासून घासून, शाळेंत मुलें कपाळावर कधीं कधीं माती उठवितात, तसले काळे डाग पाडून घेई, आणि त्यासच बिब्बा पडला असें ती समजे.

याप्रमाणें बिब्याच्या फुल्या किंवा डाग पडण्याशीं पिशाचाचा लावलेला संबंध चुकीचा आहे.

दिवसा भूत दिसणें.

कोणी ह्मणतील: या संशयित व रात्रीच्या गोष्टी राहूंद्या. पण जागेपणीं दिवसा आणि कित्येक मंडळींसमक्ष एकाद्यास आरशांत केव्हां केव्हां भूत दाखवितात, व तें बोलतें, आणि कित्येक वेळीं आरशा-शिवायही एकाद्यास कोणी जवळ बसलेलें भूत दाखवितात. हें कसें घडतें, याचा उलगडा बऱ्याच तऱ्हेनें स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या सजेशनचे परिणाम व सूचना चिकित्साशास्त्रनियमानें घडून व विशेष दृष्टी उत्पन्न होऊन त्या नियमानें कशा घडतात, याची साग्र माहिती मेस्मेरिझम या व ' मोहिनी विद्येचा शिक्षक ' या पुस्तकांत मी सशास्त्र व सप्रयोग सांगितली आहे. त्यावरून पिशाचशक्ती-वांचून या गोष्टी घडतात, अशी खातरी पटेल.

पिशाचाची भीति व्यर्थ आहे.

पिशाचाच्या ह्मणून पुढें येणाऱ्या सर्व गोष्टी वरप्रमाणें लबाडी, भ्रम, अज्ञान व दुसऱ्या कांहीं कारणानें निर्माण झालेल्या असतात, यांत कांहीं संशय नाहीं. ह्मणून अशा कांहीं ऐकीव किंवा समक्ष अनुभवास आलेल्या गोष्टींवरून पिशाचाची कल्पना करून व्यर्थ भीति बाळगणें यासारखा दुसरा मूर्खपणाच नाहीं, हें प्रत्येकानें ध्यानांत ठेवावें. पिशाचाची भीति कल्पनांनींच फार वाढविलेली आहे. त्याबद्दल भिण्याचें केव्हांही कारण नाहीं. जर पिशाच असतें, तर तें दिवसा येण्यास कां भितें? तें चार पांच माणसांत कां येत नाहीं? त्याला अंधारच कां लागतो? यावरून हें सर्व पिशाचाचें बंड अंधार व कल्पना यांच्या मिश्रणानेंच उत्पन्न झालें आहे. ह्मणून **भूतपिशाचाबद्दल बिलकूल भीति बाळगण्याचें कारण नाहीं**. यदाकदाचित् जरी असें नांव दिलेली एकादी सूक्ष्म शक्ति सृष्टींत आहे, असें समजुतीसाठीं क्षणभर मानलें, वस्तुतः मानण्यासारखा भक्कम पुरावा समोर आल्या-शिवाय असें मानतांच येत नाहीं,—यद्यपि आमच्या वरील सिद्धांताला कमीपणा येतो कीं काय, हें पाहण्यासाठीं गृहीत धरलें,

तरी सुद्धां आमच्या चालू कार्यांत तिजकडून कांहीं अडथळा येण्याचें बिलकूल कारण दिसत नाहीं. म्हणुन आपण एक केसभरही न भितां धारिष्टानें या पिशाचाच्या खोटया भीतीचा नायनाट केला पाहिजे, हेंच खरें आहे, असें तत्त्व निघतें.

आहे नाहीं ह्मणणारीं दोन मतें.

केव्हांहीं पिशाचास भिण्याचें कारण नाहीं, हें वरील तत्त्व जरी अक्षरशः खरें आहे, तरी एवढयावरून नवीन शिक्षणाबरोबर समजून आलेल्या सृष्टिशास्त्रज्ञानाच्या सिद्धांतावरच केवळ आजपर्यंत ज्याच्या अस्तित्वाबद्दलची समजूत दृढमूल झालेली आहे, अशी कांहीं एखादी शक्ति (भूत पिशाच) कधीं काळीं कोणाच्या अनुभवास आलेली नसेलच, आणि पूर्व कालचीं अनुभव सांगणारीं सर्वच माणसें अज्ञानी व खोटीं असतील, असें म्हणणें विचारी माणसास योग्य दिसत नाहीं. तरी पूर्ण विचार न करितां अशी कांहीं सूक्ष्म शक्ति नाहीं, व असणेंही शक्य नाहीं, असा सिद्धांत ठोकून देणारे कांहीं लोक आहेत. आणि याच्या उलट ज्यांना रात्रीं दिवसा जेथें तेथें भुताची भीति जरी वाटली नाहीं, तरी भूत पिशाच म्हणून कांहीं आहे, असें त्याचें अस्तित्व मानणारेही पुष्कळ लोक आहेत. याप्रमाणें एक भूत मानतात व एक भूत मानित नाहींत, अशा या दोन पक्षांतील लोकांच्या ज्ञानाचा विचार करून त्यांच्या ज्ञानावरून कोणता पक्ष खरा ठरतो हें पाहूं.

एक पक्ष अंधपरंपरेनें पूर्वजांनीं मानलें आहे ह्मणून त्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या जुन्या मताचा आहे. व दुसरा पक्ष सृष्टज्ञान व त्याचा अनुभव घेणाऱ्या शास्त्रशोधकांच्या सांगण्यावर प्रत्यक्ष प्रमाणानें विश्वास ठेवणाऱ्या नव्या मताचा आहे.

शिक्षण, परिस्थिति व त्याप्रमाणेंच उत्पन्न होणारे विचार, यांच्या योगानेंच या दोनही लोकांचीं मतें बनलेलीं आहेत. ह्मणून या दोनही मार्गानें दोन तऱ्हेच्या समजुती धारण करणारांना आपणाला दोष देतां येत नाहीं. कारण या दोनही वर्गांच्या लोकांतील सम-

जुती अशा असणें हें रूढ मार्गाला अनुसरून आहे. एकांनीं केवळ वडील आप्त वाक्यावर श्रद्धा ठेविली आहे. तेव्हां तो मार्गही बरोबरच आहे. व दुसऱ्यांनीं केवळ नवीन सृष्टशास्त्रशोधकांवर व स्वतःच्या ज्ञानावर विश्वास ठेवला आहे. तेव्हां हाही मार्ग बरोबर आहे.

आतांच्या या आप्तांमध्यें भौतिक शास्त्रज्ञानाचा अधिकार आहे. पूर्वीचे आप्तांत तपोबलाचा अधिकार होता. या आतांच्या आप्तांना आपण लोकांना अज्ञानांतून काढावें, अशी इच्छा आहे. व पूर्वींच्या ऋषिरूप आप्तांचीही सर्वांना ज्ञान प्राप्त व्हावें अशीच खटपट होती. हल्लींचे आप्त संसारी, तर पूर्वींचे विरक्त होते. हल्लींच्यांची सर्व मदार प्रत्यक्ष इंद्रियज्ञानावर, तर पूर्वींच्यांची सर्व मदार अंतारिंद्रियज्ञानावर होती. या गोष्टींचा विचार मनांत आला असतां या पूर्वींच्या शोधकांच्या आप्तवाक्यावरील श्रद्धाही खोटी ह्मणतां येत नाहीं. व नवीन जडशास्त्रांच्या नियमानें सुसंस्कृत होत असलेल्या लोकांच्या विचाराला अनुसरणेंही गैर मानतां येत नाहीं. असा विचारांचा घोटाळा उत्पन्न होतो. परस्परविरोधी असणारीं दोनही मतें सत्य मानतां येत नाहींत. व एकाचेही पदरांत खोटेपणाचें माप टाकण्याला निःपक्षपाती व विचारी माणसाला जागा दिसत नाहीं. अशा स्थितींत या पिशाचाच्या कोड्याचा विचार करण्यासाठीं आपणाला प्राचीन काळांतिल लोकांपासून तों अर्वाचीन काळांतील सुधारलेल्या शास्त्रज्ञ लोकांपर्यंत पैशाचिक समजुतींचा व प्रयोगांचा शोध करीत आलें पाहिजे.

स्वाभाविक माहिती.

अगदीं आरंभीं अज्ञात अशा रीतीच्या व न समजणाऱ्या (भूत पिशाच यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या) त्रासांतून मुक्त होण्याकरितां काय उपाय करावा, याचा विचार सांगणाऱ्या लोकांना देवऋषि ह्मणूं लागले असावेत. ते देवासारखे अद्भुत दिसणारे सामर्थ्यवान असून, त्यांची वर्तणूक ऋषींसारखी पवित्र असल्यामुळें, त्या महात्म्यां-

घ्या उपायांपासून अशा त्रासांतून सुटका करून घेण्याचा मूळ मार्ग सांपडल्यामुळें पुढें असे उपाय करणाऱ्या सर्वांना देवऋषि असेंच नामाभिधान प्राप्त झालें असावें. या वेळीं आरंभींचा भूत-पिशाचपीडा निवारण्याचा उपाय ह्मणजे पांच अक्षरांचा मंत्र असावा, व त्यावरून अशांना दुसरें नांव पंचाक्षरी हें पडलें असावें. व पुढें पिशाचासंबंधीं उपाय करण्याचा धंदा करणाऱ्या सर्व मांत्रिक वर्गाला पंचाक्षरी याच नांवानें संबोधूं लागले असावे.

ज्याप्रमाणें शारीरिक कारणानें अस्वास्थ्य उत्पन्न होतें, किंवा मानसिक कारणानें अस्वास्थ्य उत्पन्न होतें, त्याप्रमाणें याव्यतिरिक्त कारणांपासून, ह्मणजे पिशाचापासून, मानसिक व शारीरिक बिघाड झाला असतां त्याला लागीर ह्मणत असत. या लागीरांत इतर कोणतेही विकार असले, तरी भ्रम, झापड व तंद्रा, हीं लागीराचीं मुख्य लक्षणें मानीत. याच्या उलट ज्याच्या शरीरांतील चेतना उत्तेजित झाली आहे, व त्या योगें जो बडबडतो आहे व धांवतो आहे, त्याला पिशाचानें पछाडिलें असें मानीत; ह्मणजे ज्याच्या शारीरिक व मानसिक शक्तीची उत्तेजकता स्वाभाविक स्थितीपेक्षां जोरदार व्यापार करणारी झाली असेल (टॉनिक स्पाम्स), त्याच्या शरीरांत पिशाचानें प्रवेश केला आहे, असें मानीत; व ज्याची शारीरिक व मानसिक शक्ति स्वाभाविक शक्तीपेक्षां स्तब्ध, क्षीण किंवा ढिली दिसत असेल, त्या विकृतीला लागीर ह्मणत. तसेंच भुताचा प्रत्यक्ष प्रवेश न होतां त्याच्या इच्छाशक्तीचा परिणाम घडून शारीरिक मंदपणा वाढला असतां त्यास झपाटा झाला असें मानीत.

मानसिक व शारीरिक शक्तीच्या मलूल व चलाख, स्तब्ध व उत्तेजक, अशा या ज्या दोन स्थिति आहेत, त्या येण्याला ज्ञानतंतूंची विशिष्ट स्थिति कारण आहे. व अशी ही स्थिति होण्याला ज्या वेळीं कांहीं दृश्य व समजुतींत येणारें कारण आढळत नाहीं, त्या वेळीं पैशाचिक कारण समजून त्याचा उपाय करण्याकडे

प्रवृत्ति होणें स्वाभाविक आहे. व त्याप्रमाणें पूर्वीच्या वैद्यशास्त्रविशारदांना देखील ज्ञानतंतूंच्या व मेंदूच्या विकारांत कांहींचीं कारणें आपल्या आयुर्वेदमर्यादेबाहेरचीं वाटून, तशा विकारांना त्यांनीं भूतोन्माद व बालग्रह अशीं नांवें ठेवून, नुसत्या ज्ञानतंतूंमधील शारीरिक बिघाड असल्यास तो दुरुस्त व्हावा अशीं औषधें सांगून, जर त्यापासून तो दूर न होईल तर मंत्रतंत्रादि गूढ शास्त्रांतील उपाय करावे, असें सांगितलें आहे. यावरून ज्ञानतंतूंचे व मेंदूचे विकार ह्मणून जे आज आपणापुढें आहेत, व ज्यांना फेंपरें, वेड, भ्रम, अपस्मार, बेशुद्धि, इत्यादि नांवें मिळतात, अशा विकारांप्रमाणें अनुभवास येणाऱ्या कांहीं विकारांत या शरीराच्या ठिकाणीं कांहीं दृश्य विकार किंवा कारण नसतांना कांहीं काल विकृति उत्पन्न करणाऱ्या कारणाला–शक्तीलाच–त्या वेळीं भूत किंवा पिशाच मानलें आहे, असें दिसून येईल. सायंकाळीं किंवा भलत्या एकाद्या वेळीं, ह्मणजे भर बारा वाजतां, रात्रीं, निर्मनुष्य, ओसाड किंवा भयंकर स्थळीं, हलक्या मनाचीं ह्मणजे स्त्रिया किंवा मुलें एकटीं गेलीं ह्मणजे, किंवा अंगावर कढत पाणी घेऊन न्हाऊन गेलीं ह्मणजे, किंवा वस्त्राभरणांनीं शृंगारलेल्या स्थितींत गेलीं ह्मणजे, त्यांच्यावर भुताखेताची नजर पडते, किंवा झपाटा लागतो, अगर लागीर होतो. अशा वेळीं भूत पिशाचाचा कांहीं विशेष अपराध झाल्यास अगर त्याचा पूर्वीचा कांहीं अपराध झाला असल्यास, तें अशा वेळीं अंगांत शिरतें, असें मानीत असत, व हल्लींही कांहीं मानतात. ज्या ज्या वेळीं असें अंगांत शिरलेलें पिशाच किंवा भूत एखाद्याच्या शरीरांत आपण संचार केला आहे, असें दिसण्यासारखी त्याच्या शरीरव्यापारांत गडबड उडवितें, त्या त्या वेळीं त्यास अंगांत आलें असें ह्मणतात. ज्याच्या अंगांत आलें असतें, त्यास झाड ह्मणतात.

जेव्हां भूत किंवा पिशाच यांचा परिणाम फार जोराचा दिसत नाहीं, किंवा तो परिणाम खरोखरी भूतपिशाचाचाच आहे, अशी पूर्ण खात्री नसते, अशा वेळीं पिशाचाविष्ट (घेरलेल्या) मनुष्याला थोडासा

मंत्राचा अगर देवाचा अंगारा लावितात, किंवा भाकर, चटणी [illegible] दहीभात, लिंबू, यासारखे थोडके पदार्थ उतरून टा[illegible] जास्त झपाटा असेल, तर भूर्जपत्रावर यंत्रें काढून तीं पंचरंगी रेशमांत बांधुन ती भालदोरी (भारलेली दोरी) किंवा तें यंत्र पेटींत अगर ताईतांत घालून तो ताईत गळ्यांत किंवा दंडांत बांधितात. हीं यंत्रें लिहिण्यास गोरोचन नांवाचा गाईचे शरीरांत मिळणारा पदार्थ, मृगाचे नाभींत सांपडणारी कस्तुरी, वगैरे पदार्थ उपयोगांत आणीत असतात.

ज्या वेळीं पिशाच अंगांत येऊन छळीत असतें, त्या वेळीं त्याला ऊदाचा किंवा दुसऱ्या कांहीं पदार्थांचा धूर (धुपारा, धूप) देऊन त्यास बोलवीत असतात; अगर वेताच्या भारलेल्या छडीनें अगर वनस्पतीच्या काठीनें त्रासवून बोलवून अंगांतून काढीत असतात. कित्येक वेळीं पिशाच प्रत्यक्ष अंगांत न येतां आपल्या झाडाला बाहेरूनच भीति दाखवितें, त्रास देतें, त्याच्या अंगावर निशाण्या करतें, किंवा कांहीं पदार्थ टाकतें; त्या वेळीं या सर्व कृत्याला चेष्टा, चेटूक किंवा करणी ह्मणत असतात. चेटूक याचा दुसराही एक अर्थ आहे. एकाद्याच्या घरांतील खाण्याचे पदार्थ, किंवा ताक करतांना त्यावरील लोणी, व धार काढतांना दूध, व मळणी करतांना दाणे, इत्यादि पदार्थ कमी होतात. व ते सर्व भूत कोणास तरी नेऊन देतें, अशी पुष्कळांची समजूत असून यालाही चेटूक मानतात. भूत पिशाचापासून कोणत्याही रीतीनें होणारा त्रास, तें भूत काढून किंवा तें भूत कुपींत गाडून देवऋषीपणा करणारा किंवा पंचाक्षरी कमी करतो; अगर आपल्या शक्ती बाहेर वाटल्यास एखाद्या देवाच्या सेवेस लागण्यास सांगतो.

याप्रमाणें भूत शक्तीच्या समजुतीचा व प्रतिकाराचा स्वाभाविक इतिहास मिळतो. सर्व देशांतील सर्व लोकांत जवळ जवळ अशाच पद्धति आहेत. या पद्धतींमधून सर्वसामान्य समज काय निघतात, हें आपण आतां पाहूं.

सामान्य समज.

भूत किंवा पिशाच हें इतर सजीवांप्रमाणें देहधारी नाहीं. त्यांचें स्वरूप जडात्मक नाहीं. तें वायुरूप आहे. त्याचा परिणाम ज्ञानतंतूंवर व मेंदूवर होतो. आणि तो होण्यास योग्य अशी मेंदूची व ज्ञानतंतूंची स्थिति असावी लागते. तशी स्थिति स्वभावतःच मुलें व स्त्रिया यांची असते. आणि एकटेपणा व भयाण जागा या गोष्टी ही स्थिति वाढविण्यास कारण असतात. ऊन पाण्याचे न्हाण्याच्या योगानें उत्तेजित झालेलें शरीर व शृंगारयुक्तपणाचे योगानें उत्तेजित झालेलें मन पैशाचिक शक्तीचे परिणाम होण्याला जास्त पात्र होतें. आणि त्यांतच पैशाचिकपरिणामकारक ठरविलेल्या वेळाची भर पडली असतां पिशाचाचें आधिवेशन होण्याला वेळ लागत नाहीं. हीं पिशाचें इच्छाशक्ति धारण करणारीं, वाटेल तसें स्वरूप दाखविणारीं, व जड वस्तूंना चलन देणारीं असून मनुष्याला जरी त्रास देणारीं असतात, तरी विशिष्ट प्रतीच्या व विशिष्ट ज्ञानाच्या मनुष्यांच्या सामर्थ्यापुढें लीन व मऊ असतात. असे अगदीं भोळ्या व अडाणी लोकांपासून तों पिशाच आहे असें मानणाऱ्या सुशिक्षितांपर्यंत सर्वांचे समज आहेत. व सर्वांतील पिशाचशक्त्यनुभवाविषयींच्या प्रयोगपद्धति सुद्धां हेंच दाखविणाऱ्या आहेत.

प्रयोगपद्धतींचें दिग्दर्शन.

पिशाच शक्तींवर ताबा ठेवण्याचा, किंवा त्या शक्तीचे अनुभव घेऊन त्यापासून फायदा करून घेण्याचा उपक्रम करणाऱ्या कांहीं पद्धति सर्व देशांतील लोकांत आहेत. उदाहरणार्थ, कांहीं लोकांतील पद्धति आपण पाहूं.

मुसलमानांत १ मालाचलन, २ हजरत लावणें या आहेत.

हिंदूंत १ पात्रांदोलन, २ करपुतळी, ३ अंजन, ४ आदर्शनिरीक्षण, ५ कर्णपिशाच, इत्यादि पद्धति प्रचलित आहेत.

आणि **पाश्चिमात्त्यांत** १ क्रिस्टल गेझिंग [मणिनिध्यान], २ टेबल टिपिंग, ३ लँचिटी, ४ सायकोग्रॅफी–स्पिरिट रायटिंग [पिशाचलेखन], इत्यादि जातीचे प्रयोग आहेत.

१ मालाचलनः—एखादी जपाची स्मरणी एखाद्या मोळ्याला अधांत्री लोंबत ठेवून फकीर किंवा वृद्ध सत्त्वस्थ मुसलमान मनुष्य त्यावर बोट ठेवून एकाग्र मन करून एखाद्या मृताच्या स्मरणानें किंवा पिराच्या स्मरणानें तिला चलन मागतो; त्यांत विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर होय असें असेल तर पूर्वपश्चिम चलन, व नाहीं असें असेल तर उत्तरदक्षिण चलन द्यावें, असें ह्मणतो. अशा तऱ्हेनें त्या वेळेपुरती अदृष्टाशीं संकेतभाषा ठरवून संभाषण सुरू करितात.

२ हजरत लावणें:—मुलाच्या आंगठ्याच्या नखास शाई किंवा काजळ लावून त्यांत पहाण्यास सांगून आंत पिशाच, पीर, देवता, इत्यादि हजरत दिसूं लागली कीं, त्यावरोबर संभाषणास सुरवात करून त्या अदृष्ट व्यक्तीकडून माहिती मिळवितात.

३ पात्रांदोलनः—ज्यांचीं लग्नें झालीं नाहींत, अशा कुमारी मुली व लहान मुलगे सरासरी आठ ते बारा वर्षांपर्यंतच्या वयाचीं पाहून त्यांना स्नान घालून एका पत्रावळीवर तांदूळ पसरून त्यावर भरलेली पाण्याची घागर ठेवून तिच्या सभोंवार एकीकडे तीन मुली तर दुसरीकडे पांच मुलगे, अगर पांच मुली तर तीन मुलगे, अशीं विषम संख्येनें बसवितात. आणि पूर्वीं मृत झालेल्या नामांकित थोर पूर्वजांची अगर एखाद्या साधुपुरुषाची किंवा देवतेची प्रार्थना करून त्या घागरीवर अक्षता टाकून त्या घागरीच्या मध्याला त्यांच्या फक्त अंगुलीचा स्पर्श करून बसण्यास सांगतात; व प्रश्नाच्या होनाहींपणाबद्दल डावा किंवा उजवा डोल मागतात; व त्यावरून कार्याचा परिणाम समजतात. अशा वेळीं कोणाच्या शरीरांत संचार झाल्यास त्याच्या तोंडावाटेही माहिती मिळवितात.

आणि कांहीं ठिकाणीं प्रश्नोत्सुक माणसाला त्या घागरीच्या तोंडावर पाट ठेवून शरीर तोलून बसण्यास सांगतात, असेंही मी पाहिलें आहे.

४ करपुतळी—हाताला लोणी व काजळ लावून किंवा थाळ्यास काजळ लावून त्यांत लहान मुलास अगर मुलीस त्या देवगणाच्या निवडून पाहण्यास सांगतात.

५ अंजनः—जुन्या उलूक, काक,मयूर, इत्यादि कल्पांत सांगितलेल्या निरनिराळ्या विशिष्ट पद्धतींनीं तयार केलेलें काजळ (अंजन) हातास लावून, पायाळू मनुष्यास त्यांत पाहण्यास सांगून, त्या ठिकाणीं अदृष्ट व्यक्तीकडून प्रश्नांचीं उतरें किंवा त्यांचा देखावा पाहून घेतात.

६ आदर्शनिरीक्षणः—भिंगाला रंग अगर काजळ लावून काळ्या केलेल्या आरशाला त्रिकालदर्शी आरसा असें नांव देऊन त्याच्या मध्यभागीं पैशाएवढ्या जागेस तेल लावून, तेजःपरावर्तक वर्तुल करून त्यांत पुढें ठेवलेल्या दिव्याच्या पडलेल्या प्रतिबिंबित दीपशिखेवर नजर ठेववून, लहान मुलामुलींना पाहण्यास सांगून, एखाद्या अदृष्ट व्यक्तीच्या दर्शनानें माहिती मिळवितात.

७ कर्णपिशाचः—कोणतीही एखादी अज्ञात गोष्ट किंवा हकीकत आपण विचारली असतां पिशाचानें आपल्या कानांत येऊन सांगावी, ह्मणून कांहीं विशिष्ट विधीच्या साधनानें त्यास आपल्या स्वाधीन करून घेण्याची एक पद्धत आहे.

८ पिशाचवशीकरणः—मृत देहाला पुरलेलें उकरून काढून त्यावर कांहीं विशिष्ट विधियुक्त संस्कार करून अगर दुसऱ्या साधनांनीं वाटेल तेव्हां त्यानें आपल्या जवळ यावें, व मागूं ते पदार्थ आणून द्यावे, अगर आपलें काम करावें, अशासाठीं त्या पिशाचास वश करून घेत असतात.

९ अंगांत आणणें:—एखाद्या मनुष्याच्या अंगांत आपल्या स्वाधीन असलेल्या पिशाचाचा संचार करविणें, किंवा त्याच्या शरीराशीं

संबंध असलेल्या पिशाचाकडून त्याच्या शरीरांत संचार करविणें, व त्या द्वारें माहिती मिळविणें, याला अंगांत आणणें ह्मणतात.

१० **क्रिस्टलगेझिंग**:—(मणिनिध्यान) करपुतळी व आदर्श-पद्धतीप्रमाणें काचेच्या कृत्रिम गोळ्यांत पाहवून पिशाचदर्शनानें माहिती मिळविण्याची ही एक पद्धत आहे.

११ **टेबलटिपिंग**:—एका तीन पायाच्या लहान वर्तुळ टेबला-भोंवती कांहीं मंडळी बसवून, मग त्या टेबलाला स्पर्श करून, त्याच्या पायाचा ठोका सुरू झाला असतां त्यावरून विवक्षित भाषा-पद्धति बसवून अदृष्ट शक्तीशीं संभाषण सुरू करीत असतात.

१२ **लँचिटी**:—सहा इंच लांब व चार इंच रुंद, अशा एका बदामी आकाराच्या एक द्वादशांश अगर षोडशांश इंच पातळ फळीला टोकाकडे सिसपेन बसविण्यास जागा केलेली असते; व मागील रुंद भागास दोन्हीकडे दोन वाटेल त्या बाजूकडे फिरून मागें पुढें फिरण्यासही नड पडूं नये, अशीं लहान चाकें बसविलेले फिरते मजबूत पाय लावून ही फळी तयार केलेली असते. मग तिला शिसपेन बसवून एका सपाट तक्त्यावर अगर टेबलावर कागद ठेवून त्यावर ही लँचिटी ठेवून तिला नुसता हाताचा किंवा बोटाचा स्पर्श करून बसतात. आणि तींत अदृष्ट शक्तींचें अधिवेशन झालें ह्मणजे शिसपेनसलीनें कागदावर प्रश्नांचीं उत्तरें लिहून निघतात. अशा पद्धतीनें पिशाचांशीं दळणवळण ठेवण्याचा एक मार्ग निघाला आहे.

१३ **सायकोग्राफी**:—(पिशाचलेखन) पिशाचसृष्टीशीं दळण वळण होण्यास योग्य असणाऱ्या मध्यस्थाच्या (मीडियमच्या) साहाय्यानें दोन दोन घट्ट बंद केलेल्या स्लेट पाट्यांत प्रश्नाचें उत्तर आपोआप लिहून मिळविण्याची एक पद्धत आहे.

१४ **पैशाचिक चेष्टा**:—पिशाच सृष्टींशीं दळण वळण ठेवून पिशाच शक्तीकडून आवाज, सूर, गायन सुरू करविणें, अगर रूपदर्शन, वर्तन, इत्यादि क्रियांचे चमत्कारानुभव उत्पन्न करणें, यांना पिशाच

चेष्टा म्हणतात. व अशा जातीच्या प्रयोग करणारास स्पिरिच्युॲलिस्ट ह्मणतात.

याप्रमाणें प्राचीन कालापासून तों अर्वाचीन कालापर्यंतच्या शोधकांच्या प्रयोगपद्धतींची साधारण माहिती आहे.

प्रयोगांबद्दल लोकमत.

या सर्व प्रयोगांत येणाऱ्या अनुभवांचा विचार केला तरः—

१ त्यांत सत्य चलन नसतां स्पर्शानें ज्ञानतंतूला चलनाचा भास होतो. त्यासच पिशाचानुभव असें मानणारे लोक असतात. एक स्वामीमहाराज आपल्या हातांतील काठींत पिशाच आलें आहे, बोटें ठेवून नाडी पहा, ह्मणून सांगून, तिच्यावर बोटें ठेवून दाबून धरण्यास सांगत. त्या वेळींही त्यांत नाडी उडालेली लागते, असा अनुभव घेणारे शेकडों यात्रेकरू निमणी गांवीं त्या महाराजांकडे जमूं लागले. आपल्या बोटांतील शिरा व ज्ञानतंतु यांवर दाब पडून त्यांतील उडण्याचें जें ज्ञान होतें, त्यालाच पैशाचिक चमत्कार समजून मेंढरांसारखे फसणारे शेंकडों लोक आहेत.

२ याचप्रमाणें कोणत्याहि प्रयोगांत आपल्या हाताच्या स्नायूंना पुष्कळ वेळ झाल्यामुळें जो थकवा येतो, जो कंप उत्पन्न होतो, किंवा जी रग लागते, त्यालाच मूर्ख लोक पैशाचिक अनुभव ह्मणून मानतात.

३ एकसारखें पाहून डोळ्याला आलेल्या अंधारीला, किंवा घेरीलासुद्धां पैशाचिकच चमत्कार समजतात.

४ याही पुढें मनाला उत्पन्न होणाऱ्या कल्पनांना किंवा भासांनाच पैशाचिक अनुभव समजणारे अडाणी लोक असतात.

५ सूचनांनी—हिप्नॉटिझम्, मेस्मेरिझम्, इत्यादिक विद्यांच्या नियमानें जे चमत्कार घडतात, त्यांनाच पुष्कळ लोक पैशाचिक चमत्कार ह्मणतात.

६ आणि कोणी मानसशास्त्राच्या नियमानें उत्पन्न होणारे भास व भ्रम यांसच [हॅल्युसिनेशन्स] पैशाचिक चमत्कार असें मानीत असतात.

याच्या उलट अशा तऱ्हेच्या अनुभवाला कारण आपल्या अंगांतील उष्णता आहे, असें कोणी समजतात; तर कोणी त्याला कारण लोहचुंबक शक्ति आहे, असें मानतात; आणि कोणी आपल्या अंगांतील विद्युत् कारण आहे, असें समजत असतात.

याप्रमाणें या पिशाचशास्त्रांतील अगदीं आरंभींचा शास्त्रज्ञ जो देवऋषि किंवा पाश्चात्य देशांतील अर्वाचीन काळचा शास्त्रज्ञ जो स्पिरिच्युॲलिस्ट, त्यांच्या प्रयोगांसंबंधानें हीं लोकमतें साफ चुकलेलीं आहेत, असें विचार करणारास आढळून येऊन पिशाच शक्तीचा खरा शोध लागत नाहीं, असें ठरतें.

मत ठरविण्यांत चूक.

जुन्या काळचा देवऋषि किंवा पंचाक्षरी याजपासून तों अगदीं अलीकडील शास्त्रज्ञ जो स्पिरिच्युऑलिस्ट [भूतविद्येचा प्रोफेसर] त्यां सर्वांच्या एकूण एक प्रयोगांचें निरीक्षण व परीक्षण केलें, तर आपल्या समोर येणाऱ्या प्रयोगांत भोळेपणा, आपमतलब, ठकबाजी व लुच्चेगिरी हींच फार आढळतात. त्याचप्रमाणें यासंबंधीं मत ठरवितांना हे अद्भुत चमत्कार दुसऱ्या एखाद्या शास्त्रनियमानें घडत असतांना त्यांना पैशाचिक कारण जोडण्यास आपलें अज्ञान व आपल्या समजुतीची चूक हींच कारणें असतात, यांत शंका नाहीं. असें जरी आहे, तरी बारीक विचार केला, तर पिशाचशास्त्राचा सत्यपणा निदर्शनास आणून देणारा एखादा सत्य चमत्कारही नसतोच असें नाहीं; तर आधिभौतिकसृष्टशास्त्रदृष्टीनें ज्याचें गूढ उकलत नाहीं, असा एखादा लाखांत एक कां होईना—प्रत्यक्ष अनुभवही असतो, ही गोष्टही कांहीं खोटी नाहीं.

आरंभीं आपण पिशाचाच्या ह्मणून मानण्यांत येणाऱ्या चमत्कारा-चें आधिभौतिकसृष्टशास्त्रनियमानें विवरण करून पिशाचासंबंधानें तीं मतें कशीं साफ चुकलेलीं आहेत, तें पाहिलें.

आधिभौतिकसृष्टशास्त्रनियमानें घडणाऱ्या पुष्कळ कार्यांचीं कारणें न पाहतां या सर्व गोष्टी भूतपिशाचांच्या योगानें घडतात, असें समजणारे या सृष्टिशास्त्राविषयीं अज्ञानी आहेत, ह्मणून त्यांच्या कल्पना मूर्खपणाच्या आहेत, हें खरें आहे.

सृष्टज्ञानविहीन भोळ्या किंवा अडाणी लोकांनीं भुतांबद्दलच्या आपल्या कल्पना ठाम करण्यांत सृष्टशास्त्राचीं सत्य कारणें बगळ-ण्याची चूक केली, आणि त्यामुळें त्यांना खरें समजलें नाहीं, असें सृष्टिशास्त्राची थोडीशी माहिती असलेल्या शिक्षित माणसांनीं ठरविलें. व हें त्यांचें ठरविणें अगदीं बरोबर व सत्यही आहे. पण भोळ्या व अडाणी लोकांच्या ज्या अज्ञानामुळें त्यांच्या कल्पना चुकीच्या ठर-विल्या, तसलेंच एखादें अज्ञान आपणापुढें घडणाऱ्या प्रयोगाचें कारण ठरवितांना या शिक्षित ह्मणविणाऱ्या वर्गाजवळ राहिलेलें आहे कीं काय, तें आपण पाहिलें पाहिजे. ह्मणजे आधिभौतिक सृष्टशास्त्रानें ज्याचें गूढ उलगडत नाहीं, अशा सत्य अनुभवाचें कारण ठरविण्याकारितां तत्सदृश अनुभव देणाऱ्या अशा भौतिक शास्त्रांत किंवा आध्यात्मिक सृष्टशास्त्राच्या दुसऱ्या एखाद्या शाखेंत शिरण्याची चूक ते करीत आहेत कीं काय, तें पाहिलें पाहिजे.

तुमच्यासमोर भूतशास्त्रांतील ह्मणून एखादी गोष्ट आली असतां तिचें कारण ज्या शास्त्राअन्वयें आहे असें वाटेल, त्या शास्त्राच्या सर्व नियमांनीं तुह्मी तें ताडून पाहिलें पाहिजे, आणि मग आपलें मत ठाम ठरविलें पाहिजे.

कांहीं लोक हट्टानें व दुराग्रहानेंच भूत नाहीं ह्मणत असतात. त्यांच्या समोर दुसऱ्याच्या अनुभवाच्या ह्मणून कांहीं गोष्टी आल्या, तर ते त्या खऱ्या मानीत नाहींत. ते असे अनुभव सांगणाऱ्या कसल्याही विद्वान शोधकावर व त्याच्या ज्ञानावर विश्वास ठेवीत

नाहींत. ते ह्मणतात, जें खरोखर नाहींच अशी आमची ठाम समजूत आहे, त्याबद्दल खरें खोटें कोण शोधित बसतो! कदाचित् तुह्मी एखादा अद्भुत चमत्कार दाखवून त्याचें कारण सांगा ह्मणाल, तर त्या घडणाऱ्या चमत्काराचें कारण काय असेल, तें आह्मांस कदाचित् उकलणार नाहीं; पण तें शोधण्याचें तरी आमचें काय नडलें आहे! तें पिशाचापासून आहे कां दुसऱ्यापासून आहे, याचा विचार करण्याकरितां अनुभव पाहण्यास तयार होणें ह्मणजेच पिशाच नाहीं या आमच्या पक्क्या समजूतीबद्दल एक तऱ्हेनें आमचा बेभरवंसा किंवा संशय आहे, असें दाखविणें आहे! ह्मणून पिशाच ह्मणून कांहीं नाहीं, असें आमचें ठाम मत झालेलें आहे. यासाठीं ज्याला संशय असेल, त्यानें जें नाहीं त्याचा खुशाल शोध करावा.

याप्रमाणें या एका वर्गानें हा विषय अगदीं अंगाबाहेर टाकला. दुसऱ्यांनीं कोणी याला आधिभौतिक सृष्टशास्त्रांत घातलें, तर कोणी आध्यात्मिक सृष्टशास्त्रांतील एखाद्या शाखेपर्यंत नेऊन पैशाचिक कारण खोटें ठरविलें आहे. आणि कोणी कोणी तर सृष्टशास्त्रविषयक कारणें व हातचलाखी, इत्यादि योगानें घडणाऱ्या गोष्टींवरूनच पिशाच व भूत यांना खरेपणा दिला आहे. ह्मणून अशांचीं मतें मुळींच ग्राह्य मानतां येत नाहींत.

खऱ्या शोधाचा सत्य मार्ग.

शोधास सुरवात करणाऱ्या सर्व लोकांत शोधक बुद्धीबरोबरच निःपक्षपातीपणा, आणि ज्या शास्त्राचा शोध करावयाचा त्या शास्त्राचें सत्य ज्ञान करून घेण्याची उत्कट इच्छा असावी लागते; तरच खऱ्याचा पत्ता लागतो. अशा रीतीनें याचा सत्य शोध करण्याचा निश्चय करून कांहीं विद्वानांनीं स्वतः अद्भुत चमत्काराचा अनुभव घेऊन, तें सर्व शास्त्रनियमाच्या कसोटीवर ठेवून, त्या त्या शास्त्रांतून त्याला गाळून काढलें आहे. व मग पिशाचशास्त्रांतच त्या चमत्काराची स्थापना करून जगासमोर त्या गोष्टी मांडल्या आहेत. तेव्हां अशा गोष्टी प्रत्यक्ष पाहिलेले,

याचा विचार केलेले, व याचा शोध लावलेले, असे विश्वसनीय साक्षीदार आपण कसून पाहून त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांच्या अनुभवाला किंमत द्यावी. आणि मग जर त्या साक्षीदारांवर भरंवसा ठेवतां आला, तर मात्र आपणही पिशाचासंबंधीं शास्त्र काय आहे, हें पाहण्यास तयार झालें पाहिजे. व त्याच्या नियमांची माहिती करून घेऊन व प्रयोग पाहून त्यांच्या म्हणण्याप्रमाणेंच पिशाचशास्त्राची सिद्धता होते कीं नाहीं, तें अनुभवानें ठरविलें पाहिजे.

पिशाचशक्तीच्या अस्तित्वाचा पुरावा देणारे साक्षीदार.

पिशाचशक्तीच्या अनुभवाकरितां शोध केलेल्या व प्रयोग पाहिलेल्या विद्वान लोकांची नांवनिशीवार यादी केली, तर ती फार मोठी होईल. म्हणून साधारणपणें सर्वांस पटण्यासारख्या नामांकित विद्वानांचीं पांच चार नांवें पुढें मांडतों.

१ डॉक्टर उइल्यम् ग्रेगरी, एफ. आर. एस्. ई., प्रोफेसर ऑफ केमिस्ट्री इन् दी युनिव्हर्सिटी ऑफ एडिमूबरो.

२ ऑक्झन ए. एम्. ए , एडिटर ऑफ लाईट, लंडन.

३ डॉ. रॉबर्ट हेअर, एम. डी.

४ प्रोफेसर एफ्. झोल्नर ऑफ लेपझिक्, ऑथर ऑफ ट्रॅन्सेन्डेन्टल् फिजिक्स.

५ डॉ. ओमॅनी, ‘ हिंदुस्थानांतील मंत व साधु ’ यांचे कर्ते.

इत्यादि परक्या देशचे साक्षीदार आहेत.

साधारणपणें ज्यांच्या नांवाची माहिती पुष्कळांना आहे, असे आपल्या देशांतील कांहीं साक्षीदार प्रथम आपण पाहूं.

१ करमणूक पत्रांत प्रसिद्ध झालेल्या एका हकीकतीचा सारांशः— “ पुणें येथें एका बाईच्या खाद्य पदार्थावर एकदम पिशाच विष्ठा

आणून ठेवूं लागलें. त्याची सत्यता पाहण्यासाठीं डॉ. गणेश कृष्ण गर्दे व डॉ. विश्राम रामजी घोले, या पुण्यांतील नांवाजलेल्या डॉक्टर द्वयांतील एकांनीं बाटलींत दूध घेऊन व एकानें ग्लासांत सोडून ग्लास हातांत धरून हातानें झांकून तिच्या तोंडापुढें नेला असतांही त्यांत एकदम विष्टा आली." अशा अर्थाचा मजकूर पूर्वी प्रसिद्ध झाला आहे.

२ बागलकोट येथील इंग्रजी शाळेंत चांभाराचा एक मुलगा असलेल्या वर्गांत आपोआप दगड येतात, अशी तक्रार असिस्टंट मास्तरनीं त्या शाळेचे हेड मास्तर, रा० व्यंकटेश बापूजी केतकर, यांजकडे केली असतां त्यांनीं त्या मुलाला आपल्या स्वतंत्र खोलींत घेऊन खिडक्यांचीं दारें घट्ट लावून घेतलीं असतांही त्यांच्या टेबलावर, टेबलाला धक्का न लागतां, एकही तावदान न फुटतां, एकही दार न उघडतां, आणि पडल्याचा आवाजही न होतां, एक मोठासा दगड येऊन तो कांहीं वेळ गरगर फिरून थांबला. याबद्दल शास्त्रीय खुलासा तुह्मी कांहीं कळवाल काय, असें त्यांनीं मजला विचारिलें होतें.

३ भट्ट विद्याविभूषण वे. शा. रा. सदाशिवशास्त्री तांबे यांनीं पिशाचाबद्दल आपल्या डायरींत आपले अनुभव लिहून त्याखालीं तारीख ११।६।१९०७ इ. रोजीं सही केली आहे. व त्यांनीं आपले अनुभव समालोचक अंक ४ संवत् १९६३ वर्ष १ भाद्रपद शुद्ध पौर्णिमेचे अंकांत प्रसिद्ध केले आहेत. त्यांतील एक उतारा याखालीं देतों.

रत्नागिरी जिल्ह्यांत देवगड नांवाचा एक तालुका आहे. तेथें बापट उपनांवाचे प्रसिद्ध वकील असून त्यांनीं त्याच तालुक्यांत नारिंग्रें येथें चार वर्षांपूर्वी एक वाडा बांधिला. परंतु या वाड्यांत पिशाचाचा उपद्रव लवकरच सुरू झाला. घरांत रात्रीच्या वेळीं दगड पडूं लागले. विशेष चमत्कार असा कीं, जेथें दगड पडत, तेथें ते बाहेरून येण्याचा बिलकूल संभव नव्हता.

बापटांकडील हा चमत्कारिक प्रकार पाहण्यासाठीं, देवगडची वकील मंडळी व मी मुद्दाम गेलों होतों. रात्रीं जेवण झाल्यानंतर ९ वाजतां सर्व मंडळी दिवाणखान्यांत सोंगट्यांचा डाव मांडून खेळत बसली. चोहों बाजूंनीं भक्कम भिंती व वरच्या बाजूला कडीपाट असल्यामुळें दिवाणखाना बंद केलेल्या पेटीसारखा होता. मात्र आंत हवा येण्यास भिंतीस पत्र्याच्या बारीक जाळ्या होत्या. दरवाजे बंद केलेले असल्यामुळें आंतून बाहेर किंवा बाहेरून आंत येणें जाणें लहानशा उंदरासही शक्य नव्हतें. असा कडेकोट बंदोबस्त करून सर्व मंडळी पिशाचाच्या करामतींची मार्गप्रतीक्षा करीत बसली. दहा वाजले तरी दगड येईनात! साडे दहा झाले तरी दगडांचा ठिकाण नाहीं! मग काय विचारतां! जो तो बापटांच्या चेष्टा करूं लगला. आमच्यांत रामभाऊ लेले या नांवाचे एक तरतरीत वकील होते, त्यांनीं तर बापटांच्या सुपरस्टिशनची (देवभोळेपणाची) बरीच टर उडविली. पण मंडळीची वाचाळपंचविसी बंद करण्यासाठींच कीं काय कोण जाणें, वरील कडीपाटापासून समईत बारीक खडे पडूं लागले! सर्व मंडळी चकित झाली. इतक्यांत लेल्यांच्या पुढेंच एक खाडींतील कालवें चिकटलेला भला मोठा दगड धप्प करून येऊन पडला. मग काय विचारतां? मंडळीची जी तिरपीट उडाली, ती सांगतां पुरवत नाहीं. कोणी डोकीवर जाजम घेतलें, तर कोणी टेबलाखालीं शिरले!

४ अमेरिकेस जाऊन आलेले इतिहासाचे प्रोफेसर डॉ. काणे यांनीं अमेरिकेंत पाहिलेली स्वतःच्या अनुभवाची अद्भुत हकीकत, सन १८८९ सालीं मिरजेस औषध घेण्यास येऊन राहिले होते तेव्हां, मला समक्ष सांगितली. ती खालीं लिहिल्याप्रमाणें. ते ह्मणाले:—“ आपण अमेरिकेंत असतांना एका गृहस्थाकडे मुद्दाम भूतविद्येचे चमत्कार पहाण्यास गेलों. त्यांच्या बंगल्यांत जाण्याबरोबर माझ्यासाठीं जवळ असलेल्या एका खुर्चीनें आपो-

आप मजकडे तोंड फिरविलें. व माझ्या मित्रासाठीं एक खुर्ची बाजूनें सरकत आली. त्यावर आह्मी बसलों. खुर्च्यांच्या पायांस खालीं स्लायडिंग् होतें. मला असें आश्चर्य वाटलें कीं, या अमेरिकन लोकांची यांत्रिक कौशल्यांत किती तरी ही सुधारणा झाली आहे! या खुर्च्या विवक्षित दिशेनें प्रेरणा देऊन विवक्षित स्थळीं थांबतील, इतकाच जोर खालून मिळावा, अशी योजना यांनीं केली असेल, व हा चमत्कार भुताच्या नांवावर हे दाखवीत असतील. पण वास्तविकपणें हा चमत्कार कांहीं भूतपिशाचशक्तीचा नसावा, असें मला वाटलें. तेथें जाऊन बसल्यानंतर समोर किंचित् कमी प्रकाशांत एक कोंबडा फडफडला. तो पांढरा होता. त्याकडे लक्ष्य गेलें. व त्याकडे पहात असतांच कोंबडा नाहींसा होऊन फुल्ड्रेस (पूर्ण पोषाख) केलेली एक लेडी दिसली. व तिजकडे पहात असतां तीही नाहींशी झाली! हा चमत्कारही भूतशक्तीचा असेल, असें मला वाटलें नाहीं. कारण या अमेरिकेंत शास्त्रीय शोधाचा उपयोग अशा कांहीं अद्भुत ट्रिक्स् दाखविण्याकडे केला असेल, आणि आरशाच्या साह्यानें व प्रकाशाच्या परावर्तनानें विजेच्या तारेंतून कोठील तरी देखावा मजपुढें दिसत असावा, अशी मी कल्पना केली. यानंतर ते गृहस्थ उठले, व त्यांनीं मजजवळ दोन स्लेट पाटया दिल्या. व एकीवर मनांतील प्रश्न कोणास न दिसेल असा लिहून त्यावर दुसरी पाटी घट्ट झांकून आंत पेन्सिलीचा तुकडा टाकून आपल्या हातांत बळकट धरून ठेवा, असें ह्मणाले. तेव्हां मी पाटीवर प्रश्न लिहिण्यास हरकत घेतली. शेवटीं प्रश्न मनांतच ठेवून स्लेटपाटया हातांत बळकट धरण्याचें ठरलें. त्याप्रमाणें दोन स्लेट पाटया डावा हात खालीं, व उजवा हात वर, अशा रीतीनें हातांत बळकट धरून त्या टेबलाच्या कोपऱ्यावर हात धरिले. आणि मग मनांत विचार करून माझ्या समजुतीप्रमाणें अति अवघड असा इंग्लंडच्या हिस्टरींतील (इतिहासांतील) राजमृत्यूच्या तारखेचा प्रश्न मनांत आणिला. त्याबरोबर माझ्या हातांतील

पाटींत पेन्सलीचें लेखन चालल्याप्रमाणें खुर खुर आवाज ऐकुं येऊं लागला. मला वाटलें, टेबलाच्या पलीकडील कडेला किंवा पायाला खालीं कोणी खरखरीत असून, त्याचा हा अवाज असावा. इतक्यांत तें वाजणें थांबलें. मग त्या पाट्या उलगडल्या, तों काय आश्चर्य ! हातांत धरलेल्या बंद पाट्यांत मनुष्यानें लिहिल्याप्रमाणें वरच्या पाटीवर अगदीं बरोबर उत्तर लिहून आलें होतें. असा त्यांनीं आपला अनुभव मला सांगितला.

५ माझा स्वतःचा एक अनुभवः—एका बाईला पिशाच फार त्रास देतें, तिच्या अंगावर बिब्याच्या फुल्या पडतात, शरीराच्या कोणत्याही भागाला एकदम बारीक रस्सीचा फांस पडतो, असें एका विद्वान डाक्टर मित्रांनीं मी पुण्यास प्रदर्शन पाहण्यास गेलों असतां मला कळविलें. आणि सदरहू बाईवर मेस्मेरिझमूचा प्रयोग करून पहा, असें ते मला ह्मणाले. त्या वेळीं मीं ह्मटलें, डाक्टरसाहेब, या अशा गोष्टीवर तुमचा कसा भरंवसा बसतो, कोणास ठाऊक ! अद्याप सर्व विकारांचा संपूर्ण पत्ता कोठें लागला आहे ! व कित्येक विकार नवीन उत्पन्न होणार नाहींत, असें कोण सांगणार आहे ? ज्याप्रमाणें प्रमेहाची किंवा इतर विकाराची लस शरीरांतून त्वचेवर येऊन त्वचेला उतते, किंवा एखाद्याच्या त्वचेचाच घाम त्वचेवर पुरळ उत्पन्न करितो, त्याप्रमाणें हा त्वचेंतूनच वर येऊन बिब्यासारखा उतणारा कदाचित् नवीन विकार असेल. मग त्याला तुह्मी पैशाचिकच समजणार का ? ती लस किंवा बिब्याचें तेल तिच्या त्वचेवर येण्याबरोबर हळूच काढून घेऊन तें सूक्ष्मदर्शक यंत्रांत पाहून व त्याचें पृथक्करण करून तें प्राणिज नसून वनस्पतिजन्यच आहे, आणि बिब्याचें तेलच आहे, अशी कोणी खात्री करून घेतली आहे काय ? जोंपर्यंत अशी खात्री झाली नाहीं, तोंपर्यंत यांत कांहीं तथ्य नाहीं. बहुशः यांत कांहीं तरी लबाड्या असाव्यात. हें माझें भाषण ऐकल्यावर ते ह्मणालेः " तुह्मी उद्यां समक्षच पहा, ह्मणजे कळेल. " त्याप्रमाणें दुसरे दिवशीं कसब्याच्या गणपतीकडे त्यांच्या बिऱ्हाडीं पाहण्यास

गेलों. एका सोप्यांत उजेडांत स्वच्छशा बिछान्यावर एक गोरी पान स्त्री उताणी निजली होती. तिच्या जवळ एक तरुण ब्राह्मण नोकर बसला होता. त्याचे जवळ एक कात्री व खोबरेल तेलाचें एक पातेलें होतें. मी तेथें गेल्यावर तिजवर मेस्मेरिझम्चा प्रयोग करण्यासाठीं ह्मणून तिच्या डाव्या हाताचा अंगठा हातांत धरिला. त्या हाताकडे पहात असतांच तिच्या मनगटावर बिब्याच्या तेलाची एक मोठी फुली पडली. तेव्हां त्या ब्राह्मणानें त्या ठिकाणीं खोबरेल तेल लावून ती पुसून काढिली. मला त्या फुलीबद्दल कांहींच आश्चर्य वाटलें नाहीं. न समजणाऱ्या कांहीं शारीरिक विकाराचा हा परिणाम असेल, अशी माझी कल्पना होती. या वेळीं तिजवर प्रयोग करण्यासाठीं मी तिच्या डोळ्यां-कडे टक लावून पाहूं लागलों. तिनेंही मजवर डोळे वटारले. आणि दांतांत ओंठ धरून एकसारखी पाहूं लागली. सुमारें दोन मिनिटांत ती 'आग झाली' 'आग झाली' असें दोन वेळां ह्मणाली. आणि त्याच वेळीं तिच्या त्या भव्य कपाळावर एक मिरच्या-च्या वस्त्रगाळ पुडीची मूद (दही वाढण्याच्या चमच्यांतून घट्ट दह्याची मूद जेवढी पडते तेवढी) जणूं काय आंतूनच आली, अशी एकदम दिसली. त्या जवळच्या ब्राह्मणानें ती एका टोपलींत हळूच झाडून घेऊन तेथें खोबरेल तेल लावलें. अशी गोळा केलेली पूड त्या टोपलींत बरीच होती. हें पाहिल्याबरोबर मी मनांत एकदम दचकलों, व तेथून उठलों. त्या घरच्या मंडळींनीं तिला बंधन करीत असलेल्या दोऱ्या दाखविल्या. त्या तागाच्या असून विलायती तांबड्या हिरव्या सुतळीच्या होत्या. बंधन झाल्या बरो-बर पहावें, तों त्या ठिकाणीं दोरी आंत रुतून करकोचा पडला असल्यामुळें तिची गांठ सोडून ती काढणें अशक्य होत असल्यानें तिच्या खालीं कात्रीचें एक टोंक सरकवून ती कातरून काढावी लागे. व असे प्रकार दिवसांतून बरेच वेळां घडत, असें त्या मंडळींनीं सांगितलें. हे कोठलेसे मामलेदार असून गाणगापुरास जाण्यासाठीं निघाले असतांना चार दिवस येथें मुक्कामास आले होते.

६ अलीकडील विद्वानांचे अनुभव ज्यांस पहावयाचे असतील, त्यांनीं १४ आक्टोबर सन १९०५ चा टाइम्स ऑफ इंडियाचा अंक पहावा. किंवा मराठी वाचकांनीं तारीख २०।१०।०६ चा रोजचा किंवा ता. २२।१०।०६ चा आठवड्याचा ज्ञानप्रकाश पहावा. त्यांत " भूतपिशाचाबद्दल युरोपीय शास्त्रज्ञांचे विचार " या मथळ्याखालीं दिलेल्या लेखांत भुताचे अस्तित्वाची खात्री करून घेतलेल्या विद्वानांचीं नांवें आहेत. त्यांतील सर वुइल्यम क्रुक्स्, रसेल, वालेस्, जिवियर, झोलनर, हे प्रख्यात शास्त्रज्ञ आहेत.

पारिस येथील विद्यापीठांतील वैद्यकशास्त्राचे प्रोफेसर शार्ल् रिशे हे थिऑसोफिस्ट नाहींत, किंवा ढोंगी लोकांच्या मायाजाळांत सांपडलेले हिंदुस्थानांतील कोणी भोळे गृहस्थ नाहींत. फ्रान्समधील बर्थेला नांवाच्या महान् शास्त्रज्ञाच्या शिक्षमध्यें तयार झालेले ते कसलेले शास्त्रज्ञ आहेत. आणि प्राणिशास्त्र व शारीरशास्त्र यांच्या व्यासंगाप्रीत्यर्थ कांहीं तपें लॅबोरेटरी (प्रयोगशाळा) मध्यें शास्त्रीय प्रयोग पाहण्यांत व करण्यांत त्यांनीं घालविलेलीं आहेत. सांप्रत (१९०६) ते पारीस युनिव्हर्सिटीमध्यें वैद्यक शास्त्राचे वरिष्ठ अध्यापक आहेत, व इंग्लडमधील सायकिकल रिसर्च् सोसायटीचे ह्मणजे मानसिक शक्तीचा शोध करणाऱ्या मंडळाचे ते अध्यक्ष आहेत. इंग्लडांतील प्रासिद्ध तत्त्ववेत्ते, प्रोफेसर सिजविक आणि ऑलिव्हर लॉज् , यांच्या मदतीनें त्यांनीं भूत व पिशच्च यांच्या अस्तित्वाच्या शोधार्थ प्रयोग केले आहेत. व पिशाचावेशित (ज्यांच्या शरीरांत पिशाचानें प्रवेश केला आहे) मनुष्यांना त्यांनीं आपल्या शास्त्रीय शस्त्रांनीं तपासलेलें आहे. आणि पिशाचाच्या अद्भुत शक्तीचा अनुभव घेतला आहे. तेव्हां अशा जाड्या युरोपियन शास्त्रज्ञानें भूत पिशाचाच्या अस्तित्वाबद्दल आपल्या शोधाची दिलेली सशास्त्र माहिती व या भूतपिशाचशास्त्राच्या शोधाबद्दल नमूद केलेला इतिहास खोटा ह्मणण्यास कोणी आधुनिक विद्वान धजणार नाहीं, अशी त्यांची योग्यता आहे.

पिशाच नाहीं या मताची डळमळ.

आपण भूतपिशाचांच्या अस्तित्वाचे साक्षीदार ह्मणून पुढें घेतलेल्या लोकांत जुने लोक आहेत, नवीन पदवीधर आहेत, विद्वान डाक्टर आहेत, व आध्यात्मिक ज्ञानांत ज्यांची प्रगति फार झाली आहे, असे तत्त्ववेत्ते आहेत. तसेंच पिशाचशक्तीचा शास्त्रीय शोध करणारे व प्रयोगानुभव पाहणारे सृष्टिशास्त्रपारंगत विद्वानही आहेत. तेव्हां पिशाच नाहींच ह्मणणाऱ्यांच्या बाजूपेक्षां पिशाच नाहीं ह्मणणारे ज्या सृष्टज्ञानाला आपला आधार समजतात, व ज्या आपल्या अनुभवाला महत्व देतात, त्या सृष्टशास्त्रांत पारंगत व अनुभव घेण्यांत कुशल अशा शोधकांनीं पिशाचाचें अस्तित्व सिद्ध केलेलें आहे. ह्मणून ‘ पिशाच आहे ’ ही बाजूही अधिक भक्कम दिसूं लागते.

आपणापुढें आलेली दोन्ही बाजूंची माहिती पाहिली, तरी हा वेळपर्यंत पिशाचाबद्दल आपणास कांहीं जास्ती माहिती झाली नाहीं. पिशाच नाहीं असा आपला जो ठाम ग्रह होता, तो लटपटला. पिशाच नाहीं अशी जोंपर्यंत समजूत होती, तोपर्यंत पैशाचिक ह्मणून गणल्या जाणाऱ्या चमत्कारविवरणाचा विचार करण्याचें कारणच नव्हतें. पण आतां तशी स्थिति नाहीं. पिशाच नाहीं, हा ग्रह पालटून पिशाच असेल का, असा ग्रह होण्याबरोबर आपल्यापुढें एक नवें जगच उत्पन्न झालें व एक नवें शास्त्रच आपलें गूढपणाचें पांघरूण घेऊन आपल्यापुढें उभें राहिलें. हें याचें गूढपणाचें आच्छादन काढून याचें सोपपत्तिक शास्त्रीय स्वरूप उघडें करून पाहण्यासाठीं आपल्याला जुन्या व नव्या पैशाचिक प्रयोगशाळेंत प्रवेश करून प्रथमतः या नव्या जगाचा नकाशा पाहिला पाहिजे.

पिशाचशास्त्रशोध.

कोणत्याही शास्त्रांतील प्रयोगानुभव पाहण्यास तयार होणाराला त्या शास्त्राची माहिती असून त्याशिवाय दुसऱ्याही आनुषंगिक शास्त्रांची माहिती असणें अवश्यक असतें. त्याप्रमाणें या पैशाचिक ह्मणून

पुढें येणाऱ्या चमत्काराच्या विवरणाला व स्वतः प्रयोग करून पहाण्यास तयार होणाऱ्याला आत्मा, मन, शरीर, व सृष्टशास्त्र, इतक्या विषयांची चांगली जरी नाहीं, तरी या विषयापुरती माहिती करून घेणें भाग आहे. म्हणून या शास्त्रां-तील प्रयोगास व अनुभव पहाण्यास अवश्यक तेवढ्या माहिती-चा आज आपणास विचार केला पाहिजे. आत्मा, मन, शरीर व बाह्य विश्व या सर्व ब्रह्मांडांत आढळून येणाऱ्या सर्व भूमिका, सर्व स्थिति, सर्व नियम, ज्यामध्यें आपणाला एकत्र आढळून येतात, अशी सर्व ब्रह्मांडाची प्रतिमा जो पिंड—मनुष्य प्राणी—त्याचें खरें स्वरूप अगोदर बरोबर समजून घेतलें पाहिजे.

मनुष्याचें स्वरूप.

आपल्या डोळ्यांपुढें दिसणाऱ्या माणसाकडे पाहिलें, तर त्याच्या. वर नाना तऱ्हेच्या पोषाखांचीं आवरणें दिसतात. या दिस-णाऱ्या त्याच्या कृत्रिम कोषाच्या आंत सर्व अवयवानें युक्त असा मनुष्य प्राणी दिसतो. पण हा दृष्टीस प्रत्यक्ष दिसणारा मनुष्य ह्मणजे तरी काय दिसतें? याचा विचार केला तर शरीरावरून मढवून टाकलेला एक त्वचेचा पातळसा काचोळा दिसतो. अशा रीतीनें आपल्या नुसत्या इंद्रियांनीं प्रत्यक्ष दिसणाऱ्या—अनु-भवास येणाऱ्या—मनुष्याच्या शरीराचा तपास करण्यास सुरवात केली, व शरीर फाडून पाहिलें, तर शरीरा-च्या आंतील भाग दृष्टीस पडतो. नुसत्या डोळ्यांनीं दिसणाऱ्या अंतर रचनेपेक्षां अधिक समजावें ह्मणून सूक्ष्मदर्शकाची मदत घेतली, तर मनुष्याच्या देहरचनेचें अधिक ज्ञान होतें. परंतु कितीही सूक्ष्म भागाचें ज्ञान झालें, तरी या जड इंद्रियांत याला चालविणाऱ्या क्रियाशक्तीचें प्रत्यक्ष दर्शन कोणत्याही यंत्रानें होत नाहीं. तरी इंद्रिय-व्यापाराच्या कारणाला मूळ आधारभूत असलेली जी शक्ति मस्तकांत मेंदू या नांवानें प्रसिद्ध आहे, तिच्या शाखोपशाखांनीं मन या नांवाच्या क्रियाशक्तीचा संबंध सर्व शरीरास जडला आहे, असें

समजून येतें. आणि यावरून स्थूल व जड असणारा असा हा देह ह्मणजे कांहीं मनुष्य नव्हे, तर हें त्या मनुष्याचें सर्व सोईनें युक्त असें घर आहे, पोषाख आहे, आवरण आहे, असें ठरतें. याहीपेक्षां खोल तपास करण्यास या इंद्रियांची—या स्थूल—बाह्य—पंचज्ञानेंद्रियांची शक्तिमर्यादा अपुरी आहे, व सूक्ष्मदर्शकादिक सृष्टशास्त्रनियमांची आजची उपलब्ध सामग्री पुरी पडत नाहीं. ह्मणून या शोधास दुसरें कांहीं साधन प्राप्त होण्यासाठीं अलीकडील मोठमोठ्या शोधक मनुष्यांनीं प्रयत्नास सुरवात केली. तेव्हां त्यांनीं प्राचीन काळच्या लोकांनीं याचा विचार कोणत्या शक्तीच्या जोरावर केला, तें पाहून या कालींही तीच शक्ति प्राप्त करून घेऊन मनुष्याच्या स्वरूपाचा अधिक पत्ता लावण्यास सुरवात केली. याप्रमाणें प्रयत्न करीत असतां अर्वाचीन व प्राचीन काळच्या अंतर्ज्ञानदृष्टि प्राप्त करून घेतलेल्या लोकांनीं आपापल्या शोधाची माहिती आपल्या अतींद्रिय शक्तीप्रमाणें व आपल्या ज्ञानाप्रमाणें आणि लोकांना सुगम तऱ्हेनें समजून देण्याच्या आपल्या पद्धतीप्रमाणें सांगितलेली आहे. त्या सर्व माहितींचें यथाशक्ति दिग्दर्शन करूं. ह्मणजे मनुष्याच्या स्वरूपाचा उलगडा करण्याच्या कामीं वाचकांस तिचा उपयोग होईल.

अगदीं अर्वाचीन माहिती ह्मटली, तर लेडबीटर यांनीं अतींद्रिय ज्ञानदृष्टि उघडलेल्या लोकांच्या साह्यानें मिळालेली माहिती ह्मणून 'मॅन व्हिजिबल् ॲन्ड अन्‌व्हिजिबल' (दृश्य मनुष्य व अदृश्य मनुष्य) या पुस्तकांत प्रसिद्ध केलेली आहे. त्यांतील आपल्या विषयापुरतें सर्व सार काढिलें, तर तें खालीलप्रमाणें निघतें.

लेडबीटर साहेबांचें ह्मणणें.

हें स्थूल किंवा जड शरीर अथवा भूमिका हा एक बाहेरचा कोश असून हा जड द्रव्याचा आहे. यामध्येंच एक भाग वायुरूप द्रव्याचा आहे. या कोशाच्या आंत दुसरा कोश तेजः शरीर आहे. ही भूमिका स्थूलप्रकाशरूप आहे. याच्या आंत तिसरा कोश, मनोरूप शरीर आहे. त्याचा एक भाग रूप-

शरीर हा असून तो सूक्ष्म प्रकाश द्रव्याचा आहे, आणि दुसरा भाग अरूपशरीर हा आहे. त्यामध्यें सूक्ष्म प्रकाशयुक्त द्रव्य सुद्धां नसून त्याहीपेक्षां विरल द्रव्य आहे. यापुढें बौद्धिक शरीर आहे. तें प्राण किंवा जीव तत्त्वाचें आहे. यापलीकडे पांचवें शरीर निर्वाण भूमिका हें चैतन्य तत्त्वाचें (स्पिरिट) आहे. सहावी भूमिका किंवा कोश परनिर्वाण नांवाचा असून सातवी भूमिका महापरनिर्वाण नांवाची आहे. या सहा आणि सात भूमिकेच्या स्वरूपासंबंधानें कांहीं विशेष माहिती या नवीन अंतर्ज्ञानदृष्टि उघडलेल्या लेडबिटरच्या शिष्यमंडळास लागलेली नाहीं.यांच्या माहितींत या सात भूमिकेशींच–सात आवरणांशींच—सर्व जगांतील पदार्थ व प्राणिमात्र यांचा संबंध असून आपापल्या स्थितिपरत्वें व ते ज्या ज्या भूमिकेवर आरूढ असतील त्या त्या भूमिकेच्या धर्माप्रमाणें त्यांच्या सामर्थ्यांत व कृत्यांत फरक असतो. आणि जो जो जितक्या उच्च भूमिकेवर आरूढ झालेला असेल, तो तो तितका सामर्थ्यवान् व श्रेष्ठ असतो, असें सांगितलें आहे.

थिऑसॉफीचें मत.

थिऑसॉफी ह्मणून नांव धारण करणारा–तत्त्वविचाराचा शोध करणारा—एक पंथ निर्माण झाला आहे. व त्यांनींही या मनुष्याच्या शोधाबद्दल आपले विचार नमुद केलेले आहेत. त्यांच्या वर्गीकरणाप्रमाणें:—१ शरीर (जडशरीर), २ सूक्ष्म (वासनात्मक), ३ प्राण किंवा जीव, ४ पशुआत्मा किंवा अहंकारी जीव, ५ मानवी तत्त्व (शुद्ध सद्विचारी व मन), ६ धर्मबुद्धि (ईश्वरी अभिमान बुद्धि), ७ आत्मा (चैतन्य), हीं सात तत्त्वें किंवा कोश आहेत, व यांच्या एकत्र सांनिध्यानें, प्रवेशानें, व परस्पर संबंधानें जगत् बनलें असून यांतील आरंभींचीं चार मनुष्यांत व प्राण्यांतही स्पष्ट सारखीं असतात. हीं चार पार्थिव (जड) आहेत. पांच, सहा हीं चैतन्यात्मक आहेत. आणि सातवें ईश्वरी आहे. पहिल्या चारी पुढील पांच, सहा, सात हीं

मनुष्यांतच असतात. याप्रमाणें पिंडांतील सात तत्त्वें आपला संबंध ब्रह्मांडांतील–सृष्टींतील–सात तत्त्वांशीं ठेवितात. अशी माहिती मिळते.

प्राचीन आर्य लोकांचें विवेचन.

प्राचीन काळच्या आर्य लोकांनीं मनुष्य देहाचा विचार करितांना निरनिराळ्या बाजूंनीं जितकें विवरण करितां येईल तितकें स्पष्ट विवरण व्हावें, ह्मणून अनेक भागप्रतिभागानें ही मनुष्याची घोटाळ्याची रचना समजून सांगितलेली आहे. त्यांतील थोडकें–अगदीं थोडकें–आपणाला आपला पिशाचविषय स्पष्ट समजण्यास मदत व्हावी इतक्या बेताचें दिग्दर्शन करितों.

१ सर्व विश्व आठ तत्त्वांचें बनलेलें असून त्यांच्या जडांशानें जड वस्तु व सूक्ष्मांशानें सूक्ष्म बनलेलें आहे. १ पृथ्वी. २ आप्. ३ तेज. ४ वायु. ५ आकाश. हीं पंचतत्त्वें किंवा महाभूतें होत. आणि ६ मन ७ बुद्धि व ८ अहंकार, हीं तीन मिळून आठ तत्त्वें होतात. याप्रमाणें सर्व विश्वांत अष्टधा प्रकृतीचें प्राधान्य आहे.

(श्रीमद्भ. गीता, अ. ७ श्लो. ४)

२ या शरीरधारीला एका वर्गीकरणाप्रमाणें पांच निरनिराळे कोश आहेत, असें ठरविलेलें आहे. ते कोश. १ अन्नमय कोश. २ प्राणमय कोश. ३ मनोमय कोश. ४ विज्ञानमय कोश. ५ आनंदमय कोश. याप्रमाणें पांच कोशांनीं युक्त असा हा मनुष्य आहे.

(पंचदशी.)

३ ऋषि लोकांनीं कथन केलेल्या सर्व वाङ्मयांत पिंडाचे व ब्रह्मांडाचेही चार देह आहेत असें सांगितलें असून, त्यांचा परस्पर संबंध दाखविला आहे. त्या चार देहविवरणाचा निष्कर्ष असाः—

१ स्थूल देहः—डोळ्यानें दिसणारें शरीर फाडून पाहिलें असतां सूक्ष्मदर्शकानें दिसणारें जें स्थूलद्रव्यरूप ह्मणून आहे, त्या सर्व जडाचा समावेश त्यांनीं स्थूल देहांतच केला आहे.

२ सूक्ष्म देहः--लिंगदेह किंवा वासनात्मक देह ह्मणून तेजोरूप, अंगुष्ठप्रमाणाचा, जड-इंद्रियविरहित, या सर्व देहाची बरोबर उद्‌भूत किंवा अनुद्‌भूत तेजःप्रतिमा धारण करणारा, मन, बुद्धि, दशेंद्रियांच्या शक्ति व पंचप्राण ज्यांत असतात, आणि जो जिवंतपणीं या जड शरीरांत असून या शरीराचा त्याग झाल्यानंतर जो स्वतंत्रस्वरूपी होतो, त्यास सूक्ष्म देह ह्मणतात. याची बरोबर कल्पना यावी ह्मणून त्यांनीं स्वप्नांतील देहाचा दृष्टांत देऊन स्वप्नांत (सूचक स्वप्नांत) जो देह स्वतंत्रपणें वावरत असलेला स्वप्नस्थितींत अनुभवास येतो, तोच सूक्ष्म देह, असें स्पष्टीकरण केलेलें आहे.

३ कारण देहः—या देहाला आकार नाहीं. अरूप ह्मणजे स्वतःच्या स्वरूपाविषयीं मात्र अज्ञान असून बाकी सर्व ज्ञान अनुद्‌भूत स्थितींत भरलेलें असतें, तो कारण देह, असें सांगून झोंपेच्या स्थितींत आपण त्या देहांत असतों, असें स्पष्टीकरण दिलेलें आहे.

४ महाकारण देहः—सर्व ज्ञानमय ज्ञानरूप देह तूर्यावस्थेंत अनुभवास येणारा, तो महाकारण देह, असें याचें स्पष्टीकरण केलेलें आहे. असे हे चार देह एकांत एक राहून एकमेकांच्या साहाय्यानें सर्व व्यापार करितात. असा यांच्या स्पष्टीकरणाचा निष्कर्ष आहे.

मनुष्याच्या अस्तित्वाबद्दल तपास करीत असतां व त्याच्या एकंदर क्रिया आणि ज्ञान यांचा विचार करीत असतां पौर्वात्यांनीं व पाश्चात्यांनीं शास्त्रप्रमाणें व अनुभव यांच्या साहाय्यानें स्पष्टीकरणासाठीं जरी याप्रमाणें निरनिराळे विभाग व शब्दयोजना केलेली आहे, तरी आपणाला या जागृत स्थितींत जाणतां येणारें सार काढिलें, तर तें खालीलप्रमाणें निघतें.

सर्वांतील प्रत्यक्ष जाणतां येणारें सार.

१ इंद्रियांनीं जाणतां येणारें, मग तें प्रत्यक्ष इंद्रियें स्वतः जाणोत, किंवा तें ज्ञान होण्यास स्थूल द्रव्यांनीं बनलेल्या एकाद्या यंत्राचें तीं इंद्रियें साहाय्य घेवोत, अशा रीतीनें इंद्रियज्ञानाच्या मर्यादेंत जें येईल त्या सर्वाला स्थूल ह्मणावें.

२ या इंद्रियज्ञानमर्यादेपलीकडील, पण मनाला समजणारें, मनाच्या व्यापारांनीं अनुभवास येणारें, व मनाच्या द्रव्याच्या जातीचें जें तें सर्व सूक्ष्म ह्मणावें.

३ स्थूल व सूक्ष्म यांच्याहून अतीत, पण स्वप्रतीत, असें जें आहे, त्यास आत्मतत्त्व असें ह्मणावें. याप्रमाणें शरीर, मन व आत्मा या साध्या तीन विभागांत सर्वांच्या वर्णनाचा इत्यर्थ येतो. असें जरी आहे, तरी आपल्या पिशाचविषयाच्या माहितीसाठीं वरील प्रत्येक विवरणांतील कोणकोणत्या भागाशीं पिशाचाचा संबंध मानतात, तें आपल्यास पाहिलें पाहिजे.

पिशाच कशास ह्मणतात?

१ आरंभींच्या कोशविवेचनापैकीं ज्यांत २ प्राणमय, ३ मनोमय व ४ विज्ञानमय या तिन्ही कोशांचा समावेश होतो;

२ अथवा, सात भूमिकांपैकीं ज्यांत २ तेजोरूप व ३ मनोरूप या भूमिकांचा समावेश होतो;

३ किंवा, आठ तत्त्वांपैकीं मन व वायुतत्त्व यांनीं जो भाग दर्शविला जातो;

४ तसेंच, सात कोशांपैकीं २ सूक्ष्म शरीर, ३ जीव, ४ जीवात्मा =अहंकार, हे कोश ज्यांत असतात;

५ ज्या विदेह चैतन्यशक्तीलाच कोणी विद्युत्शरीर, मानसिक विद्युत्शरीर, तेजःशरीर, (इथेरिक बॉडी) वायुरूप शरीर, याप्रमाणें निरनिराळ्या नांवांनीं संबोधितात, त्या सर्व नांवांचा अर्थ आणि

वरील सर्व वर्णनांचा इत्यर्थ ह्मणजेच (वासनात्मक) लिंगदेह होय. व यालाच विशिष्ट अवस्थेंत **पिशाच्च** किंवा **भूत** ही साधारण व्यवहारांतील लोकांनीं दिलेली संज्ञा आहे.

या निरनिराळ्या शाखांनीं दाखविलेलें भूत किंवा पिशाच्च कसें बनतें, त्याची शक्ति काय आहे, त्याचें राहण्याचें स्थल कोणतें, व त्याचा आपल्याशीं संबंध कसा घडतो, या गोष्टींचा शास्त्रीय विचार करून या शास्त्रांतील सप्रचित प्रयोग–अनुभवासाठीं अनुभवून पाहण्यायोग्य असे सोपे प्रयोग–कोणते आहेत, व ते कसे करावे, आणि या सर्वांवरून आपण आपल्या आचरणांत काय बोध घ्यावा, इतक्या गोष्टींचा अद्याप आपण विचार केला पाहिजे.

पिशाच अवस्था केव्हां व कशी येते ?

मनुष्य मरण्यास टेकला असतां हळु हळु त्याच्या नाड्या बंद पडूं लागतात, शरीराला गारवा येऊं लागतो, व प्राण जातो, एवढेंच फक्त साधारण माणसाला समजतें. तथापि मरणाची क्रिया होत असतां यापेक्षां आणखी निराळा प्रकार चाललेला असतो.

या जड किंवा स्थूल देहाला सोडून सूक्ष्म, वासनात्मक किंवा लिंग देह मोकळा होतो. परंतु विशिष्ट परिस्थितींत हा वायुरूप देह प्रथम या शरीरांतून जरी निराळा होतो, तरी तावडतोब तो याचा संबंध सोडींत नाहीं, तर याला चिकटून असतो; आणि कित्येक वेळीं जरी हा देह त्याला फिरून आंत येऊन राहण्यास निरुपयोगी झाला असला–अगदीं प्रेत झाला असला–तरी यापासून अलिप्त होऊन दूर जाणें त्याला फार कठिण पडतें. अशा वेळीं तो सूक्ष्म देह–या स्थूल देहा-सारख्याच बरोबर प्रतिमेचा सूक्ष्म तेजरूप असणारा–त्या प्रेताच्या जवळपास आपल्या भूमिकेवर भ्रमण करीत असतो.

पुन्हां जीव येणें.

लिंग देह किंवा सूक्ष्म देह बाहेर पडला असला, तरी ज्या वेळीं मनुष्याचें हें स्थूल शरीर त्या लिंगदेहानें आंत येऊन राहण्यासारख्या

सुस्थितींत असतें, आणि सूक्ष्म देह आंत येण्याचें द्वार बंद झालेलें नसतें, व या स्थूलाशीं असलेला लिंगदेहाचा संबंधतंतु तुटलेला नसतो, त्या वेळीं लिंगदेह पुन्हां स्थूल शरीरांत प्रवेश करून या जड देहाला चेतना आणतो. अशा वेळीं गेलेला जीव आला, असें ह्मणण्याची लोकांची वहिवाट आहे.

अडाणी लोकांना काय ते जीव असतानांच हा मेला असें समजून तिरडीवर बांधून नेत असतील, आणि मग जेव्हां त्या शरीरांत रिॲक्शन (स्तब्ध झालेली क्रिया पुन्हां चालू होणें) सुरू होऊन तो जागृतीवर येतो, तेव्हां पुन्हां जीव आला असें ह्मणत असतील. असे याविषयीं पुष्कळ लोकांचे उद्गार ऐकू येतात. पण त्यांनीं याबद्दलचा साग्र शोध केलेला नसतो. जीव परत आलेलीं माणसें मग स्वर्ग पाहून आल्याची हकीकत सांगत असतात. त्या हकीकतीला भ्रम, किंवा भास, अगर स्वप्न असें ह्मणून त्या गोष्टीचा निकाल झाला, असें पुष्कळ लोक आपल्या मनाशीं ठरवितात. पण विद्वान व शोधक लोकांचे कांहीं अनुभव आणि त्यांतून पदवीधर डॉक्टर लोकांचे कांहीं अनुभव "जीव गेलेला पुन्हां माघारी शरीरांत येत असतो," या लोकांच्या पूर्वापार समजुतीला पुष्टीकरण देऊन निरनिराळ्या देहांचें अस्तित्व सिद्ध करण्याला मदत देणारे आहेत.

कांहीं डॉक्टर लोकांनीं आपल्या नवीन शास्त्रानें दिलेल्या ज्ञानाप्रमाणें परीक्षा करून सुद्धां हा मृत झालेला आहे, असें ठरविलें असतांही तो थोड्या वेळानें चलन वलन करून शुद्धीवर आला, अशींही उदाहरणें आहेत. पण अशीं उदाहरणें पुढें आलीं, ह्मणजे स्वतः डॉक्टरीची माहिती नसलेले, किंवा डॉक्टरीची माहिती असून असा अनुभव नसलेले अहंमन्य शिक्षित लोक त्या परीक्षक डॉक्टरला बरोबर परीक्षाच झालेली नसेल, असें ह्मणून त्याच्या गळ्यांत अडाणीपणाचें सर्टिफिकिट बांधणार! एकादे वेळीं एकाद्या डॉक्टरापुरती ही शंका कदाचित् बरोबर ह्मणतां येईल; पण

पुष्कळ डॉक्टर लोकांच्या देखरेखीखालीं त्यांनीं कसून परीक्षा करून मेला अशी खात्री करून घेऊन त्यावर मुद्दाम देखरेख ठेविली असतांही कांहीं तासांनीं तो जिवंत झाला, असें जेव्हां उदाहरण असेल, तेव्हां तें आपणाला विश्वसनीय मानलें पाहिजे.*

आह्मी विद्वान डॉक्टर लोकांच्या कमिटीवर असा विश्वास ठेवून मेलेला पुन्हां जिवंत होतो, असें ह्मटलें तर जिज्ञासाबुद्धि, विचार व शोधकपणा यांच्याशिवाय शहाणे ह्मणून घेणारे लोक "तो मेला नसून या सर्व डॉक्टरांनासुद्धां न समजणारें असें कांहीं तरी जिवंतपणाचें चिन्ह राहिलें असेल," असें ह्मणतील. या न समजणाऱ्या त्यांच्या कांहींतरीलाच **"या जड देहास जडलेला लिंगदेहाचा संबंधतंतु"** असें पारिभाषिक नांव आहे.

सूक्ष्मदेह या स्थूलांतून निराळा होतो.

मरत असलेल्या पुष्कळ लोकांचें काळजीपूर्वक निरीक्षण करणाऱ्या शोधक मनुष्यांनीं मिळविलेले अनुभव, आणि मरत असतां किंवा जीव गेला असतां पुन्हां जीव आलेलीं शोधक मनुष्यें यांनीं लिहून ठेविलेले आकस्मिक अनुभव आपण विचारांत घेतले, तर मनुष्य मरत असतां त्याचा सूक्ष्मदेह या शरीरासारखाच यापासून अगदीं निराळा होतो, असें मानणें भाग येतें. कित्येक वेळां तो तावडतोब यांतून सुटून स्वतंत्रदेहधारी होतो, तर कित्येक वेळेला त्याला स्वतंत्रदेहधारी बनण्याला उशीर लागतो. सर्वांना या देहाचा अनुभव मिळविणें शक्य नाहीं. तरी पुष्कळ आजार असे असतात कीं, त्यांत आपले झालेले दोन देह त्या आजाऱ्यास स्पष्ट समजत असतात; व ते बेशुद्धींत नव्हेत, तर सर्व तऱ्हेची शुद्धी असतांना देखील दिसतात. याला कोणी ज्ञानतंतूंचा विकार ह्मणतात. अर्थात् ज्ञानतंतूंचा विकार ह्मणजे भ्रम, आणि भ्रम म्हटला

* प्रोफेसर आगरकर यांच्या विविध-विषय-संग्रहांत पहा.

कीं तें खोटें, असें मानण्याची आपणाला संवयच आहे. ही संवय व्यवहारांत बरोबर आहे. पण शास्त्रीय शोधांत ती बरोबर नाहीं.

आपल्या डोळ्यांसमोर जेव्हां आरसा येतो, तेव्हां आरसा दिसतो. पण तो डोळ्यांसमोर जेव्हां नसतो, तेव्हां दिसत नाहीं. हा जसा भ्रम नव्हे, किंवा कंपवायूंत (रायटर्स क्रॅंप) जसा हात कांपतो त्याप्रमाणें मी माझ्या इच्छेनें हात कांपवित असलों, तर तो जसा ज्ञानतंतूचा विकार नव्हे, तर हे त्या त्या इंद्रियांचे व्यापार आहेत, तसे मनाच्या इंद्रियाचे चाललेले व्यापार शास्त्रीय तऱ्हेनें भ्रम नसून सत्य आहेत. पण त्यांचा पुनः पुनः तोच तो अनुभव घेतां येत नसल्यामुळें त्याला भ्रम म्हणतात. जेव्हां जेव्हां ढाळ-कावें औषध घ्यावें, तेव्हां तेव्हां आंतड्यांत विशिष्ट फेरफार होऊन ढाळाचा कमजास्त प्रमाणाचा जसा अनुभव येतो, तसाच **बॅप्टी-शिया** या नांवाचें औषध जास्त प्रमाणांत घेतलें असतां (माहित-गार डाक्टरच्या हातून, कारण तें विषारी आहे.) ज्ञानतंतूला विशिष्ट शक्ति येऊन दुसरा देह दिसण्याचा अनुभव येऊं लागतो. याप्रमाणें प्रत्येक वेळेला तोच तोच अनुभव देणारी क्रिया म्हणजे भास किंवा भ्रम नव्हेत. तर हा जसा त्या औषधीचा ठराविक परिणाम आहे, तसा दुसरा सूक्ष्म देह दिसणें ही शरीरांतील सूक्ष्म इंद्रियज्ञानाची एक ठराविक स्थिति आहे, असेंच ह्मणणें भाग आहे. व ही स्थिति सत्य आहे, असें दाखविणारे दुसरेही पुष्कळ अनुभव आहेत.

माझ्या अनुभवाची एक गोष्ट.

(डायरीवरून.)

विठू येसूजी पाटील, राहणार तासगांव, हा अत्यंत आजारी असतांना मी त्याजवळ बसलों होतों. त्याच्या कानाजवळ झालेल्या भयंकर करटाच्या वेदनेनें तो ओरडत असतां हळुहळू बेशुद्ध होऊं लागला. त्याचे हातपाय गार पडले. मी अगदीं त्याच्या जवळ होतों. त्याची नाडी बंद झाली. व श्वासोच्छ्वासही बंद पडला.

त्या बरोबर जवळची मंडळी तो मेला ह्मणून रडूं लागली. मी थांबविण्याची खटपट केली. पण कोणी ऐकेनात. इतक्यांतच पुन्हा श्वास चालू झाला. व तो अगदीं हळुहळू विवळूं लागला. तेव्हां मी त्याला हळूच हांक मारली. मी या वेळीं माझ्या चौकस बुद्धीमुळें त्याला तावडतोब विचारिलें, " तुला काय वाटलें ? " त्या वेळीं तो ह्मणालाः " मला या शरीरांतून कोणी ओढून बाहेर काढिलें, व मी अगदीं विकाररहित निराळा झालों. मला या लोकांचें रडणें ओरडणें ऐकूं येत होतें. व येथें आंत बसलेले आणि बाहेरचे सर्व लोक बरोबर दिसत होते. पण मला कोणास कांहीं कळवितां येईना. माझें एक प्रेत पडलेलें दिसत होतें. व त्यालाच लागून मी सुटा वेदनारहित झालों होतों. आणि रडणाऱ्या लोकांच्या विनाकारण दुःखाबद्दल मला वाईट वाटत होतें. इतक्यांत जोरानें मला कोणी यांत ढकलिलें, व मग मी डोळे उघडिले. " हें सांगत असतांच पुन्हां थोडा थोडा ठणका सुरू झाला. आणि पुन्हां विवळणें सुरू झालें. तरी तें साधारणपणें सहन करण्यासारखें होतें. दुसरे दिवशीं डोलींत घालून कोल्हापुरास त्याला आपटे डाक्टरकडे नेला. आणि कानाजवळील करटावर ऑपरेशन करून त्याला आणलें. तो अद्याप (तारीख ६।६।११ पर्यंत) जिवंत आहे.

त्याच्या त्या वेळच्या स्थितींत त्या खोलींतून आह्मांला देखील जें दिसण्यासारखें नव्हतें, तें त्याला डोळे मिटलेल्या स्थितींत दुसऱ्या सूक्ष्म देहाच्या डोळ्यांनीं बरोबर दिसलें, अशी मी आपली खात्री करून घेतली.

याहीपेक्षां विशेष आश्चर्याच्या गोष्टी शोधकांनीं नमूद करून ठेविलेल्या आहेत. त्यांपैकीं पूर्वी वर्तमानपत्रांत स्वतःच्या सहीनें एका पाश्चिमात्य डाक्टरांनीं प्रसिद्ध केलेल्या हकीकतीचा सारांश देतों.

" मी एकदां चाकर व मडम यांना बरोबर घेऊन एका गांवांस निघालों असतां वाटेंत मला बेशुद्धी आली. तींत मला असें दिसलें कीं, मी आपल्या शरीरांतून निघून उंच हवेंत उडत चाललों असून

त्यांत एक प्रकारचा सुखातिशय वाटत होता. परंतु पुढें वर जाण्यास नडविणारा कोळीष्टकाच्या धाग्यासारखा एक बारीक धागा माझ्या डुंगणास चिकटलेला दिसत होता. मी असलेल्या उंच अंतराळांतून, आह्मी निघाल्याचें स्थळ, जाऊन पोहोंचण्याचें स्थळ, आमची चाललेली गाडी व त्यांतील सर्व मनुष्यें मजला दिसत होतीं. या वेळीं ज्या वाटेनें निघण्याचा आपण संकल्प केला होता ती वाट सोडून भलत्याच वाटेनें आपली गाडी जात आहे;आणि आपलीं कांहीं चाकरमाणसें व मडम हीं ह्या गाडीबरोबरच्या मार्गानें न येतां त्यांची गाडी निराळ्या मार्गानेंच येत आहे; व माझ्या चाकरांपैकीं दोघांनीं दारूची बाटली घेऊन मडम जात असलेल्या रस्त्यावर एके ठिकाणीं बसून ती घेण्याचा सपाटा चालविला आहे; असें दिसत होतें. इतक्यांत मागें चिकटलेल्या धाग्याची ओढ पुन्हां सुरू झाली. व मी आनंदमय प्रदेशांतून खालीं खालीं येऊं लागलों. या वेळीं तो धागा तोडून टाकण्याचा मी अटोकाट प्रयत्न केला. परंतु तो धागा इतका बळकट होता कीं, सरते शेवटीं तोडण्याच्या प्रयत्नांत मी थकलों. त्याची ओढ एकसारखी वाढत चालली. आणि त्यानें मला खेंचून माझ्या गाडींतील शरीरांत ओढलें, व मी थोड्याच वेळानें स्मृतीवर आलों. या वेळीं माझी गाडी पोंचण्याच्या ठिकाणाजवळ आली होती. मी उठल्यानंतर मी पाहिलेल्या सर्व प्रकारांबद्दल चौकशी केली, तेव्हां जसें मला दिसलें होतें, तसेंच खरोखरी घडल्याचें आढळून आलें ! " हा त्याच्या लेखाचा मथितार्थ होता.

' नाईट साईड ऑफ् नेचर ' या पुस्तकामध्यें देखील अशा-बद्दलचीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. मेलेल्या माणसांनीं व खून होऊन मेलेल्या माणसांनीं त्याच वेळीं किंवा त्यानंतर दुसऱ्याच्या स्वप्नांत जाऊन बरोबर हकीकत कळविल्याचीं उदाहरणें सुद्धां या जड देहांतून सूक्ष्म देह वेगळा निघत असल्याची खात्री देण्यास सिद्ध आहेत. (माझ्या स्वप्नमीमांसा पुस्तकांतील विदेह वर्गांतील स्वप्नांत विशेष माहिती पहा.)

प्राण जात असलेल्या किंवा क्वचित् प्रसंगीं प्राण गेलेल्या प्रेतासभोंवार धुरासारखें कांहीं पसरून नंतर त्याची कांहीं आकृति बनून ती अदृश्य झाल्याचे देखावे देखील कोणी कोणी पाहिल्याचे दाखले ग्रंथांतून मिळतात.

सर्वांना व सर्व वेळीं वरप्रमाणें अनुभव येत नसल्यामुळें या गोष्टी सर्वांना पटत नाहींत. आणि सर्वांना हे सूक्ष्म प्रकार दिसण्याची योग्यताही असत नाहीं. स्वाभाविक स्थितींत ती फार थोड्यांच्या अंगीं असते. त्याचप्रमाणें सूक्ष्म देहाला स्थूल-दृष्टि-योग्य घनताही क्वचित्च येते. यामुळें सर्वसाधारण माणसांना याचे अनुभव फार कमी येतात.

अनुभव येण्यास काय केलें पाहिजे ?

१ हे अनुभव पाहण्यासाठीं आपण आपली दृष्टि व स्थिति योग्य केली पाहिजे;

२ किंवा, त्या सूक्ष्म देहाला या स्थूल दृष्टीला समजण्यासारखा स्पष्ट आकार येईल, अथवा स्थूल इंद्रियाला समजण्यासारखें क्रिया-सामर्थ्य येईल, असें कांहीं साधन पाहिलें पाहिजे; तरच आपली खात्री पटेल.

अशी आपली खात्री पटवून घेण्यास योग्य साधनें पाहण्यापूर्वी या अनुभवास योग्य अशी ज्ञानदृष्टि प्राप्त करून घेणाऱ्यांनीं आपले काय अनुभव लिहून ठेविले आहेत, ते पाहूं.

योग्यांचे अनुभव.

योगासारख्या अभ्यासाच्या योगानें मनुष्यांना या आपल्या स्थूल देहाचा त्याग करून आपल्या सूक्ष्म देहानें या पृथ्वीवरून भुवर्लोकाला जातां येतें. व तेथूनही त्या लोकाचा त्याग करून व त्या देहांत फरक करून स्वर्गाला जातां येतें. आणि अशा रीतीनें वर जाऊन पुन्हा खालीं परत या पृथ्वीवर स्थूल देहांत येतां

येतें, असें सांगितलेलें आहे. या रीतीच्या अभ्यासाच्या योगानें त्यांना मरणकालीं कोणत्याही भूमिकेवर गुंतून अडकून पडावें लागत नाहीं. तथापि ज्यांचा देह चांगला शुद्ध झालेला नसतो, त्यांना एकादे वेळीं बरोबर रीतीनें जातां येत नाहीं. तरी ते साधारण माणसा-प्रमाणें भूतयोनींत म्हणजे भूतशरीरांत शिरून मात्र रहात नाहींत. गीतेंत अध्याय ८ श्लोक २४ ते २८ यांत असें सांगितलें आहे कीं, प्राण जातांना कोणी योगी धूर, रात्र व कृष्णपक्ष, या मार्गानें गमन करितो; म्हणजे नेहमींच्या अनुभवाप्रमाणें या बाह्य जगाची विस्मृति होऊं लागल्यानंतर व या इंद्रियांची बहिर्मुखता जाऊं लाग-ल्यानंतर, अंतर्मुखतेमध्यें—अंतरानुभवांत—शिरतांना धूम्रमय प्रदेश, दाट धुकें पसरल्यासारखा अंधकारयुक्त प्रदेश, किंवा कांहीं अंधकार व कांहीं प्रकाश असा मिश्र प्रदेश त्याला लागतो. त्यांतून वर जाणारा भुवर्लोकांतून पितृलोकापर्यंतच जाऊन पुनः कमी पडलेला अभ्यास पूर्ण करण्यासाठीं पृथ्वीवर जन्मास येतो. कारण योगाभ्यास करणाराकडून मोहानें किंवा भ्रमानें भूर्लोकांत किंवा त्याखालीं राहणाऱ्या दुसऱ्या अनिष्ट जातीच्या सूक्ष्म देहधाऱ्यांत राहण्याची चूक होत नाहीं. आणि जो योगी प्रयाण कालीं अग्नीसारख्या प्रकाशमय प्रदेशांतून, किंवा जोतिर्मय प्रदेशांतून, किंवा दिवसासारख्या लख्ख उजेडाच्या प्रदेशांतून आपल्या स्थूल देहा-ला सोडून सूक्ष्म देहांतील यातनाशरीर सोडून व वासनाशरीर सोडून स्वर्गाच्या वर जाऊन पोहोंचतो, तो त्या ठिकाणींच आपली उन्नति करून घेण्यायोग्य क्रिया करण्याला समर्थ होतो. म्हणून या पृथ्वीवर पुन्हां येणें त्याला भाग नसतें. तथापि येथें येऊन जाणें अगर न जाणें हें त्याच्या सामर्थ्यांत असतें. हे जे वर योग्याचे दोन मार्ग दाखविलेले आहेत, त्या मार्गावरील प्रदेशाच्या अधि-कारिणी देवता उपासनेप्रमाणें प्रयाण करणारास आपआपल्या प्रदेशां-तून नेतात. पण साधारण माणसाला याचा कांहीं उपयोग होत नाहीं.

साधारण मनुष्याला हा स्थूल देह सोडल्यानंतर कोणकोणत्या प्रदेशांतून कसकसें जावें लागतें, त्याच्या सूक्ष्म देहाची स्थिति कसकशी होते, इत्यादि प्रकारची माहिती पूर्वीच्या काळच्या श्रेष्ठ व पवित्र योगिवर्यांनीं निरनिराळ्या ग्रंथांतून सांगितली आहे. पण आज पुष्कळांना जुन्या ग्रंथांच्या दृष्टीनें पाहण्याची इच्छा व श्रद्धाही नाहीं; आणि योगज्ञानानें समजण्याची योग्यताही नाहीं. यासाठीं आपणाला दुसरा साधा मार्गच पत्करिला पाहिजे.

प्रथम या विषयाचा अनुभव घेणाऱ्यासाठीं व अभ्यास करणाऱ्यासाठीं अर्वाचीन शास्त्रज्ञानानें या सप्तभूमिकांबद्दल चांगली कल्पना आणून देऊन मग अंतर्ज्ञानदृष्टीच्या लोकांनीं सांगितलेली माहिती पुढें ठेविली, तर ती समजण्याला सुलभ पडेल. व मग साध्या मार्गानें तिजबद्दलचें ठाम अनुमान बांधतां येईल.

भुवनकल्पनेचें स्पष्टीकरण.

या भुवनांबद्दलची साधारण लोकांची कल्पना ह्मटली तर ज्याप्रमाणें एकादा सुंदर, उंच व शृंगारलेला वाडा असून त्याचे मजले उत्तरोत्तर जास्त सुखसोईनें युक्त केलेले असावेत, तशा प्रकारचा या पृथ्वीच्या वर उंच आकाशांत स्वर्ग असतो; व त्याच्यावर उत्तरोत्तर सात स्वर्ग असून या पृथ्वीच्या खालीं सात पाताळें आहेत; अशी कल्पना झालेली दिसते. अशी ही कल्पना निव्वळ शब्दज्ञानानें झालेली आहे, असेंच ह्मणावें लागतें. शास्त्र व विचार या योगानें यावर निराळाच प्रकाश पडतो. वर आणि खालीं याचा अर्थ कनिष्ठ व श्रेष्ठ असा, किंवा एकापेक्षां एक सूक्ष्म असा घेतला असतां याचा बरोबर अन्वय लागतो.

या आपल्या पृथ्वींत घन द्रव्याचें जग आहे. व त्या घन द्रव्याच्या जगांत देखील पातळ द्रव्याचें जग आहे. शिवाय एक वायूचें जग आहे. तसेंच प्रकाशाचें एक स्वतंत्र राज्य असून त्याचें एक भुवन आहे. आणि यांतच विद्युत्चेंही एक साम्राज्य असून त्याचा सर्व कारभार स्वतंत्र तऱ्हेनें चालला आहे.

स्थूल दृष्टीला व वर वर पाहणाराला घन, पातळ, वायुरूप, विद्युत् हीं अगदीं पृथक् दिसतात खरीं; पण हीं कोणीही एकमेकांला सोडून नाहींत. पृथ्वीचा बाह्य भाग सोडून जसजसें आपण तिच्या आंत मध्याकडे जावें, तसतसा एकापेक्षां एकाचा प्रांत विस्तीर्ण होत गेला असून एकापेक्षां एक उच्च आहे व स्वतंत्र आहे, आणि अगदीं मध्यांतील उच्च भागालाच त्यापेक्षां कनिष्ठाचें रूप येत येत पृथ्वीच्या वरचें कवच आज बनलेलें दिसत असून या कवचावरील विविध सृष्टींत या सर्वांचा पुरवठा मूळ मध्यांतून होत आहे, व तसाच तो या पृथ्वीबाहेर असलेल्या सजातीयांच्या साह्यांतूनही होत आहे, असा भूगर्भशास्त्राचा व ज्योतिषशास्त्राचा शोध आपणापुढें आहे. त्याचप्रमाणें दुसरीं सृष्टशास्त्रेंसुद्धां आपणाला पृथ्वीवरील कोणत्याही एका पदार्थांत देखील या सर्व स्थिति–या सर्व भूमिका–किंवा हीं सर्व जगें आहेत, असें सांगण्याला तयार आहेत. तुह्मी एक साधा कागद किंवा अगदीं कोरडें पीठ घेतलें, तरीसुद्धां रसायनशास्त्र त्यांत पाणी आहे असें सांगण्याला तयार आहे. उष्णताशास्त्र उष्णता आहे असें सांगण्याला तयार आहे. प्रकाशशास्त्र प्रकाश आहे असें सांगत आहे. व विद्युत्-शास्त्र त्यांत विद्युत् आहे ह्मणून ह्मणत आहे. याप्रमाणें शास्त्रानें सांगितलेला घनवस्तूंतील जलांश, त्याच्या लवचीकपणामुळें आणि आर्द्रपणामुळें, आणि उष्णता व विद्युत् हीं सर्व पदार्थांत असतात, ही गोष्ट थोडेंसें शास्त्र (सायन्स) पाहिलेला मनुष्य कबूल करील. पण प्रत्येक वस्तूंत प्रकाश असतो, हें मात्र तो कबूल करणार नाहीं. प्रत्यक्ष जरी पाहिलेला नसला, तरी फक्त एकट्या रेडियम् धातूंतच प्रकाश असतो, त्याशिवाय स्वप्रभ पदार्थ नाहीं, असें तो ह्मणेल. हें त्याचें ह्मणणें साध्या दृष्टीपुरतें जरी बरोबर आहे, तरी तें शास्त्राला संमत नाहीं. आमच्या दृष्टीपेक्षां शास्त्राची दृष्टि जास्त विस्तृत व जास्त सत्य आहे. जें आमच्या दृष्टीला दिसत नाहीं, तें नाहीं असें मानिलें, तर जगांतील किती तरी शोधांस आंचवावें लागेल. आमच्या दृष्टिमर्यादेच्या खालच्या व वरच्या प्रदेशांत ती दृष्टि शून्य होते.तरी खालच्या व वरच्या प्रदेशांत

प्रकाश नाहीं, असें मात्र नाहीं. मात्र तो आपणांस दिसत नाहीं. या जगतांतील सर्व पदार्थ स्वप्रभ आहेत, म्हणजे त्या प्रत्येकाला स्वतःचा प्रकाश आहे, असें शास्त्र सांगतें. दिसणाऱ्या प्रकाशासारखाच एक न दिसणारा प्रकाश आहे. वर्णलेखांत दिसणाऱ्या प्रकाशाबरोबरच न दिसणाऱ्या प्रकाशाच्या रेषा किंवा पट्टे पडलेले असतात, ही गोष्ट लाइट प्लेटच्या (नाजूक द्रव्य लावलेल्या ग्राहकाच्या) फोटोवरून सिद्ध झालेली आहे. प्रकाशकिरण म्हणजे ईथरच्या लहरी असून त्या आपणांस लोलकांतून दिसणाऱ्या तांबड्या रंगापासून तों अखेरच्या आबाशाई रंगापर्यंत जवळ जवळ दुपटीपर्यंत वाढत जातात. ही त्यांची एका सेकंदांत वाढत जाणारी संख्या जेव्हां या दुपटीपेक्षां जास्त वाढत जाते, तेव्हां तो प्रकाश आपणास दिसत नाहीं. त्याला आबाशाई पलीकडील प्रकाश म्हणतात. व तांबड्या किरणलहरीच्या किंवा ईथरच्या कंपाच्या एका सेकंदांतील संख्येपेक्षां जेव्हां कंपाची संख्या एका सेकंदांत कमी पडते, तेव्हांही हे प्रकाशकिरण डोळ्यांस दिसत नाहींत. यांना तांबड्याच्या अलीकडील किरण म्हणतात. हें जसें फोटोवरून सिद्ध झालें आहे, तसें विशिष्ट तऱ्हेच्या नेत्ररचनेच्या मनुष्यांनाही तें दिसून प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध झालें आहे. व याच नियमानें या संख्येपेक्षां कमी कंप उत्पन्न करणारे पदार्थ, व दुपटीपेक्षां अधिक कंप उत्पन्न करणारे पदार्थ, आपणास विशिष्ट नेत्ररचनेशिवाय, किंवा नेत्राच्या विशिष्ट स्थितीशिवाय स्वप्रभ आहेत, असा अनुभव येणार नाहीं. तरी ते स्वप्रभच आहेत. प्रत्येक परमाणु स्वयंचल आहे, व तो सदोदित गतियुक्त आहे. त्या प्रत्येकापासून ईथरमध्यें सदोदित कंप उत्पन्न होत आहेत. म्हणून ज्याप्रमाणें त्यांत सदोदित उष्णता आहे, त्याचप्रमाणें प्रकाशही कायम आहे, असा हा शास्त्रज्ञांचा सिद्धांत कोणत्याही पदार्थांत बाकीच्या भुवनांप्रमाणें प्रकाशाचें भुवन व्यापून राहिलेलें आहे, असें सांगेल. मात्र ते दिसण्यास कमी असलेले ईथरमधील कंप वाढून दृष्टिमर्यादेंत आले पाहिजेत, किंवा अधिक होत असलेले कंप कमी होऊन दृष्टिमर्यादेंत आले पाहिजेत, तरच आमची साधी दृष्टि त्याला प्रकाश किरण म्हणणार. इतकी आमची दृष्टिमर्यादा संकुचित आहे.

सर्व लोकांना या शास्त्रीय माहितीवरून भुवनांची कल्पना येणार नाहीं, कारण पुष्कळांना या सृष्टशास्त्राची माहिती नसते, हें खरें. पण विशेष शंका व जिज्ञासा असलेल्या सृष्टशास्त्रावलोकन करणाऱ्या लोकांसाठींच वरील अवघड विवेचन करणें नाइलाजानें भाग आलें. सर्वांना भुवनांची कल्पना आणून देणारें सुलभ तऱ्हेचें विवेचन ह्मटलें, तर सर्वांनाही त्याचा अनुभव असेल, अशा दृष्टांतानेंच देणें भाग आहे.

एका कांचेच्या गोल व भरीव गोळ्याकडे तुह्मी पाहिलें, तर तुह्मांला त्या सर्व गोल भागांत जिकडे तिकडे कांचच भरलेली आहे, असें दिसेल. त्याला हातानें चाचपून पाहिलें, तर त्या सर्व भागांत स्पर्शाला कठिणपणाच आहे, असें लागेल. तोच गोल लाल असेल, तर जितका काचेच्या परमाणूंनीं तो गोल भाग व्यापलेला आहे, तितका सगळा तो लाल रंगानें व्यापलेला आहे, असे दिसेल. व तोच गोळा ऊन केला असेल, तर त्याच सर्व गोल भागांत उष्णताही भरून राहिली आहे, असा स्पर्शानें प्रत्यक्ष अनुभव येईल.

याप्रमाणें त्या एका काचेच्या गोलानें व्यापलेल्या आकाशाच्या गोल भागांतच काचेची भूमिका आहे. त्यांत तितकीच लाल रंगाची भूमिका आहे. आणि तितकीच उष्णतेचीही भूमिका आहे. अंधळ्यास त्यांपैकीं आकार व रंगसृष्टि नाहीं, व सुनबहिऱ्यास (त्वगिंद्रिय ज्ञान नष्ट झालेल्या रोग्यास) त्यांपैकीं उष्णतासृष्टि ज्ञात होणार नाहीं. खडीसाखरेच्या खड्याच्या आकारांतच सर्वत्र गोडी भरलेली आहे. पण ज्याच्या जिव्हेची चव घेण्याची शक्ति गेलेली आहे, त्याला चवीची सृष्टि नाहीं. कारण बाह्य सृष्टीचें ज्ञान करून देणारें व त्या सृष्टीशीं संबंध ठेवणारें इंद्रिय कार्यकर्तृक झाल्यावांचून त्या सृष्टीचा अनुभव किंवा ज्ञान आपणास होत नाहीं. हीं बाह्य स्थूल सृष्टीचें स्थूल ज्ञान करून देणारीं ज्ञानेंद्रियें पांच असल्यामुळें, (१) एका वस्तूंत ज्याप्रमाणें स्पर्शज्ञेय सृष्टि असते, ह्मणजे त्वगिंद्रियसाधनानें समजणारा थंडपणा किंवा उष्णपणा, व स्पर्शानें समजणारा आकार, यांची विविध सृष्टि असते. (२) रसनेंद्रिय

साधनानें ज्ञात होणारी विविध रससृष्टि जशी त्यांतच असते, (३) घ्राणेंद्रिय साधनानें समजणारी गंधसृष्टि जशी ह्यांतच भरून असते, (४) कर्णेंद्रियांनीं प्रतीतीस येणारी नादलहरीची सृष्टिही त्या एकांतच भरलेली असते, आणि (५) नेत्रेंद्रियसाधनानें अनुभवाला येणारी आकार व रंग यांची विविध-सृष्टि जशी त्यांतच भरून राहिलेली असते, त्याप्रमाणें या मनुष्याच्या पिंडांत व ब्रह्मांडांत एकाच भूमि-केला व्यापून एकापेक्षां एक श्रेष्ठ, सूक्ष्म, व उच्च अशा निरनिराळ्या सृष्टि, जगें, किंवा भुवनें भरलेलीं आहेत. आणि तीं ज्ञात होण्यायोग्य अंतरिंद्रियेंही आहेत.

हें वरील एकंदर विवेचन पुढील भुवनांची अंधुक तरी कल्पना आणून देण्यास उपयोगी पडेल.

सप्तदेह व भूमिका.

पिशाचज्ञानाला उपयोगी असें अर्वाचीन लोकांचें सप्तदेहांचें व भूमिकांचें वर्णन खालीलप्रमाणें आहे.

१ **स्थूल देहः**—आपलें हें स्थूल शरीर किंवा कवच जड पर-माणूंनीं बनलेलें आहे, व त्याला कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें, व ज्ञानतंतु आणि मेंदू, इतकी सामग्री आहे. या देहाला घन (सॉलिड), पातळ (लिक्विड), व वायुरूप (गेशस्), अशा तीन तऱ्हेच्या द्रव्यांनीं बनविलेलें आहे. या देहाचा संबंध भूलोकाशीं—पृथ्वीशीं आहे.

२ **सूक्ष्मदेहः**—या स्थूल देहाला व्यापून असणारा सूक्ष्मदेह, इंद्रियांनीं प्रत्यक्ष ज्ञात होणाऱ्या वरील स्थूल देहाच्या द्रव्यापेक्षां सूक्ष्म, व्यापक व पंचज्ञानेंद्रियागोचर, अशा ईथरसारख्या चार द्रव्यांनीं बनलेला असून तो हुबेहूब या स्थूलासारख्याच आकाराचा आहे. ह्मणजे याच्याशीं प्रमाणांत आहे. याचा संबंध या लोकांतील सजातीयाशीं (भुवर्लोकाशीं) आहे.

३ **प्राणदेहः**—सूक्ष्म देहाच्या द्वारानें स्थूल देहाशीं संबंध ठेव-णारा व सर्व खनिज, वनस्पति, प्राणी, इत्यादिकांना व्यापून अस-

णाऱ्या प्राण द्रव्याच्या अंशानें बनलेला हा देह किंवा कोश आमच्या सूक्ष्म व स्थूल देहाला व्यापून असून याचा संबंध खालीं जीव लोकाशीं व वर तेजोलोकाशीं (ॲस्ट्रल प्लेन) स्वर्गलोकाशीं आहे.

शास्त्रीय स्पष्टीकरणः—आमच्या या स्थूल देहाच्या वाढीचा विचार केला, तर यांतील अंश क्षणाक्षणाला वाढत असतात व कमी होत असतात. शरीरांतील शेकडों परिमाणु प्राणरहित व निर्जीव होऊन—मरून जाऊन—बाहेर पडतात. व त्या ठिकाणीं शेकडों नवीन येतात.

सर्व शरीर ह्मणजे सुद्धां असंख्य सूक्ष्म अशा प्राणयुक्त परिमाणु-समुच्चयाचा बाजारच आहे, असें पाश्चात्य जंतुशास्त्रज्ञांचें मत आहे.

मनुष्याच्या सर्व शरीराची व्यवस्था करणारे विलक्षणशक्तिमान् जीव (व्हाईट सेल्स) यांना हा सूक्ष्मतेजोरूप प्राणदेहच अप्रत्यक्ष-पणें एकसारखें उत्पन्न करून त्यांना चेतनसामर्थ्य देत असतो.

४ वासनादेहः—स्थूल, सूक्ष्म, व प्राण या देहांना किंवा कोशांना [कवचांना] व्यापून असणारा देह ह्मणजे वासना देह होय. हा प्राणाच्या साहाय्यानें सर्व देह व्यापून असतो. हाही सूक्ष्म प्रकाशाच्या जातीच्या द्रव्याचा बनलेला असतो. यांतच भूक, तहान, विषयवासना, काम, क्रोध, लोभ, ईर्षा, मत्सर इत्यादिकांचा समावेश झालेला असून सर्व प्रकारचे मनोविकार यांतच असतात. व याचा संबंध कामलोकाशीं असतो.

५ मानसदेहः—स्थूल, सूक्ष्म, प्राण व काम या देहांना व्यापून असणारा मानसदेह हा ‘ अहं ’ ह्मणजे मी या भावनेवर आरूढ होणारा, तेजोरूप पण विकृत अशा आत्म-तत्त्वाचा बनलेला आहे. याचा संबंध देवलोकांशीं (जनो लोकांशीं) आहे. हा विचार करणारा व चिंतन करणारा आहे. याला या स्थितींत कांहीं तरी रूपभूमिका आहे. पण जेव्हां

हा देह किंवा कोश विशिष्ट स्थितींत शुद्धस्वरूपी बनतो—अरूप बनतो—अहंकार विरहित होतो, तेव्हां जीवात्मा या पदवींतून तो मोकळा होऊन शाश्वत तत्त्वांत येतो. तेव्हां तो महत्तत्त्वाचा बनलेला असतो. त्याला शुद्ध मानस ह्मणतात. तो इच्छाशक्तीच्या योगानें पाहिजे त्या सामर्थ्यवान् देवतांचीं स्वरूपें घेण्यास शक्तिमान् असतो. आणि तो शाश्वतपणा व स्वतंत्रपणा यांचा अनुभव घेत असतो.

या शुद्ध मनाचा जो खालीं कामरूप देहाकडे आलेला भाग, किंवा किरण, किंवा संबंधतंतु असतो, त्यालाच अशुद्ध मानस ह्मणतात. हा अशुद्धमानसकिरणतंतु आपल्या शुद्ध मानसाकडे येऊन मिळण्याकरितां खटपट करीत असतो. परंतु त्याला एकीकडे कामरूपाची ओढ लागलेली असते.

६ **आत्मबुद्धिः**—या शुद्ध मानसाला व्यापून राहणारें आत्मबुद्धि हें सर्वव्यापक तत्त्व आहे. हें आत्मप्रभेपासून जोंपर्यंत निराळें आहे, तोंपर्यंत त्याला अरूपरूप असा आकार आहेच. या आत्मबुद्धीला येऊन मिळण्यासाठीं शुद्ध मानसाची खटपट चालू असते, व तो सर्वात्मबुद्धीच्या स्वरूपास येण्यासाठीं आपल्या तेजःसामर्थ्यानें सर्वोत्कृष्ट अनुभव मिळविण्याची खटपट करीत असतो.

७ * **आत्मप्रभाः**—हें सर्वांत श्रेष्ठ शेवटचें आपलें सत्य स्वरूप आहे.

याप्रमाणें एकाला एक व्यापून असणारे, व एकापेक्षां एक सूक्ष्म पण विस्तृत होत जाणारे, देह किंवा कोश मिळून मनुष्यप्राणी बनलेला आहे. आणि त्याच्या स्थूलाच्या सर्व क्रियेंत वरच्या देहांचें—कोशांचें—साह्य असतें.

---

* जी आत्मप्रभा नित्यनवी । तेची करूनी ठाणदिवी ॥
जो इंद्रियांतें चोरून जेवी । तयासिची फावे ॥ १ ॥

ज्ञानेश्वरी.

या सात भागांनीं—कोशांनीं—युक्त असलेला मनुष्यप्राणी जसजसा एकेक भागाचा त्याग करितो, किंवा एकेक कोशाचा संबंध सोडून वरच्या भागांत जातो, तसतसा त्याला त्या त्या जगाचा—भुवनांचा--अनुभव येतो. या मनुष्य देहांत चाललेल्या सर्व क्रियांचा व या देहांचा—भूमिकांचा—सर्व संबंध नीट ध्यानांत येण्यासाठीं निरनिराळ्या भुवनांत निरनिराळ्या देहांच्या चाललेल्या क्रियांचें विशेष स्पष्टीकरण करूं.

लेखकाची एक कल्पना.

आपण एकादी वस्तु पाहतों त्या वेळीं काय काय क्रिया घडते, व ती कोणकोणत्या ठिकाणीं घडते, याचा विचार केला, तर आपण जी वस्तु पाहतों, त्या वस्तूपासून प्रथमतः ईथरमध्यें विक्षित रंग किंवा प्रकाशदर्शक लहरी निघून त्या आमच्या या स्थूल डोळ्याच्या बाहुलीवर येऊन आदळतात, व त्या योगानें आमच्या स्थूल देहाच्या नेत्रांतील दर्शनज्ञानतंतूंत त्या सजातीय कंप उत्पन्न करितात. या ज्ञानतंतूंतील ते कंप मग सूक्ष्म देहाशीं संबंध ठेवणाऱ्या मेंदूंतील तंतूंपर्यंत पोंहचतात. हें गति नेण्याचें काम प्राणपरमाणूंचें (प्राणदेहाचें) आहे. एथपर्यंत जरी मजल आली, तरी आह्मांला तें रूप दिसत नाहीं. या लहरी जेव्हां कामरूपापर्यंत (वासनारूपापर्यंत) येऊन पोंहचतात, तेव्हांच आह्मांला तो पदार्थ दिसतो, परंतु या कामरूपांत असणाऱ्या त्या लहरी मानसरूपापर्यंत आल्या नाहींत, तर त्या दिसल्या तरी त्यांच्याबद्दल कांहीं विचार उत्पन्न होत नाहीं. कित्येक वेळेला आपल्या डोळ्यांपुढून कांहीं वस्तु गेली असतां, कांहीं तरी गेलें, पण तें काय गेलें, हें समजत नाहीं. अशा वेळीं फक्त स्थूल नेत्रेंद्रियापासून सूक्ष्म देहापर्यंत त्या वस्तूच्या लहरी आलेल्या असतात. जेव्हां उत्कट इच्छा, भीति, अभिलाष, प्रेम, इत्यादि वृत्तींशीं जोराचा संबंध करणारी वस्तु अचानक नजरेसमोर येते, तेव्हां जर तिचे कंप मानस देहापर्यंत न पोंचतां

कामरूपांतच थांबले, तर त्या वेळीं असा पदार्थ दिसत असूनही त्याबद्दल कांहीं विचार न चालतां चकित होऊन--भुलून--त्याचें नुसतें रूपच स्तब्धपणें पहात राहण्याची स्थिति येते.

विषयकल्पना, मनोविकार, वासना, विचार, सद्बुद्धि, इत्यादि वृत्ति या आपआपल्या स्थानांतून—भुवनांतून उत्पन्न होऊन स्थूल कार्य घडवितात; तशाच त्या बाहेरच्या स्थूल विषयापासून रूपांतर होत होत पुन्हा आपआपल्या भुवनांत जाऊन राहतात, व स्मरण केलें कीं पुन्हा तशाच क्रमानें येतात. ज्या आपल्या भुवनापर्यंत स्पष्ट तऱ्हेनें पोंचत नाहींत, त्यांचें स्मरणच पुन्हां होत नाहीं. त्या विसरून जातात. व ज्या अंधुक आणि अस्पष्ट असतात, त्या स्मरणांत आणण्यास–पुन्हा स्पष्ट करण्यास–वेळ लागतो, अशी माझी समजूत आहे. याप्रमाणें खालच्या सर्व कोशांपर्यंत मानस देहाचा संबंध पोंचलेला असतो. कोणताही विषय प्रत्येक देहाच्या भुवनाशीं सजातीय कंपाचें रूप धारण करीत शेवटीं मानस देहापर्यंत पोंचल्याशिवाय त्याचें ज्ञान, विचार, चिंतन, किंवा मनन, या क्रियाच होत नाहींत.

मनुष्याच्या अंतःस्वरूपाबद्दल एक अर्वाचीन मत.

शुद्ध मानसदेहापासून (अंतर्मनापासून) एक मानस–प्रकाश-किरण (संबंधतंतु) खालीं–खालच्या देहाकडे–आलेला असतो. आणि त्या मानस किरणाला कामदेह गच्च धरून ठेवितो. या मानस किरणाला किंवा या अशुद्ध किंवा खालच्या मानस देहाला खालच्या बाजूकडे कामदेहाची ओढ असते, व वरच्या बाजूकडे त्याला शुद्ध मानसाची ओढ असते. जिवंतपणीं काम व हें खालचें मन हीं एकरूप असतात. व या दोन्हीला–काम व खालचें मन मिळून असलेल्याला **जीव, जीवात्मा** असें म्हणतात. या वेळीं ह्मणजे जिवंतपणीं कामदेहाला कांहीं आकार किंवा रूप असत नाहीं. काम हा प्राणशरीराला व्यापून असतो. व त्या द्वारें जेव्हां **जीवात्मा** ह्मणजे **काम व खालचें मन** एकत्र मिळून मेंदूत कार्य

करितात, तेव्हां त्याला मन, (बाह्य मन) बुद्धि, अशीं व्यावहारिक नांवें आहेत. इंद्रियांना विषयस्पर्शाबरोबर दुःख, सुख किंवा आनंद हे या अधोजीवाच्या–जीवात्म्याच्या–साहचर्यामुळेंच होतात. काम देहांत आलेल्या मानसाला अधोजीव ह्मणतात. व स्वतंत्र राहिलेल्या मानसाला **शुद्ध मानस** किंवा **ऊर्ध्व जीव** ह्मणतात. काम शरीरांत या ऊर्ध्व जीवाचा किंवा शुद्ध मानस देहाच्या भागाचा–तेजाचा–तेजःकिरणांचा प्रवेश झाल्यावांचून मनुष्य ही संज्ञाच येत नाहीं. काम प्राणाशीं संबंध ठेवितो. प्राणांत कामशरीर नसेल, तर ज्ञान आंत जाऊन पोंहचणार नाहीं. नुसता प्राणदेह खालच्या देहाचें फक्त चलन वलन करील.[1] पण सूक्ष्म देहाच्या इंद्रियांला गति देण्याला प्राण (देह) त्यांत नसेल, तर सूक्ष्मेंद्रियांचेंही चलन वलन होणार नाहीं. स्थूलाला जशीं व जितकीं इंद्रियें आहेत, तशींच व तितकींच तीं सूक्ष्माला आहेत. आणि या सूक्ष्माच्या (तेजोरूप) इंद्रियांचा स्थूलाच्या त्या त्या इंद्रियाशीं संबंध जडलेला आहे. या स्थूलाचा एकसारखा नाश होत आहे. स्थूलाचीं इंद्रियें व स्थूल एका जन्मांत कित्येकदां नवीन होत असून हा आपला देह आरंभापासून आहे तोच आहे असें जें वाटतें, तें सूक्ष्म देह काय-

---

१ एका प्रख्यात अमेरिकन डाक्टरनें कुत्र्याचा संपूर्ण मेंदू काढून मेंदूच्या साह्याशिवाय नुसत्या सिंपेथेटिक नर्व्हसच्या साह्यानें त्याला जिवंत राखतां येणें शक्य आहे, असें प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध करून दाखविलें. या त्याच्या मेंदु काढलेल्या स्थितींत त्याच्या हृदयाची क्रिया व खालच्या इंद्रियांतील क्रिया चालू होत्या. या स्थितींत तो कांहीं दिवस जिवंत होता. त्याला हालचाल करितां येत होती. त्याला फक्त सरळ पळतां येत होतें. पण आप्त परके कांहीं समजत नव्हतें. या मेंदूशिवाय त्याच्या शरीरांत चाललेल्या क्रिया त्याच्या हृदयाशीं संबंध असलेल्या सिंपेथेटिक नर्व्ह सिस्टिममधील प्लेक्ससशीं संबंध ठेवून असलेल्या प्राणदेहाच्याच योगानें होत असाव्यात.

मचा एकच असल्यामुळें व त्याच्याशीं जीवात्म्याचा संबंध असल्यामुळें वाटतें.[1]

अदृश्यापासून दृश्य पदार्थ बनविण्याची शक्ति प्राण देहांत आहे.[2] ह्या प्राणदेह अंतकाळीं निघून गेला असतां सर्व शरीराची व्यवस्था करणारे शरीरांतील रक्तांतील सूक्ष्म जंतु (व्हाईट सेल्स) अनियंत्रित होऊन हवे तसे वागूं लागतात, व शरीर नाश पावतें. या स्थूल शरीराचा नाश झाल्यावर सूक्ष्म शरीर बाहेर पडतें. या स्थूल शरीराचा पूर्ण नाश झाल्याशिवाय सूक्ष्म शरीर पूर्ण मोकळें होत नाहीं. स्थूल शरीराचा नाश त्या देहाचें पृथक्करण होऊन होतो. स्वाभाविकपणें हळुहळू कुजून त्याचा नाश होण्यास फार काळ लागतो, पण दहनानें स्थूल ताबडतोब नाश पावतें.

---

१ मनुष्याच्या शरीरांतील रक्त एक वर्षात जुनें सर्व जाऊन नवें येतें. केश व नखें यांच्या वाढीवरून साधारण माणसाला आपल्या शरीरांत जुनें जाऊन नवें होत आहे, हें ध्यानांत येईल. नखें साधारणपणें सहा महिन्यांच्या खालीं आपल्या बोटाला असलेलीं—त्यांचा आपणाजवळ आज एक अंशही असत नाहीं, असें मेंदी लावलेलें नख वाढून नाहींसें झाल्यावरून बायकामाणसांची देखील खात्री होते. याचप्रमाणें सर्व त्वचा, स्नायु, शिरा, वगैरे जड देहाचे भाग सात वर्षांनीं नवे होतात. आणि हाडासुद्धां सर्व स्थूल देह बारा वर्षांत पूर्वींचा एकही जड द्रव्याचा परमाणु शिल्लक नाहीं असा नवा होतो. (ह्मणूनच तपश्चर्येची मर्यादा बारा वर्षांची सांगितलेली असावी.) याप्रमाणें शहाण्णव वर्षांचा मनुष्य असेल, तर त्याचें रक्त शहाण्णव वेळ, हाडावांचूनचा देह तेरा वेळ, व हाडाच्या सांपळ्यासुद्धां सर्व देह आठ वेळ, अगदीं नवा बनलेला असतो. अर्थात् जड इंद्रियें हीं नवीं नवीं बनलेलीं असतात, तरी त्यांचीं मूळ असलेलीं सूक्ष्म देहाचीं इंद्रियें तींच असतात. ह्मणून हा वरचा फरक समजुतींत येत नाहीं.

२ ही गोष्ट वनस्पतींच्या वाढीचा विचार केला असतां सहज ध्यानांत येते. चिनी मातीच्या सारख्या वजनाच्या दोन प्याल्यांत

मरणकालीं सूक्ष्म (प्रवहदेह) जरी स्थूलांतून बाहेर पडतो, तरी स्थूलाचा नाश होईपर्यंत स्थूलाचा व त्याचा संबंध तुटत नाहीं, आणि हा स्थूलाला सोडून लांब जात नाहीं; त्याला चिकटून, लगटून असून त्याजसभोंवती फिरत असतो. आणि स्थूलाचा पूर्ण नाश झाला कीं, याचें त्याच्याशीं असलेलें संबंधसूत्र तुटतें, आणि त्याच वेळीं या (प्रवहदेह) सूक्ष्म शरीरासही मरण येतें, आणि त्याबरोबर यांतून—या सूक्ष्म कोशांतून—प्राण देह बाहेर निघतो. स्थूल मनुष्या सारखीच हुबेहूब प्रतिमा असलेला सूक्ष्म कोशप्रवह, आकाश-तत्त्वाच्या जगांत प्राणरहित होऊन, ज्याप्रमाणें समुद्रांत किंवा नदींत गोगलगाईचे शंख सुटे होऊन पडलेले असतात, त्याप्रमाणें टर्फल होऊन पडलेला असतो. प्राणही, त्यांतून काम वेगळा होतांच, लय पावतो. याप्रमाणें स्थूल, सूक्ष्म, व प्राण या तीनही देहांचा संबंध सुटल्यावर मानसाचा खालचा किरण असलेला वासनात्मक देह, ज्याला काममानस देह म्हणतात, तो कामलोकांतील शरीर धरून राहतो. हें काम लोकांतील शरीर अगदीं हलक्या, पातळ व सूक्ष्म द्रव्याचें बनलेलें असतें, व या कामरूपाला हवा तो आकार धारण करितां येतो. भूलोकांतील द्रव्यें वेगळीं व या लोकांतील द्रव्यें वेगळीं असल्यामुळें या भूलोकांतील मनुष्यें व हे देहधारी अगदीं जवळ जवळ असून सुद्धां (कांहीं विशिष्ट अवस्थांवांचून) एकमेकांच्या गांठी पडत नाहींत. साधारण माणसाच्या कामरूपांत विशेष जोर असतो. कारण अधोमानस व काम एकमेकांत फार गुंतून गेलेले

सारख्या वजनाची माती घालून त्यांत वजन करून सारखेंच पाणी घालीत गेलें, व एकांत एक बी पेरिलें, आणि नित्य त्या पेल्यांचीं वजनें केलीं, तर ज्यांत झाड लावलेलें असतें, त्या पेल्याचें वजन (झाडाप्रमाणें) वाढत आहे, असें अनुभवास येतें. वातावरणांतील अदृश्य वायूंना बीजांतील प्राणशक्तीनें आकर्षण करून घेऊन झाडाचें स्थूल दृश्य स्वरूप दिल्यामुळेंच हें वजन वाढलेलें व प्रत्यक्ष झाड वाढलेलें अनुभवास येतें. ही प्राणशक्ति–हा प्राणदेह–त्या बीजांत नसेल तर झाड वाढणार नाहीं.

असतात. या कामरूपाला भूलोकांतील आप्त इष्ट वगैरेंच्या याजसंबंधींच्या मनोविकारानें पुष्टता येते. आणि यामुळें अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष मनोविकारानें दळणवळण सुरू होऊन कामलोकांत हें रूप पुष्कळ राहतें, किंवा याच्या जिवंतपणींच्या मनोविकाराच्या जोराच्या प्रमाणांत हें फार काळ राहतें. यालाच **भूत पिशाच** ह्मणतात. आणि जेव्हां या कामशरीरांत असलेला मानसकिरण कामाच्या ओढीनें शुद्ध मानसापासून तुटून, हा काममानस राक्षस अगदीं वेगळा व स्वतंत्र होतो, तेव्हां त्याला **खवीस, समंध** व **ब्रह्मराक्षस** ही पदवी येते. अशी स्थिति झाली असतां पुनःपुन्हां खालचे जन्म घेऊन वासनाभोग भोगून कामशरीर झिजवून नाश पावत आलें असतां खालच्या मानसाच्या मदतीला शुद्ध मानसाचा एक किरण पुन्हां येतो. आणि मग त्याच्या उन्नतीच्या प्रवासाला सुरुवात होते.

या कामलोकांत पृथ्वीवरील जीवांप्रमाणें अनेक प्रकारच्या काममानस जीवांची वस्ती आहे. या काममानस लोकांतील आशाळभूत जीव ह्मणजे **भूत पिशाचें** आपलीं विषयभोगाचीं साधनें जीं स्थूल इंद्रियें तीं स्थूल देहासह नष्ट झालेलीं पाहून कोंवळ्या मनाच्या मनुष्याच्या शरीरांत शिरतात, कमकुवत मनाच्या मनुष्याच्या शरीरांत शिरतात, व आपल्या विषयवासना तृप्त करून घेतात.

या काम मानसांतून उन्नतीला जाण्यासाठीं ह्मणजे मोक्षाकडे जाण्यासाठीं अधोमानसाला कामरूपांतून निघून शुद्ध मानसांत मिळावें लागतें, तरच त्याला पुढचा मार्ग आक्रमण करतां येतो. अधोमानसाला काम शरीराच्या आकर्षणांतून सुटून मोकळा होण्यास त्या काम शरीराला सुखाची निद्रा यावी लागते. काम देहाच्या या सुखाच्या निद्रेच्या स्थितींत देखील–काम लोकाच्या जीवांच्या या वासनारहित शांत स्थितींत देखील–भू लोकांतील इष्टमित्रांच्या वासनांचें व सुखदुःखाचें आकर्षण चालतें. आणि त्या लहरी जोराच्या व वेगवान् असल्या तर त्या धक्यांनीं तो कामदेह जागृत होतो. त्याला भू लोकांतील जन्माची आठवण होते. आणि

तो एकादे वेळीं आपल्या टाकून दिलेल्या सूक्ष्म (प्रवहक) कवचींत शिरून आपलें रूप धरून अगर दुसऱ्या कोणाच्या टाकलेल्या सूक्ष्म देहाच्या कवचींत शिरून तेथील रूप धरून किंवा स्थूल शरीरांत (भू लोकांतील माणसाच्या) शिरून भाषण करतो, अथवा कांहीं स्थूल क्रियांच्या द्वारानें आपले मनोविकार कळवितो. आणि अशा रीतीनें चेतनेंत कांहीं काळ (दिवस, वर्षें) गेल्यावर त्या देहाला पुन्हां सुषुप्तावस्था—निद्रास्थिति—येते. भू लोकांत राहणाऱ्या लोकांच्या आकर्षक व उत्तेजक वासनांनीं काम देहाच्या या काम लोकांतील शांत निद्रास्थितीचा मोड झाला नाहीं, तर या काम देहाच्या मरणास व्यत्यय येत नाहीं. व या काम देहास यातनाही होत नाहींत. या काम देहाला सोडून अधो मानस शुद्ध मानसांत मिळण्यास निघणें हें दुसरें मरण आहे. हें काम देहाचें मरण झाल्याशिवाय त्या जीवाला शुद्ध मानसाच्या देवलोकांत येतां येत नाहीं. व या ठिकाणीं देवलोकांत आल्यावांचून पुढें जातां येत नाहीं.

काम शरीराचें कवच किंवा प्रेत काम लोकांत टाकून मानस वर गेलें, तरी या कामकोशांत मनोविकार व चेतनालहरी पुष्कळ दिवस कायम असतात. आणि त्या पूर्वसंस्काराच्या जोरदारपणाप्रमाणें फार वेळ किंवा थोडा वेळ राहतात. हीं कामरूप कवचें किंवा प्रेतें बाहेरून येणाऱ्या सजीवांच्या लहरी धरून (स्थापन करून घेऊन) यांच्याशीं संबंध घडणाराला त्रास देत असतात. असें जरी आहे, तरी यांतून मानस निघून गेल्यावर हें कामशरीर हळू हळू क्षीण होत जातें. कामलोकांतून मानस देह पलीकडे गेल्यावर भू लोकांतील वासनांच्या आकर्षणांतून तो सुटतो. व त्याच्याशीं भू लोकाचें दळणवळण बंद पडतें.

शुद्ध मानस स्वरूपाला आलेला (जीवात्मा=प्रत्यगात्मा) मूळच्या—आद्य—रूपांत जरी स्वतंत्र (शिवात्मा=परात्मा) असतो, तरी तो प्रत्येक भुवनाच्या अवस्थेमध्यें सांपडला असल्यामुळें त्या भुवनाचें सर्व ज्ञान करून घेऊन त्यांतून मोकळा

होईपर्यंत तो परतंत्र असतो. शुद्ध मानसरूपांत येईपर्यंतच त्याचे कोश नाशवंत असतात. पण या रूपापासून त्याच्या शाश्वततेस सुरवात होते. जेव्हां हें शुद्ध मन धारणेनें आत्मबुद्धितत्त्वाच्या स्वरूपांत येतें, तेव्हां आत्मप्रभा त्याला आपोआप आपल्या स्वरूपांत मिळवून घेते, आणि मग **मानस, बुद्धि,** व **आत्मा**, हे एकरूप होतात.

पिशाच कशास ह्मणतात ?

या वरील सर्व देहांचा विचार केला, तर पिशाच कोणाला ह्मणावें, हें स्पष्ट होतें. प्रथम **स्थूल देह,** मग **सूक्ष्म देह,** मग **प्राणदेह,** हे तीन आणि वरील **उर्ध्व मानस, बुद्धि,** आणि **आत्मा,** हे तीन यांच्यामधील देहाचा पिशाचवर्गात समावेश होतो. **स्थूल. सूक्ष्म, प्राण,** आणि **पिशाच,** हे चार कोश अशाश्वत आहेत. व **ऊर्ध्व मानस, बुद्धि,** आणि **आत्मा,** हे तीन शाश्वत आहेत. मिळून सात देह किंवा सात कोश झाले. **पिशाच** या स्वरूपांत **काम देह, काम मानस देह,** आणि **अधो जीव** किंवा **अशुद्ध मानस,** या तीन वर्गांचा समावेश होतो. आणि कामकोशाच्या चेतनायुक्त टरफलाचा समावेश मात्र **प्रेत** या भूताच्या जोडीच्या त्रासदायक वर्गांत होतो.

ज्यांचे जगांतील आचार विचार शुद्ध असतात, व जे अशाश्वतांत गुंतून रहात नाहींत, ते या कामलोकांत फार वेळ रहात नाहींत. पण आकस्मिक मेलेले, मरतांना अति आशा राहिलेले, आत्महत्या करून घेतलेले, कोणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मारलेले, असे या पिशाचदेहांत फार काळ व जोरदार चेतनेनें युक्त होऊन राहतात. या कामभुवनांत वास्तव्य करणाऱ्या एकंदर रहिवाशांपैकीं मुख्य मुख्य जातींची माहिती जवळ जवळ खालीलप्रमाणें आहे.

कामलोकांतील रहिवाशी.

या लोकांत मानवी नव्हेत असे तेथीलच रहिवाशी ह्मटले, तर या लोकांची व्यवस्था पाहणारे दैवी कामगार होत. त्यांना **देवता** ह्मणतात. त्यांत **१ कामदेव, २ रूपदेव, ३ देवदूत, ४ देवराजे**, इत्यादि वरिष्ठ वर्गांत आहेत. अगदीं खालच्या वर्गांत **५ खनिज व ६ वनस्पतींचीं कामशरीरें** ७ व **पशूंचीं कामशरीरें** असतात. यापेक्षां जरा वरच्या वर्गांत, ८ मृत झालेल्या मनुष्यांचीं (धनंजयवायु असलेलीं) निर्जीव होऊन पडलेलीं **सूक्ष्म देहाचीं कवचें** (या वायूंत स्थूल दृष्टीला दृश्य होण्याचा धर्म आहे), ९ **कामशरीरांचीं शवें** (प्रेतें), १० भूलोकांतून आलेल्या विकारांनीं (मानसिक विषयविकारांनीं) सजीव केलेलीं **कामकवचें**, ११ **काममानसाचीं छायारूपें**, १२ **काममानसाचीं प्रतिबिंबरूपें**, १३ **मृतांचीं काममानसरूपें (पिशाच)**, १४ साधारण मार्गांत असलेल्यांचीं **निद्रिस्त कामशरीरें**, १५ **लोभी, आप्पलपोटे, विषयासक्त, इत्यादिकांचीं भेसुर रूपें**, १६ **आकस्मिक हत्येनें अगर आत्महत्येनें मेलेल्यांचीं भयंकर स्वरूपें**, १७ **चेटकी व जादु करणाऱ्या लोकांचीं खस्याळ स्वरूपें**, १८ योग्य अभ्यासानें वर जाण्याला तयार असून **गुरूच्या हुकमाची वाट पहाणारे शिष्य**, व १९ या लोकांतील योग्य रहिवाशांना वर घेण्यासाठीं आलेले **वरच्या जगांतील महात्मे**, ह्मणजे **सिद्ध पुरुष**, इत्यादि भूलोकांतील मृत वर्गांपैकीं असतात. याशिवाय या ठिकाणीं भूलोकांतील माणसांनीं उत्पन्न केलेले रूप रहिवाशी ह्मटले, तर २० साधारण माणसांनीं न कळत आपल्या **कल्पनांनीं उत्पन्न केलेलीं रूपें**, २१ गैरमाहीत व अडाणी **मांत्रिकांनीं उत्पन्न केलेलीं वेडीं वाकडीं रूपें**, २२ **यंत्राकृति रूपें**, २३ **मंत्राकृति रूपें**, २४ **ज्ञानरूपें** व **आशीर्वादरूपें**, २५ आणि साधु सत्पुरुषांच्या छळाच्या योगानें त्यांच्या क्रोधापासून उत्पन्न झालेल्या **कृत्या**, इत्यादि भूलोकांतील देहधाऱ्यांनीं निर्माण केलेलीं

रूपें असतात. याशिवाय या भूलोकांत स्थूल देहानें रहात असून या कामलोकांत लिंगदेहानें येणारीं स्वरूपें झटलीं, तर २६ साधारण लोक आपल्या अंशतः किंवा पूर्ण बेशुद्धीच्या स्थितींत, अगर झोपेच्या स्थितींत अगर आजाराच्या स्थितींत क्वचित् या लोकांत **लिंग देहानें कांहीं काल येतात तीं रूपें**, २७ कृत्रिम साधनांच्या साह्यानें इंद्रियांना उत्तेजकता देऊन किंवा **पिशाच्चाशीं संबंध ठेवून या लोकांत येतात ते लिंगदेह**, २८ भूलोकाच्या जागृतींतच या लोकापर्यंत सूक्ष्मदेहानें येऊन परत जाण्याचें सामर्थ्य जन्मतःच प्राप्त झालें असलेले **अधिकारी लोक**, २९ आपल्या सूक्ष्म रूपाला निराळें करून वर घेऊन येणारे **नवशिके तपस्वी**, आणि ३० आपल्या मानसिक शक्तीनें कामद्रव्यांचें मायावी स्वरूप धारण करणारे **योगी**, इत्यादि भूलोकांत जिवंत असून या लोकांत दृष्टीस पडतात.

याप्रमाणें ही माहिती वारंवार गूढ शक्तीचा अनुभव घेतलेल्या, तपास केलेल्या, व विचार केलेल्या, शोधकांनीं दिलेली आहे. पण ही साधारण मनुष्याच्या अनुभवाला येत नाहीं.

अनुभवपात्रता.

मनुष्याला येणारे अनुभव त्याच्या ज्ञानेंद्रियावर व त्या ज्ञानेंद्रियाच्या सामर्थ्यावर अवलंबून असतात, हें जरी खरें आहे, तरी त्यालासुद्धां शिक्षणाची अवश्यकता असते. शॉर्टसाइट्च्या (लांबचें न दिसणाऱ्या) मनुष्याला मोकळ्या प्रदेशांत आपल्या सभोंवार फार थोड्या प्रदेशांतील दिसतें. ज्यांचे डोळे चांगले आहेत, त्यांना त्यापेक्षां अधिक लांब दिसतें. आणि जहाजावरील खलाशी लोकांपैकीं व शिकारी लोकांपैकीं अभ्यासानें दूर पाहण्याची शक्ति वाढलेल्या मनुष्याला, माकड किंवा गीध यांसारखें, अति लांबचें साधारण दुर्बिणीप्रमाणें स्पष्ट दिसतें. वाचण्यास जो शिकला नाहीं,अशा माणसाला ग्रंथभांडाराचें जग व त्यांतील चित्तचमत्कृतिजनक देखावे दिसण्याची पात्रता उत्पन्न झालेली नसते. तसेंच ज्याचें एखादें इंद्रिय अशक्त,

कमकुवत, अगर विकृत असतें, त्याला त्या इंद्रियसृष्टींतील चमत्कारा-चे अनुभव बरोबर येत नाहींत. असे शास्त्रज्ञांचे अनुभव आहेत. तसेंच ज्या इंद्रियाची शक्ति जास्त कार्य करण्यायोग्य उत्तेजित होते, त्या इंद्रियाला जास्त सूक्ष्म व लांबचें ज्ञान होण्याची पात्रता येते. एखादें इंद्रिय—बाह्य ज्ञानेंद्रिय—कार्य करण्याला अजिबात असमर्थ झालें असलें, तर त्याची शक्ति दुसऱ्या ज्ञानेंद्रियांत शिरून त्या इंद्रि-याला साधारण माणसाच्या ज्ञानापेक्षां विलक्षण ज्ञान प्राप्त करून देतें. आंधळ्याच्या त्वगिंद्रियाला किंवा घ्राणेंद्रियाला (त्याच्या डोळ्यां-कडून गेलेली) किती विलक्षण ज्ञानशक्ति उत्पन्न झालेली असते, याचे अनुभव पुष्कळांना आलेले आहेत. अशा तऱ्हेच्या अनुभवांवरून व शास्त्रीय शोधांवरून समजून आलेल्या सिद्धांतांच्या आधारानें आपणास अनुभवपात्रता कशी येईल तें पाहूं.

वरील नियमांप्रमाणें बाह्यज्ञानेंद्रियांची शक्ति उत्तेजित होण्यासाठीं **एखाद्या बाह्यज्ञानेंद्रियाच्या क्रियेला ताप देऊन बाकीच्यांची शक्ति अधिक उत्तेजित केल्यानें बाह्यविषयज्ञान कमी होऊन सूक्ष्मेंद्रियाची** (बाह्यज्ञानेंद्रियाला क्रियासामर्थ्य देणाऱ्या व ज्ञान ग्रहण करणाऱ्या ज्ञानतंतुपिंडाची) **शक्ति अधिक वाढून अतींद्रिय ज्ञान उत्पन्न होतें**. (याची शास्त्रीय माहिती मी मेस्मे-रिझम या पुस्तकांत, व मोहनीविद्येचा शिक्षक या पुस्तकांत, सप्रमाण व सशास्त्र सांगितली आहे.) या तत्त्वास अनुलक्षूनच आमच्या जुन्या शास्त्रशोधकांनीं देखील आरंभीं आरंभीं **वेद्यनिरीक्षण** पद्धतीचा स्वीकार केलेला आढळतो. आणि यापुढें यापेक्षांही श्रेष्ठ व अधिक योग्यतेचे असे योगासारखे मार्ग शोधून काढून व त्या द्वारांनीं शोध करून अदृश्य जगाची पुष्कळ माहिती त्यांनीं सांगितली आहे. त्या त्यांच्या माहितीपैकीं आपल्या विषयास लागू असणारें थोडेंसें दिग्द-र्शन करणें या ठिकाणीं इष्ट आहे.

प्राचीन पौर्वात्य शोधकांचीं मतें.

एकंदर लोक सात (सप्त स्वर्ग) आहेत. पण त्यांत देखील आणखी चौदा भुवनें आहेत (एकवीस सर्ग). हीं भुवनें किंवा लोक

पृथ्वीच्या वर आहेत (श्रेष्ठ आहेत). त्यांतील मुख्य **भूर्लोक, भुवर्लोक, स्वर्लोक, महर्लोक जनोलोक तपोलोक,** व **सत्यलोक.** याप्रमाणें या सात स्वर्गांतील रहिवाशीही त्यांनीं सांगितलेले आहेत. भूलोकांतील मृत झालेले सर्व किंवा भूलोकांत जन्मास येणारे सर्व भुवर्लोकांत कांहीं काळ असतात. भुवर्लोकांत त्यांना **यातनादेह** किंवा **भुव शरीर** कांहीं काळ असतें. या भुवर्लोकांतच वासनाशरीरही असतें. आनंदभोग भोगण्यासाठीं मात्र स्वर्गलोकांत जावें लागतें. **प्रेतें, भुतें, पिशाच्चें,** हीं भुवर्लोकांत राहतात, व राक्षसही येथेंच असतात. राक्षसांना वर स्वर्गांत जातां येतें, व खालीं भूलोकावरही येतां येतें. **पिशाच्चें** व **भुतें** भूवरच्या लोकांना त्रास देण्याची संधि पहात सदा तयार असतात. दुष्ट यंत्रमंत्राकृतींनीं उत्पन्न केलेल्या आकृति भुवर्लोकांत असतात. व सत्कार्यकारक उत्पन्न केलेल्या आकृति किंवा सिद्धि स्वर्गलोकांत असतात. योगी तपस्वी हे आपआपल्या अधिकाराप्रमाणें महर्लोक, जनोलोक, तपोलोक, इत्यादि वरच्या स्वर्गांपर्यंत तेथील तेथील देह धरून जाऊन येण्यासही समर्थ असतात; किंवा देहत्यागानंतर त्या त्या ठिकाणीं वास्तव्य करितात. साधारण चांगले किंवा वाट चुकलेले (योगाभ्यासांत) लोक भुवर्लोकांतील **चंद्रलोकावर** जातात. आणि बाकीचे भुवर्लोकांतील **पितृलोकावर** जातात. या स्थूल देहांतून मरणसमयीं सूक्ष्म देह ओढून बाहेर काढला जातो, व त्याला नंतर यातनादेह प्राप्त होतो. नंतर वासनादेह प्राप्त होऊन पुण्यलोकाला (स्वर्गाला) तो सुख भोगण्यास जातो. आणि पुन्हां आपल्या कर्माप्रमाणें जन्मास येतो. या वरील लोकांत त्याच्या भूलोकांतील **कर्मांचीं** (शारीरिक क्रियांचीं) व **मानसिक वासनांचीं** सर्व चित्रें, सर्व ठसे, बरोबर जसेच्या तसे राखून ठेवणारे कामगार (**चित्रदेव**) असतात. व हीं चित्रें या लोकावर स्पष्ट झालीं असतां पुन्हा पुन्हा त्यांचे ठसे कायम होण्यासाठीं—ज्याप्रमाणें आपल्या मनांत एकाद्या गोष्टीचा ठसा उठल्यावर तो पुन्हा स्मरणाबरोबर उठावा म्हणून आपल्या मनाच्या भागांत

अरूपस्थानीं जाऊन राहतो, व तेथून पुन्हा वाटेल तेव्हां स्पष्ट ध्यानांत येतो, त्याप्रमाणें—सर्व चांगल्या वाईट वासना व कृत्यें यांचे ठसे पुन्हा स्पष्ट करण्यासाठीं अनुद्भूत स्थितींत गुप्त ठेवणारे कामगार **चित्रगुप्त देव** हे असतात. या स्पष्टास्पष्ट ठशांप्रमाणें बरोबर व्यवस्था लावणारे आध्यात्मिक सृष्टींतील नियामक कामगार **यम**, व **यमधर्म देव** हे आहेत. या देवांप्रमाणें या लोकांत इंद्रियांच्या अधिकारिणी देवता, **चंद्र, सूर्य, वायु, अग्नि, वरुण, इंद्र**, इत्यादि असतात. या सर्व आपआपल्या लोकांत असून ते सर्व लोक—सातही स्वर्ग—या पिंडांतच (स्थूल देहांत) व्यापून आहेत. ह्मणून **चित्र, चित्रगुप्त**, वगैरे सदोदित सर्वकाल आपल्यावरोवर अव्याहत व अविश्रांत आपलें कार्य करीत असतात. भूलोकावरील (पार्थिव देहधाऱ्यावर) प्राण्यावर भुवर्लोकांत राहणारीं **प्रेतें, भुतें, पिशाचें**, आणि या भुवनाच्या वर व स्वर्गाच्या खालच्या भागीं असणारे **राक्षस, यक्ष**, इत्यादि रहिवाशी आपल्या भुवनांतील द्रव्याच्या—पण या स्थूलांतील मानानें सूक्ष्म, अदृश्य—रूपांनीं ज्याच्याशीं संबंध जडवितां येणें शक्य असेल, त्याच्यावर वाईट परिणाम करीत असतात. देहांत प्रवेश करून ते नाना तऱ्हेनें पीडा देतात. पण त्यांना अनुकूल करून घेणाऱ्याला ते थोडा काळ उपयोगी पडतात. अशा तऱ्हेच्या सूक्ष्म देहांचे भक्तही गीतेंत सांगितलेले आहेत. **"प्रेतान्भुतगणांश्चान्ये यजंते तामसा जना."**

भुवर्लोकांतील सूक्ष्मदेहधाऱ्यांची पीडा होऊं नये, ह्मणून आपल्याभोंवती स्वर्गीय द्रव्याचें कवच बनविण्यासाठीं ह्मणून सांगितलेल्या निरनिराळ्या **कवचप्रयोगांत भूत, प्रेत, पिशाच, यक्ष, राक्षस, वेताळ**, इत्यादिकांचा नामानिर्देश केलेला आहे. याचप्रमाणें भुवर्लोकाच्या मर्यादेंतून **प्रेतें, भुतें, पिशाचें**, इत्यादिकांचा संबंध घडण्यासारखी मानसिक स्थिति उत्पन्न होणाऱ्या धार्मिक प्रयोगांत त्यांच्यापासून बचाव व्हावा म्हणून अगोदर दिग्बंधनविधि सांगितलेला आहे.

पौष्टिक कर्मांत, गृह्ययज्ञामध्यें व सर्व शांतीचे ठिकाणीं **पिशाच्च प्रेत, गुह्यक, यक्ष, राक्षस, डाकिणी, शाकिणी,** इत्यादि-कांना वेदमंत्रानें व पौराणिक मंत्रानें बलिदान देण्यास सांगितलें आहे.

सर्व धर्मांत व सर्व समाजांत सूक्ष्मदेहधाऱ्यांच्या प्रतिबंधासाठीं व नाशासाठीं कांहींना कांहींतरी विधि प्रचलित आहेत.

पिशाचाचें अस्तित्व सिद्ध करणारे कांहीं शास्त्रीय शोध.

१ अमेरिकेंतील डॉ. म्यॉकडुयल यांनीं आपल्या दुसऱ्या एका डॉक्टर मित्राच्या साहाय्यानें फार परिश्रम करून व वारंवार अनुभव घेऊन अगदीं सूक्ष्म तराजूंच्या साहाय्यानें लिंगशरीराचें वजन ठरविलें आहे. हें ठरविण्यासाठीं त्यांनीं कशा जातीचे प्रयोग केले, याची थोडी दिशा समजावी, ह्मणून त्याची थोडीशी माहिती सांगतों. त्यांनीं मनुष्याला निजतां येईल एवढा उत्तम बिछान्याचा यांत्रिक ताजवा तयार करून त्या ताजव्यावर मनुष्य मरण्यापूर्वी निजवून ठेवून त्याचें प्राणोत्क्रमण होण्याबरोबर त्याच्या वजनांत पडणारा फरक कोणकोणत्या दृश्य कारणांनीं, कां, व किती पडतो, आणि अदृश्य कांहीं तरी नाहींसें होण्याबरोबर किती वजन कमी पडतें, हें मरणारांना मरतांना वजन करून, असे हजारों अनुभव घेऊन, लिंगदेहाचें वजन सरासरी एक औंस असतें, असें ठरविलें आहे.

२ (प्रबुद्ध भारतांत वाचलेल्या माहितीचें सार):—एका शोधकानें सजीवावांचून कोणत्याही वस्तूंतून पार जातील व त्यामुळें बिनसजीवाची छाया मुळींच पडणार नाहीं, अशा तऱ्हेचे विद्युत्-किरण—प्राण्यांच्या डोळ्यांतील—रस भिंगास लावून तयार करवून, ते किरण एका पडद्यावर सोडिले. त्या किरणांमध्यें कोणताही निर्जीव पदार्थ ठेविला असतां ते किरण त्यांतून पार जात असल्यामुळें पदार्थाची छाया त्या पडद्यावर पडत नसे; पण सजीव

प्राणी ठेविल्याबरोबर मात्र त्या किरणास प्रतिबंध होऊन तेवढीच छाया पड्यावर उमटे. एकादा मृत प्राणी ठेविला, तर त्यांतून किरण पार जात असत. जेव्हां एका तारेच्या पिंजऱ्यांत उंदीर ठेविला, तेव्हां त्या पिंजऱ्याची छाया पड्यावर पडली नव्हती; तरी उंदराच्या फिरण्यानें तें पिंजऱ्याचें क्षेत्र किती असावें, तें पड्यावर समजे. यानंतर त्या उंदरास मरणाचें औषध देऊन पहात बसलें असतां त्याचें प्राणोत्क्रमण होण्याबरोबर त्या पड्यावर पिंजऱ्याच्या तळाशीं पडलेली उंदराची छाया, उंदराचें प्रेत तेथेंच असतां, त्या ठिकाणाहून पड्यावर वर वर जाऊं लागलेली दिसली. आणि अखेर ती छाया त्या पड्यावर पडलेल्या किरणप्रदेशाच्या शेवटास येऊन नाहींशी झाली. याप्रमाणें त्या उंदराच्या देहांत वास्तव्य करीत असलेलें चैतन्य (त्याचा सूक्ष्म देह) त्याच्यासारख्याच आकाराचें असून तें त्या सूक्ष्मदेहांतून निघून वर जाऊं लागण्याबरोबर, त्याचें छायाचित्र वर जाऊं लागलें. हा चैतन्यदेह बाहेर पडल्याबरोबर उंदराचे प्रेतांतून किरण पार जाऊं लागले. पण त्या चैतन्यदेहांतून ते पार जात नसल्यामुळें त्याची छाया पड्यावर उंदराच्या स्थूल देहाशिवाय पडूं लागली. व तो चैतन्यदेह जसजसा वर गेला, तसतशी त्याची छायाही वर गेली. या प्रयोगावरून, सूक्ष्म किंवा चैतन्य देह स्थूलासारख्याच आकाराचा, अदृश्य, पण सूक्ष्म द्रव्याचा बनलेला, असा असतो; व तो स्थूलाला सोडून असला, तरी त्यासारखाच राहतो; असें मानण्यास पुष्टि मिळते.

३ खानदेश समाचारांत आलेल्या लेखाचा उतारा समालोचकाच्या पहिल्या वर्षाच्या चौथ्या अंकांत पान ९ मध्यें खालीलप्रमाणें आहेः—

लिंगशरीराचा फोटो.

कलकत्त्यास जो एक विचित्र फोटोग्राफ घेण्यांत आला आहे, त्यानें सर्वांना आश्चर्यचकित करून सोडिलें आहे. पवना येथील बाबू रंजि-

त्चरण लाहिरी, एम्. ए., बी. एल., वकील, यांचे कुटुंबांतील दोघी स्त्रियांचा हा फोटो काढिला होता. हा फोटो काढिल्यावर फोटोची काच धुतांना त्यावर वरील दोघी स्त्रियांचे मध्यभागीं एक तिसरीच आकृति एका स्त्रीची हलुहळू दिसूं लागली. या आकृतीच्या गळ्यांत एक मोत्याचा हार होता, व ती साडी नेसलेली होती. वरील गृहस्थास फोटोग्राफरनें ही काच दाखविल्याबरोबर त्यानें आपल्या पुष्कळ दिवसांपूर्वी वारलेल्या बायकोचें हें चित्र आहे असें ओळखिलें, व ती जिवंत असतांना तोच मोत्यांचा हार व तीच साडी नेसत असे, असेंही त्यानें ताडलें. कलकत्त्यांतील विद्वान मंडळींना हें चित्र दाखविलें. ते ह्मणतात कीं, **हें चित्र भुताचें असावें.** खा. समाचार.

याचप्रमाणें पाश्चात्य देशांतही आकस्मिक फोटो निघाल्याचे अनुभव ऑकल्ट रिव्ह्यूंत प्रसिद्ध झालेले समालोचकाच्या दुसऱ्या वर्षाच्या ७।८ अंकांत लिहिले आहेत. त्यांतील १।२ खालीं लिहितों:—

४ एका तरुण बाईस क्षय झाला होता. औषधोपचारासाठीं तिला एका चांगल्या हवेच्या गांवीं नेण्यांत आलें. पण वर्षभर औषधोपचार होऊनही ती बाई वांचली नाहीं. तेव्हां ती निवर्तल्यावर मंडळी आपल्या गांवीं परत जाऊं लागली. जाते वेळीं त्यांनीं त्या घरासमोर बसून आपला फोटो काढविला. फोटोग्राफरनें तें चित्र तयार करून पाठवितांच त्यांत त्या घरच्या एका खिडकींतून पहात असलेल्या त्या **मृत बाईचा फोटो** पाहून त्यांस फार विस्मय वाटला. ती बाई त्या चित्रांत मंडळी बसली होती त्यावरच्या एका खिडकींत उभी आहे, अशी निघाली होती. ती बाई मरावयाच्या पूर्वी त्या खिडकींत वरचेवर बसत असे, व तींत ऊन येत असल्यामुळें ती खिडकी तीस फार आवडत असे.

५ एका सरदाराच्या मरणानंतर खेड्यांतील त्याचा वाडा एका अमेरिकन सावकारास भाड्यानें दिला होता. त्या सावकारानें त्या सरदारास कधींही पाहिलें नव्हतें. तो अमेरिकन सावकार त्या वाड्यांत फार दिवस राहिला नाहीं. जाते वेळीं त्या अमे-

रिकनाच्या मुलीनें त्या वाड्याच्या देखाव्याचीं बरींच चित्रें काढून घेतलीं. त्यांत जुन्या लायब्ररी हॉलचाही एक फोटो घेतला. वाड्याचा मालक तो सरदार हा नेहमीं तेथें वाचण्यांत गुंग रहात असे. या चित्रांत (लायब्ररी हॉलच्या फोटोंत) एका खुर्चीवर बसलेली एक मूर्ति येथें कशी उमटली, याबद्दल त्या मुलीनें चौकशी चालविली. शेजाऱ्यांस दाखवितांच त्यांनीं तो **मृत सरदाराचा फोटो** म्हणून दाखविला.

६ एकदां एक लष्करी कामगाराचा फोटो त्याच्या मित्रानें काढला. त्या वेळीं त्याजवळ कोणी नव्हतें. पण पुढें पाहतात तों चित्रांत त्याच्या भावाचें चित्र उमटलेलें दिसलें. हा त्याचा भाऊ मरून कित्येक वर्षें होऊन गेलीं होतीं. पण त्याचें चित्र येथें दिसलें.

अशा तऱ्हेच्या शास्त्रीय अनुभवाच्या कार्यकारणांची मीमांसा ठरवूं लागलें, तर मृत्यूनंतर जीवाला या स्थूल जगांतील स्थूल वस्तूंचीच बरोबर प्रतिमा धारण करणारा असा सूक्ष्म तेजयुक्त देह असतो, असेंच गृहीत धरलें पाहिजे. अशा तऱ्हेचे फोटो जेव्हां जेव्हां अकस्मात् उत्पन्न झाले, तेव्हां तेव्हां त्या फोटो घेण्याच्या प्लेट्स (कांचा) अतिशय सेन्सिटिव्ह (सूक्ष्मग्राहक) होत्या, असें आढळून आल्यामुळें गूढ शक्तीचा शोध करणाऱ्यांनीं फारच जलद व सूक्ष्म तेजाचाही परिणाम होईल, अशा सूक्ष्म कांचांच्या साहाय्यानें पाहिलें असतां त्यांत दिसून येणाऱ्या सूक्ष्मशरीरधारी विदेहाची आपलें अस्तित्व दाखविण्याची इच्छा असून तें त्या ठिकाणीं आल्याशिवाय फोटो उठत नाहीं, असें त्यांना आढळून आलें आहे.

७ वरील पुस्तकांतच डॉक्टर फ्रान्झ्हार्ट्मन् नांवाच्या गूढवाद्यानें ऑकल्ट रिव्ह्यूंत दिलेल्या अनुभवाची माहिती दिली आहे. तिचा सारांशः—

सूक्ष्म शरीर हें जडदेहाहून भिन्न असून तें या जडशरीरांत असतांही यामधून बाहेर जाऊं शकतें. बाहेर पडल्या-नंतर त्या (सूक्ष्म शरीराच्या) देहानें दिसतें, स्पर्श करितां येतो, श्वास सोडितां येतो, सर्व कांहीं या देहासारखेंच करितां येतें. जड पदार्थांतून त्या देहास न अडतां पार निघून जातां येतें. असा स्वतःचा व बर्लिनमधील आणखीही एकाचा अनुभव आहे, असें सांगितलें आहे.

८ डाक्टर एल्मर ग्रेटस् यांनीं " धि ॲनालजी ऑफ फिजिकल सायन्स " मध्यें लिहिलें आहे कीं, " नवीन शोधक पद्धतीनें आत्म्याचा इंद्रियधारी देह जरी द्रव्यरूपाचा आहे असें आढळून येतें, तरी आमचा हा हल्लींचा दृश्य (जड) देह बनविणाऱ्या द्रव्याचे परमाणु—जे **घन, प्रवाही** व **वायुरूप** मिळून शरीर बनविणारे असतात ते,—रासायनिक परमाणूं (ॲटम) पेक्षां किती तरी लहान असतात; या जडदेह बनविणाऱ्या परमाणूंच्या जातीपेक्षां निराळ्या जातीच्या व याच्यापेक्षां हजारोंपट लहान जातीच्या परमाणूंनीं आत्म्याचा (पिशाचाचा) देह बनलेला असतो."

९ सर वुइल्यम क्रूक्स या प्रख्यात गृहस्थांनीं " सर्चेस इन् स्पि-रिच्युॲलिझम् " या पुस्तकांत आपण शास्त्रीय रीतीनें पिशाच शक्ती-च्या अस्तित्वाचे घेतलेले अनुभव दाखल केले आहेत.

१० पाश्चात्य देशांत मानस शास्त्रासारख्या गूढ शास्त्राचा शोध करणाऱ्या मंडळ्या (सायकिकल् रिसर्च् सोसाइटीज्) स्थापन झालेल्या असून त्यांनीं आपले शास्त्रीय शोध वेळोवेळीं नमूद करून ठेविलेले आहेत.

सप्रयोग स्वानुभव हेंच खात्रीचें साधन.

भूत किंवा पिशाचाबद्दल प्राचीन व अर्वाचीन शास्त्रकारांच्या म्हणण्याचे मथितार्थ काय काय आहेत,ते बहुतेक हा वेळपर्यंत वर दाख-विलेच आहेत. त्या सर्वांवरून असें दिसेल कीं,आपणासारख्या साधारण

माणसाला ते नुसते ऐकून घेण्याच्याच उपयोगाचे आहेत. आपले पवित्र ऋषि सांगतात, ह्मणून धर्मश्रद्धेनें ते खरे मानून स्वस्थ बसावें, किंवा अर्वाचीन विद्वान् लोक पिशाच आहे म्हणतात, म्हणून त्यांच्या विरुद्ध आपण ब्र काढूं नये, असें ह्मणून स्वस्थ बसावें लागणार. यापेक्षां याचा आपणास कांहीं प्रत्यक्ष अनुभव मिळणार नाहीं. कारण, आपणाजवळ कांहीं योगसाधन नाहीं, योग-सामर्थ्य नाहीं, किंवा अंतर्ज्ञानदृष्टीही नाहीं. ह्मणून हा विषय या आपल्या इंद्रियज्ञानाच्या आटोक्याबाहेरचा व न समजणारा असा कांहीं तरी आहे, असें वाटून निराशा उत्पन्न होईल. पण कोणीही निराश होण्याचें कारण नाहीं.

ज्यांना अंतर्ज्ञानदृष्टीसारख्या खोल विषयांत शिरावयाचें नसेल, व ज्यांना शास्त्रीय विषयांत शिरावयाचें नसेल, त्यांनीं—लोहचुंबकशक्ति जरी प्रत्यक्ष दिसली नाहीं, तरी ज्याप्रमाणें विद्युत्च्या साह्यानें साध्या लोखंडांत ती आणून तिच्या सामर्थ्याचे चमत्कार आपणास पाहतां येतात, त्याप्रमाणें अदृश्य असलेल्या जगांतील व्यक्ति जरी प्रत्यक्ष दिसली नाहीं, तरी तिच्या शक्तीनें होणारे चमत्कार आपणास या स्थूल इंद्रियज्ञानमर्यादसीमेंत आणितां येतात. आणि त्यायोगें पिशाच-विद्या हें केवळ थोतांड व लुच्चेगिरी आहे, का सत्य आहे, हें पाहतां येतें, ह्मणून—याचा अनुभव घेण्याची खरी इच्छा असेल, तर अनु-भवासाठीं स्वतः प्रयोग करून खात्री करून घ्यावी.

अनुभवासाठीं प्रयोगाची माहिती.

१ हे अनुभव घेण्यासाठीं पिशाचशक्तीचें आकर्षण होऊन तिच्या क्रियेचे चमत्कार दिसण्यासारखें **मंडळ बनवावें लागतें.** आणि त्या मंडळांतील एखाद्याच्या शरीरांत त्या पिशाचाचा प्रवेश होण्या-सारखा, अगर त्याच्या योगानें दुसरे चमत्कार दिसण्यासारखा अनुकूलपणा उत्पन्न करावा लागतो.

२ कांहीं मनुष्यें विशेष अनुकूल असतात, व कांहीं प्रयत्नांनीं योग्य अनुकूल स्थितींत येतात, व कांहीं अनुकूल स्थितींत येण्यास

फारच खटपट पडते. कोणत्याही तऱ्हेनें अनुकूल स्थितींत आलेल्याला इंग्रजींत **मेडियम्** (मध्यस्थ), साधारण लोकांत **झाड,** व या शास्त्रीय भाषेंत **आवेश्य** ह्मणतात.

३ या प्रयोगासाठीं **मंडळ** बनवावयाचें तें पांचपासून आठ माणसांचें असावें लागतें. या मंडळांत ज्याच्यावर आपला विश्वास नाहीं, असा कोणीही असूं नये. तर जे आपल्याशीं बिलकूल लबाडी करणार नाहींत, असे आपले खरे मित्र असावेत; किंवा याहींपेक्षां पूर्ण खात्रीसाठीं आपल्या कुटुंबांतीलच आपली मंडळी असली, ह्मणजे आरंभीं देखील शंकेला जागा राहणार नाहीं.

४ प्रयोग पाहण्याचा निश्चय केल्यावर सर्व मंडळींचा निदान अकरा दिवस तरी प्रयोगाचा अनुभव घेण्याचा निश्चय ठाम असावा. मग मध्यंतरीं अनुभव आला तरी उत्तमच.

५ मंडळाकरितां निवडलेल्या लोकांत निदान निम्मे तरी, ह्मणजे पांचास तीन व आठास चार असे, ऋण प्रकृतीचे (निगेटिव्ह) शांत स्वभावाचे, विशेषेंकरून गोरे, गोंडस, नाजूक (राजस, तामस प्रकृतीचे) असावे. किंवा स्त्रिया व मुली असाव्यात. आणि बाकीचे धनप्रकृतीचे (पॉझिटिव्ह) ठसठशीत, खंबीर, हट्टी असे जोरदार असावेत.

६ मंडळ बसण्यासाठीं केलेली जागा निवांतपणाची व बंदिस्त असावी. त्या ठिकाणीं आपलीच अशी दुसरी पांचचार मंडळी स्वस्थ बसणारी असल्यास नड नाहीं. त्यांच्यापासून थोडें सोडून मंडळाची जागा मर्यादित करावी.

७ या जागेंत प्रकाश फार थोडा व अगदीं अंधुक असावा. मग त्या जागेच्या मध्यावर एखादी रिकामी घागर, एखादा हलकासा चौरंग, अगर उत्तम सोईस्कर ह्मटल्यास तीन पायाचें हलकेंसें गोल टेबल, त्याचे पाय चांगलेसे भक्कम खालीं सुद्धां आडव्या लांकडांनीं पक्के केलेले, असें उघडें ठेवावें. आणि त्याच्या सभोंवार सर्वांनीं बसावें.

८ सभोंवार बसतांना सुखकर व न अवघडणाऱ्या स्थितींत दंगा, गडबड, व धांदल न होऊं देतां, ऋण प्रकृतीचे व धन प्रकृतीचे एका आड एक येतील असें बसावें.

९ याप्रमाणें वर्तुलांनीं टेबलासभोंवार बसल्यावर आपल्या हाताचे तळवे टेबलाचे पाठीला साफ लागतील असे त्यावर हात पालथे ठेवावेत. आंगठा, तर्जनी व मध्यमा यांत जाणारा ज्ञानतंतु (मेडियम नर्व्ह), व अनामिका व कनिष्ठिका यांत जाणारा ज्ञानतंतु (आलनार नर्व्ह), हे अनुक्रमें तळहाताच्या मध्यांत आंगठ्याच्या खालच्या फुगीर बाजूकडे एक व करंगळीकडच्या हाताच्या फुगीर बाजूकडे एक असे आलेले असतात. त्या भागांचा स्पर्श त्या वस्तूस असावा लागतो. ह्मणून तळहाताचा तळवा नुसतीं बोटें टेंकून उचलून न धरितां सर्व तळहात साफ टेकावा. आपल्या डाव्या हाताच्या आंगठ्यास आपल्या उजव्या हाताचा आंगठा लागावा, व आपल्या उजव्या करांगुळीस उजव्या बाजूच्या बसणाराची डावी करांगुली लागावी, व आपल्या डाव्या करांगुलीजवळ डाव्या बाजूच्या बसणाऱ्याच्या उजव्या हाताची करांगुळी लागावी. अशी ही एक पद्धत आहे. अथवा एकमेकांच्या करांगुल्या एकमेकांस न लागतां मध्यें किंचित् अंतर असलें तरीही चालतें.

१० अथवा दुसरी एक पद्धत वरप्रमाणेंच आहे. प्रत्येकांनीं आपला डावा तळहात एकमेकांस लागून अथवा न लागतां साफ ठेवावा. आणि त्या आपल्या डाव्या हातावर डाव्या बाजूच्या बसणाराचा उजवा हात पालथा—चार बोटांवर चार बोटें बसतील असा—ठेवावा. अर्थात् प्रत्येकाचा उजवा हात त्याच्या शेजारीं उजव्या बाजूस बसलेल्या इसमाच्या डाव्या हातावर पालथा येतो. अशीही एक पद्धत आहे.

११ यांपैकीं कोणत्या तरी एक पद्धतीनें बरोबर हात ठेवल्यावर आतां आपणास अनुभव कां व कसे येतात, असें मनांत आणून

केवळ तिकडेच मनाची एकतानता गुंतवून ठेवूं नये. तर मनाला समाधान व आनंद देणारें असें मजेदार संभाषण हलके हलके चालू ठेवावें. पण त्यांत वादविवाद, ईर्षा, तंटा, किंवा कलह उत्पन्न होऊन एकमेकांच्या मनाच्या प्रेमळ एकतानतेंत विरोध होणार नाहीं, अशा साध्या तऱ्हेचें तें भाषण असावें.

१२ मंडळांतील मनुष्यांनीं मनांत शंका बाळगिली, तर तेवढ्यानेंच अनुभव येण्यास कांहीं प्रत्यवाय येतो असें नाहीं. परंतु जोरदार इच्छाशक्तीच्या मनुष्यानें आपल्या मनाचा ग्रह विरुद्ध बाजूचा करून तसाच मनोनिग्रह ठेविला, तर मंडळ अनुकूल होऊन अनुभव येण्याजोगतें होण्यास विलंब लागेल, किंवा त्या पैशाचिक दळणवळणास प्रतिबंध होईल, किंवा चालू कार्यांत कांहीं तरी विघ्न उत्पन्न होईल.

१३ या मंडळांत गप्फासारखें मजेचें व हलके चालू असलेलें संभाषण थोड्या वेळानें नीरस होत चाललें, तर एकादें मंजुळ वाद्य किंवा हलकें गायन दुसऱ्या मंडळींनीं चालू ठेवावें. तें हळू व बेताचें असावें. कर्णकटु असूं नये. सतार, ताऊस किंवा बाजाच्या पेटीचे सूर चालू असले, तर आपल्या चालू कार्याला उलट मदतच होते.

१४ हा प्रयोग करीत असतां उतावळेपणा सोडिला पाहिजे, व धिमेपणा ठेविला पाहिजे; एक तासपर्यंत आपल्या बैठकीची परमावधि झाली, ह्मणजे ती बैठक पुरी करावी, आणि पुन्हां दुसरे दिवशीं त्याच जागीं व त्याच वेळीं व त्याच मंडळीचें एक तासाचें मंडळ वर सांगितल्याप्रमाणें बसावें. अशा अकरा बैठका होईपर्यंत चालवावें.

१५ सात बैठकांत कांहीं दिसून आलें नाहीं, तर प्रयोग कां व कोठें चुकतो तें बारकाईनें तपासून हुडकून काढावें, व तें कारण दूर करावें. वर सांगितल्याप्रमाणेंच मंडळ बरोबर बनविलें आहे कीं नाहीं, आपण बरोबर बसलों कीं नाहीं, परिस्थिति बरोबर

आहे कीं नाहीं, व बसल्यावर आपण बरोबर वागतों कीं नाहीं, हें पहावें. आणि जुळण्यासारखीं दिसत नाहींत अशा प्रकृतीच्या मनुष्यांला त्यांतून काढून तीं ऋण असतील तर त्यांच्या जागीं ऋण प्रकृतीचीं व धन असतील तर त्यांच्या जागीं धन प्रकृतीचीं मनुष्यें त्या मंडळांत घालून पुन्हां काम चालू करावें.

१६ जर कांहीं व्यंग व कमीपणा आढळून येणार नाहीं, आणि अनुभवही दिसणार नाहीं, तर तें पहिलें सर्व मंडळ बदलून पुन्हा दुसरें मंडळ बनवावें. त्यांत पहिलीं कांहीं मनुष्यें व दुसरीं कांहीं मनुष्यें घेऊन मंडळाच्या नियमाप्रमाणें बसवावीं. पण पूर्वीच्या मंडळांत जवळ जवळ असलेले आतां विभागून त्यांच्यामध्यें दुसरा मनुष्य बसवावा. व सर्व मडळांत एक ऋण व एक धन असा क्रम असावा.

१७ बारा वर्षांवरील मुलें व मुली, किंवा स्त्रिया व पुरुष, अथवा ऋण व धन प्रकृतीच्या स्त्रिया, अगर ऋण व धन प्रकृतीचे पुरुष, यांपैकीं कोणत्याही पद्धतीचें मंडळ बनविलें तरी चालतें; पण स्वतंत्र स्त्रियांच्या किंवा स्वतंत्र पुरुषांच्या मंडळापेक्षां स्त्रीपुरुषामिश्रित मंडळांत अदृष्ट व्यक्तीचें दळणवळण लवकर घडतें.

१८ मंडळांतील मनुष्यांच्या एकत्र समक्रियेच्या योगानें पिशाचांचा दळणवळणाचा मार्ग मोकळा होऊन ते आपल्याशीं संबंध ठेवण्यास तयार झाल्याची पहिली खूण (१) हातावरून गार वारा जातो आहे असें वाटतें. (२) त्या मेजांत, चौरंगांत, घागरींत किंवा हाताखालच्या वस्तूंत आंतून चलन आलें किंवा स्फुरण आलें असें वाटतें. किंवा (३) त्या मंडळांतील मनुष्यांपैकीं कोणाचे तरी हात आपोआप आपल्या इच्छेविरुद्ध अचकूं लागले आहेत, असा त्यास भास होतो.

१९ आरंभीं हीं चिन्हें इतकीं सूक्ष्म असतात कीं, ही नुसती मनाची कल्पना आहे, किंवा नुसता भास आहे, असा संशय येतो.

पण हळू हळू त्यांचें स्पष्टपण वाढत जातें, व तें प्रत्यक्ष अनुभवास येतें. बरीच स्पष्टता येऊन मेज हालूं लागलें, तर हाताचा दाब त्याच्या पृष्ठभागावर अगदीं हलका व समान ठेवावा. फक्त हाताचे तळवे मेजास किंवा त्या वस्तूला स्पर्श करतील, व सुटून असणार नाहींत, इतका बेताचा स्पर्श असावा. आणि त्या मेजाच्या अगर वस्तूच्या गतीला आपल्याकडून मदत मिळत नाहीं, अशी आपली खात्री असण्याइतका आपला हात आवदार (हलका) ठेवावा. आपल्या दाबानें त्याला गतीही मिळत नाहीं, किंवा त्याच्या गतीला प्रतिबंधही होत नाहीं, अशा बेताचा हाताचा स्पर्श असावा. आणि त्याच्या गती-बरोबर आपल्या हाताचे तळवे त्याच्या स्पर्श केलेल्या भागाला सोडून न राहतील, अशाबद्दल काळजी घ्यावी. कारण, जर त्या मेजांत जोरदार गति उत्पन्न झाली नसेल, तर सर्व हात सुटे झाल्याबरोबर या वेळापर्यंतचे सर्व श्रम व्यर्थ जाऊन पुन्हां तितकी गति येण्यास कदाचित् कांहीं काळ लागेल.

२० ही गति जेव्हां वारंवार उत्पन्न होऊन जोरदार होते, तेव्हां अशा रीतीनें भासत असलेली गति आपल्या ज्ञान-तंतूंतील नव्हे, अगर आपल्या स्नायूंतील नव्हे, किंवा आपल्या मनाला वाटणारा भ्रम नव्हे, तर हा दुसऱ्या **विदेहचैतन्य** शक्ति-संचाराचाच खेळ आहे, अशी खात्री करून घेण्यासाठीं ती फार जोरदार होईपर्यंत धीर धरून मग पुढील अनुभव पहावा. मेजाला हाताचा स्पर्श न करितां सर्वांनीं आपले तळहात त्या वस्तूवर किंचित् वर उचलून अधांतीं धरिले असतां देखील त्याची गति चाललेली अनुभवास येईल, तेव्हां त्या गमनाप्रमाणें आपण आपले हात अधांत्रीं वर धरून त्याबरोबर जावें; तथापि आरंभा-पासूनच अशी गति उत्पन्न झाल्याचा चमत्कार पाहण्यासाठीं म्हणून हात वर उचलून धरूं नयेत. केव्हांही कोणताही चम-त्कार पाहण्यास आतुर न होतां हळू हळू योग्य वेळ येण्याची वाट पाहत राहिलें पाहिजे.

२१ आपल्या शारीरिक शक्तीशिवाय दुसरी एखादी अदृश्य शक्ति या स्थळीं असली पाहिजे, अशी तुमची पूर्ण खात्री झाली, ह्मणजे त्या अदृश्य शक्तीशीं, **पिशाचाशीं** किंवा **भुताशीं**, आपण कोणत्या रीतीनें संभाषण सुरू करावयाचें, तें ठरविलें पाहिजे. कारण आमच्या मनांतील किंवा आमची भाषा जरी त्याला समजते असें असलें, तरी त्याचें ह्मणणें आपल्याला समजण्यासारखी एखादी पद्धत बसविली पाहिजे. व त्या पद्धतीनें दळणवळण जोडिलें पाहिजे. यासाठीं त्या मंडळांतील तरतरीत व हुषार मनुष्यानें आपल्याकडे अध्वर्यूचें (पुढारीपणाचें) काम घेऊन तें मंडळ आपल्या ताब्यांत ठेवावें.

२२ अध्वर्यूनें सावकाश, शांत व धिमेपणानें त्या पिशाचाशीं बोलण्यास सुरवात करावी. त्याला हें मंडळ बरोबर आहे का, असें विचारावें. याप्रमाणें चालू विषयासंबंधीं भाषणास सुरवात झाली असतां, तें पिशाच टेबलाच्या पायाचा ठक् असा ठोका देईल, अथवा दुसऱ्या वस्तूवर चिटकीसारख्या आवाजाचा ठोका देईल, किंवा तेथेंच कोठें तरी असा आवाज करील. टेबलाच्या पायाचे ठोके देऊं लागलें, तर त्या टेबलावर हात आवदार असतांनाच एक पाय उचलून ठोका देईल.

२३ टेबलाच्या पायाचा, अगर वस्तूवर, किंवा कोठें तरी असा ठोका पडूं लागला असतां, होय असें उत्तर देण्याच्या वेळेला एक ठोका, व नाहीं असें उत्तर देण्याच्या वेळेला दोन ठोके द्यावेत, अशी भाषा ठरवावी. अगर नाहींस एक ठोका, व होय यास दोन, अशी किंवा इच्छेप्रमाणें पण सोईस्कर ठोक्यांची संकेतभाषा त्याच्याशीं ठरवावी. मग प्रथम मंडळ बरोबर आहे कीं नाहीं, हें विचारून, होय ह्मटल्यास दुसरा प्रश्न करावा. नाहीं ह्मटल्यास, त्याजला विचारून मंडळ बरोबर करून घ्यावें. नंबर एकचा अमुक मनुष्य नको कीं असूं दे, अशा रीतीनें सर्वांबद्दल प्रश्न विचारून त्याचें उत्तर होकारार्थी अगर नकारार्थी येईल,

त्याप्रमाणें व्यवस्था करावी. आणि अमुक मनुष्य अमुक नंबराला नको असेल, तर ज्या ठिकाणीं पाहिजे तितके ठोके मागवावे. अगर अजीवात नको असेल, तर अमुक ठोके दे, असें सांगून प्रथम अध्वर्यूनें मंडळ दुरुस्त करून घ्यावें. मग बोलणारें पिशाच कोण आहे, काय आहे, हें माहीत करून घ्यावें. तूं स्त्री आहेस का, पुरुष आहेस का, ब्राह्मण आहेस का, आमच्या कुटुंबांतील आहेस का, अशा रीतीच्या प्रश्नांनीं येणाऱ्या उत्तराप्रमाणें तें समजून घ्यावें. या मंडळापैकीं कोणाच्या शरीरांत प्रवेश करणार, झाड कोण आहे, तूं कोणाजवळ राहणार, हेंही विचारून घ्यावें. ठोक्याच्या द्वारानें संभाषण चालू झालें असतां, ते ठोके एकादे वेळीं कोठ तरी एकाद्या कोंपऱ्यांत किंवा बाजूला होऊं लागलेले असतात, तेव्हां आपल्या मेजावर किंवा आपल्यास स्पष्ट ऐकूं येतील, अशा ठिकाणीं आवाज करण्यास त्यास कळवावें.

२४ जर त्याच्या मनांत तुमच्याशीं चांगल्या रीतीनें बोलावें असें असेल, तर मध्यंतरीं कांहीं जरी घोटाळे उत्पन्न झाले असले, तरी धिमेपणानें ते सर्व बाजूला होतीलच. परंतु तुह्मी मात्र घाईघाईनें त्या अदृष्ट व्यक्तीला—पिशाचाला—त्रास होईल, असले विनाकारण निर्बंध करूं नका, किंवा त्यावर ओझें घालूं नका; कारण तें संबंध ठेवूं इच्छित असेल, तर आपण होऊनच तुह्मांस स्पष्ट समजेल अशीच रीत पत्करील. आणि मधील अडथळे दूर करील.

२५ अशा या अनुभवांवरून त्या ठिकाणीं हजर असलेल्या स्थूलशरीरधारी माणसांच्या खेरीज तेथें दुसरी कोणी तरी अदृश्य व्यक्ति असून तिच्या बरोबर बोलतां येणें शक्य आहे, एवढी तरी पूर्ण खात्री झाली, ह्मणजे मनाजोगतीं उत्तरें देऊन भाषण करण्याला उत्सुक झालेलें **शांत पिशाच** असेल, तर मग भाषेचीं दुसरीं साधनें बनवावीं. तारेच्या भाषेसारखी जोड ठोक्याची भाषा ठरवावी. किंवा अक्षराच्या बाराखडीच्या मेळाचीं अक्षरें ठोक्यावर ठरवून तें त्याला कबूल झाल्यास त्याचें नांव

विचारून घ्यावें, आणि क्रमाक्रमानें व बेताबातानें त्याच्याशीं नानातऱ्हेचें संभाषण करावें. तथापि एकादी गोष्ट किंवा विलक्षण माहिती आतुरपणानें समजावून घेण्याचा प्रयत्न करूं नये.

२६ त्या मंडळामध्यें कांहीं तरी दांडगाई किंवा जबरदस्ती अगर खोडसाळपणा करण्याचा त्या पिशाचाचा उद्देश दिसून आला, तर आपल्याबद्दलच्या शास्त्रांतील (पिशाचमंत्र इत्यादि) माहितगार कोणी येथें नाहीं, यासाठीं तसा कोणी भेटल्याशिवाय अगर येथें हजर असल्याशिवाय आपण असें करूं नये, अशी त्यास विनंति करावी. या विनंतीला मान न देतां जोरदार जबरदस्ती करण्याचा व झाडास पछाडण्याचा (आवेश्यांत प्रवेश करून आवेशित करण्याचा) तें प्रयत्न करील, तर दिवसा दारें उघडून, किंवा रात्रीं दीप प्रज्वलित करून, एकदम प्रकाश जास्त वाढवावा, आणि मंडळ मोडून टाकावें. कारण अननुभवी मनुष्याला या असल्या संचरित स्थितींत फार त्रास होतो. यासाठीं हे असले अनुभव फार वेळ घेऊं नयेत. अशा वेळीं या सर्व शास्त्राची माहिती घेतलेला तज्ज्ञ मनुष्य असल्याशिवाय जास्त पंचायतींत पडूं नये.

२७ शांतपणानें संभाषण करणारें पिशाच भेटलें असतां जे काय अनुभव मिळतील, ते विचारानें व कसोटीनें ताडून पहावे, आणि शांत मनानें व शांत डोक्यानें खात्री करून घ्यावी. पिशाचांच्या सांगण्याची कांहीं वेळ खात्री पक्की झाली असली, तरी देखील सरसकट त्यांच्यावर विश्वास ठेवूं नये. कारण या जगांत जसे ज्ञाते, साधु, महात्मे, हे क्वचित् असून लुच्चे, ढोंगी, फसवे, भामटे, वेडे, मूर्ख, व स्वार्थी असलेच लोक पुष्कळ असतात, त्याप्रमाणें अदृश्य जगांतील व्यक्तींतही हाच मासला आहे. यासाठीं त्यांनीं जरी एकादे वेळीं आपण अमुक आहों, म्हणून एकाद्या मोठ्याचें, साधूचें, अगर महात्म्याचें नांव सांगितलें, तरी त्यावरून फसूं नये.

२८ या प्रयोगकृत्यांत तुह्मी आपल्या सारासार शक्तीला सोडून एक क्षणभर देखील राहूं नये. पोरचेष्टा किंवा निव्वळ उत्सुकता एवढ्याच दृष्टीनें कांहीं करूं नये; तर सत्यज्ञान मिळविण्याचा हेतु धरून अनुभव पहावे. आणि जें उत्तम व सत्य अनुभवास येईल, त्याजबद्दल सदैव आदरबुद्धि ठेवावी. असें वागलें असतां अदृष्ट पिशाचशक्ति असल्याबद्दल आत्मप्रचीतीनें ज्याची त्यासच पक्की खात्री पटेल.

पिशाचाबद्दलचे कांहीं शास्त्रीय नियम.

या पिशाचांसंबंधानें आपणाला आधुनिक पद्धतीनें समजून आलेले नियम फारच थोडे आहेत, आणि अद्याप आपणास समजावयाचें गूढ फारच राहिलें आहे. तथापि जे थोडे बहुत नियम समजले आहेत, त्यांतील प्रयोग पाहणाराच्या उपयोगीं पडणारा सारांश असाः—

१ या प्रयोगाचा अनुभव येण्यास आरंभीं आरंभीं अंधकाराची अवश्यकता लागते.

२ या पिशाचशक्तीचा स्थूलाशीं संबंध झाल्याशिवाय त्याच्या चमत्काराचे अनुभव येत नाहींत.

३ (मेडियम) झाड–मध्यस्थ–आवेश्य, याच्या द्वारानें संबंध फार जलद घडतो.

४ एक जीवाच्या (निदान या कार्यापुरते तरी एक जीव झालेल्या) मित्र मंडळींच्या ह्मणजे मंडळाच्या योगानेंही पिशाचशक्ति उत्तेजित, आकर्षित, किंवा कार्यकर्तृक होऊन तिचा या जगाशीं संबंध घडण्यायोग्य अनुकूलता उत्पन्न होते.

५ बळकट मनःशक्तीच्या किंवा इच्छाशक्तीच्या सामर्थ्यानें या पैशाचिकशक्तीवर तावा ठेवितां येतो.

या नियमांअन्वयें येणारे अनुभव.

आपणासमोर पैशाचिक ह्मणून येणाऱ्या प्रयोगांतून संगनमताचे, ढोंगाचे, लुच्चेगिरीचे, हातचलाखीचे, शरीरांतील विद्युत्चे, ज्ञानतंतूच्या विकाराचे, मेंदूच्या विशिष्टशक्तिसामर्थ्याच्या उत्तेजनाचे,

हिप्नोटिझमचे (भुरळ), मेस्मेरिझमचे (मोहनीविद्येचे), सजेशनचे (सूचनाशास्त्राचे), व कल्पनेच्या योगानें होणाऱ्या भ्रमाचे, असे जे जे चमत्कार असतील, ते ते त्या शास्त्रांत घालून त्यांच्या कार्य-कारणांची मीमांसा जरी त्या त्या शास्त्राअन्वयें पूर्ण करतां आली, तरी त्या योगानें पैशाचिकशक्तिसामर्थ्याच्या सत्य चमत्काराचा उलगडा कांहीं होत नाहीं. हे चमत्कार वगळून बाकी कांहीं सत्य चमत्कार राहतातच.

ज्या एकाद्या आवेश्याच्या द्वारानें पिशाचाचा बुद्धिप्रभाव निदर्शनास येतो, त्या मनुष्याच्या नेहमींच्या ज्ञानाकडे पाहिलें, तर त्या वेळीं दिसून येणारी क्रिया ही मानवी बुद्धीच्या पलीकडील क्रिया आहे, असें ठाम ठरतें. कारण, लेखनचमत्काराच्या अनुभवांत आवेश्याच्या हातांनीं दृश्यलेखनसाधनाच्या साह्यानें आलेले लेख पुष्कळ वेळ लिहिणाऱ्या आवेशित माणसाला माहीत नाहीं अशा भाषेंत किंवा लिपींत निर्माण झालेले असतात. व ते कधीं कधीं बनलेल्या मंडळांतही कोणास माहीत नाहीं अशा एकाद्या गहन विषयावरही लिहिलेले दिसून येतात. तसेंच कित्येक वेळीं मानवी शक्तीवांचून नुसत्या पाटी पेन्सलीनें किंवा कागद शिसपेन्सलीनें बंद पेटींत लेखनचातुर्याचे चमत्कार अनुभवास येतात. आणि कधीं कधीं नेहमीच्या मानवी लेखनसाधनांतील अवश्यक साधनांपैकीं कशाचीही मदत घेतल्यावांचून लेख निर्माण झालेले अनुभवास येतात; तर कधीं कधीं निरनिराळ्या तऱ्हेच्या वाद्यांचे सूर दृश्य साधनांवांचून ऐकूं येतात. आणि केव्हां केव्हां तर दारें बंद असतांना कांहीं बाहेरचे पदार्थ आंत आलेले आढळून येतात. यावरून अदृश्य शक्तीच्या (पिशाचाच्या) अंगीं अद्भुत ज्ञान व विलक्षण सामर्थ्य आहे, अशी स्वतः प्रयोग करून शोध करणाराची खात्री पटते. तरी अशी ही खात्री पटण्याला आपणांतीलच एकमेकावर विश्वास असणाऱ्या व कोणी कोणास फसविण्यास बसला नाहीं अशी खात्री असणाऱ्या मंडळीचा (किंवा त्यांत कोणी फसविण्यास बसला आहे, असें

जरी क्षणभर मानलें, तरी ज्या गोष्टी कपटानें किंवा लुच्चेगिरीनें करतांच येणार नाहींत, अशा गोष्टींचा) विचार आणि तारतम्य यांनीं कस लावलेला, जागृत स्थितींतील इंद्रियज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभवाचा पुरावा हेंच एक बळकट साधन आहे. या पुराव्यावरून " या स्थूलशरीरधाऱ्यांशिवाय म्हणजे या ठिकाणीं असलेल्या आपणा मानवांशिवाय कांहीं तर विलक्षण सामर्थ्य असलेली एक ज्ञानवान् अशी अदृश्य शक्ति–पिशाच–आहे खास, व तीही पण मानवी मनाच्या सत्तेखालीं आणतां येतें, " असें सिद्ध होतें.

याप्रमाणें जागृत स्थितींतील इंद्रियज्ञानानें पूर्ण खात्री करून घेतलेले अनुभव जरी आपणास अद्भुत वाटतात, तरी ते शास्त्रीय नियमांनींच अनुभवाला येतात. हे येणारे असे अनुभव कोणकोणत्या शास्त्रनियमांनीं कसकसे घडतील, त्याचा उलगडा करण्याचा थोडा प्रयत्न करूं.

अनुभवास येणाऱ्या चमत्कारांच्या कांहीं उपपत्ती.

१ पिशाच हें दिवसा व उजेडांत न दिसतां, किंवा या पिशाचशक्तीचे अनुभव विशेषेंकरून दिवसा व उजेडांत न येतां, रात्रीं व अंधारांतच कां यावेत, असा एक प्रश्न आपणापुढें येतो. सर्व साधारण नियम म्हटला ह्मणजे सर्व पदार्थ उजेडांत व दिवसा नजरेला चांगले स्पष्ट दिसतात; मग या पिशाचदर्शनासच अंधकार कां लागावा ? याचा विचार करूं.

कोणत्याही पदार्थाचें स्पष्ट दर्शन होण्याला तो पदार्थ स्वजातीय पदार्थावर असतां उपयोगीं नाहीं. तांबड्या कागदावर तांबडी रेघ किंवा तांबड्या रंगाचें चित्र स्पष्ट उठणार नाहीं. पारदर्शक एकादें भिंग किंवा अभ्रकाचा तुकडा पाण्यांत धरिला, तर तो दिसत नाहीं. स्पष्ट दर्शन होण्याकरितां त्या पदार्थाच्या आजूबाजूची भूमिका विजातीय असावी लागते. तरी त्यांतल्या त्यांत त्या वस्तूच्या पूर्ण विरुद्ध असली ह्मणजे ती वस्तु स्पष्ट दिसते. दिवा उजेडांत आणावा,

तसा अस्पष्ट दिसतो. व जास्त प्रकाशांत मुळींच दिसत नाहीं. एकादी फास्फरस असलेली तांबड्या गुलाची व वाटेल त्या ठिकाणीं ओढली असतां पेटणारी आगकाडी घ्यावी, व तिचें बोंड किंचित् ओलें करावें, आणि मग तें आपल्या बोटांनीं थोडें चोळावें. याप्रमाणें केल्यावर आपण उजेडांतून हळुहळु अगदीं अंधेरांत जावें, ह्मणजे जसजसे अंधेरांत जाल, तसतशा तुह्मांला एक प्रकारच्या चळित आकृती तुमच्या बोटांवर आढळून येतील. या अशा सूक्ष्म व उष्णता न भासणाऱ्या प्रकाशाच्या समुच्चयानेंच—काडीच्या घर्षणानें हाताला उष्णतेनें पोळविणारा स्पष्ट—दिवा निर्माण होतो. या गोष्टी ध्यानांत घेऊन आपण वरील गोष्टींचा निर्णय केला पाहिजे.

आरंभीं आकर्षण होऊन आकार धारण करणारें पैशाचिक द्रव्य अगदीं सूक्ष्मतेजोरूप असतें. त्यामुळें तें स्पष्ट दिसण्यास अंधकारच लागतो. त्याचें तें रूप जसजसें घन होऊं लागेल, तसतसा अंधकार कमी असला, तरी तें दिसण्यास नड पडत नाहीं. पण प्रयोगकाराला आरंभीं सर्व प्रयोगाला अंधकाराची अवश्यकता लागते. सूक्ष्म प्रकार अंधकारांत दिसतो, ह्मणून तेजोजनक देखावे पाहण्यास अंधकाराचीच अवश्यकता लागते. त्याचप्रमाणें पैशाचिक घनाकार बनून त्याच्या अंगीं नाद किंवा शब्दचमत्कार दाखविण्याचें सामर्थ्य उत्पन्न होण्यास देखील अंधाराची अवश्यकता लागते. कारण पूर्ण अंधारांतील प्रयोगांत नाद, आवाज व शब्द, यांसंबंधीं अनुभव जसे सुलभ व सहज येतात, तसे ते उजेडांत येत नाहींत; एवढेंच नव्हे तर फार उजेडानें प्रयोगानुभवसिद्धीस अडथळा येतो. यावरून फोटोची प्रतिमा पूर्ण उठण्यास ती उठण्याचे ठिकाणीं कॅमेऱ्यांत जसा गडद अंधार असावा लागतो, व ती पक्की किंवा कायम होण्याची क्रिया पूर्ण होई तों त्या ठिकाणीं जसा अंधारच असावा लागतो, किंवा रेड लाईटच असावा लागतो, त्याप्रमाणें ही पिशाचकृती सामर्थ्यवान् होण्यास तिच्यावर अंधेरांतच पूर्ण संस्कार घडावे लागतात, आणि मग ती पूर्ण सामर्थ्यवान् बनल्यावर उजेडांतही अनुभव येतात.

या पैशाचिक शक्तीच्या सामर्थ्याचे अनुभव येण्यास बाह्य स्थितींत जसा अंधकार विशेष उपयोगी पडतो, त्याप्रमाणें शारीरिक व मानसिक क्रियेंत अनुक्रमें डोळ्याचीं बुबुळें स्थिर असून सरळ व टक लावून पहाणें आणि मनाची तल्लीनता (त्याकडेच लक्ष, एकतानता) या क्रियांनींही पैशाचिक शक्ति जास्त अनुभवास येते. कारण या क्रिया त्याचा स्थूलाशीं संबंध घडण्याला विशेष साह्य करितात.

पूर्व कालीं या तऱ्हेनें कांहीं तरी आकस्मिक अनुभव आले असल्यामुळेंच आपणांत रात्रीं आपल्या छायेकडे एकसारखें पाहूं नयें, किंवा रात्रीं आरशाकडे एकट्यानें एकसारखें पहात राहूं नये, किंवा एकसारखें पाण्यांत अगर आरशांतील प्रतिबिंबाकडे पहात राहूं नये, तसेंच एक मुहूर्त असल्याच विषयावर एकसारखें संभाषण करून मन गुंतवूं नये, अशी समजूत आहे.

प्रयोगानुभव पाहणाराशीं या शक्तीचा संबंध मानसिक तेजाच्या द्वारानें घडून येतो, व तो लवकर घडण्यास छायारूप व प्रतिबिंबरूप यांचें दर्शन आणि मानसिक तल्लीनता, या योगानें हें आवरण जास्त योग्य होतें. ज्या मनुष्यांचें हें मानसिक शक्तीचें आवरण स्वाभाविकपणेंच विशेष योग्य असल्यामुळें त्यांचा लिंगशरीराशीं संबंध लवकर पोंचतो, तीं मनुष्यें झाड, मध्यस्थ, किंवा आवेश्य (मेडियम) होतात.

एक जिवाची व एक विचाराची अशी मित्रमंडळी एकत्र संबंध ठेवून बसलीं असतां, सर्वांच्या मानसिक आवरणांच्या संमेलनानें लिंगशरीरधारी पिशाचाचा स्थूलाशीं संबंध होण्यायोग्य असें सामर्थ्यवान् मानसिक शक्तीचें मंडळ बनतें. ह्मणून त्या योगें पैशाचिक शक्तीचे अनुभव पाहतां येतात.

पिशाचांना जरी सर्व सृष्ट शास्त्राचें ज्ञान असतें, व त्याप्रमाणें त्यांना जलद परिणाम घडविण्याचें सामर्थ्य असतें, तथापि सर्वांनाच

तें उपयोगांत आणण्यायोग्य साधनें सदोदित उपलब्ध असत नाहींत. तीं क्वचित् प्राप्त होतात.

२ दारें बंद केलीं असतां त्या वेळीं दार उघडल्याचा आढळ न होतां बाहेरचे पदार्थ आंत कसे येतात, याबद्दल कांहीं उपपत्ति बसतात का पाहूं. कित्येक वेळेला मंडळी बसली असतां नाना तऱ्हेचीं फळें, दगड, किंवा दुसऱ्या वस्तु पटापट पडताहेत, असें आढळून येतें. पण पुढें त्या वस्तु मात्र तेथें दिसत नाहींत. एखादे वेळीं एकादी वस्तुच आढळून येते; पण ती सर्वांना सारखी दिसत नाहीं. अशा वेळीं प्रत्यक्ष वस्तु तेथें आलेल्या नसतात, तर पाहणारांच्या नेत्रांवर मात्र तशा वस्तूंच्या प्रतिमा फक्त उत्पन्न केलेल्या असतात; अगर बाह्यप्रकाशलहरींतच तसा फरक होऊन डोळ्यावर प्रतिमा पडलेल्या असतात. पण जेव्हां एखादी वस्तु आंत आलेली असून ती पुन्हां तेथें वाटेल त्याला दिसून जगांतील वस्तूप्रमाणें कायम असते, तेव्हां ती (१) त्या ठिकाणच्या वातावरणांतील कणांचें आकर्षण करून बनविलेली असेल. उदाहरणार्थ, एखादें फळ असेल, तर ज्याप्रमाणें झाडांत ऑक्सिजन, कार्बन, इत्यादि वायु आकर्षण होऊन, त्यांच्या कणांचें संमेलन होऊन, व हीं घटक द्रव्यें फळाच्या रूपानें एकत्र होऊन कालावधीनें पूर्ण दृश्य स्थूल फलाकार धारण करून वृक्षावर दिसतात, त्याप्रमाणें त्या सर्व क्रिया अति जलदीनें आपल्या जीवन रासायनिक ज्ञानानें वृक्षावांचून घडवून वातावरणांतील तत्त्वांपासून फळ बनवून पुढें टाकीत असतील. अगर (२) इतकेंही न करितां बाहेरचीं फळें किंवा वस्तुही आंत आणीत असतील. कारण नेत्रेंद्रियावर दार बंद असल्याचा ठसा कायम असणाऱ्या कालमर्यादेपेक्षां अति सूक्ष्म कालांत दार उघडून पुन्हां बंद करून वस्तु आंत आणणेंही शक्य आहे. कालसूक्ष्मतेमुळें आपल्या डोळ्यांना दार उघडलेलें समजणार नाहीं, ही गोष्ट खालील प्रयोगावरून सिद्ध होते.

एक घड्याळाचें चक्र घेऊन त्याच्यावर तें चक्र झांकेल असा गोल पत्रा बसवावा, व त्या पत्र्यास मध्यापासून एका बाजूकडे लहानशी फट राखावी. याप्रमाणें केल्यावर पत्रा स्थिर ठेवून खालचें

चाक वेगानें फिरवावें; म्हणजे त्या चिरीखालीं चक्राचे कोणते भाग आले, किंवा कोणते गेले, हें सुद्धां दिसणार नाहीं. पण खालचें चक्र स्थिर ठेवून वरच्या पत्र्याला गोल गति दिली, तर त्या चिरींतून जरी चक्राचा किंचित् भाग दिसत असतो, तरी जणूं वर कांहीं आड नाहीं, किंवा तो पत्रा अगदीं पारदर्शकच आहे, असें खालील सर्व चक्र नजरेस स्पष्ट दिसतें. याप्रमाणें ही देखत भूल–नेत्रेंद्रियावर पडलेला पदार्थमात्राचा एक ठसा नाहींसा होऊन दुसरा ठसा ग्रहण करण्यास सेकंदाचा एक सप्तमांश काळ जावा लागतो, या दर्शनानुशासन शास्त्राच्या नियमाअन्वयें–उत्पन्न होऊन, या कालापेक्षां कमी कालांत घडून गेलेली क्रिया आपल्यास न समजतां, दार कायम बंदच आहे, असें वाटणें शक्य आहे.

३ एकाद्या तिजोरीसारख्या बळकट लोखंडी पेटींतून बंदोबस्तांत ठेवलेली वस्तुदेखील पिशाचास बाहेर आणतां येणें किती तऱ्हांनीं शक्य आहे, तें पाहूं. १–धातूच्या पत्र्याच्या कणांतील स्नेहाकर्षण दूर करून ते कण वेगळे करून त्या द्वारानें वस्तु बाहेर काढून पुन्हां ते कण जेथील तेथें जोडून ठेवून करीत असेल. किंवा २–विद्युत् शक्तीच्या साह्यानें कांहीं भाग वितळवून वस्तु बाहेर काढून पुन्हा जशाचा तसा लोखंडी पत्रा बेमालूम करीत असेल. किंवा ३–अंतर्ज्ञानदृष्टीनें समजलेल्या चतुर्थपरिमाण(फोर्थ डायमेन्शन्)द्वारानें क्रिया करीत असेल.

या चतुर्थ परिमाणाबद्दलची कल्पना अशीः—या सृष्टींत पदार्थांना आढळून येणाऱ्या १ लांबी, २ रुंदी, व ३ उंची, या तीन परिमाणांची या नेत्रांला माहिती आहे. पण या तीन परिमाणांशिवाय सर्व वस्तुमात्रांना या डोळ्यानें न समजणारी एक विलक्षण स्थिति असते. तिला चतुर्थ परिमाण म्हणतात. या चतुर्थ परिमाणांत वस्तूची प्रतिबंधक शक्तिच नाहींशी झालेली असते. याच्या समजुतीसाठीं एक दोन उदाहरणें घेऊंः—

(१) एका लाकडाच्या पेटींत नवसागर ठेविला, तर तो बाहेरून दिसला नाहीं, तरी तिच्या सच्छिद्रतेच्या स्थितीमुळें तींतून वाय्वंश व

जलांश जातो व येतो. घन नवसागर जरी त्यांतून बाहेर येत नाहीं, तरी त्याला जलार्द्र—वायुयुक्त वातावरणाच्या स्थितींत द्रव-रूपता आली असतां तो तींतून बाहेर पाझरतो. मग वाफेच्या रूपानें जल निघून गेलें असतां पुन्हां पेटी-च्या बाहेरच्या बाजूस तो घन रूपही धरितो. (२) कांचेच्या बाटलींतून कितीही सूक्ष्म वायु बाहेर जाऊं येऊं शकत नाहीं, पण प्रकाशकिरण जाण्यायेण्याला तिची सर्व बाजूंनीं मुभा असलेली आढ-ळून येते. या प्रकाश जाण्यायेण्याच्या स्थूल उदाहरणाप्रमाणेंच ज्या द्वारानें पदार्थांत प्रतिबंधक स्थितिच उरत नाहीं, त्याला चतुर्थ परिमाण ह्मणतात.

या चतुर्थपरिमाणाच्या द्वारांतून वस्तूला आणण्यायोग्य स्वरूप देऊन बाहेर आणून मग मूळच्या स्वरूपानें एखादी वस्तु पिशाचास बाहेर आणतां येते.

इतक्या तऱ्हेच्या उपपत्ति आज बंद ठिकाणच्या वस्तु येण्या-जाण्यासंबंधानें आपणासमोर आहेत.

४ पिशाच मूर्तिमान् पुढें दिसतें, तेव्हां तें प्रत्यक्ष स्थूल देहानें दिसतें, किंवा नुसता भास उत्पन्न करितें, अथवा काय क्रिया घडते, याचा विचार करूं. शास्त्रवेत्त्यांमध्यें या संबंधानें अद्याप थोडासा वाद आहे. गूढशास्त्रानुभव घेणारे लोक ह्मणतात कीं, पिशाच जरी मूर्तिमान् पुढें दिसतें, तथापि त्याच्या ठिकाणीं स्थूलत्व नसतें. त्याला फक्त देहाकार दाखवितां येतो. पण पिशाचशास्त्रवेत्ते ह्मणतात कीं, पिशाच प्रत्यक्ष स्थूल मूर्ति धरून पुढें येतें. याप्रमाणें दोन तऱ्हेच्या मतांत जरी भेद असला, तरी बाकीच्या घडणाऱ्या गोष्टीं-संबंधानें त्यांची एकवाक्यता आहे.

पिशाचाच्या स्वरूपासंबंधानें शास्त्रीय तऱ्हेचे अनुभव घेण्यास सुरुवात केली असतां, व बारीक निरीक्षण केलें असतां, खालील गोष्टी अनुभवास येतात.

१ कित्येक वेळीं पिशाचाकृति दिसत असतां त्या शरीरापलीकडील पदार्थ त्यांतून पारदर्शकाप्रमाणें परंतु अस्पष्ट दिसतात. २ दीपप्रकाश किंवा दिवसाचा प्रकाश यांच्या योगानें त्याची प्रतिछाया किंवा सावली निर्माण झालेली दिसत नाहीं. क्वचित् कधीं अस्पष्ट भासमय उत्पन्न होतेही. ३ इतर जडदेह ज्याप्रमाणें पृथ्वीला चिकटलेले दिसतात, तसे ते न दिसतां पृथ्वीला किंचित् सुटून अधांत्रीं असलेले दिसतात. यावरून त्यांना प्रत्यक्ष स्थूलत्व किंवा जडपणा नाहीं, असेंच म्हणणें पुष्कळ अंशानें भाग पडलें, तरी क्वचित् ते स्थूल रूपाला येतात, असेंही मानणें भाग येतें. हीं दृश्य स्वरूपें पिशाचें कशीं दाखवीत असतील, याचा आतां विचार करूं.

१ या स्थूल प्रकाशांत फरक करून आपल्या आकारा इतक्या भागाच्या प्रकाशाकारांत लाटा उत्पन्न करून आरशांतील प्रतिबिंबासारखा प्रकाशाकार दाखवितात, तेव्हां ती आकृति विशिष्ट ठिकाणीं दिसत असते. २ पहाणाराच्या नेत्रपटलावर संस्कार करूनच आकार दाखावितात. तेव्हां आकृति एकाद्या विशिष्ट ठिकाणीं न दिसतां जिकडे जिकडे नजर फिरवावी, तिकडे तिकडे तें समोर दिसतें. ३ आपल्या सूक्ष्म देहाचा ठसा पांघरून किंवा ज्याचें स्वरूप दाखवावयाचें असेल त्याच्या सूक्ष्म देहाचा ठसा ह्मणजे शिल्लक पडलेला कोश पांघरून तें तें स्वरूप दाखवितात. अथवा त्या स्वरूपालाच किंचित् घन करितात. ४ आपल्या कामरूपालाच वाटेल तो आकार देऊन तें दाखवितात. याप्रमाणें रूपें दाखविलीं असतां त्यांमध्यें जड सृष्टिद्रव्यांचा अभाव असतो. ह्मणून पार्थिव वस्तूंच्या सृष्ट नियमांप्रमाणें हीं रूपें स्थूलदेहपरीक्षेला उतरत नाहींत, व त्यामुळें यांना प्रत्यक्षदेहधारित्व आहे, असें म्हणतां येत नाहीं. तथापि, केव्हां केव्हां जड स्वरूपही धारण केलें असतें; तेव्हां, ५ वर सांगितलेल्या आपल्या रूपाच्या (काम) ठिकाणीं या जड वातावरणांतील चुंबकाचे व विद्युत्चे कण एके ठिकाणीं जमवून त्यांना रासायनिक कृतीनें घनाकार देऊन व त्यांत मर्जीप्रमाणें फेरबदल करून ते जडदेह दाखवितात. तरी त्यांना पूर्ण स्थूल देहाच्याप्रमाणें

द्रव्यांनीं युक्त जड देह धारण करितां येत नाहीं. केव्हांही त्यांच्या देहांत सूक्ष्म द्रव्याचेंच आधिक्य असतें.

या वरील पांच रीतींपैकीं कोणत्याही पद्धतीनें पिशाचानें आपला देहाकार दाखविलेला असो; पण तो ज्याला दाखवावयाचा असेल, किंवा ज्याला दिसावयाचा असेल, त्याच्या शरीराशीं या शक्तीचा संबंध होऊन त्याच्या स्थूल देहांतील परमाणु आकर्षण करून धरिल्याशिवाय त्या मनुष्याला आपलें रूप दाखविण्याचें पिशाचांत सामर्थ्य नाहीं; म्हणजे ज्या मनुष्याच्या शरीरांतील—मेंदूंतील—सूक्ष्म तेजावर या पिशाच शक्तीचें आकर्षण चालत नाहीं, त्या मनुष्याला पिशाच आपलें स्वरूप दाखविण्यास समर्थ होत नाहीं. यामुळें पुष्कळ वेळां एकाद्यास पिशाच दिसत असतां त्याच्याजवळील दुसऱ्यास तें दिसत नाहीं.

पिशाचशक्तिसामर्थ्यानें घडणाऱ्या चमत्कारांच्या कारणांबद्दल कल्पनेच्या व तर्कांच्या अशा या निरनिराळ्या शास्त्रीय उपपत्ति आपल्यापुढें मांडल्या आहेत. यांपैकीं कोणत्याही उपपत्तीप्रमाणें हे चमत्कार घडत असोत, किंवा या उपलब्ध शास्त्रनियमांशिवाय अज्ञात अशा एकाद्या नियमाअन्वयें घडत असोत; तथापि हे चमत्कार कधीं कधीं कां होईनात घडतात खास, व अनुभवास येतात खास. अशा या पिशाचशक्तीचा अनुभव पाहण्यासाठीं आणि आपलें कांहीं ऐहिक कार्य साधण्यासाठीं पैशाचिक प्रयोगांमागें लागून पुष्कळ मनुष्यें त्या अदृश्य शक्तीच्या ताब्याखालीं जाऊन जन्माचें मातेरें करून घेतात. व अशक्त मनाचीं पुष्कळ मनुष्यें त्या प्रयोगासंबंधीं बरोबर ज्ञान नसल्यामुळें व्यवहारास निरुपयोगी होतात. यासाठीं या शक्तीच्या फारसें नादीं लागूं नये, व सतत पैशाचिक प्रयोगाच्या मागें लागून आपल्या अमोल्य वेळाचा नाश करून घेऊं नये, हें जरी खरें आहे, तरी व्यवस्थित रीतीनें व चांगल्या सावधगिरीनें अनुभवासाठीं व खात्रीसाठीं किंवा अधिक शोधासाठीं सद्हेतूनें प्रयोग करून पाहूं नयेत, असा मात्र याचा अर्थ नाहीं.

साध्या व सोप्या प्रयोगांत क्रमानें, हळु हळु, व पुष्कळांच्या शक्तीनें, अदृश्य व्यक्तींचें आकर्षण करून अनुभव पाहण्यांत कांहीं विशेष धोका नाहीं. एकट्याच्या शक्तीनें व एकदम जलद आकर्षण करण्याचे जे विशेष प्रयोग आहेत, तेच फार घातक असतात. यांत पुष्कळ तऱ्हेच्या खोट्या व निरुपयोगी गोष्टींची भर पडून नाना तऱ्हेचे कांहीं तरी प्रयोग अस्तित्वांत आलेले आहेत, हें जरी खरें आहे, तरी शास्त्रीय सत्य असलेले कांहीं प्रयोग योग्य परंपरेंत कायम आहेत. तसले घातक प्रयोग या ठिकाणीं सांगितले नाहींतच. तरी जो साधा मार्ग सांगितला आहे, त्याबद्दल सुद्धां आणखी एकवार नीट माहिती देऊन ठेवणें अवश्यक वाटतें.

प्रयोगासंबंधीं पुन्हां सूचना.

१ जागा एकांताची, घाण नसलेली, अशुभ, व अपवित्र नसलेली, अशी असावी. चांगली, रमणीय, बंदिस्त, व आपल्या कार्यांत कोणाकडून कांहीं व्यत्यय येणार नाहीं, अशी असून सारवून, झाडून, स्वच्छ करून, उदासारख्या धुपाच्या धुरानें शुद्ध करावी.

२ प्रयोगास बसण्यास रात्रीची वेळ उत्तम. तीसुद्धां दहापासून दोनपर्यंत उत्तम. तिन्हीसांजपासून दहापर्यंत मध्यम. दिवसाची वेळही दोन प्रहरची बरी. एकंदरींत दिवसाचे बारा वाजल्यापासून रात्रीचे बारापर्यंत क्रमानें जास्त चांगली. रात्रीचे दोन वाजल्यापासून पुढें दिवसाचे बारापर्यंत आरंभीं कार्यसिद्धीला विलंब लावणारी किंवा निरुपयोगी आहे.

३ योग्य वेळीं मंडळाच्या सामर्थ्यानें हे अनुभव घेण्यास तयार होऊन चारीपेक्षां जास्त मनुष्यांचें मंडळ पूर्वीं सांगितल्या नियमाप्रमाणें बनवावें. मंडळाच्या सभोंवार विवक्षित जागा घेऊन त्याला मर्यादा करावी. व ही जागा मंडळाची ह्मणून स्वतंत्र राखावी. या जागेस मंडळांतील मनुष्यांखेरीज इतरांचा स्पर्श न होऊं देतां ती पवित्र राखण्यासाठीं त्या मर्यादेंत दुसऱ्या कोणास न येऊं देण्याची

सक्त खबरदारी ठेवावी. आणि मंडळ बेनविल्यावर त्यास परक्या कोणाचाही स्पर्श होऊं देऊं नये.

४ बसण्यास खुर्च्या घेतल्या असल्या, तर मध्यें टेबल त्या बेताचें (तिपाई) उंच असावें. खालीं बसण्याचे वेळीं चौरंग, तिपाई, चौकी (लहान टेबल), घागर इत्यादि सोईस्कर असेल तो पदार्थ मंडळाच्या मध्यें घ्यावा. पण मुद्दाम याच कामासाठीं चौपाई गोलटेबल, अथवा विशेष सोईस्कर तिपाई गोलटेबल करून त्याच्या सपाटीशीं मिळून जाईल, व सर्वांच्या तळहाताच्या मध्याच्या खालीं येईल, अशी लोखंडी तार त्यांत घट्ट बसविली असली, तर फार चांगला उपयोग होतो. ह्मणून शक्य तर असें तिपाई टेबल तयार करून अनुभव पाहण्यासाठीं पहिल्या पद्धतीनें, किंवा तिनें अनुभवण्यास वेळ लागतो असें वाटेल, तर दुसऱ्या हातावर हात ठेवण्याच्या रीतीप्रमाणें, हात ठेवून बसावें.

५ बसण्यापूर्वी दिवस असल्यास दारें बंद करून अंधार करावा. रात्र असल्यासही दारें बंद करावीं, व दिवा मंद करावा किंवा मालवावा. व जवळ मेणवत्ती, काड्यांची पेटी, पाण्याचा तांब्या, आणि वाजविण्याचा शंख, झांज, किंवा झंगट, यांपैकीं कांहीं तरी एक जवळ ठेवून घ्यावें.

६ नंतर मंडळांतील सर्वांनीं स्वस्थपणानें, व शांततेनें एकाग्र मन करून पिशाचाचें आकर्षण (आवाहन) करण्यास सुरवात करावी. अदृष्ट शक्तींच्या विशिष्ट व्यक्तिचेंच आकर्षण करावयाची इच्छा धरून एकाद्या मृताचें ध्यान करण्यासही नड नाहीं. पण असें करीत असतां प्रत्येकानें एकेक निराळी व्यक्ति मनांत धरली, तर कांहींच कार्य होत नाहीं. यासाठीं कांहींही काळजी न करितां किंवा कांहींही भीति न बाळगितां सर्वांनीं एकाच योग्य व्यक्तीचें ध्यान करावें. ह्मणजे सर्वांच्या एकरूप इच्छाशक्तीचा एक केंद्र जुळून जोराचा ध्यानप्रवाह सुरु झाला, तर वाटेल त्या अदृष्ट व्यक्तीला आकर्षण करितां येईल.

७ वरप्रमाणें स्वस्थ बसून एकाग्र मनानें आकर्षणास सुरवात झाल्यानंतर कोणा व्यक्तीचा अभिनिवेश झाल्याचीं (आगमन झाल्याचीं) चिन्हें दिसूं लागलीं तर, ह्मणजे कोणाचा श्वास लांब चालूं लागला, घोरूं लागला, हाताला कंप सुटला, किंवा हाताखालच्या वस्तूंत प्रत्यक्ष चांगली गति आली, तर त्यांतील हुषार अध्वर्यूनें (प्रमुखानें) मंडळाचा संबंध न तोडतां आपल्या बाजूच्या माणसाचे हात आपल्या मांड्यांवर अगर खांद्यांवर ठेवून मग आपले दोन्ही हात उचलून दिवा मंद असेल तर थोडा सारावा, व मालविलेला असेल तर काडी ओढून लावावा. आणि पुन्हा हात जेथले तेथें ठेवून स्वस्थपणानें बसून अगर साध्या भाषणांत आणखी कांहीं वेळ घालवून अदृष्ट शक्तींचा जडत असलेला संबंध जोरदार रीतीनें जडूं द्यावा. आणि मग प्रश्न विचारण्यास सुरवात करावी.

८ हाताखालील वस्तूंत चलन किंवा कंप येऊन तिच्या द्वारानें अदृष्ट व्यक्ति सांकेतिक संभाषण सुरू करण्याची इच्छा दर्शवील, किंवा मंडळांतील एकाद्याशीं संबंध होऊन संभाषणाची इच्छा दर्शवील, त्या वेळीं त्या मंडळींतील धीट, नीतिमान् व सदाचारी मनुष्यानें अध्वर्यु बनून प्रश्न विचारण्याचें काम सुरू करावें. त्यावांचून दुसऱ्या कोणी बोलूं नये. दुसऱ्यांनीं आपले प्रश्न त्याचेच मार्फत विचारावेत. प्रश्न विचारणारानें कोणत्याही बाबतींत घाई किंवा उतावळेपणा करूं नये, तर शांततेनें, सभ्यपणानें, आणि गोड व नम्र भाषेनें प्रश्न करून ठोक्यानें उत्तरें मिळवावीं; अगर आवेशितप्रसंगीं प्रथम त्या मनुष्याच्या हातीं पेन्सिल द्यावी. या वेळीं त्यास ह्मणावें कीं, आपण कोणी असाल, ते या ठिकाणीं आलां आहां. आपण (ठोक्यांनीं अगर भाषणांनीं) उत्तरें देण्याची कृपा करावी. नंतर शांतपणें उत्तर देण्याची वेळ येई तों वाट पहावी. प्रथम एकमेकांची मैत्री जमण्यासारखा साधीं प्रश्नोत्तरें करून संबंध नीट जुळूं द्यावा. ह्मणजे मग पुढें पुष्कळ तऱ्हेचे अवघड प्रश्न विचारून तोंडातोंडीं किंवा अप्रत्यक्ष आवाजानें अथवा लेखनानेंही उत्तरें मिळूं लागतील.

९ सर्व कांहीं शांतपणें, स्थिरपणें व सुरळित चाललें असेल, तर त्या अदृष्ट व्यक्तीचा स्वभाव चांगला असून त्यापासून कांहीं काळ चांगली करमणूक होऊन कांहीं गोष्टींचें ज्ञान मिळवितां येईल. पण जेव्हां या मंडळाच्या आकर्षणशक्तींत एकादी दुष्ट स्वभावाची व्यक्ति सांपडते, तेव्हां आवेशितास किंवा मंडळांतील एकाद्यास अगर सर्वांस ती कांहीं तरी त्रास देण्यास सुरुवात करिते. अशा प्रसंगीं एक दोन वेळ त्यास सामोपचारानें सांगून पाहून तो त्रास नाहींसा झाला नाहीं, तर त्या अदृष्ट व्यक्तीला पिटाळून लावलें पाहिजे. त्यासाठीं मंडळांतील प्रमुख चालकानें —अध्वर्यूनें— अधिक दीपप्रकाश करावा व नाद करावा. एवढ्यानें भागलें नाहीं, तर मंडळाचा संबंध सोडून टाकावा, आवेशित मनुष्याच्या कानाजवळ झंगट, झांज अगर शंख वाजवावा, आणि मग आल्हादकारक ईशस्मरण करून तांब्यांतील थंड पाणी त्याच्या डोळ्यांस लावून सर्वत्र शिंपडावें; ह्मणजे आपोआप सर्व त्रास नाहींसा होईल.

१० शांतपणानें सर्व सुरळित चालण्यासाठीं मंडळाशीं संबंध झालेल्या व्यक्तीशीं बोलतांना उत्तरें येण्यास कांहीं वेळ लागला, किंवा एकाद्या प्रश्नाचें उत्तर आलें नाहीं, तर तें सोडून द्यावें. त्यावर बळजवरी करूं नये. आणि थट्टा मस्करी किंवा कुचेष्टा न करितां सभ्यता ठेवून विनयानें ती बैठक पुरी करून उठावें. पुन्हां अशाच २।४ वेळ बैठका कराव्या. उत्तरें येऊं लागलीं तरी ४।५ खेपा होऊन जाई तों अवघड व गुंतागुंतीचे प्रश्न करूं नयेत, व निदान पूर्ण खातरी होण्यासारखा जोरदार संबंध घडल्याशिवाय त्या ठिकाणीं मंडळांतील माणसांखेरीज कोणीही प्रेक्षक असूं नये. नंतर सभ्य, जिज्ञासु व सत्य ज्ञान करून घेणारे असे प्रेक्षक घ्यावेत; नुसते कुटाळ, चारगट, दंगा करणारे असे प्रेक्षक घेऊं नयेत.

११ मंडळांतील अनुभव मनोभ्रमाचे नव्हेत, कल्पनेचे नव्हेत, ते अदृश्य शक्तींचे आहेत, अशाबद्दल सर्व तऱ्हेनें आपली पूर्ण खात्री पटल्यानंतर त्या व्यक्तीच्या मागें न लागतां हा नाद सोडून द्यावा.

या प्रमाणें या सूचना पूर्ण ध्यानांत ठेवून हे प्रयोग पहावेत. मी पुष्कळ वेळां व पुष्कळ जागीं निरनिराळ्या तऱ्हेनें हे प्रयोगानुभव घेतलेले आहेत. आणि त्याबद्दल डायरींत त्या त्या दिवशीं त्यांचा उल्लेख असून हजर असलेल्या प्रेक्षकांच्या सह्याहि घेतलेल्या आहेत. तरी त्या संबंधाच्या पाल्हाळिक हकीकती देऊन हें पुस्तक भरावें, असें मला वाटत नाहीं. ह्मणून एकच मजेचा अनुभव देतों.

माझा एक मजेचा अनुभव.

सन १८९० सालीं मी कांहीं मित्र मंडळीसह बसलों असतां पिशाच या विषयावर भाषण सुरू झालें. तेव्हां माझे बंधु कृष्णराव व केशव विनायक काणे, यांनीं पिशाचशक्ति हें थोतांड आहे ही बाजू घेतली होती. त्या वेळीं अनुभवासाठीं म्हणून मी पूर्वी हरिपुरच्या गणपतीच्या बागेंत राहणाऱ्या ब्रह्मचारी बुवापासून ऐकलेला एक प्रयोग सहज बोलून गेलों. या गोष्टीला ४।५ दिवस झाले नाहींत, तोंच एके दिवशीं काणे व माझे बंधु मजकडे मिळून आले, आणि पिशाचशक्ति आहे खरी,असें म्हणाले. त्या वेळीं मीं त्यांना विचारिलें कीं, हें आज तुह्मी कशावरून म्हणतां ? तेव्हां काणे म्हणाला, ' मी त्या प्रयोगाचा अभ्यास केला आहे. कृष्णाला मनांत धरूं दे, ती वस्तु मी सांगतों.' हें ऐकून मी कागदावर एक दोन वस्तूंचीं नांवें लिहून तीं आमचे बंधु कृष्णराव यांना दाखविलीं, व केशवानें आंगावर पासोडी पांघरून घेऊन तीं पटकन सांगितलीं. तेव्हां मला वाटलें, हे दोघेही मथलेले असतील, व यांच्या कांहीं खुणा असतील, आणि आतां हे उलट मलाच कसें फसविलें म्हणून चेष्टा करतील. यासाठीं यांच्यांवर भरंवसा ठेवून उपयोगीं नाहीं, असा विचार करून मी म्हणालों: यांत तुमची दोघांची कांहीं तरी लबाडी आहे. तुमच्यावर माझा भरंवसा नाहीं. माझ्या मनांतील आणि तेंही अगदीं बरोबर ओळखलें, तर मी खरें म्हणेन. तेव्हां केशवानें तें कबूल केलें, व माझ्या मनांत मी धरलेलीं फळें, त्यांचे आकार, त्यांचे रंग, तीं ज्या स्थितींत मनांत धरलेलीं होतीं ती स्थिति, डहाळीसुद्धां फांकी

काढलेलीं, किडकीं, अशीं जशीं धरलेलीं असतील, तशीं सांगूं लागला, तेव्हां मला आश्चर्य वाटलें. यानंतर पुढें पुढें तो आम्ही मनांत धरलेली वस्तु नुसती न सांगतां, आमच्या घरांतील अगर शेजारच्या घरांतील ज्या ठिकाणीं ठेवलेली मनांत आणली असेल, तेथून मुकाट्यानें ती वस्तुच आणून दाखवूं लागला. याप्रमाणें कांहीं मंडळींत गम्मत चालली असतां, शेजारचे रा. रा. महादेव नाईक भिरंगी हे आले होते. ते फार चाणाक्ष होते. त्यांनीं त्या वेळीं एक फार मजेची वस्तु मनांत धरिली, आणि ती वस्तु धरून आणून दाखविण्यास सांगितलें. केशवानें चटकन् समई उचलून आणून दाखविली. तेव्हां ते 'ही आपली वस्तु नव्हे' असें ह्मणाले, आणि "फसला रे फसला!" ह्मणून हासूं लागले. केशवानें पुन्हां पांघरूण घेतलें व समईतील वाती धरून दिवा पुढें आणला. पण नाईक पुन्हां ह्मणाले, ही माझ्या मनांतील वस्तु नव्हे, चुकलास! पुन्हां नीट पहा. तेव्हां त्यानें पुन्हां पांघरूण घेतलें, व म्हणाला: छे! तुह्मी मनांत धरलेली वस्तु नुसती दिव्याची ज्योत आहे, व ती नुसती आणतां येणार नाहीं. अशा रीतीनें याबद्दल जेव्हां मी आपली पूर्ण खात्री करून घेतली, तेव्हां तूं एकंदर अभ्यास कसकसा केलास, व तुला हें कसें सांगतां येतें, तें सर्व सांग, ह्मणून विचारून घेऊन मी त्या दिवशीं जें टिपून ठेविलें, त्यांतील सारांश: "सांगितल्याप्रमाणें अभ्यास चालू झाल्यावर पांचवे दिवशीं आपल्या जवळ एका युरोपियनाची आकृति दिसूं लागली, व तिनें आपलें नांव एच्. एस्. + + + असें सांगितलें. पुढें पांघरूण घेऊन स्मरण केलें कीं, तो पुढें येऊन मनांत धरलेल्या जिनसा व त्यांचें स्वरूप, त्यांची जागा, इत्यादि दाखवितो. त्याच्याजवळ सर्व कांहीं असतें. तो पटकन् काखेंतून काढून जिन्नस दाखवितो, आणि ती लगेच एकाद्या ठिकाणीं नेऊन ठेवून तें ठिकाणही दाखवितो. हें सर्व तेथेंच त्याच्याजवळ असतें. हें पाहिलेलें सर्व ध्यानांत ठेवून मी पांघरुणाबाहेर येऊन तुह्मांस सांगतों, व आणून दाखवितों." अशा रीतीच्या गमती चालल्या असतां, एक दिवस आम्ही फिरा-

वयास निघालों. तेव्हां केशव ह्मणाला, " मी कांहीं येत नाहीं. एच्. एस्. म्हणतो कीं, तूं जाऊं नकोस, तुला दगड लागणार आहे." तें त्याचें न ऐकतां आम्ही बळजबरीनें त्याला नेलाच. कर्मधर्मसंयोगानें आम्ही परत येत असतां श्रीमंत जोगांच्या बागेंतून एका मुलानें दगड फेकला, व तो केशवास लागलाही! पुढें थोड्याच दिवसांत केशव म्हणजे आम्हांला न दिसणाऱ्या त्या अदृश्य आकृतीच्या ताब्यांतील बाहुलें बनून ती सांगेल तसा वागणारा असा लहरी मनुष्य बनला. त्याचा बाप खोकल्यानें थोडा आजारी झाला असतां, एक दिवस सकाळीं तो म्हणालाः " एच्. एस् म्हणतो, तुझा बाप आज रात्रीं मरणार!" या त्याच्या ह्मणण्याची वे. रा. दत्तात्रय शास्त्री देवधर (हे वैद्य होते) यांनीं अगदीं टर उडविली. पण रात्रीं बारा वाजतां केशव धांवत आला आणि ह्मणालाः चला बाप मेला! मी ताबडतोब त्याजबरोबर गेलों, तों खराच बाप मरून गोंधळ उडाला होता! पण त्याबद्दल केशवास कांहींच दुःख झालें नव्हतें. तो त्या एच्. एस्. बरोबर कांहीं तरी बोलत आनंदांत अगदीं हंसत होता. यापुढें त्या एच् एस्. च्या वेडांत त्या केशवाची विलक्षण अवनति झाली. त्यासंबंधानें मला या ठिकाणीं जास्त कांहीं लिहितां येत नाहीं. कारण तो केशव आज (१९११) बंगाल नागपूर लायनीवर केशवराव स्टेशन मास्तर ह्मणून आहे. त्या त्याच्या स्थितींतून त्याला मार्गावर आणण्यास फार श्रम पडले. यानंतर ती अदृष्ट व्यक्ति पुन्हां त्याच्या जवळ कशी ती आली नाहीं, व मागचें सर्व एकंदर सुटून गेलें. या वरील हकीकतीस कोणी मानसिक भ्रम (हॅल्यूसिनेशन्स) ह्मणतील, तर कोणी त्यांत मेंदूची शक्ति वाढली असेल असें ह्मणतील; आणि कोणी तर यावर भरंवसाही ठेवणार नाहींत, असेही वाचक भेटतील. हें मी जाणून आहें. तरी या पैशाचिक प्रयोगामागें लागून अदृष्ट शक्तीच्या ताब्याखालीं जाण्यास सुरवात झाली असतां मनुष्याची कशी अवनति होत जाते, याच्या प्रत्यक्ष अनुभवाचें उदाहरण पुढें ठेवणें हें माझें काम आहे.

या पैशाचिक शक्तीशीं संबंध जडला असतां अशक्त मनाच्याच मनुष्याचें पार वाटोळें होऊन जातें असें नाहीं, तर सशक्त मनाच्या मनुष्याला सुद्धां अवनतिच प्राप्त होते. अशा तऱ्हेच्या शक्तीच्या सामर्थ्यानें घडणाऱ्या प्रयोगाला कोणी आपली योग्यता व महत्त्व वाढावें ह्मणून प्रसंगविशेषीं योगसामर्थ्य किंवा तपःसामर्थ्य ह्मणून नांव देतात. याखालीं मी अशा तऱ्हेच्या पैशाचिक शक्तिसामर्थ्याची एक साधार हकीकत देत आहें. ती त्यांतील सर्व मजकुरावरून योगाची किंवा तपःशक्तीची नसून पैशाचिक सामर्थ्याच्या योगानें घडलेल्या चमत्काराचीच आहे, अशी विचारी वाचकांची मजप्रमाणेंच खात्री होईल.

पुणें, सुधारक, सन १९०७ अंक ३३।३५ मधील उतारा.

तारीख २० मे सन १९०७

एका अलौकिक चमत्काराची हकीकत.

रा. रा. सुधारककर्ते यांस, विनंति विशेष.

गेल्या दिसेंबर महिन्यांत मी कांहीं कामाकरितां नाशीक जिल्ह्यांत मालेगांव मुक्कामीं गेलों होतों. त्या वेळीं तेथें एक जैन धर्माचे जती मुक्कामास होते. जती मजकूर हे मेज चालवितात, दगडी पाटा, बांक वगैरे पदार्थ हवेंत अधांतरीं ठेवितात, व इतर चमत्कारही करतात, असें तेथील मामलेदार रा. सा. माधवराव केळकर व रा. सा. पाटसकर मुनसफ यांनीं लायब्ररींत बोलत असतांना मजला सांगितलें. अशा प्रकारच्या चमत्कारावर माझा मुळींच भरंवसा नसल्यामुळें व सृष्टपदार्थशास्त्राच्या आजपर्यंत माहीत असलेल्या नियमांस बाध आणणाऱ्या ह्या गोष्टी असल्यामुळें हे चमत्कार प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कबूल करावयाचे नाहींत, असा माझे मनाचा कायमचा ग्रह होता. वरील आमचे दोन्ही स्नेह्यांनीं कळविलें कीं, महाराज आज येथें आहेत, व केव्हांही जिज्ञासु मनुष्य आल्यास ते त्यास हे चमत्कार करून दाखवितात. ह्मणून त्यांनीं मला लागलीच महाराजांचे बिऱ्हाडीं

नेलें. त्या ठिकाणीं मी विनंति केल्याबरोबर त्यांनीं पुढील चमत्कार करून दाखविले. व ते मी प्रत्यक्ष पाहिले. परंतु पूर्वींपासून असल्या प्रकारांवर पूर्ण गैरभरंवसा असल्यामुळें मी अगदीं बारकाईनें व चवकसपणानें अवलोकन करीत होतों, तरी त्यासंबंधानें कांहींच कार्यकारणतेचा खुलासा माझे बुद्धीनें झाला नाहीं; परंतु घडलेले प्रकार मात्र अगदीं चमत्कारिक व सत्य आहेत. त्यांत भाविकपणानें अतिशयोक्तीचा भाग मजकडून सांगण्यांत येणें अर्थात् अशक्य आहे. ह्मणून त्याचें यथातथ्य वर्णन मी देत आहें.

जतीमहाराजांचे सांगण्यावरून एक तिपाई मेज त्याच खोलीमध्यें एके बाजूस उभा होता, तो एका इसमानें खोलीचे मध्यभागीं आणून ठेविला. तें टेबल जतीमहाराजांचेकडील नसून मुद्दाम एका वकिलांनीं तेथें आणविलें होतें. त्या टेबलास कांहीं कळसूत्र किंवा हिकमत असेल, असें समजून मीं तें बारकाईनें खालीं वर तपासून पाहिलें. टेबल अगदीं साधारण नेहमींप्रमाणेंच होतें. टेबल मध्यभागीं ठेवल्यानंतर दोघातिघांस त्या टेबलास, केवळ स्पर्श मात्र करा, असें सांगितलें; व कोणत्याही रीतीनें त्या टेबलाचे गतीस साहाय्य किंवा विरोध करूं नका, असें बजाविलें. त्याप्रमाणें मीं व मामलेदारसाहेब व आणखी दोन इसम, ह्यांनीं त्या टेबलाचे फळीला हाताचा स्पर्श मात्र केला. त्यानंतर जती त्या टेबलाला “ पांव उठाव ” असें बोलले. ही वेळ खरोखरीच माझे मनामध्यें विलक्षण क्रांति होण्याची असल्यामुळें तें टेबल खरोखरीच आपला पाय उचलतें कीं काय, याकडे माझें लक्ष्य फार बारकाईनें वेधलेलें होतें. एक किंवा अर्ध्या मिनिटाचा अवकाश गेला नाहीं. तोंच त्या तिपाईनें आपला एक पाय उचलून धरिला. त्याप्रमाणें पाळीपाळीनें त्यानें आपले इतर पाय पटपट उचलून धरिले.

२ या नंतर जती टेबलास उद्देशून बोलले, मंडलीके जाके प्रणाम करो. तेव्हां त्या टेबलापासून मंडळी ७।८ हातावर जाजमावर बसली होती, त्यांच्याकडे टेबल चालत गेलें. टेबलास तीन पाय असल्यामुळें

द्विपाद प्राण्याप्रमाणें नीट सरळ चालत न जातां तें टेबल आपल्या स्वत:भोंवतीं वाटोळें फिरत फिरत पाय उचलीत चालत गेलें. अर्थात् आह्मांस त्या टेबलाचे फळीस स्पर्श करण्यास सांगितलें होतें, ह्मणून त्या टेबलाचे गतीबरहुकूम त्याभोंवतीं आह्मां सर्वांसही त्याचेबरोबर पुढें चालावें लागत होतें. टेबलाची गति बरीच झपाट्याची होती. याप्रमाणें टेबल मंडळी ज्या जाजमावर बसली होती, तेथें जमिनी-वर आडवें पडलें, व पुन्हां पूर्वींप्रमाणें ताठ उभें राहिलें. टेबलास ताठ उभें करण्यास मात्र आम्ही थोडीशी मदत केली. ताठ उभें राहि-ल्यावर पूर्वीं निर्दिष्ट केलेल्या रीतीनेंच जती बसले होते, तेथपर्यंत तें परत चालत गेलें.

३ यानंतर जतींनीं आम्हांस सांगितलें कीं, तुम्ही आपली छत्री अगर दुसरी एखादी वस्तु भुईवर कांहीं अंतरावर ठेवा, म्हणजे हें टेबल तो जिन्नस मजकडे आणील. अर्थात्च बिनहातापायाचें हें टेबल ती जिन्नस कशी घेऊन येणार, याजबद्दल मला मोठा अचंबा वाटला. टेबलापासून दहा बारा हाताचे अंतरावर मी एक छत्री ठेविली. व तें टेबल वर वर्णन केल्याप्रमाणें वर्तुळाकार गतीनें छत्री-पर्यंत चालत गेलें, व आम्हांसही त्याचे भोंवतीं फिरावें लागून टेबलावर हात ठेवून त्याबरोबर छत्रीपर्यंत चालत जावें लागलें. छत्री-जवळ गेल्याबरोबर टेबल छत्रीस वळसा घालून तिचे मागें जाऊन उभें राहिलें, व छत्रीवर तें आडवें पडलें. याप्रमाणें आपल्या तीन पायांनीं ती छत्री ढकलीत ढकलीत तें टेबल निम्या वाटेपर्यंत घेऊन आलें. या वेळीं तें टेबल भुईवर सरपटत होतें. अर्ध्या वाटेंत छत्री मागें राहिली, व टेबल पुढें निसटून गेलें. सबब जतींनीं टेबल उभें करण्यास आम्हांस सांगितलें, व " छत्री तो छोड दी, जाव, उसको लाव!" असा हुकूम केला. व टेबलानें वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें छत्रीस फरपटत फरपटत आणिलें.

४ ह्यानंतर तीन चार रुपये भुईवर टाकून त्यांपैकीं एकादा रुपया ध्यानांत धरा, असें जतीनें मला सांगितलें. त्याप्रमाणें मीं केलें. नंतर जती त्या टेबलास उद्देशून " या रावसाहेबांनीं जो रुपया

मनांत धरिला आहे, त्या रुपयावर पाय ठेव," असा हुकूम केला. रुपये टेबलापासून दोन तीन हातांवर टाकिले होते, त्यांपैकीं मी एका बाजूचा रुपया मनांत धरिला होता. टेबल जणुं काय सावधगिरीनें एका रुपयाजवळ जाई, व थबकत थबकत आपला एक पाय एका रुपयाजवळ नेई, व पुनरपि सावरून घेई, व पुन्हां दुसऱ्या रुपयाजवळ त्याप्रमाणेंच पाय सावधगिरीनें दबकत दबकत नेई. याप्रमाणें त्यानें प्रथम एका रुपयावर पाय ठेविला. परंतु मी जतीस सांगितलें कीं, टेबल चुकलें. नंतर दुसऱ्या रुपयावर त्यानें पाय ठेविला, तरीही तें चुकलें. नंतर पुन्हा दुसऱ्या रुपयावर त्यानें पाय ठेविला, तरीही तें चुकलें. सबब फिरून रुपये उचलून घेऊन भुईवर टाकिले, व त्यांपैकीं एक रुपया मी पुन्हां ध्यानांत धरिला. व या वेळेस टेबलानें थबकत थबकत न जातां बिनचूक त्याच रुपयावर जाऊन पाय ठेविला. पहिल्या वेळेस तें टेबल इतक्या सावधगिरीनें व जपून पाय मागें पुढें करीत होतें कीं, त्यावरून सरकसमध्यें लहानशा चौरंगावर घोडा पाय जमवून उभा राहण्याची खटपट करितो, त्याची आठवण झाली. जरी भलत्याच रुपयावर दोन वेळेला टेबलानें पाय ठेविला, तरी खरा रुपया ओळखून काढण्याकरितां जणूं काय टेबल विचार करीत आहे, असें माझ्या मनास वाटलें. खऱ्या रुपयावर पाय ठेविला या गोष्टीचें मला महत्त्व वाटतें; कारण कीं, कांहीं तरी विचाराची क्रिया त्या टेबलाकडून होत होती, असें मला भासलें.

या नंतर जतीनें सांगितलें कीं, तें टेबल आजारी आहे, व तें कांहीं बरोबर काम करीत नाहीं. त्या टेबलाचा एक पाय मोडला असून तो खिळ्यानें जोडलेला होता.

५ या नंतर टेबलाचा नाद सोडून देऊन एक चौरंग आणण्यास जतीमहाराजांनीं आह्मांस सांगितलें, व त्याही चौरंगास पाय उचलण्यास सांगितल्यानंतर त्यानें टेबलाप्रमाणेंच आपले पाय उचलले.

६ नंतर जतीनें एक दगडी पाटा आणण्यास सांगितलें, त्याबरोबर खालचे मजल्यावर जाऊन कोणी एकानें चटणी वाटलेला तसाच

पाटा वर आणला. तो पाटा अधांत्री हवेमध्यें जाईल, व तेथेंच तो तरंगत राहील, असें जतींनीं सांगितलें. म्हणून हा चमत्कार पाहण्याची आम्हांस फारच उत्कंठा वाटली. त्या पाट्यास 'उप्पर जाव' अशी आज्ञा केली. टेबलाप्रमाणेंच पाट्यासही हात लावण्यास त्यांनीं आह्मांला सांगितलें. जतींची आज्ञा झाल्याबरोबर तो पाटा जागच्या जागींच हलूं लागला; व भुईवर पडलेला होता, तो तटकन आपल्या एका कोरेवर उठून उभा राहिला. तो आपला वरचा भाग मात्र एकसारखा मागें पुढें हालवीत होता. तो पाटा अदले दिवशीं हवेंत वर गेला होता, असें मामलेदार साहेबांनीं मला सांगितलें. व जती म्हणूं लागले, मी आज फार थकलों आहें, म्हणून आतां आज माझ्याच्यानें हा पाटा हवेंत नेववणार नाहीं.

७ यानंतर त्यांनीं एक हंडा आणण्यास सांगितलें.

(अपूर्ण)

नगर, ता. १७ मे १९०७. } **बळवंत बाबाजी देशपांडे,**
बी. ए., एल्‌एल्‌. बी.

*** पत्र संपूर्ण प्रसिद्ध झाल्यावर या विषयाबद्दल आह्मांस लिहावयाचें तें लिहूं. **एडिटर.**

एका अलौकिक चमत्काराची हकीकत.

(तारीख २० मेच्या अंकावरून समाप्त.)

हंडा आणिल्यानंतर त्या हंड्याकडून जे चमत्कार जतीमहाराजांनीं केले ते तर फारच आश्चर्यकारक वाटले. ते येणेंप्रमाणें:—

शार्दूलविक्रीडिताच्या एका ओळींत किती अक्षरें आहेत, हें सांग, असा त्या हंड्यास हुकूम केला. त्याबरोबर हंड्यानें लागलीच एकोणीस ठोके दिले. शार्दूलविक्रीडिताच्या एका ओळींत एकोणीस अक्षरें असतात.

८ त्याप्रमाणेंच स्रग्धरावृत्ताच्या एका ओळींत किती अक्षरें असतात, तें ठोके देऊन सांग, असा दुसरा हुकूम केला. त्याबरोबर

त्या हंड्यानें २१ ठोके दिले. स्रग्धरावृत्तांत एकवीस अक्षरें असतात, हें सर्वश्रुत आहेच.

९ नंतर त्यानें हंड्यास अशी आज्ञा केली कीं, या रावसाहेबांचें नांव इंग्रजी लिपींत लिहून दाखीव. त्याचा खुलासा त्यांनीं मंडळीस असा सांगितला कीं, हंडा कांहीं शाई, कलम घेऊन कागदावर लिहिणार नाहीं. परंतु तुमच्या नांवापैकीं प्रत्येक अक्षर वर्णमालेंत कितवें आहे, हें तितके ठोके देऊन कळवील. माझें नांव काय आहे, हें जतीला ठाऊक नव्हतें, अशी माझी पक्की खात्री आहे. त्या हंड्यानें प्रथम दोन ठोके दिले, ह्मणजे अर्थात् पहिलें अक्षर B ठरलें. नंतर एक ठोका दिला; ह्मणजे A अक्षर ठरलें. नंतर बारा ठोके दिले; ह्मणजे L अक्षर सिद्ध झालें. येथपर्यंत बरोबर जमलें. यानंतर हंड्यानें बरेच वेळेला ठोके दिले. परंतु तीं उत्तरें माझ्या नांवाशीं मुळींच जमेनात. हें सर्व चुकत आहे, असें मी जतींना कळविल्यानंतर जती हंड्यास उद्देशून ह्मणाले, असा काय घोटाळा करीत आहेस, नीट विचार करून ठोके दे. नंतर हंड्यानें दोन तीन वेळां पुन्हा खटपट केली; परंतु उत्तर बरोबर पटेना. तेव्हां जती ह्मणाले, त्याच्या मनांत घोंटाळा झाला आहे. त्याला बरोबर उत्तर सुधरावयाचें नाहीं, सोडून द्या. इंग्रजी लिपींत न सांगतां मराठी लिपींत नांव कां वदविलें नाहीं, असें जतीस विचारितां जती ह्मणाले, मराठींत काना, मात्रा, वेलांट्या वगैरे असतात, त्यामुळें बाराखडींतील अक्षरांची संख्या कळविण्यास कठीण जातें, व इंग्रजींत कळविणें सोपें जातें.

१० नंतर त्यांनीं मामलेदार साहेबांस विचारलें, तुमच्या घड्याळांत किती वाजले. मामलेदारांनीं सर्वांस घड्याळ दाखविलें, तों ८ वाजून ४० मिनिटें झालीं होतीं. हंड्यास जतींनीं हुकूम केला कीं, मामलेदारांच्या घड्याळांत जितके तास वाजले आहेत, तितके ठोके दे. हंड्यानें बरोबर आठ ठोके दिले. नंतर मिनिटाचे ठोके दे, असें सांगितलें. भांड्यानें एक वेळ २६ व दुसऱ्यानें ४८।४९ ठोके दिले. मिनिटांचे ठोके बरोबर जुळले नाहींत.

११ पुढें नगर व घोडनदी यांमध्यें किती अंतर आहे, हें सांग, असा प्रश्न हंड्यास केला. हें अंतर जतीला ठाऊक नसावें, असें मला वाटतें; पण मला तें ठाऊक होतें. हंड्यानें एक वेळ ४८ व एक वेळ ५२।५४ ठोके दिले. हीं उत्तरें चुकीचीं आहेत; असें मी कळविल्यावर जती हंड्यास उद्देशून बोलले, 'अरे तेरेकु मालूम नहि होयगा, तो उदर जाके कितना अंतर है देखना, फेर जबाब देव; और उदर जाकर वापस जब आएंगा, तब हमकू उसका इषारा देना बात जबाब देव.' यानंतर सुमारें दोन मिनिटें तो हंडा स्तब्ध होता. नंतर त्या हंड्यानें एक ठोका दिला. तेव्हां जती ह्मणाले, तो जाऊन परत आला. नंतर त्या हंड्यानें ३२ ठोके दिले. हें उत्तर अगदीं बरोबर आलें. नगराहून ३२ वा मैल अगदीं घोडनदी गांवापाशीं आहे.

१२ नंतर त्यांनीं पांच चार मंडळींना तो हंडा वरून दाबून धरण्यास सांगितलें, व हंड्यास सांगितलें कीं, यांच्या बरोबर कुस्ती खेळ. त्यावर मी म्हणालों, मी एकटाच दाबून धरितों, मजबरोबर कुस्ती खेळूं द्या. असें ह्मणून त्या अचेतन व जड अशा हंड्याला वरून मी आपल्या हातांनीं खूप जोरानें दाबून धरिलें. त्यासरसें ज्याप्रमाणें खालीं आणिलेला कुस्तींतील गडी एकदां डावीकडून व एकदां उजवीकडून ढुसणी देतो, किंवा उठावयाची खटपट करितो, त्याप्रमाणें तो हंडा निरनिराळ्या भागांकडून खालून माझ्या हाताला ढुसण्या देऊं लागला, व मला उत्तरोत्तर अतिशय ताकद लावून हंड्यास खालीं दाबून ठेवावें लागलें, तरी त्या हंड्यानें खूप गडबड माजविली. असें होतां होतां माझा एक हात त्याच्या बुडावरून निसटला व माझ्या हाताच्या जोरास न जुमानतां पांच सहा हाताच्या अंतरावर निसटून गेला, व तेथें तो शांत व निश्चेष्ट पडला.

हीं वरील सर्व कृत्यें हंडा पालथा असतांना त्यानें केलीं. हंडा मी आंतून बाहेरून नीट तपासून हात लावून पाहिलेला होता. तो

अगदीं नेहमीं वापरण्यांत असणाऱ्या हंड्याप्रमाणें साधा होता, व तो तेथूनच एका बिऱ्हाडकरूच्या घरांतून मजदेखतच आणिलेला होता.

१३ यानंतर जतींनीं एक बांक आणण्यास सांगितलें. तें साधारण शाळेंतील बांकाप्रमाणें होतें. तें बांक भुईवर फळी व वर पाय असें ठेवण्यांत आलें. हें बांक आतां हवेंत वर जाईल व तेथें अधांतरीं राहील, असें जतींनीं सांगितलें. त्या बांकाचे फळीखालीं पांच सहा जणांनीं आपल्या हाताचा स्पर्श करावा, असें मात्र आह्मा सर्वांस सांगितलें; त्याप्रमाणें आम्हीं केलें. बांकाची एक बाजू किंचित् वर चढूं लागली, व क्रमाक्रमानें चोंहीकडून तें बांक हवेंत आपोआप सरकत चाललें. जतींनीं आह्मांस सांगितलेंच होतें कीं, त्याचें गुरुत्व अगदीं नष्ट होऊन तें अगदीं कागदाप्रमाणें हलकें आमच्या हातास भासेल, व असें होईल तेव्हां तें वर जाईल. आह्मांस खरोखर त्याचें वजन मुळींच भासेनासें झालें,आणि वर चढत चढत तें सुमारें एक पुरुषभर उंचीवर हवेंत तरंगूं लागलें. ठेंगण्या मंडळीचे हात आपोआप सुटले. व मीच त्या मंडळींत सर्वांत उंच असल्यामुळें माझ्या मात्र हाताचीं बोटें कळत न कळत त्या बांकाचे फळीस खालचे बाजूनें स्पर्श करीत होतीं नव्हतीं. सुमारें दोनएक मिनिटें बांक याप्रमाणें निराधार हवेंत राहिल्यावर जतीमहाराज म्हणाले, त्याला आतां गुरुत्व येईल, त्यास हाताचा आधार द्या. त्यासरसें तें बांक आह्मा सर्वांच्या हातावर आदळलें. व आह्मी तें खालीं घेतलें. याप्रमाणें चमत्कार जतींनीं करून दाखविले. या कोणत्याही जिनसा जतीच्या जवळच्या नव्हत्या. जती हे जैन धर्माचे असून त्यांच्याजवळ फक्त एक घोंगडी व एक छाटी व एक दंड असतो. बरोबर शिष्य नसतात. व नेहमीं एका गांवाहून दुसऱ्या गांवाला पायानें प्रवास करितात. मुक्कामाच्या ठिकाणीं दोन तीन घरें भिक्षा मागून क्षुधाशांति करितात. असा त्यांचा वर्तनक्रम मालेगांवचे वृद्ध वकील रा. ब. आबासाहेब गुप्ते यांनीं सांगितला. हे सर्व प्रकार दिव्याच्या उजेडांत झाले. सुमारें एक तास लागला. हे सर्व प्रकार घडत असतानां जती तिकडे मुळींच लक्ष देत नसत. एक वेळ हुकूम

करून मंडळीशीं इतर सामान्य भाषण करीत असत. हे सर्व चमत्कार कसे घडतात, याचा खुलासा मी त्यांस विचारिला. तेव्हां जतींनीं कळविलें कीं, आपणास कांहीं मंत्र येत नाहीं, किंवा आपण मेस्मेरिझमही करीत नाहीं, किंवा पिशाचाचें साह्य घेत नाहीं, किंवा कोणतेंही साधन करून घेतलेलें नाहीं. हें सर्व आपल्या Will Power नें ह्मणजे मानसिक शक्तीनें घडतें. सृष्टींतील सर्व स्थावर जंगम वस्तु मनुष्याच्या मनाच्या आधीन झालेल्या पाहिजेत, असा सृष्टिनियम आहे. मनुष्याच्या मना इतकी जोरदार शक्ति दुसरी नाहीं. कसरतीनें शरीरबल वाढवितां येतें, व अभ्यासानें बुद्धि तेजस्वी होते, त्याप्रमाणेंच मानसिक शक्ति तपश्चर्येनें वाढवितां येते. त्याबद्दल संस्कृत भाषेंत पुष्कळ शास्त्रीय ग्रंथ आहेत; त्यांत आचरणाचे नियम दिले आहेत. पुरातनकालीं मारुतीनें द्रोणागिरि उचलिला, ऋषिलोक सूर्याच्या किरणाला दोरीप्रमाणें धरून शरीर न भाजतां सूर्यलोकीं जात होते, वगैरे कथा आहेत; त्या खोट्या नाहींत. नर्मदेच्या तीरीं एक वेळ ब्राह्मण ब्रह्मचारी व जैनजती तपश्चर्या करीत होते. तेथें जंगलांत एक रामाचें व मारुतीचें अशीं देवालयें होतीं. हीं एकाद्या गांवाच्याजवळ असलीं, तर नीट व्यवस्था राहील, असा विचार मनांत आणून रात्रीं ब्राह्मण ब्रह्मचाऱ्यानें रामाचें देऊळ उचलिलें, व जतीनें मारुतीचें उचलिलें. संकल्प असा ठरला होता कीं, कोंबडा आरवेपर्यंत प्रवास करून त्या ठिकाणीं देवालयें ठेवावीं. प्रवास करीत करीत अबू पर्वताजवळ एक गांव आहे, तेथपर्यंत रातोरात ते गेले. परंतु ब्राह्मण गांवच्या पुढच्या बाजूस गेला होता, व जती दुसऱ्या बाजूस राहिला होता; इतक्यांत सूर्योदयाची वेळ झाली, व त्यांनीं कोंबड्याचा स्वर ऐकिला. त्यासरसें जतीनें मारुतीचें देऊळ गांवाच्या एका बाजूस ठेवून दिलें, व ब्राह्मणानें रामाचें दुसऱ्या बाजूस ठेविलें. राम व मारुति ह्यांचीं देवालयें नेहमीं समीप व समोरासमोर असावयाचीं, परंतु या कारणामुळें हीं देवालयें त्या गांवच्या निरनिराळ्या बाजूंस दृष्टीस पडतात. यानंतर जतीला बऱ्याच गोष्टी विचारावयाच्या होत्या, पण रात्र फार झाल्यामुळें भाषण बंद करावें लागलें. जती हे

चांगलें संस्कृतज्ञ असून मोकळ्या मनानें वादविवाद करितात. एकंदरींत ही मानसिक शक्ति सदाचारानें वाढते, असें जतीनें सांगितलें. परंतु याबद्दल फार गहन शास्त्रविचार आहेत, व तपश्चर्येनें सदाचरणही फार दिवस करावें लागतें, असें ते म्हणाले. आपण जे चमत्कार दाखविले ते आपल्या हातून सहज घडतात, त्याबद्दल आपण कांहीं तपश्चर्या वगैरे केली नाहीं, असेंही जतीनें कळविलें. सदरील जतीमहाराजांस मी नगरास बोलावणार आहें. त्यावेळीं माझ्या नेटिव व युरोपियन मित्रमंडळीला मी बोलावणार आहें. या चमत्कारासंबंधानें माझें वाचन नाहीं, व मला माहितीही नाहीं. तेव्हां त्याबद्दल मत देण्यास मला अधिकार नाहीं. परंतु जिज्ञासु लोकांच्या माहितीकरितां घडलेली हकीकत आपल्या पत्रांतून प्रसिद्ध करीत आहें. तरी ती प्रसिद्ध व्हावी. कळावें, लोभ असावा ही विनंति.

अहमदनगर, तारीख ३१ मे सन १९०७

बळवंत बाबाजी देशपांडे,

बी. ए., एल्एल्. बी.

*** आमचे मित्र रा. रा. बळवंतराव देशपांडे यांनीं मालेगांव येथें पाहिलेल्या चमत्काराची हकीकत त्यांचेकडून आली तशी आह्मी प्रसिद्ध केली आहे. ही प्रसिद्ध करण्यापूर्वीं मालेगांवचे मामलेदार रा. सा. केळकर आणि तेथील एक वृद्ध वकील यांजकडे मित्राच्या मार्फतीनें चौकशी करून या हकीकतीच्या खरेपणाबद्दल आह्मी जास्त खात्री करून घेतली आहे. रा. देशपांडे यांचा स्वभावतः देवभोळेपणाकडे कल नाहीं, इतकेंच नाहीं, तर ते आपणाला संशयवादी म्हणवितात, असें येथें सांगणें अवश्य आहे. ते चांगले विद्वान आहेत, आणि व्यवहारदृष्टयाही हुषार आहेत. आपण फसूं नये ह्मणून जितकी खबरदारी घेणें अवश्य होतें, तितकी त्यांनीं घेतली होती. अशा स्थितींत त्यांचें पत्र लोकांपुढें मांडून ज्याला जो योग्य तो तर्क काढण्यास मोकळीक द्यावी, हाच एक मार्ग आम्हांस मोकळा आहे.

एडिटर सुधारक.

पैशाचिक प्रयोगांमागें लागलें असतां कांहीं वेळां जरी अवनति होण्याचा संभव आहे, तरी या वरील हकीकतीवरून व पिशाच प्रसन्न करून घेऊन तुळशीदासानें रामदर्शन करून घेतलें, अशा ऐकीव आख्यायिकांवरून कांहीं एकादा मोठा फायदा करून घेतां येणेंही शक्य आहे, अशी कल्पना येणें साहजिक आहे. यासाठीं या विषयावर विचार करणाऱ्या लोकांचें याबद्दल काय मत आहे, तें पाहूं.

पैशाचिक प्रयोगामागें लागणें फायदेशीर नाहीं.

या पैशाचिक शक्तीच्या अनुभवासाठीं प्रयोग करीत असतां पुष्कळ वेळां करमणूक होते, कांहीं अद्भुत चमत्कार दिसतात, व कांहीं कांहीं वेळ कांहीं फायदे व कांहीं अनुभव येतात. तरी या पिशाचविषयाचा अभ्यास करणाऱ्या, विचार करणाऱ्या व अनुभव घेणाऱ्या प्राचीन व अर्वाचीन शास्त्रशोधकांनीं एकंदरींत एकच निर्णय केला आहे. त्यांतील इत्यर्थ खालीलप्रमाणें आहे.

" या पैशाचिक शक्तीला स्वाधीन करून घेऊन तिच्याशींच खेळ खेळण्यांत काळ घालविणाराची उन्नति तर होत नाहींच, पण अखेर त्याला सर्व तऱ्हेच्या अवनतींतच पडावें लागतें. कोणाला आरंभीं जरी कांहीं ऐहिक फायदे दिसले, तरी शेवटीं तो पुष्कळ दिवसांच्या पिशाचशक्तिसाहचर्यानें त्या शक्तीच्या ताब्याखालीं जाऊन त्याचें ऐहिक व पारमार्थिक अकल्याणच होतें. "

यासाठीं यापासून एखादा फायदा होईल, असें समजून त्याच्या मागें सदोदित लागूं नये. तर अनुभवासाठीं प्रयोग करून पहात असतांना ती अदृष्ट व्यक्ति–पिशाच–आपल्या ताब्यांत असे तोंपर्यंतच थोडे चमत्कार पाहून आपली व आपल्या मित्र मंडळीची खात्री करून द्यावी. पण आपल्यापैकीं एखाद्याला त्या पिशाचशक्तीच्या—अदृष्टव्यक्तीच्या—ताब्यांत देऊन चमत्कार पाहणें प्रसंगीं घातक आहे. आणि कोणत्याही पिशाचाशीं नेहमींचा संबंध ठेवणें तर अतिशयच घातक आहे. कारण या पैशाचिक प्रयोगामागें

लागणाराचें वर्चस्व पुढें पुढें हळू हळू नष्ट होत जाऊन शेवटीं ती अदृष्ट व्यक्ति त्याला आपला ताबेदार करून घेते.

आरंभीं आपणाला स्पष्ट समजो वा न समजो, तरी पिशाचाचा आपणाशीं संबंध घडला असतां, अगर घडवून घेतला असतां, त्यापासून चांगल्या मार्गांत आपल्याला एकसारखे अडथळे मात्र येत असतात. आणि त्यामुळें आपल्या उन्नतीस तितका प्रतिबंध मात्र होत असतो, किंवा आपण जास्त जास्त अवनतीस मात्र जात असतों.

पिशाच आमच्याखालील मानस देहाला (जीवात्म्याला—जीवाला) पकडून त्याकरवीं या जगांत असतांना अतृप्त राहिलेल्या आपल्या क्षुद्र वासना तृप्त करून घेण्याची खटपट करीत असतें. त्यामुळें तें लोकांना आपल्या सपाट्यांत घेऊन व आपल्या त्या वासनांना बळी पाडून, निरनिराळ्या व्यसनांच्या स्वाधीन करीत, नीचतर विचारांची वाढ करवून शेवटीं भ्रष्ट, पतित, व दुराचारी बनवितें.

या जगांतील कोणत्याही स्थूल विषयाचा उपभोग त्यांस सहजासहजीं स्थूलदेहधारी मनुष्याशीं संबंध केल्यावांचून घेतां येत नाहीं. यासाठीं आपणांस योग्य गिऱ्हाइकें पाहून त्यांना आपल्या उपयोगीं पडण्यासारखें कह्यांत घेण्याचा तीं सारखा प्रयत्न करीत असतात.

असें जरी आहे, तरी कोणी पिशाचाची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. कां तर, पुष्कळांच्या मानसिक आवरणाच्या दृढपणामुळें त्यांना वासनाद्वारा प्रवेश करणें अशक्य असतें. आणि वासनाद्वारा प्रवेश करण्यास जरी त्यांना कांहीं द्वारें खुलीं असलीं, तरी विशिष्ट वासनेखेरीज त्या मनुष्याच्या स्थूल देहाशीं संबंध करून त्याला यातना देणें किंवा त्रास देणें हें तर फारच अवघड असतें.

१ ज्याच्याशीं तसा पूर्वीचाच कांहीं संबंध जडलेला असतो, अगर जो आपण होऊन तसा संबंध जडूं देतो, किंवा जडवून घेतो,

आणि तो सुद्धां फार काल घडवून घेतो, २ किंवा जो कोणी
दुष्ट मनुष्य पिशाच स्वाधीन करून घेऊन आपल्या इच्छाशक्ती-
च्या जोरानें हलक्या इच्छाशक्तीच्या माणसाला त्या पिशा-
चाच्या स्वाधीन करून देतो, त्या मनुष्यासच त्या पिशाचाला
छळतां किंवा त्रास देतां येतो.

याशिवाय जरी कधींकाळीं सृष्ट नियमानें (आध्यात्मिक सृष्ट
नियमाअन्वयें) कोणास कांहीं पैशाचिक चमत्कार दिसले, किंवा
पिशाचाची आकृति दिसली, किंवा एखादा भयंकर देखावा नजरे-
समोर आला, अथवा भाषणचमत्कार ऐकूं आला, तथापि "जों-
पर्यंत त्या मनुष्याच्या मनाचें स्थैर्य कायम आहे, तोंपर्यंत पिशा-
चाला त्यावर कांहींही अनिष्ट परिणाम घडवितां येत नाहीं," असा
मानसशास्त्राचा सिद्धांत आहे.

हें जरी खरें आहे, तरी पुष्कळ लोकांच्या ठिकाणीं इतक्या
उत्कृष्ट धारिष्टाची धारणाशक्ति नसल्यामुळें व कित्येकांच्या मना-
च्या कमकुवतपणामुळें, अज्ञानामुळें, किंवा गैरसमजुतीमुळें खोटे किंवा
खरे, सूक्ष्म किंवा मोठे, असे जे घातुक परिणाम होत असतील, ते
टाळण्याच्या व नाहींसे करण्याच्या मार्गाचा विचार आपणाला
अवश्य केला पाहिजे.

पिशाचाचे त्रासांतून सुटण्याचे उपाय.

अडाणी लोक सर्व तऱ्हेच्या शारीरिक भोगाला पैशाचिक
त्रासच समजतात. यांत त्यांचा कांहीं दोष नाहीं. कारण त्यांचें
ज्ञानच तसें कोतें असतें. त्याचप्रमाणें अलीकडील कांहीं नेटिव्ह
वैद्य—धंदा करणारे—विचार करणारे नव्हेत—मेंदूच्या विकाराला
सुद्धां पिशाचहत या सदरांत घालणारे आढळतात. तरी त्यांनाही
याबद्दल दोष देतां येत नाहीं. कारण असा भेद ओळखण्या-
सारखें शारीरशास्त्राचें व इंद्रियविज्ञानशास्त्राचें ज्ञानच त्यांना मिळत
नाहीं. बरें, ज्यांना शरीर व इंद्रियविज्ञान या शास्त्रांचें ज्ञान पोटापुरतें

मिळतें, त्या डाक्टर लोकांकडे पाहिलें, तर ते मनाचे व पिशाचाचे सत्य विकारसुद्धां सर्व मेंदूच्याच विकारांत घुसडून देतात. याचें कारण त्यांनासुद्धां आपल्या शाळेंत शिकलेल्या ज्ञानापलीकडे कांहीं ज्ञानप्रदेशच नाहीं, असें वाटत असतें; आणि त्यामुळें ते या शरीरांत स्थूल दृष्टीनें आढळून येणाऱ्या द्रव्यस्वरूपी इंद्रियांपुढें जात. नाहींत. परंतु योग्य विचार करणारे कांहीं विद्वान डाक्टर हल्लीं मानसशास्त्रमर्यादेंत वावरूं लागले आहेत. आणि कोणी कोणी शोधक पैशाचिक कारणांपर्यंतही येऊन पोंचले आहेत.

पूर्व काळच्या काय, किंवा अर्वाचीन काळच्या काय, योग्य शोधक लोकांचे अनुभव एकच असणार. त्यांनीं प्रत्येक तऱ्हेच्या विकाराच्या मूळ कारणाचा प्रदेश अगदीं पृथक् पृथक् करून त्या अनुरोधानेंच पृथक् पृथक् मूळ कारणावर परिणाम करतील, असेच पृथक् पृथक् उपायही सांगितलेले आहेत. आणि जेथें सूक्ष्म अशा मूळ कारणापासून घडणाऱ्या दूषित संस्काराच्या योगानें त्यापेक्षां जड द्रव्यधारी अशा स्थूळ इंद्रियांवर परिणाम होतात, तेथें अशा वेळीं या दोनही ठिकाणांवर परिणाम करणारे मिश्र उपाय सांगितले आहेत.

स्थूळ तऱ्हेनें आढळून येणारा विकार जरी एकच असला, तरी त्याचें मूळ कारण मात्र निरनिराळ्या स्थळीं असतें. (यासंबंधीं कांहीं माहिती मोहिनीविद्येच्या शिक्षकांत पहावी.) उदाहरण. बालग्रह (कन्व्हल्शन्) हाच विकार घ्या. १ पचनक्रियेंत बिघाड हें मूळ कारण असून बालग्रह होतो. २ पोटांत जंत हें मूळ कारण असूनही बालग्रह होतो. ३ किंवा मेंदूंत बिघाड या मूळ कारणानेंही बालग्रह होतो. इतक्या गोष्टी अर्वाचीन डाक्टरांना कबूल आहेत. या किंवा अशाच दृश्य मूळ कारणांवर परिणाम करणारे उपचारही यांना कबूल आहेत. दुसरें उदाहरण उन्माद (हिस्टेरिया) या रोगाचें आपण घेऊं. या विकाराचें मूळही (१) गर्भाशयांत असतें, (२) मेंदूंत असतें, अगर (३) या तीनही ठिकाणीं न आढळतां तें मनांत असतें. येथपर्यंत डाक्टर लोकांची कबूली

आहे. जेव्हां या विकारांत आजपर्यंत समजून आलेल्या इंद्रिय-परीक्षप्रमाणें खालच्या शरीरेंद्रियांत किंवा ज्ञानतंतु व मेंदू यांत कांहींही विकार न आढळतां–प्रकृतीला कांहींही दोष न दिसतां–एक-दम ज्ञानतंतु व खालचीं इंद्रियें परमावधीच्या विकारास जाऊन पोंचलीं आहेत, असा अनुभव येत असतां क्षणांत पुन्हां कोठेंच कांहीं विकार नाहीं, असा खडखडीतपणा आढळून येतो, तेव्हां त्या विकाराचें मूळ मनांत [अगर त्यापेक्षां सूक्ष्मांत] असतें. तें प्रत्यक्ष मेंदूंत आढळत नाहीं. तर मनोवृत्तींनीं ज्या वेळी मेंदूच्या विशिष्ट पिंडांतील विशिष्ट ज्ञानतंतूंत विशिष्ट प्रकारची गती चालू होते, तेव्हांच त्या संस्कारानें ज्ञानतंतूंत व दुसऱ्या स्थूल इंद्रियांत तो बिघाड अनुभवास येतो, व ती वृत्ति बंद होण्याबरोबर तो नाहींसा होतो. यापेक्षां अर्वाचीन डाक्टरी शास्त्राला याचा फारसा शोध लागलेला नाहीं. हें अज्ञात आहे, बरोबर समजलें नाहीं, असें त्या शास्त्रानें प्रांजलपणें कबूल केलें असून याबद्दल आपले शोध पुढें चालू ठेवले आहेत. अशा विकारावर **होमो-पाथी, हैड्रोपाथी, जलोपचारपद्धति विद्युदुपचार, मेस्मेरि-झम, हिप्नॉटिझम, सजेशन,** या सर्वांच्याच उपचाराची अवश्य-कता आहे, असें जी. सी. फुल्मन, एम्. डी., यांनीं आपल्या होमि-ओपाथीच्या हँडबुकांत सांगितलें आहे. आपल्या प्राचीन आयुर्वेद-वेत्त्यांनीं या विकारांचीं उगमस्थानें यापेक्षांही सूक्ष्मापर्यंत नेऊन पोंचविलीं असून त्यांतही भेद केलेले आहेत, व त्या सर्वांवर उपाय सांगितले आहेत. त्यांनीं केवळ याच विकारांच्या मूळ कारणांचा इतका खोल शोध केला आहे असें नव्हे, पण दुसऱ्याही पुष्कळ विकारांचीं मूळ कारणें त्यांनीं अतिशय खोल नेऊन पोहोंचविलीं आहेत, असें त्यांच्या कारणमीमांसेवरून व उपचारकथनावरून शाबीत होतें.

कांहीं ज्वर, कांहीं बालग्रह, व कांहीं उन्माद, या विकारांशीं त्यांनीं पैशाचिक कारणांचा संबंध जोडलेला आहे. १ अशा जातीच्या विकाराचें मूळ कारण शरीराच्या कोणत्याही भागांतच

असतें, तेव्हां तें कारण वातज, पित्तज, कफज, किंवा द्वंद्वज, अगर सन्निपातज असतें. २ शरीरबाह्य पण स्थूल मूळकारण शरीरांत (आगंतुक) शिरलेलें असलें तर तें विषजन्य असतें. ३ याचें मूळकारण मनांतच असतें, असें सांगून, ४ शरीरबाह्य सूक्ष्म मूळकारणांत निरनिराळ्या ग्रहांचा शरीरांत प्रवेश झाल्यानें निरनिराळीं लक्षणें होतात, असें सांगितलें आहे. उन्मादांत, भूतोन्माद, देवजुष्ट, असुरजुष्ट, गंधर्वजुष्ट, यक्षजुष्ट, पितृग्रहजुष्ट, राक्षसजुष्ट, पिशाचजुष्ट, असे निरनिराळे भेद सांगितलेले आहेत. हीं कारणें स्थूलदृष्टीला जरी प्रत्यक्ष दिसून आलीं नाहींत, तरी तीं कशीं असतात, याबद्दल त्यांचें मत खालीलप्रमाणें आहे.

श्लोक.

दर्पणादीन्यथा छाया शीतोष्णं प्राणिनो यथा ।
स्वमणौ भास्करांशुश्च यथा देहं च देहधृक् ।
विशन्ति च न दृश्यंते ग्रहास्तद्वच्छरीरिणां ॥

भावार्थः–आरशांत जसें प्रतिबिंब शिरतें, तसे ते शरीरांत शिरतात. शीत उष्ण हे शरीरावर परिणाम करीत असतां गुप्तपणें कार्य करीत असलेले जसे दिसून येत नाहींत, तसेच हे ग्रह समजत नाहींत. सूर्यमण्यांत सूर्यकिरण जसे एका केंद्रांत प्रवेश करून आपला प्रभाव दाखवितात, तसे हे देहांत प्रवेश करून आपलें सामर्थ्य चालवितात. आणि ज्याप्रमाणें आत्मा या शरीरांत या देहाच्या सर्व क्रिया चालवीत असतांही दिसून येत नाहीं, त्याप्रमाणें हे तापदायक ग्रह–भूतें, पिशाचें–शरीरांत शिरून राहून परिणाम करीत असतांही दिसून येत नाहींत, असा भावार्थ आहे.

या पुरातन विचारांशींच अर्वाचीन पिशाचशास्त्रवेत्ते हळू हळू येऊन मिळाले आहेत. व त्यांनींही या मूळ कारणावर उपाय सांगितले आहेत.

आतां आपणाला या खोट्या पैशाचिक कारणापासून तों भ्रामक पैशाचिक कारणानें, आणि शेवटीं सत्य पैशाचिक कारणानें, उत्पन्न होणाऱ्या त्रासाचा थोडक्यांत पण उपयुक्त विचार करावयाचा आहे.

हा वेळपर्यंत पिशाचासंबंधानें केलेल्या विचारावरून दहा हजार गोष्टी पिशाचाच्या ह्मणून पुढें आल्या असतां त्यांत सर्व तऱ्हेच्या शास्त्रीय शोधनास टिकून पिशाचशक्तीचें अस्तित्व निदर्शनास आणून देणारी–सिद्ध करणारी–एखादीच गोष्ट असते. एखादाच सत्य चमत्कार असतो, आणि बाकीच्या नऊहजार नऊशें नव्याणव गोष्टींत पिशाचाचा संबंध असत नाहीं, असें आढळून आलें आहे. यामुळें सत्य पिशाचांविषयींच्या त्रासापुरत्याच उपायांचा विचार करणें न्याय्य होईल. हें जरी खरें आहे, तरी बहुजन समाजांत शिक्षण प्रसाराच्या अभावीं सत्यज्ञानाची पात्रता नसल्यामुळें त्यांनीं पैशाचिक त्रासाचें जेवढें क्षेत्र वाढविलें आहे, तेवढ्याच्या त्रासांतून सुटण्यासाठीं म्हणून मलाही आपली उपायक्षेत्रमर्यादा विस्तृत करणें भाग झालें आहे. तरी सुद्धां मला ते भरपूर दाखविण्यास अवकाश नाहीं. म्हणून थोडकेच, पण त्यांतील १ खोटे, २ भ्रामक व ३ सत्य प्रांत जितके बरोबर करून दाखवितां येतील, तितके स्पष्ट दाखवून त्यांच्या त्यांच्या उपायांचें दिग्दर्शन करणें अवश्यक झालें आहे.

खोटे त्रास:—ज्या शारीरिक विकारांशीं किंवा व्याधींशीं आणि मानसिक विकारांशीं किंवा आधींशीं पिशाचशक्तीचा कांहीं संबंध नाहीं, अशा सर्व त्रासांचा; गैरसमजुतीनें किंवा भोळेपणानें, ते पिशाचाचे आहेत, असें गृहीत धरलें असेल, त्या त्रासांचा; व समजून उमजून खोटें ढोंग करून घरच्या मंडळींना त्रास देण्यासाठीं, किंवा लोकांस फसविण्यासाठीं अंगांत आणण्याचा; या सर्वांचा समावेश मी खोट्या त्रासांतच करितों.

यापैकीं लोकांना फसविण्यासाठीं अंगांत आणणाऱ्या लोकांबद्दल क्षमा न दाखवितां त्यांची खोडच मोडली पाहिजे. पण त्यापूर्वी त्यांच्या लबाडीच्या उद्देशाबद्दल मात्र खातरी करून

घेतली पाहिजे. बांधून घालून मार देण्याबद्दल पूर्वीच्या वैद्यक ग्रंथांत जो उपाय सांगितला आहे, तो अशाच अंगांत आणण्यास उद्देशून सांगितलेला असावा. जेव्हां याला घरची मंडळीच साथीदार असते, तेव्हां बाहेरच्या समजदार लोकांनींच हा असला धंदा बंद केला पाहिजे, व तो बंद करण्यासाठीं खोड मोडावयास युक्तीचाच आश्रय केला पाहिजे.

खोटें अंगांत आणणाऱ्या माणसाची खोड मोडावयासाठीं अंगाऱ्यांत अगर भंडाऱ्यांत, किंवा गुलालांत अथवा बुक्यांत, कवसकुल्याची (खाजकुहिलीच्या शेंगेची) कूस मिसळून किंवा अग्यावोंडाची कूस मिसळून तो त्या लबाड माणसाच्या अंगास लावावा; ह्मणजे ही कूस लागल्याबरोबर त्याच्या अंगाची विलक्षण आग होऊं लागून तो सर्वांग खाजवूं लागतो, व त्याला कांहीं सुचेनासें होऊन तो आपल्या सोंगाची बतावणी सोडून तळमळूं लागतो. अशा रीतीनें त्याची लबाडी उघडकीस आणून त्याची खोड मोडून बेंड मोडेतोंपर्यंत त्याच्या अंगाची फारच आग झाली, तर आंगाला तेल लावून खरखरीत रुमालानें घासून पुसून स्नान घालावें, ह्मणजे ती कमी पडते.

आपल्या आंगांत आणून घरच्या माणसांला फसविणाऱ्या एका वस्ताद बाईची खोड मोडण्यासाठीं आमच्या एका मित्रानें एक खासा नामी तोडगा केला होता. हा आमचा मित्र नेहमीं जादूचे चमत्कार (ट्रिक्स) करणारा असल्यामुळें, निरनिराळ्या लबाड लोकांशीं त्याचे पुष्कळ सामने झाले होते. पण ही बाई त्याला फारच वस्ताद भेटली. तिच्यापुढें तिला भीति दाखविण्याच्या नेहमींच्या चलाखीचा कांहींच उपयोग झाला नाहीं. तेव्हां या राजश्रीनें तिला (त्या आंगांत आलेल्या पिशाचास ह्मणून) उद्देशून सांगितलें कीं, " तूं या झाडाला सोडून जात नाहींस, तर या तुला, किंवा ढोंग करीत असशील तर या झाडाला मंत्रसामर्थ्यानें जाळून टाकितों. काय समजलास ! " याप्रमाणें बोलून एक मोठा काकडा पेटवून घेऊन तिच्या समोर धरला आणि यांनीं आपल्या तोंडात तोंड भरून तेल व रेक्टिफाइड स्पिरिटची चूळ घेऊन ती तावडतोब त्या काकड्याच्या जाळांतून त्या बाईच्या

लुगड्यावर पायांकडे फुंकली. त्याबरोबर तिच्या पायावर व लुग- ड्यावर जिकडे तिकडे निळसर पिवळ्या रंगाच्या ज्वाला दिसूं लागल्या. त्याबरोबर (या सर्व गोष्टी आकस्मिक तऱ्हेनें तिच्या बुद्धीला कांहींच उलगडा न होण्यासारख्या बेमालूमपणें घडल्या- मुळें आपल्या सर्वांगाला मंत्रानेंच आग लागली असें वाटून) ती घाबरली, आणि " मी जातों, मी जातों " ह्मणून धाडदिशी जमिनी- वर घालून घेतलें. भीतीनें तिच्या जिवाची त्रेधा उडाली. या वेळीं " पिशाच नसून तूं ढोंग करीत होतीस, ह्मणून तुझ्या आंगाला व कप- ड्यालाच ज्वाळा उत्पन्न होऊन तूं जळूं लागलीस. पुन्हां असें करूं नकोस ! " असें ह्मणून तिची फटफजीती केली. तिच्या आंगावर व कपड्यावर जागजागीं थोड्या थोड्या उत्पन्न झालेल्या ज्वाळा स्पिरिट जळून जाण्याबरोबर आपोआप नाहींशा झाल्या. तरी तिच्या आंगाला कोठें ऊब व कोठें चटका लागला.

सूचना:—स्पिरिटच्या ज्वाळांनीं पेटत नाहीं, किंवा जळत नाहीं, असें मात्र नाहीं. बोट स्पिरिटमध्यें बुचकळून पेटविलें असतां आपल्या बोटाच्या कातडीवर ज्वाळेच्या दरम्यान स्पिरिटच्या वाफेची गादी जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत बोट भाजत नाहीं. ती कमी होतांच बोट भाजतें, अगर ज्वाळा दुसरीकडे लागल्यास भाजतें. कपडा स्पिरिटमध्यें भिजवून पेटविला असतां स्पिरिट उडून जाई- पावेतों त्याला जरी धक्का लागत नाहीं, तरी फार वेळ झाल्यास कपडा पेटतो. यासाठीं असा प्रयोग करण्याची वेळ आल्यास फक्त क्षणैक ज्वाळा दिसून फार तर थोडी उब लागून अधिक कांहीं परि- णाम होणार नाहीं, अशी दक्षता ठेवावी. मनावर भीतीचा पहिला परिणाम होण्याबरोबर त्या ज्वाळा आपोआप विझल्या नाहींत, तर घोंगडीनें गुरफटून त्या एकदम विझवून टाकल्या पाहिजेत.

या किंवा अशाच कांहीं वस्तादगिरीच्या कृत्यांनीं असल्या लबाड माणसांच्या खोटें अंगांत आणण्याचा बंदोबस्त केला पाहिजे.

आतां पिशाचाचा संबंध नसतांना पैशाचिक मानण्यांत येणाऱ्या **लाक्षणिक भ्रम, बालग्रह, उन्माद, बेशुद्धि, वेड, व भ्रमिष्टपणा**, इत्यादि विकारांचा विचार करूं.

(१) **लाक्षणिक भ्रमः**—आंगांत पुष्कळ ताप आला असतां किंवा तापांत मेंदूंत फाजील उष्णता गेली असतां भ्रम उत्पन्न होतो. याला लाक्षणिक भ्रम म्हणावें. अशा भ्रमाला पुष्कळ लोक पैशाचिक मानतात. पण तसें समजण्याचें कारण नाहीं. आलोपाथी (डाक्टरी) व होमिओपाथी पद्धतीच्या डाक्टरांनीं याच्या निरनिराळ्या सूक्ष्म भेदाचें वर्णन केलें आहे.

१ रोगी ज्या भ्रमांत प्रश्नांचीं उत्तरें बरोबर, पण सावकाश व हळू देतो, त्याला **सुस्ती, जडता** (लेथरजी) ह्मणतात.

२ उत्तरा पुरतीच जागृति येते, त्या भ्रमाला **निद्राभ्रम** (सॉमनोलन्सी) ह्मणतात.

३ मोठ्यानें हांक मारून किंवा हालवून जागृति येते, त्या भ्रमास **गुंगी** (स्टूपर) ह्मणतात.

४ हालवून किंवा मोठ्यानें हाक मारूनही जेव्हां जागृति येत नाहीं, तेव्हां त्यास **बेशुद्धि** (कोमा) ह्मणतात.

५ जेव्हां थोडा वेळ शुद्धि नाहींशी होते, तेव्हां त्यास **झीट** (फेंटिंग) ह्मणतात.

ही स्थिति ज्ञानतंतुजालाची समता बिघडल्याची द्योतक असते, अथवा प्रत्यक्ष त्या ठिकाणींच विकार असतो. कित्येकदां अशी स्थिति विषारापासून अथवा न मानवणाऱ्या पदार्थांच्या अंतःप्रवेशापासून उत्पन्न होते. व येथूनही नानातऱ्हेच्या भ्रमाच्या अवस्था उत्पन्न होतात.

६ जेव्हां असंबद्ध प्रलाप, विचित्र कल्पना, व वेडीवांकडी इंद्रियक्रिया चालू असते, तेव्हां याला **भ्रम** (डिलिरियम) ह्मणतात.

७ जेव्हां आजारी हालचाल न करितां आपल्याशींच कांहीं गुण-गुण, पुटपुट करीत असतो, तेव्हां त्याला **आत्मगतविचारभ्रम** (टॉरपिड डिलिरियम) म्हणतात.

८ बिछान्यांतच असून जेव्हां मोठ्यानें बडबडतो, तेव्हां त्याला **साधा भ्रम** (सिंपल डिलिरियम) ह्मणतात.

९ बिछान्यांतच जोरानें दाबून ठेवण्याची पाळी येते, तेव्हां त्याला **उत्तान भ्रम** (फिरिअस डिलिरियम) ह्मणतात.

बेशुद्धि आणि भ्रम हे सदोदित एक नव्हेत, तरी ते जेव्हां जेव्हां एकत्र असतात, तेव्हां तेव्हां वायु झाला असें ह्मणतात. या सर्वांवर निरनिराळ्या कारणाप्रमाणें व त्या वेळेच्या लक्षणाप्रमाणें आलोपाथ व होमोपाथ डाक्टरांनीं व वैद्यांनीं निरनिराळी औषधयोजना सांगितली आहे.

(२) **बालग्रहः**—(कनव्हलशन्) हा विकार बहुशः सर्वांच्याच परिचयांतील आहे. हा लहान मुलांचा विकार विनाकारण भूतभावना उत्पन्न करीत असतो. यांत मुख्य दोन भेद आहेत. एक **तात्कालिक** (अक्यूट) व दुसरा **विलंबी** (क्रॉनिक).

तात्कालिक बालग्रहः—१ कोणत्याही कारणानें मस्तकाकडे जास्त उष्णता गेली असतां एकदम बुबुळें फिरवून दचकण्याचीं लक्षणें उत्पन्न होतात.

२ साधारणपणें कोणत्याही विकारांत ताप विशेष वाढला असतां लहान मुलांस हीं लक्षणें होतात.

३ दांत येत असतां हिरड्या सुजल्यानें त्यांचा दाब ज्ञानतंतूंवर पडूनही हीं लक्षणें उत्पन्न होतात.

४ क्वचित् पडून त्या धक्क्यानेंही अशीं लक्षणें उत्पन्न होतात.

५ जंतानेंही अशीं लक्षणें होतात. या तात्कालिक होणाऱ्या बालग्रहांत बालग्रहाचीं सर्व लक्षणें (हाताच्या मुठींत आंगठे जाणें

वगैरे) होतातच, असा नियम नाहीं. तरी पण डोळ्यांचीं बुबुळें फिरवून एकदम बेशुद्ध होणें हें लक्षण मुख्यत्वें करून असतें.

विलंबी बालग्रहः—१ हा विकार मुलाची पचनक्रिया बरोबर चालेनाशी होऊन यकृताच्या क्रियेंत बिघाड झाला असतां व शौचास अवष्टंभ होऊं लागला असतां उत्पन्न होतो.

२ आईबापांच्या अशक्त प्रकृतीमुळें, विशेषतः पुरुषाच्या अशक्त वीर्यापासून उत्पन्न झालेल्या मुलांचा मेंदू व ज्ञानतंतूच अशक्त असल्यामुळें, त्या मुलास हा विकार उत्पन्न होतो.

३ मुलाची प्रकृति चांगली निकोप असतांही त्या मुलाला पाजविण्याच्या वेळीं आईच्या मनांत पाजविण्याच्या प्रेमकारक विकारावांचून त्रास, द्वेष, भांडण, इत्यादि तऱ्हेचे किंवा कांहीं काळजीचे विचार येतील, तर त्या विचारक्रियेच्या संस्कारानें दूषित झालेलें दूध मुलाच्या कोंवळ्या मेंदूवर परिणाम करून बालग्रह उत्पन्न करीत असतें.

४ तसेंच आईबापांच्या मनांतील मुलांच्या प्रकृतीबद्दलच्या व जगण्याबद्दलच्या सदोदितच्या काळजीच्या कल्पनांचे किंवा विचारांचे आकार त्या मुलांच्या मनावर परिणाम करून बालग्रह उत्पन्न करीत असतात. अशींही कारणें **विलंबी बालग्रहांत** आढळून येतात.

तात्कालिक बालग्रहावर उपायः—१ या विकारावर सोसेल अशा ऊन पाण्यांत गळ्याइतकें १५ मिनिटें सुमारें धरावें.

२ ऊन पाण्यांत मोहऱ्यांची पूड चमचाभर टाकून गुडघ्याइतके पाय बुचकळुन ठेवावे, व डोक्यावर कोलनवाटरची किंवा थंड पाण्याची घडी ठेवावी.

३ पोटांत ब्रोमाईड आफ पोट्याश वयाचे मानानें डाक्टरांचे सल्यानें घ्यावा.

४ शौचास साफ होण्यास मॅग्नेशिया सॉल्ट, त्रिफळा किंवा एरंडेल वयाचे मानानें घ्यावें.

५ आणि ताप, अजीर्ण, दांत, इत्यादि जो मुख्य विकार असेल, त्याचेही उपशामक उपचार वरील उपचार करून चालू ठेवावे.

विलंबी बालग्रहावर उपचारः—(डाक्टरी) टिंक्चर चिराटा व पोट्याश ब्रोमाइड वयमानाप्रमाणें डाक्टरच्या सल्यानें घ्यावें. कित्येकांस फार दिवस ब्रोमाइड दिल्यास किंवा कित्येकांस लौकर अथवा अधिक प्रमाणांत पोंचल्यास ब्रोमाइझम (सुस्ती वगैरे लक्ष-णाचा विकार) होतो. ह्मणून अशीं लक्षणें दिसल्याबरोबर ब्रोमाइड हें औषध बंद ठेवावें. (**होमोपाथी**) बेलाडोना १२×३०× कोनि-यम १२×३०× क्युप्रम मेट ३०× हीं औषधें द्यावीं. (**वैद्यकीय**) १ जस्त भस्म (उत्तम) वयाच्या प्रमाणांत अनुपानपरत्वें चांगलें कार्य करितें. २ लक्ष्मीनारायणमात्रा आल्याचा रस मध किंवा खडीसाखर घालून अर्धागुंज ते वयाप्रमाणें २ गुंजे पावेतों उगाळून त्यांत पाणी अगर आंगचें दूध मिसळून (सौम्य करून) दिवसांतून तीन वेळां दिल्यास चांगला उपयोग होतो. (**जटेली**) चार तोळे काडे चिरा-ईत घेऊन त्याच्या काड्या थोड्या दुखवून एका स्वच्छ फडक्यांत बांधून एका मोठ्या स्वच्छ पांढऱ्या कुपींत घालून त्यांत १० तोळे पाणी घालावें, आणि बूच लावून ती बाटली चांगल्या उन्हांत टांगून ठेवावी. पाण्यावर बाटलींत उघडी (पोकळ रिकामी) जागा पुष्कळ असावी. याप्रमाणें ३।४ दिवस ऊन खालल्यावर तो अर्क काढून घेऊन वयाचे मानाप्रमाणें अर्धा चमचा ते एक चमचा मध किंवा साखर घालून दिवसांतून दोन तीन वेळां द्यावा. (**जीवनरासा-यनिक उपचार**) फेरंफास ६× (फॉस्फेट ऑफ आयर्न, विशेष तऱ्हेनें योग्य केलेला) क्यालकर फॉस ६× (क्यालशीयम फॉस्फेट, ऑर फॉस्फेट ऑफ लॉईम, विशेष तऱ्हेनें योग्य केलेला) हीं औषधें एक गुंज, दीड गुंज प्रमाणें दिवसांतून सहा वेळ द्यावीं. (**स्वानु-भवाचा उपचार**) नवसागर (हैड्रोक्लोरेट ऑफ आमोनिया) वयाचे मानानें अर्धी गुंज ते एक गुंज आंगावरील अगर गाईचें दुधांतून दिवसांतून चार वेळ द्यावा, आणि आरंभीं सांगितल्याप्रमाणें लहर, झटका येईल, तेव्हां अगर दिवसांतून दोन वेळ तरी ऊन

पाण्यांत बसवून डोक्यावर थंड पाण्याची पट्टी ठेवावी. याप्रमाणें उपचार विकाराच्या कमीजास्ती प्रमाणानें बरेच दिवस चालू ठेविले असतां चांगला उपयोग होतो.

(३) भूतोन्माद (हिस्टेरिया) :—या विकारास सर्व वेळीं साधारणपणें पैशाचिक विकार मानण्याची प्रवृत्ति पडलेली आहे. पण सदोदित याच्याशीं पिशाचाचा कांहीं संबंध नसतो. या विकारांत कोणत्याहि शारीरिक इंद्रियांत विकृति आढळून येत नाहीं, असें जरी पुष्कळ वेळां दिसतें, तरी या विकाराचा उगम मुळांत तीन स्थानांत असतो. पहिलें स्थान गर्भाशय, दुसरें मेंदू, आणि तिसरें मन.

१ **गर्भाशय दोषः**—ज्या वेळीं हा विकार गर्भाशयाशीं संबंध असलेल्या इंद्रियांना जीवन देणाऱ्या—चेतना देणाऱ्या—नाडीतंतुजालाच्या (सिंपॅथेटिक नर्व्हस सिस्टीम प्लेक्ससच्या) उत्तेजकतेपासूनच मूळ उत्पन्न झाला असतो, अगर अशी उत्तेजक स्थिति कायम राहण्यास जरी कांहीं मनोवृत्ति कारण झालेल्या असल्या तरी मेंदूतील तंतूंच्या व्यापारास त्या योगानें कायमचा कांहीं बिघाड अगर घोटाळा न उत्पन्न होतां, तो सर्व या खालच्याच इंद्रियांत झालेला असतो, तेव्हां सर्व लक्षणें भूतोन्मादासारखींच होतात. तथापि बारकाईनें पाहिलें तर यांत श्रृंगारचेष्टाप्रियत्व किंवा त्याचा अतिद्वेष, या वृत्तीची झांक असते; आणि गर्भाशय असलेल्या ओटीपोटाच्या भागावर किंवा जवळपासच्या भागावर हाताचा स्पर्श झाला, अगर घर्षण झालें, तर विकाराच्या सर्व लक्षणांना जोर येतो, किंवा जोराचें आंगांत येतें, असें आढळतें. पण झटका आलेला असतां स्त्रियांच्या अंडपिंडावर (ओहरीवर) दाबलें असतां झटका उतरतो. अशा वेळीं विकाराचें मूळ खालच्या स्थानांत आहे, असें समजण्यास जड नाहीं. या विकारासही विटाळाच्या सुमारास, आमावास्या पौर्णिमेच्या सुमारास, स्वाभाविकपणें जोर असतो. असा हा विकार उत्पन्न होण्याच्या मूळ कारणाचा बारकाईनें घरींदारीं परिस्थितींत शोध करून कांहीं कारणें आढळल्यास तीं दूर करावीं. व गर्भाशयस्थ ज्ञान-

तंतूंची किंवा त्याच्या प्रेरक ज्ञानतंतुजालाची क्रिया समतेंत चालेल, अशा उपायांची योजना करावी.

२ **मेंदूदोष**—भूतोन्माद हाच विकार मेंदूतील कांहीं तंतूंना उत्तेजकता किंवा शिथिलता आल्याच्या योगानेंच मूळ उत्पन्न होऊन खालच्या इंद्रियांतही (गर्भाशयांत) उत्तेजकता आणितो. तेव्हां याच्या लक्षणांत धरबंदच रहात नाहीं. अशा वेळीं हा नाना तऱ्हेच्या विकारांचीं लक्षणें उत्पन्न करितो, तर क्षणांत कांहींच विकार नाहीं असें भासवितो. असें जरी आहे, तरी हें विकारांचें उगमस्थान ओळखण्यास गळ्याखालील शरीराच्या खालच्या भागाचा ताठपणा, कंप, किंवा ढिलेपणा, ही एक मोठी खूण आहे, व यासही आमावास्या व पौर्णिमा यांच्या सुमारास जोर येतो.

३ **मनोदोष**—जेव्हां भूतोन्माद उत्पन्न होणारें मूळ कारण मनोवृत्तींतच असतें, तेव्हां क्षणांत निरनिराळ्या तऱ्हेच्या विकारांचीं लक्षणें उत्पन्न होतात; पण त्या इंद्रियांत विकृति तर आढळून येत नाहीं. आणि क्षणांत तीं आजी नाहींशीं होतात. याजवर मनश्चिकित्साशास्त्राप्रमाणें उपाययोजना करावी लागते.

उपचारः——

१ **गर्भाशयदोषसंबंधीं उन्मादावर** (**डॉक्टरी**) पोट्याश ब्रोमाईड ४५ ग्रेन, टिंक्चर हायासियामस एक ड्राम, पाणी तीन औंस, हें मिश्रण दिवसांतून तीन वेळ द्यावें; दरवेळीं एक औंसप्रमाणें. (**होमोपाथी**) क्युप्रम ॲसेट १२×३०× हायासियामस १२× हीं औषधें दर वेळीं एक दोन थेंब किंवा बारीक १।२ गोळ्या अगर मोठी एक गोळी (होमोपाथिक साखरेच्या) अशी दिवसांतून चार ते सहा वेळ ध्यावी. (**जटिली**) गजगा भाजून त्याच्यांतील बी काढून वाटून निमी किंवा चौथाई तुपाबरोबर नित्य सांज सकाळ द्यावी. (**जीवन रासायनिक उपचार**) नैट्रम मूर ६×१२× [साध्या मिठाचें (सोडियम) विशेष तऱ्हेनें तयार केलेलें औषध] दिवसांतून चार वेळ दीडगुंज प्रमाणें द्यावें. (**जलोपचार**) कुन्हाच्या पद्धतीपैकीं मार्जनविधीनें चांगला उपयोग होतो. **हिप्नॉटिझमचे** प्रयोगानेंही गुण येतो.

२ **मेंदूसंबंधीं उन्मादावर उपचार** (**डॉक्टरी**) टिंकचर व्हलेरियाना १० थेंब, पाणी तीन औंस, हें औषध दिवसांतून दरवेळीं एक औंसप्रमाणें तीन वेळ द्यावें. (होमोपाथी) व्हलेरियानिकम ६×१२×झिंकम १२×३०×बेलाडोना ६×१२×हीं औषधें गोळ्या किंवा अर्क, दररोज चार वेळ क्रमाक्रमानें द्यावीं. (**जटेली**) उत्तम हिराहिंग दोन गुंज, कस्तुरी एक गुंज, वेखंडाची पूड तीन मासे, दाती मूळ व त्रिफळा यांच्या काढ्यांत खलून उडीदप्रमाण माला बांधून ती ब्रह्मीच्या रसांतून घ्यावी. (**जलोपचार**) डॉक्टर कुन्हे यांच्या पद्धतीप्रमाणें कटिस्नान, मार्जनविधि, व बाष्पस्नान, यांचा उपयोग करावा. (**जीवन रासायनिक उपचार**) क्यालकर फॉस ६×१२×नित्य चार वेळ देत जावा. **मेस्मेरिझमचे** प्रयोग करावे.

३ **मनोवृत्त्यात्मक भूतोन्मादोपचार**:—यावर सारस्वत घृत पिण्यास घ्यावें (कौतुकचिंतामणी ग्रंथातील). **हिप्नॉटिझम** [भुरळ], **मेस्मेरिझम** [मोहनीविद्या], **सजेशन** [सूचनाशास्त्र], या विद्यांतील प्रयोग करावे. मानसशास्त्रांतीलही प्रयोग करावे. (मानासिक शक्तीची थोडी ओळख पहा.) शिवाय मेंदूसंबंधीं वर सांगितलेले व पुढें सांगण्यांत येणारे उपचारही प्रसंगाप्रमाणें करावे.

(४) **बेशुद्धी**:—एकदम मनुष्यास झटका येऊन बेशुद्ध पडतो. त्यास १ **घेरी** (गिडीनेस, व्हर्टिगो), २ **बेशुद्धीचा झटका** (हिस्टेरिक), ३ **फेपरें** (एपिलेप्सी), ४ **लुक किंवा झळंब** (सनस्ट्रोक), यांपैकीं कांहीं तरी कारण असतें. पण यालाही पैशाचिक संबंध जोडीत असतात. कोणत्याही कारणानें कां असेना, एकदम बेशुद्धि आली, तर प्रथम त्याला सरळ उताणा करावा. त्याचे छातीचे कपडे सैल करावे, मग आमोनियाचा वास द्यावा. तो नसल्यास नवसागर व ओला चुना एकत्र करून त्यांतून निघणाऱ्या आमोनियाच्या वाफांचा वास घ्यावा, किंवा कस्तुरीचा, कापराचा, अगर कांदा फोडून त्याचा उग्र वास घ्यावा; अथवा पंख,कागद,किंवा चिंधी जाळून त्या धुराचा वास घ्यावा. या वेळीं सर्वांत उत्तम व

खात्रीचा उपाय म्हटला, तर थंड पाण्यांत हात बुचकळून जलदीनें व झटक्यानें बोटें त्याच्या कपाळावर व तोंडावर झाडून पाण्याचा वर्षाव करण्यासारखा दुसरा उपायच नाहीं. त्यानें डोळे उघडले कीं, चांगली शुद्धि येईतों त्याच्या मस्तकावर थंड पाण्याची पट्टी ठेवावी. व गिळतां येऊं लागलें कीं, शक्य असल्यास कॉफी (ऊन) अगर ऊन दूध घ्यावें, आणि मग पुढें सांगितलेले उपचार थोडे अगर फार दिवस करावे. घेरींतून सावध केल्यानंतर ती जर **१ अपचनानें अगर बद्धकोष्ठामुळें** आली असेल, तर (१) पाण्यांतून थोडें मीठ घ्यावें. (२) नैटंमूर ३× घ्यावें. (३) नक्स हामिका ३× घ्यावी. (४) मोरवळ्यांतून सूत शेखर घ्यावा. **२ डोळ्याच्या किंवा नाकाच्या ज्ञानतंतूच्या अशक्तपणापासून** असेल, तर (१) अर्निका ३×चायनिनम्सल्फ् ३× घ्यावेत. **३ अशक्तपणामुळें** (ॲनिमिक्) असेल, तर (१) फेरीसल्फ् घ्यावा. (२) वसंत घ्यावा, मंडूर अगर लोह घ्यावा. (३) हिराकस $\frac{1}{2}$ गुंज व कोयनेल एक गुंज लिंबाच्या रसांतून रोज २ वेळ घ्यावें. (४) फेरंमेट ३×, चायना ३×, कॅल्करकार्ब ३×, घ्यावें. (५) फेरंफास ३×६×घ्यावें. **४ मेंदूच्या अशक्तपणामुळें** (नर्व्हस उईकनेस) असेल, तर (१) बेलाडोना ३×, नक्सव्हा ३× किंवा ग्लोनोनियम् ६×घ्यावें. **५ फेंपरें येत असेल**, तर (१) सल्फेट ऑफ झिंक्, नैट्रेट ऑफ सिल्हर, डाक्टरच्या सल्ल्यानें घ्यावें. (२) टाकणखार दोन मासे व पाणी आठभार, हें मिश्रण कुपींत करून तें दिवसांतून चार वेळ घ्यावें. (३) जस्तभस्मही या विकारावर चांगला उपयोग करितें.

(५) **वेडें**—वेडाचें मूळ कारण मेंदूंत असतें, अशींच उदाहरणें फार आढळतात.

त्यांपैकीं (१) मेंदूची वाढ चांगली झाल्यानंतर त्यांत बिघाड होऊन होणारीं वेडें (डिमेनशिया) खालीलप्रमाणें आहेत. **१ एकविषयक वेडें** (मोनोमॅनिया), **२ औदासिन्यवेड** (मेलँकोली), **३ तात्कालिक वेड** (मॅनिया किंवा अक्यूट प्रायमरी इनसॅनिटी),

४ विलंबी वेड (क्रॉनिक प्रायमरी इनसॅनिटी), **५ विकृतिपरिणामवेड** (सेकंडरी इनसॅनिटी), **६ विलीन उत्तेजक समतावृत्ति वेड** (व्हेरियंट इनसॅनिटी), **७ पिसाळणें** (मॅडनेस), **८ मनोभ्रंश** (डिमेनशिया);

व (२) ज्यांत मुळांतच मेंदूची वाढ कमी होऊन वेडें उत्पन्न होतात, तीं (इमेनशिया) खालीलप्रमाणें असतातः—**९ पशुवृत्ति वेड** (क्रीटिनिझम), **१० बालवृत्ति वेड** (इंबेसिल), **११ अर्धवट वृत्ति वेड** (इडियसी), **१२ जन्मवेड** (इमेनशिया), असे भेद आहेत. या भेदांशीं मेंदूच्या व ज्ञानतंतूच्या विघाडाचा संबंध आहे. ह्मणून याच्याशीं **पिशाचाचा** कांहीं संबंध नाहीं, हें उघड आहे.

भूतोन्माद, बालग्रह, बेशुद्धी, वेडें, इत्यादि उत्पन्न होण्यास जी ही कारणपरंपरा पुढें आली आहे, तीवरून हे विकार भूतपिशाचाचे नव्हेत, हें जसें उघड होतें, तसेंच ज्यांचीं मूळ कारणें मेंदू व ज्ञानतंतु यांत नसून याच्या पलीकडे असतात, असे कांहीं विकार पैशाचिक वाटण्याचा संभव आहे. पण ते देखील पैशाचिक नसतात. कित्येक वेळ ज्यांचीं कारणें या स्थूल शरीराच्या द्रव्यमय भागांत इंद्रियगम्य, अगर हल्लीं उपलब्ध यंत्रसामग्रीनें समजून येण्यासारखीं यंत्रगम्य, अशीं जरी प्रत्यक्ष आढळून आलीं नाहींत, तरी तीं पैशाचिक मात्र नसतात. अशांना व्याधीच्या सदरांत घालतां येत नाहीं. तरी मी त्यांना पैशाचिक विकारांत न घालतां खोट्या पैशाचिक विकारांपैकीं **भ्रामक** या वर्गांत घालून त्यांचें विवेचन करितों.

(६) **भ्रामक विकारः**–जे विकार पिशाचाचे नसतांना पैशाचिक असावेत, असा संशय मात्र उत्पन्न करितात, त्या मानसिक भ्रमविकारांना मीं **भ्रामक विकार** असें नांव दिलें आहे. यांत **१ आनुवंशिक संस्कार भ्रम, २ अनुकरणसंस्कारभ्रम, ३ संवय संस्कार भ्रम, ४ कल्पनासंस्कार भ्रम, ५ प्रयोगसंस्कार भ्रम**, असे मुख्य पांच भेद आहेत. यांचा परिणाम मेंदूवर, ज्ञानतंतूवर, व शरीरावर बरेच दिवस चालू राहिला असला, तर

मात्र त्या त्या ठिकाणीं विघाड आढळून येऊन शरीरावरील व विशेषतः चेहऱ्याच्या भागावरील दोषदर्शक ध्रुवस्थानावर तो सुजेच्या रूपानें दृग्गोचर होतो. व त्यावरून मात्र अंतर्गत बिघाडस्थान निर्णय करणें कुशल वैद्याला सुलभ जातें. [डायरी १९११ तारीख १६।८।११, सप्रमाण व सोदाहरण अनुभव नमूद केले आहेत.]

१ आनुवंशिकसंस्कार भ्रमः—मनावर परंपरागत आनुवंशिक संस्काराच्या योगानें परिणाम घडून, कित्येक माणसांच्या मनांत स्वभावतःच कांहीं भ्रम उत्पन्न झालेले असतात. त्यांना आनुवंशिक संस्कारभ्रम ह्मणावें. हे कित्येक ठिकाणीं पिढ्यान्‌पिढ्या चालत येंत असतात.

२ अनुकरणसंस्कार भ्रमः—मनुष्याचे मनांत लहानपणीं स्वभावतःच अनुकरणाची प्रवृत्ति विशेष असते. अशा वेळीं भ्रमिष्ट, मूर्ख व वेडगळ माणसांच्या संगतीमुळें एखाद्या अशक्त मनाच्या मनुष्यास कांहीं शारीरिक चाळे करण्याची प्रवृत्ति नकळत सुरू होऊन ती कायम जडते. त्याप्रमाणेंच मनावरही संस्कार होऊन तें भ्रमिष्ट बनतें. अशा संस्काराला अनुकरणसंस्कार भ्रम ह्मणावें.

३ संवय संस्कार भ्रमः—ज्याप्रमाणें एखाद्यास बुद्ध्या वेडावून दाखविण्यासाठीं त्याच्या तोतऱ्या भाषणाची किंवा त्याच्या अंगविक्षेपाची नक्कल करण्याची संवय लागली असतां, कित्येक वेळीं तो दुर्गुण अंगास जडतो, त्याप्रमाणेंच खोटें अंगात आणण्याचें ढोंग करीत असतां, किंवा पिशाचावेशाचें खोटें ढोंग करण्याची संवय लागली असतां, त्या संवयीच्या संस्कारानें पुढें तें सत्यच आहे, असा भ्रम उत्पन्न होतो. त्याला संवय-संस्कार-भ्रम ह्मणावें.

४ कल्पनासंस्कार भ्रमः—चांगल्या सशक्त माणसांना देखील एखाद्या विशिष्ट परिस्थितींत किंवा आजार होऊन गेल्यानंतर कांहीं गोष्टी पाहिल्या किंवा ऐकिल्या असतील, त्यांच्या एकामागून एक कल्पना येऊं लागून त्यांच्याच मनाच्या सूचनांनीं (ऑटोसजेशन्स), किंवा अशाच तऱ्हेच्या भेकड माणसाच्या काल्पनिक सूच-

नांनीं, मनावर परिणाम होऊन जो **भूतपिशाच**संबंधीं कल्पनानुभवाचा भ्रम होतो, किंवा जे चाळे उत्पन्न होतात, त्यांना कल्पनासंस्कार भ्रम ह्मणावें.

५ प्रयोगसंस्कारभ्रमः—मेस्मेरिझम् (मोहिनीविद्या), **हिप्नॉटिझम्** (भुरळ), किंवा **सजेशन** (सूचनाचिकित्साविद्या), इत्यादि विद्येच्या योगानें एखाद्यावर प्रयोग करून त्याला जर क्षणिक पैशाचिक भ्रम उत्पन्न केला असेल तर, किंवा वरील कोणत्याही प्रयोगपद्धतीनें असा उत्पन्न केलेला क्षणिक भ्रम प्रयोगकाराच्या अज्ञानामुळें, चुकीमुळें, व मूर्खपणामुळें जर एखाद्यांत अधिक काळ राहिला असेल, तर त्याला प्रयोगसंस्कार भ्रम ह्मणावें.

याप्रमाणें या पांच तऱ्हेच्या संस्कारांच्या योगानें मनाला विकृति होऊन पैशाचिक वाटणाऱ्या भ्रमांत सत्य पैशाचिक त्रासांत दिसून येणाऱ्या चिन्हांशीं साम्य ठेवणारीं कांहीं लक्षणें आढळून येत असल्यामुळें, व त्यांतील भेद स्पष्टपणें ओळखून काढण्याचें काम साधारण माणसांना कठीण असल्यामुळें, यावर सांगितलेले उपचार कांहीं मानसिक मूळ कारणावर व कांहीं मानासिक व पैशाचिक मूळ कारणावर परिणाम करतील, अशा मिश्र जातीचे सांगितलेले आहेत. असें जरी आहे, तरी या विकृतीशीं कोणत्याही तऱ्हेनें पैशाचिक शक्तीचा कांहींही संबंध नाहीं, हें पूर्ण ध्यानांत ठेवावें.

या भ्रामक विकारांवर अनुक्रमें उपचारः— १ आनुवंशिक संस्कार भ्रम हे सूचना व योग्य शिक्षण यांनींच क्रमानें व हळुहळु कमी होतात. **२ अनुकरण–३ संवय व–४ कल्पना–संस्कार भ्रम** हे समजून येण्याबरोबर त्यांच्या खाण्यांत सत्त्वस्थ पदार्थ ठेवून नियमित मोकळ्या हवेंत व्यायाम ठेवून मेंदूला शक्ति देणारे उपचार करावे. १ कॅलशियम फास्फेट २।३ ग्रेन (दीड दोन गुंजा) लोणी साखरेंतून, अगर दुधाची साय व साखर यांतून दोन वेळ घ्यावा. २ प्रवाळ व माक्षिक घ्यावें. ३ शीतोपलादिचूर्ण घ्यावें. ४ वेखंड, ब्राह्मी, शंखपुष्पी, शंखाहुली, व कोष्टकोळिंजन, यांचा

समान काढा निकाढा घ्यावा. ५ सारस्वतादिघृत पिण्यास घ्यावें. ६ बेलाडोना ६×फास्फरस ३०×हीं औषधें घ्यावीं. ७ कालीफास ६×१२× व केलकर फास ६ × हीं औषधें घ्यावीं. ८ जलोपचार करावे. जेव्हां अगदीं **वेडच** आहे अशी स्थिति झाली असेल, तेव्हां झपाट्याबरोबर त्याची पहिली परिस्थिति बदलून नवीन परिस्थितींत एकटा एकलकोंडा ठेवावा. एक महिनापर्यंत कोणाची गांठ नाहीं, कोणास भेटतां येत नाहीं, व कोणाशीं कांहीं बोलतां येणार नाहीं, अशा बंदोबस्तांत ठेवून कांहीं लिहितां किंवा वाचतां येणार नाहीं, अशी तजवीज करावी. खाण्यास प्रथम थोडेंथोडें दूध द्यावें, आणि तें दर तीन दिवसांनीं थोडें थोडें वाढवावें. सकाळीं थोडें मिठाचें पाणी (एक घोट पाणी व एक चांगली चिमटभर मीठ) प्यावें. व्हलेरियाना टिंक्चर डाक्टरी पद्धतीनें (आलोपाथी अगर होमोपाथी पद्धतीनें) दिवसांतून तीन वेळ घ्यावें. कालीफास ६×दिवसांतून २ वेळ पाण्यांतून (दीडगुंज) घ्यावा. आठ दहा दिवसांपुढें खाण्यांत थोडीं सात्त्विक फळें दुधाच्या जोडीस घ्यावीं. पंधरा दिवसांपुढें सात्त्विक अन्नही घ्यावें. अंग रगडणारा कुशल मनुष्य पाहून त्याजकडून अंग रगडून घ्यावें, तेथल्या तेथें थोडा शारीरिक श्रमाचा व्यायाम करावा. आणि शीतजलोपचार चालू ठेवावे. सूचना व आज्ञा यांनीं वृत्तीवर धाक घालीत असावें. या उपायांनीं जर त्याच्या सूक्ष्मेंद्रियावरच नुसता परिणाम झाला असेल, आणि सूक्ष्मेंद्रियांच्या (मेंदूच्या) तंतूचा नाश झाला नसेल, तर त्याची वृत्ति हळूहळू सुधारत जाऊन तो बरा होईल. ५ **प्रयोगसंस्कार श्रम** प्रयोग करूनच दुरस्त करावे,किंवा वरील पद्धतीचाही उपचार मदतीस घ्यावा.

खरे पैशाचिक त्रास.

आपल्या समोर येणाऱ्या विकारांचें अथवा त्रासांचें सर्व बाजूंनीं परीक्षण व निरीक्षण केल्यानंतर शारीरिक विकार, मानसिक विकार किंवा आधि, व लुच्चेगिरी, यांच्या मर्यादेबाहेर अद्भुतपणा आढळून येईल, आणि या वरील जातीच्या उपचारांचा उपयोग होत नसून

पिशाचशक्तीशींच त्याचें मूळ कारण नेऊन पोहोंचविण्याजोगती भरपूर पुराव्याची खातरी असेल, तर त्या विकृतीला किंवा त्रासाला **सत्य पैशाचिक** त्रासांतच घातलें पाहिजे.त्याशिवाय गत्यंतर नाहीं.असले हे सत्य पैशाचिक त्रास जरी फारच क्वचित् आढळून येतात, तरी देखील ते उत्पन्न होण्यास कोणातरी व्यक्तीशीं पैशाचिक शक्तीचा संबंध घडावा लागतो. हा संबंध १ **कृत्रिम** तऱ्हेनें अथवा २ **स्वाभाविक** तऱ्हेनें जडलेला असतो.

१ **कृत्रिम संबंधः**--जे पैशाचिक त्रास उत्पन्न होण्याला समजून उमजून आपली कांहीं कृति कारण झालेली असते, त्या संबंध जडण्याला कृत्रिम तऱ्हेनें जडलेला पैशाचिक संबंध म्हणतात. हा संबंध खालील कृत्यांत जडण्याचा संभव असतो. [१] **मेस्मेरिझम, हिप्नॉटिझम्** वगैरे विद्यांचे प्रयोग करीत असतां प्रयोग करून घेणारा (प्रयुज्य) अंतर्ज्ञानदृष्टि अवस्थेंत किंवा तिजपुढील अवस्थांत गेला असतां, एखादे वेळ त्याच्याशीं पिशाचशक्तीचा संबंध जडतो. (मेस्मेरिझमचा शिक्षक, पान १८५, व मेस्मेरिझम अथवा मोहिनी विद्या, पान ९०।९१।९२।११० पहा). [२] पिशाचशक्तीचे अनुभव घेण्याचे प्रयोग करीत असतां एखाद्या अशक्त व कमकुवत मानसप्रकृतीच्या (मध्यस्थाशीं=झाडाशीं=मेडीयमशीं) माणसाशीं पिशाच शक्तीचा संबंध घडतो. [३] आध्यात्मिक सृष्ट शास्त्रांतील उच्च-तऱ्हेच्या शक्तीच्या अनुभवासाठीं प्रयत्न करीत असतां, ह्मणजे मानस, मंत्र, उपासना, योग, इत्यादि शास्त्रांतील प्रयोग (तप) करीत असतां, विशिष्ट तऱ्हेची शारीरिक व मानसिक उत्तेजकता प्राप्त होत असते. अशा वेळीं योग्य सावधगिरी ठेवलेली नसली, तर पिशाचशक्तीचा संबंध घडतो.

२ **स्वाभाविक संबंधः**—जे पैशाचिक त्रास उत्पन्न होण्यास समजून उमजून आपली कांहीं कृति कारण असत नाहीं, तर पिशाचशास्त्रनियमानें आपल्याशीं त्याचा संबंध जडण्यासारखी शारीरिक व मानसिक स्थिति बनल्यामुळें आकस्मिक योगायोगानें किंवा

आपोआप जो संबंध घडतो, त्याला स्वाभाविक संबंध ह्मणतात. हा स्वाभाविक संबंध खालील प्रकारच्या स्थितींत घडतो.

[अ] **झोंपेंत घडणारे स्वाभाविक संबंधः**—झोंप लागली असतां, जेव्हां नेहमींच्या झोपेपेक्षां एखाद वेळ विशिष्ट तऱ्हेची गाढ झोंप लागते, तेव्हां आपली मानसिक स्थिति पिशाचशक्तीचासंबंध जडण्या योग्य होते. अशा वेळीं क्वचित् त्या शक्तीचा संबंध जडून **प्रत्यक्ष परप्रेरित विदेह स्वप्न** किंवा **अप्रत्यक्ष परप्रेरित विदेह स्वप्न** निर्माण होतें. (स्वप्नमीमांसा, पान ३७ ते ४५ पहा.) अथवा स्वप्नांत भीतिदायक देखाव्यांनीं व कृत्यांनीं त्रास उत्पन्न होतो. झोंपेंत ज्या वेळीं आपल्या मेंदूंतील जड विद्युत् कमी होऊन चैतन्य-विद्युदाधिक्य झालेलें असून कोणत्याहि कारणानें जागृतीची ओढ उत्पन्न झालेली असते, पण याच वेळीं झोपेकडे जाण्याची ओढही समान असल्यामुळें जागृति न येतां सूचक स्वप्न पडण्या योग्य स्थिति निर्माण होते, तेव्हां विदेह स्थितींत असलेल्या **चैतन्याचा—पिशाचाचा**—संबंध घडूनहि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परप्रेरित विदेह वर्गांतील सूचक स्वप्नें पडतात, किंवा त्रासदायक पैशाचिक स्वप्नें निर्माण होतात. गैरमाहित लोक साध्या स्वप्नोत्पत्तींतील भयंकर स्वप्नांना पैशाचिक समजण्याची चूक करीत असतात. कित्येक वेळीं अशा स्वप्नांच्या स्थितींत असे तोंपर्यंत त्रास किंवा पीडा वाटतात. त्या पैशाचिकासारख्या दिसत असतात. पैशाचिकाची खात्री पटण्यासाठीं जागृतींतील—या जगांतील दुसऱ्या माणसास पटण्या सारख्या प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या—पुराव्याची अवश्यकता लागते. तसा तो असल्यावांचून कोणत्याहि स्वप्नाला किंवा वारंवार स्वप्नांत घडणाऱ्या त्रासाला पैशाचिकांत न घालतां स्वप्नाच्या दुसऱ्या योग्य वर्गांत घालावें.

[ब] **जागृतींत घडणारे स्वाभाविक संबंधः**—हे नेहमीं मानसिक क्षीणतेनें घडत असतात. हे १ **वृत्ति-उत्तेजक क्षीणता**, २ **वृत्तिविलीन क्षीणता**, ३ **घातकृत्यप्रवृत्त्यात्मक क्षीणता**, या तीन स्थितींत घडतात.

१ वृत्ति-उत्तेजक क्षीणता:—अतिहास्य केल्यानें, अतिशय रडल्यानें, हर्षातिशय झाल्यानें, किंवा अशाच कांहीं कारणांनीं वृत्तीच्या उत्तेजकतेचा अतिरेक झाला असतां, जेव्हां मानसिक क्षीणता येण्यास सुरवात होते, तेव्हां मनाच्या या अशा स्थितींत जोरदार पैशाचिक शक्तिसमुच्चयस्थळीं, नाद किंवा आवाज राहित अथवा अविकृत-मानस अशा दुसऱ्या मनुष्याविरहित गेलें असतां पैशाचिक शक्तीचा संबंध होण्याची पात्रता येते.

२ वृत्तिविलीन क्षीणता:––विकारांतून बरें होत असतां आलेली अशक्तता, भीति, उदासीनता, इत्यादि कारणांनीं जेव्हां वृत्ति-विलीनतेची स्थिति येऊन मानसिक क्षीणता निर्माण होते, तेव्हां एकटेपण, एकांतस्थळ, व पैशाचिकशक्तिसंचारवेळ, असा योग आला असतां पिशाचाचा संबंध घडतो.

३ घातकृत्यप्रवृत्त्यात्मक क्षीणता:—एखाद्याचें द्रव्य, वृत्ति, प्राण, इत्यादि हरण करण्याच्या कल्पनांचा उदय होऊन तद्रूपतेनें त्याचें मन निर्बल झालें असतां, जी एखादी व्यक्ति अशाच एखा-द्याच्या कृत्याच्या वेधानें प्राणत्याग करून विदेहचैतन्य स्वरूपांत राहिलेली असून, या किंवा पूर्व जन्मीं त्याचें हरण करणाऱ्याशीं तिला आपला संबंध करण्यास साधन नसतें, तेव्हां तत्संबंधीं वस्तु-मात्राला ती धरून राहिलेली असतांना, अशा वस्तुमात्राशीं संबंध झाला, तर त्या पैशाचिक शक्तीचा संबंध घडतो. अथवा आपलें असें कृत्य करणाराशीं अगर वस्तुमात्राशीं सुडाच्या बुद्धीनें संबंध करण्याची इच्छा करीत असलेला विदेहचैतन्यात्मक जीव––**पिशाच**—संधि सांपडतांच संबंध करितो.

या ठिकाणीं "या जन्मांत किंवा पूर्व जन्मांत" अशा तऱ्हेचे शब्द लिहिलेले पाहून ज्यांना पूर्व जन्माची कल्पना मान्य नाहीं, किंवा ती प्रत्यक्षप्रमाण शास्त्रांनीं सिद्ध झालेली पाहिल्याशिवाय मान्य होत नाहीं, अशा विचाराच्या माणसाला हासें तर येईलच, एवढेंच नव्हे, तर हें लिहिणाऱ्या लेखकाची तो सहृदय असेल तर

कींव करण्यास तयार होईल, आणि सहृदय नसेल तर लेखकाची थट्टा करण्यास तयार होईल. ह्मणून अशा वाचकानें अशा गूढ, पण अध्यात्मसृष्टशास्त्र शाखेंतील, विषयावरील माझे आणि इतर आधुनिक विद्वानांचे लेख पाहून व त्यांच्या खरेखोटेपणाबद्दलचा विचार करून व प्रयोगांचा अनुभव घेऊन मग **कींव** किंवा **थट्टा** करण्या इतका धीर असूं द्यावा, अशी त्याला नम्रपणाची, पण अत्यंत आग्रहाची, विनंति करून ठेवून पिशाचविषयाच्या पुढील विवेचनाच्या कार्याकडे वळतों.

सत्यपिशाच शक्ति अधिवेशनसंबंध कृत्रिम तऱ्हेनें घडलेला असो, किंवा स्वाभाविक तऱ्हेनें घडलेला असो, त्यापासून घडणारे त्रास **१ शारीरिक, २ मानसिक, ३ उभयमिश्र, व ४ अचेतन चेतनात्मक**, यांपैकीं कोणत्या तरी वर्गांतीलच असतात.

१ शारीरिक त्रासः—यांत शरीराला किंवा इंद्रियाला वेदना, टोंचणें, बोचणें, बांधणें, पोळणें, मारणें, इत्यादि ज्या यातना होतात त्या, किंवा रोगविकार, या सर्वांचा समावेश होतो.

२ मानसिक त्रासः—यांत पंचज्ञानेंद्रियांनीं ज्ञात असा स्थूल जगांतील कोणताहि प्रत्यक्ष विषय नसतांना त्या विषयाच्या दर्शनानें, ह्मणजे शब्द उत्पन्न करून, रूपें दाखवून, इत्यादि तऱ्हेनें जे त्रास होतात, त्यांचा समावेश होतो.

३ उभयमिश्र त्रासः—यांत शारीरिक व मानसिक, ह्मणजे अंगांत वगैरे येऊन शरीराला व मनाला मिळणाऱ्या, त्रासांचा समावेश होतो.

४ अचेतन चेतनात्मक त्रासः--यांत घरांतील कोणत्याहि जिनसाची हालवाहालव, मोडतोड, जाळपोळ, आदळहापट, इत्यादिकांनीं वस्तुमात्राचा नाश व नुकसान, इत्यादि तऱ्हेनें होणाऱ्या त्रासाचा समावेश होतो.

याप्रमाणें होणारा कोणताहि त्रास किंवा कोणतेहि तास, यापूर्वी सांगितलेल्या कोणत्याहि खोट्या किंवा भ्रामक कारणांनीं उत्पन्न

झालेले नसून ते उत्पन्न होण्यास खरोखरी पिशाचच कारण आहे, अशी पूर्ण खात्री करून घेतल्यानंतर त्यावर खालीलप्रमाणें आध्यात्मिक सृष्टशास्त्राअन्वयें उपायांची योजना करावी.

सत्य पैशाचिक त्रासावर उपाय.

खरोखरी पैशाचिक त्रास असेल, तर तो नाहींसा करण्यास क्रमानें **१ वासनापूर्ति २ संबंधमार्गावरोध ३ संबंधनाश** व **४ पिशाचदेहमुक्ति**, या मार्गांचा अवलंब करून पैशाचिक त्रासांतून सुटका करून घेण्याची रीति फार प्राचीन काळापासून आहे, व तीच आधुनिक कालींही जरा शास्त्रीय पद्धतीनें सुधारून पुढें मांडीत आहें.

१ वासनापूर्तिः—जेव्हां कांहीं थोडी इंद्रियविषयक वासना किंवा इच्छा पूर्ण करून घेण्यासाठीं पिशाचाचा अभिनिवेश होऊन त्यापासून होणारा त्रासही तात्पुरताच असतो, तेव्हां ती त्याची वासना योग्य पद्धतीनें पूर्ण करणें या क्रियेलाच वासनापूर्ति ह्मणतात. ही वासनापूर्ति दोन तऱ्हेनें करितात. (अ) **बलिदान**, (ब) **जीव तृप्ति**. (अ) **बलिदानः**—पिशाचाचा संबंध जडून विकारादिकांच्या योगानें त्रास पावत असलेल्या माणसाच्या (अभिनिवेशिताच्या) शरीरावरून खाण्यापिण्याच्या वस्तु, अन्नें, किंवा इतर वस्तु उतरून तीं एखाद्या विशिष्ट ठिकाणीं नेऊन टाकणें, यालाच **बलिदान, उतारा, सांदण**, अगर **देणी** म्हणतात. सर्वसाधारणपणें फळांत केळीं व लिंबू, अन्नांत सात धान्याची भाकर व भात, हींच मुख्यत्वें उपयोगांत येतात. अडाणी लोक गांजा, कोंबडी, अंडीं, इत्यादि पदार्थही घेतात. पण खरोखरी यांची अवश्यकता नाहीं.

उतारा केला असतां त्यापासून उपयोग होणें शक्य आहे कीं नाहीं, याचा विचार स्थूलशास्त्रदृष्टीनें केला असतां, हा सर्व खुळेपणा किंवा मूर्खपणा आहे, असें दिसतें. पण आपण जसजसें सूक्ष्मशास्त्रांत शोध करीत जावें, तसतसें यांत तथ्य आहे—तत्त्व आहे—असेंच

कबूल करणें भाग पडतें. सूक्ष्मशास्त्रनियमानें—मानसशास्त्रनियमानें—उतारा करीत असतां उतारा करणारा मनुष्य मनाचा व भावनेचा बळकट असणारा असून अभिनिवेशिताचें (ज्याला पिशाचपीडेमुळें विकारादि त्रास होत आहेत त्या मनुष्याचें) कल्याण इच्छिणारा असावा. त्यानें उतरण्यास घेतलेल्या फळाचे शेंडे आपणाकडे करून ते हातांत धरावेत. इतर वस्तूंचे मोठे भाग किंवा बुडखे अभिनिवेशिताकडे करून बारीक भाग किंवा शेंडे आपणाकडे करून धरावे. आणि मग अभिनिवेशिताच्या डोक्यावरून त्याला त्रास देत असलेली अदृष्ट शक्ति यांत आकर्षण करून घेण्याच्या उद्देशानें त्या माणसाच्या मस्तकाकडे पद्मात उतारा करण्यास सुरवात करावी. डोक्यावरून खालीं उतरीत असतां उताऱ्याची वस्तु अभिनिवेशिताच्या डोळ्यांच्या खालीं दृष्टिमर्यादेंत आल्यावर थोडा वेळ त्या ठिकाणीं स्थिर करून त्याजकडून नीट पाहवून त्याच्या शरीरावरून खालीं आणून पुन्हा त्याच्या शरीराच्या बाजूनें (शरीरासमोरून नव्हे) मस्तकावर नेऊन पहिल्याप्रमाणें खालीं उतरीत आणावी. असे तीन उतारे करावे. हे करीत असतां, **त्याच्या शरीरांतलि अदृष्ट व्यक्ति या पदार्थांत आकर्षण होऊन आली आहे,** अशी आपली भावना ठेवावी. उतरणारानें त्या वस्तूकडे टक लावून किंवा एकसारखें पाहूं नये. ते पदार्थ उतरून लांब ठिकाणीं टाकल्यावर तो त्रास टाकून दिला, अशी भावना करावी. आणि त्या वस्तूकडे पुन्हां न पाहतां माघारी येऊन हात, पाय व नेत्र यांना जलस्पर्श करून शुचिर्भूत होऊन मग घरांत प्रवेश करावा. असें तच्छास्त्रज्ञांचें सांगणें आहे.

(ब) **जीवतृप्तिः**—पीडानिवारणासाठीं उताऱ्यानें जेव्हां कार्यसिद्धि होत नाहीं, तेव्हां अदृष्टव्यक्तिभावकल्पनेप्रमाणें कुमार, कुमारी, ब्रह्मचारी, सवाष्ण, विधवा, गोसावी, ब्राह्मण अथवा एखादा पशु इत्यादिकांची अन्नदानानें तृप्ति करणें, यालाच जीवतृप्ति ह्मणतात. ही जीवतृप्ति करीत असतां, त्या त्या व्यक्तीमध्यें अदृष्ट शक्ति येऊन तीच तृप्त होत आहे, अशी भावना ठेवावी; ह्मणजे

त्या जीवाच्या अंतरात्म्याची तृप्तता व समाधान झाल्यानें अभिनिवेशित व्यक्तीची वासनापूर्ति होऊन किंवा त्या समाधानानें वासनानिवृत्ति होऊन त्रास नाहींसा होतो.

२ संबंधमार्गावरोधः—अदृष्ट व्यक्तीचा त्रास किंवा पीडा होण्याजोगा संबंध ज्या मानसिक आवरणाच्या विशिष्ट कोमलतेमुळें घडतो, ती कोमलता—तो अशक्तपणा—दूर करून त्रासदायक संबंध घडण्याचा मार्गच बंद पाडणें, याला संबंधमार्गावरोध ह्मणतात.

हा मार्ग बंद करण्याच्या दोन पद्धति आहेत. (१) तंत्रशास्त्रीय गुणधर्मांनीं मानसिक आवरणाची दृढता करण्याचें ज्यांत सामर्थ्य आहे, अशा वस्तूंच्या साहाय्यानें ती दृढता आणून संबंध बंद करणें, ही एक; व (२) मानसिक शक्तिदार्ढ्य असलेल्या पवित्राचरणी मनुष्याच्या मानसिक शक्तीचें साह्य घेऊन सूचना, आज्ञा, किंवा आशीर्वाद, या योगानें अभिनिवेशिताचे किंवा आवेशिताचे मानसिक आवरणास दृढता आणून संबंध बंद करणें ही दुसरी.

यांपैकीं पहिल्या पद्धतींत **१ सर्वगंधविलेपन, २ वचादि धूप, ३ बेलतुलसीगणजलसिंचन,** व **४ अष्टमंगलघृतप्राशन,** इत्यादि उपचारांचा समावेश होतो. हे उपचार आर्यवैद्यकांत भूतोन्मादप्रकरणीं सांगितले आहेत. उदाहरण—

सर्वगंध (श्लोक).

कुंकुमागरुकर्पूरकस्तुरीचंदनैः समैः ॥
सर्वगंध इति ख्यातो गणो ह्युत्तमगंधदः ॥—निघंट.

अर्थः—केशर, कृष्णागरु, कापूर (भीमसेनी कापूर, साधा पेठेंत मिळणारा नव्हे, हल्लीं पेठेंत मिळतो, तो साधासुद्धां असत नाहीं, टरपेनटाईनचा बनावट असतो.) कस्तुरी, (उत्तम मृगनाभींतील गोल, वैद्याजवळ मिळणारी नव्हे), व चंदन (चांगला मलयागिरि), हे पदार्थ समान घेऊन बनविलेल्या गंधाला सर्वगंध असें ह्मणतात. हें उत्तम सुवास देणारें आहे. कृष्णागरु व चंदन हे उगाळून

त्यांचें गंध करून त्यांत प्रमाणानें (तीं गंधें वाळलीं असतां त्यांच्या वजनाबरोबर येईल इतकें) केशर खललेलें, व कस्तुरी व भ्रासकर्पूरचूर्ण केलेलें मिसळून खलून तयार करून, डबींत भरून ठेवून, तंत्रशास्त्री उपयोगांत आणतात.

दुसऱ्या पद्धतींत **शांतिपाठासारख्या** सर्व धर्मांतील धर्मोपाध्यायांकडून केलेल्या **प्रार्थनांचा** किंवा **स्तोत्रपाठांचा** समावेश होतो. अशा प्रसंगीं बोलावण्यांत येत असलेले भटजी (सर्व धर्मांतील व जातींतील) आपण कोणते कार्यासाठीं व काय करीत आहों, आणि तें शास्त्रीय पद्धतीनें कसें केलें पाहिजे, याविषयीं अगदीं अज्ञानी असतात. व्यवहारांत त्यांना बोलावण्याची पाळी आल्यास पवित्राचरणी मिळणें जरी दुर्मिळ झालें आहे, तरी निदान पातकाचरणी तरी नाहींत असेच पाहून बोलवावे. आणि त्यांनीं सूचना, आज्ञा, व आशीर्वाद, यांचा उपयोग करावयाचा, तो तरी जाणून—समजण्यांत येऊन—केला असतां खरा फायदा होईल.

ज्याप्रमाणें अभिनिवेशित स्थितींत व आवेशित स्थितींत संबंधमार्गनिरोधाचा हा उपाय करितात, त्याप्रमाणेंच पिशाचाधिवेशन होण्याला अनुकूल परिस्थितिकालींही हा पूर्वोपाय करणें अधिक हितावह असल्यामुळें याचा प्रचार व्यवहारांत जास्त आढळतो.

जेव्हां पिशाचाचा जास्त संबंध घडण्यायोग्य कारण घडलेलें असतें, तेव्हां नुसत्या मार्गनिरोधानेंच भागत नाहीं, तर त्या अदृष्ट व्यक्तीचा संबंध तोडावा लागतो.

३ संबंधनाशः—यांत (१) **कृत्रिम तऱ्हेनें जडलेले संबंध तोडणें**, व (२) **स्वाभाविक तऱ्हेनें जडलेले संबंध तोडणें**, असे दोन भाग आहेत.

(१) **कृत्रिमसंबंधनाशः—मेस्मेरिझम्, पिशाच**, इत्यादि गूढ विद्यांचे प्रयोग करीत असतां संबंध जडूं नयेत ह्मणून काय सावधगिरी राखावी, आणि जडलेले तर त्यांचा संबंध

तोडावा, हें त्या ठिकाणीं सांगितलेंच आहे. त्या त्या उपायांचा उपयोग करूनही संबंध तुटला नाहीं, तर यापुढें सांगण्यांत येतील त्या मार्गांनीं तो नाहींसा करावा.

(२) **स्वाभाविकसंबंधनाशः**—खालील मार्गांनीं मुख्यत्वें करितात.

१ **संबंधवस्तुत्यागः**—एखाद्या अदृष्ट व्यक्तीला प्रियकर असलेल्या एखाद्या वस्तूच्या किंवा द्रव्याच्या योगानें आपणास त्रास होतो, अशी स्थिति असेल, तेव्हां त्या वस्तूचा त्याग अगर दान करणें.

२ **यंत्रधारणः**—स्थूल पंचभूतात्मक शरीरावर व सूक्ष्म चैतन्यभूतात्मक शरीरावर विशिष्ट स्थूल कार्याच्या आदि-परमाणूंचा समुच्चय करून इष्ट परिणाम घडविणाऱ्या रेषाकृतींचा—यंत्राचा—उपयोग करणें.

३ **मंत्रोच्चारः**—विशिष्ट वर्णरचनेच्या तालबद्ध संस्कारलहरींनीं (व्हायब्रेशन्स) वायु व प्राण या द्रव्यांत विशिष्टाकार निर्माण करून, त्या योगें इष्टकार्य घडविणाऱ्या शब्दोच्चाराचा—मंत्रोच्चाराचा—उपयोग करणें.

४ **देवताराधनः**—मानसद्रव्यांत सामर्थ्यवान् अदृष्टाकार (देवता) निर्माण करून त्या योगें इष्ट परिणाम घडविणें.

५ **आत्मसिद्धिः**—सर्वव्यापी अध्यात्मशक्तिसामर्थ्यांतील जोर अंतरात्म्याकडून घेऊन इष्टकार्य घडविणें.

६ **संमिश्रः**—यांतील एकापेक्षां अनेक मार्गांचे मिळून साह्य घेणें.

याप्रमाणें एकंदर ६ मार्गांनीं पिशाचाचा संबंध तोडावा लागतो. हा संबंधनाश (अ) **मारून** अगर (ब) **गाडून** करितात.

(अ) **मारून संबंधनाशः**—अभिनिवेशित (ज्याच्या शरीरांत पिशाचाचें अभिनिवेशन-प्रवेश-झाल्यामुळें फक्त व्याधीच्या व मन-

स्तापाच्या रूपानेंच ज्याला त्रास होतो असा मनुष्य) मनुष्याला, आवेशित (पिशाच्च अंगांत आलेल्या) मनुष्याला, किंवा पीडित स्थलाला (हंटिंग प्लेसेस) संबंधद्वारमार्गनिरोधापैकीं उपचार करून, नंतर १यंत्रशास्त्रनियमानें योग्य यंत्रमंडलाचा विचार करून, २मंत्रशास्त्र-नियमाप्रमाणें सूक्ष्म जगांत एकसारखे प्रतिबंधक संस्कार मेळानें फेकीत राहील, अशी त्या यंत्रास मंत्रशक्तीची जोड देऊन, तें यंत्र शरीरावर धरण्यास अगर स्थळांत ठेवण्यास—पुरण्यास—देणें, किंवा ३ तें मनुष्य अगर ती जागा मंत्राभिषिक्त जलानें सिंचन करणें, यालाच भारून संबंध तोडणें ह्मणतात. असे संबंध तोडण्यासाठीं विशिष्ट जाति, धर्म व पंथ, यांत जरी विशिष्ट विशिष्ट विधि आढळून येतात, तरी त्यांची रचना मात्र सामान्यपणें एकाच साधारण तत्त्वा-वर बसविलेली आहे. ह्मणून मला या ठिकाणीं सर्वसाधारणपणें सर्वांस उपयोग करतां येणाऱ्या सर्वसामान्य मुख्य पद्धतीचाच निर्देश करणें भाग आहे.

आधिव्याधिहरणासाठीं पंचकोण यंत्र (टोंक न उचलतां ताऱ्या-प्रमाणें पांच रेघांनीं पांच कोण काढतां येतात तें), कमल (बायका रांगोळीचें आठ पाकळ्याचें काढतात तें), अगर स्वस्तिकाकार (एका उभ्या रेषेवर आडवी काटकोनांत रेघ), हीं शुभ यंत्रें, किंवा विशिष्ट तत्त्वानुरोधानें बनविलेलीं दुसरीं यंत्रें, भूमिका, कागद, भुर्ज-पत्र, इत्यादिकांवर केशर, कस्तुरी, गोरोचन, अशासारख्या पदार्थांनीं काढून त्यावर पिशाचव्याधिग्रस्ताचें नांव, व व्याधिनिराकरण उद्दिष्ट हेतु, हे स्पष्ट लिहून यंत्रपूर्ती करून ठेवतात. एवढयानें भागणार नाहीं, असें वाटलें तर त्यावर मंत्रोच्चारसंस्कार करितात. अगर लिंबू, अंगारा, पाणी इत्यादिकांवर मंत्रसंस्कार करून ते भारून देतात. (या कामीं बहुशः धार्मिक ग्रंथांतील विशिष्ट भागाच्या शब्द-रचनेचा उपयोग करतात. उ० बायबलमधील गीतें, कुराणमधील सुरे, वेदांतील विशिष्ट सूक्तें, आणि तंत्रग्रंथांतील कवचें व इतर सिद्धमंत्र इत्यादि उपयोगांत आणतात.)

यापेक्षां अवघड प्रसंगीं **मानसशास्त्र**नियमाप्रमाणें (जपानुष्ठानानें व पुरश्चरणानें) सामर्थ्यवान् अदृष्ट व्यक्ति (देवता) निर्माण करून, आणि उपासनानियमानें त्या देवताकारांत सृष्टींत कार्य करीत असलेल्या सामर्थ्यवान् सर्वव्यापि ईशशक्तींतील प्राणतेज एकवटून राहील अशा निष्ठेची जोड देऊन, (आपल्या शारीरिक व मानसिक अधिकाराप्रमाणें) एकाद्या मंत्रावर अगर एकाद्या वस्तूवर देवतेची स्थापना करून पिशाचाचा संबंध तोडतात.

ज्या वेळीं वरीलप्रमाणें उपयोगांत आणलेलीं साधनें साधकांच्या शारीरिक किंवा मानसिक अयोग्यतेमुळें, अथवा दृढसंस्काराभावामुळें कमजोर असतात, अथवा त्या अदृष्टशक्तीचा संबंध जास्त जोरदार असतो, तेव्हां त्या अदृष्ट व्यक्तीचा संबंध तुटत नाहीं, किंवा फिरफिरून ती आपला संबंध करिते; त्यावेळीं तिला—त्या पिशाचाला—गाडून टाकणेंच फायदेशीर असतें.

(ब) **गाडणें:**—अदृष्ट शक्ति—(भूत पिशाच) वासनासंस्कारयुक्त सूक्ष्मदेह—तत्सदृश सामर्थ्यवान् सूक्ष्म तेजोमय अवगुंठणांत बांधून प्रतिबंधांत टाकणें, यालाच गाडणें म्हणतात.

पिशाचावेशित, म्हणजे संचरित आणि अभिनिवेशित, मनुष्यावर प्रयोगानें आपलें वर्चस्व बसविलेल्या प्रयोगकारानें (हिप्नोटिस्ट, मेस्मिरिस्टनें), अध्वर्यूनें (स्पिरिचुऍलिस्टनें), मानसिक शक्तिसामर्थ्याचें वर्चस्व बसविलेल्या मानसशास्त्रवेत्त्यानें (सायकॉलजिस्टनें), अथवा मंत्रसिद्धि प्राप्त करून घेतलेल्या मंत्रशास्त्रवेत्त्यानें पिशाचास गाडण्यास तयार झाल्यावर, एका कुपींत विशिष्ट वनस्पतीच्या स्पर्शानें (बेल, तुळस, सबजा, इत्यादि) योग्य केलेलें जल घेऊन, त्यास उत्तम सुवासिक गंध येणाऱ्या पदार्थांचा सुवास (सर्वगंधादिकांतील) लावून ती बाटली आवेशिताच्या पुढें धरून तींत त्याला तोंडानें किंवा नाकानें सावकाश उच्छ्वास सोडण्यास सांगावें. या वेळीं " **या उच्छ्वासाबरोबर कुपींत जावें** " अशी त्या पिशाचास—अदृष्ट व्यक्तीस —साध्या स्पष्ट शब्दानें अगर मंत्रोच्चार-

शब्दयुक्त आज्ञा करून, मनानें धारणेच्या जोरानें त्याच्या उच्छ्वासाबरोबर त्यास आंत घालीत आहों, असें ध्यान करावें.

याप्रमाणें तीन उच्छ्वास त्याजकडून सोडवावे. ते त्याजकडून त्या कुपीच्या तोंडांत मोठ्यानें व सावकाश सोडवावे. (साध्या तऱ्हेपेक्षां फुंकनळीनें सोडविणें जास्त श्रेयस्कर असतें.) नंतर त्या कुपीस बळकट बूच लावून पाणी बाहेर येणार नाहीं असा बंदोबस्त करावा.

आवेशित त्या कुपींत उच्छ्वास सोडीत नाहीं, अशी स्थिति असेल, तेव्हां त्याच्या शरीरावरून हातांनीं **मार्जनआवर्जन** (आकर्षक, भारक उतारे) कुपीच्या तोंडापर्यंत, वरील शब्दोच्चारानें, मंत्रोच्चारानें व भावनेच्या धारणेनें करून बूच बसवावें.

यानंतर त्या कुपीवर यंत्राकृतीची, किंवा सामर्थ्यभावना उद्बोधक शब्दाची (देवतानामाक्षराची), अगर आकाराची (मूर्तीची) मुद्रा (सील) करून, त्याच देवतेच्या आवाहन मंत्रानें प्रतिष्ठापना करून मुखबंधन करावें. मग ती बाटली न फुटेल अशा बंदोबस्ताच्या जागीं अथवा खोल जमिनींत पुरून टाकावी. या प्रयोगकृत्याला पिशाच गाडणें असें म्हणतात. साधारण त्रासांत अशाच रीतीनें जमिनीवर उच्छ्वास सोडवून त्या ठिकाणीं वरील प्रमाणें भावनादि योगानें एखादा मोळा ठोकूनही गाडण्याची पद्धत आहे.

जेव्हां आवेशिताच्या वाईट किंवा घातकारक कृत्यांनीं पिशाचाचा संबंध फार बळकट घडलेला असतो, अगर संबंध तुटण्यायोग्य अथवा गाडण्यायोग्य सामर्थ्य गाडणाराच्या ठिकाणीं व साधनांत पैदा झालेलें असत नाहीं, किंवा पिशाचाचा संबंधच फार बळकट झालेला असतो, तेव्हां तो गाडण्यानें तुटत नाहीं; अशा वेळीं त्या पिशाचास पिशाच देहांतून मुक्त करून त्याचा त्रास नाहींसा करावा लागतो.

४ पिशाचदेहमोचनः—जीवात्मा उन्नत देहाच्या अवस्थांना जात असतां ज्या कारणांनीं या मधील पिशाच देहांत अडून राहिला

असतो, तीं कारणें ज्या योगानें दूर होतील, असे उपाय योजून त्याला उन्नतीस पोंचविणें, यालाच पिशाचदेहमुक्ति ह्मणतात.

याला १ **पिंडदानमुक्ति**, २ **पुण्यार्पणमुक्ति**, ३ **तपाचरण-मुक्ति**, ४ **अध्यात्मबलमुक्ति**, याप्रमाणें उपाय योजीत असतात.

१ पिंडदानमुक्तिः–(पिंड=सूक्ष्मदेह) अध्यात्मिक सृष्टशास्त्रान्वयें वासनायुक्त देहांतून सुटका होण्यायोग्य सामर्थ्य मिळेल, अशा योग्य स्थलीं व वेळीं मानसिक शक्तीनें सामर्थ्य देण्याचा प्रयोग (श्राद्ध) करितात; उ० विष्णुपदीं, पिशाचमोचनींत, किंवा आपआपल्या धार्मिक दृष्टीनें पवित्र ठरलेल्या ठिकाणीं जाऊन, मुक्ततेचा विधि करीत असतां देहमुक्तिभावनेनें ओदन किंवा अन्य वस्तु सोडतात.

२ **पुण्यार्पण मुक्तिः**—ज्या कोणाजवळ सन्मार्गाचरणसंस्कार–किंवा सत्कृत्याचरणसंस्कार—अथवा ईशशक्तिसमुचय संस्कार—(ज्याला पुण्य असें म्हणतात) याच्या लहरींनीं पिशाचदेहांतील जीवात्म्याला उच्च भुवनांपर्यंत पोंचविण्यायोग्य सामर्थ्य आलेलें असतें, त्यांनीं तें सामर्थ्य पिशाचदेहमुक्ततेसाठीं—वरच्या देहांत व भुवनांत पोंचविण्यासाठीं—खर्च घातलें असतां, त्या योगें जी मुक्ति मिळते, तिला पुण्यार्पण मुक्ति म्हणतात. उ० महायात्रापुण्य, लक्षभोजन पुण्य, मंडळ भागवतपाठ पुण्य, इत्यादिकांवर मुक्त होण्यासाठीं पाणी सोडून अर्पण करितात.

३ **तपाचरण मुक्तिः**—पिशाचावेशित मनुष्याकडूनच शारीरिक व मानसिक दोषहरण होऊन, त्या पिशाचाच्या देहांतून त्याला मुक्ति मिळण्यायोग्य सामर्थ्य आपणाजवळ येईल, अशा तऱ्हेच्या शारीरिक व मानसिक क्रिया (उपासना, जप, तप, सेवा, इत्यादि) करवून शरीरांतील किंवा स्थळांतील अभिनिवेशित अदृष्ट व्यक्तीची पिशाच देहांतून मुक्तता करणें याला तपाचरण मुक्ति ह्मणतात.

४ **अध्यात्मबल मुक्तिः**—तप, योग, भक्ति, किंवा विश्वप्रेम, या मार्गांनीं जात असतां ज्यांनीं सर्व जगाच्या कल्याणासाठीं आध्या-

त्मिक शक्तींचा महान् सांठा आपल्या जवळ बाळगलेला आहे, अशा महात्म्याच्या दर्शनस्पर्शानें संस्कारावरोबरच अदृष्ट व्यक्तीची काम कोषांतून सुटका होते—कामकोषाच्या चेतनायुक्त टरफलाचें चैतन्य नष्ट होतें--वासना देहाचा निःपात होतो—आणि पिशाच बनलेला जीवात्मा सद्गतीला जातो. या मुक्तीला अध्यात्मबल मुक्ति ह्मणतात.

असे हे पिशाच देहाच्या सुटकेचे मुख्य चार मार्ग आहेत.

एकंदरींत पिशाचाच्या त्रासांतून सुटका होण्यासाठीं सांगितलेल्या मार्गांतील-या सत्यपिशाच त्रास सुटकेच्या मार्गाबद्दल-शास्त्रीय उपपत्तीसह साग्र विवेचन या ठिकाणीं केलें नाहीं, म्हणून नव शिक्षित याकडे दुर्लक्ष करतील, व जुने मजवर रागावतील. पण याला माझा नाइलाज आहे. एक तर दुसऱ्या निरनिराळ्या शास्त्रीय शाखेंत मी पृथक् पृथक् विवेचन केलें असल्यामुळें, तें पुन्हां या ठिकाणीं लिहिणें गैर होईल. व दुसरें, अशा शास्त्राचें इतकें बारीक व सूक्ष्म विवेचन करूं म्हटलें, तर होणारा शास्त्रीय ग्रंथविस्तार ग्रहण करणारा वर्ग आमच्या इकडे अद्याप निर्माण झालेला नाहीं; असें म्हणण्यापेक्षां हें छापवून काढणेंच माझ्या शक्तीच्या बाहेर आहे, असें म्हणणें भाग आहे. म्हणून जिज्ञासूंनीं शास्त्रीय उपपत्तीची तहान माझ्या पृथक् पृथक् छापलेल्या निरनिराळ्या पुस्तकांतील विवेचनावरून तूर्त तरी भागवून घ्यावी.

खात्रींत चूक.

या सुधारलेल्या काळांत सुधारलेले ठक चांगल्या विद्वानांना सुद्धां भूतविद्येच्या (स्पिरिच्युअलिझम) नांवाखालीं शास्त्रीय तऱ्हेच्या पुराव्यांत देखील कसें बेमालुम फसवितात, त्याची थोडी कल्पना यावी, आणि त्यामुळें आपण आपली खात्री करून घेत असतां केवळ दुसऱ्याच्या कोणत्याही नुसत्या शास्त्रीय पुराव्यावरूनच पिशाच संबंध आहे, असें न मानतां स्वतः निरनिराळ्या तऱ्हेनें अनुभव घेऊन, त्याची खात्री पटल्याशिवाय आपल्याशीं किंवा

आपल्या स्थानांशीं पैशाचिक शक्तीचा कांहीं व्यक्त किंवा अव्यक्त संबंध जडलेला आहे, अशी खोटी समजूत करून घेऊं नये; म्हणून मुद्दाम ही खालील माहिती सांगत आहें.

एखाद्याच्या इकडे पिशाचाचा कांहीं संबंध नसतांना तुमच्या इकडे पिशाच आहे, असें सांगून तेथील फोटो घेऊन त्यांत त्या पिशाचाचा फोटो उठवून दाखवून पैसे मिळविण्याचा धंदा करणारे तिकडे वस्ताद लोक आहेत. या गोष्टीचा स्फोट " पियरसन्स् मॅगेझाईन्, आगष्ट सन १९१० " च्या अंकांत उइल्यम् मॅरिट या गृहस्थांनीं केला आहे. ते म्हणतातः "सन १८६१ मध्यें एक्स-प्लोज्ड प्लेटवर खोटे पैशाचिक फोटो उठवून दाखविण्याचा धंदा प्रथम ममलर यानें सुरू केला. त्यावर खटला झाला, पण तो सुटला. यानंतर मिसेस् एमा, प्रोफेसर गनी, बोर्सलेन, वायली, इत्यादिकांनींही असेच बेमालूम हातचलाखीनें पिशाचांचे फोटो उठवून दाखविले. या आपल्या म्हणण्याच्या सत्यतेसाठीं उइल्यम् मेरिट यांनीं या अंकांत आपण उठविलेले पिशाचांचे पुष्कळ फोटो दिलेले आहेत. त्या वेळीं त्यांनीं फोटो घेण्याच्या कामांतील या मॅगेझीनच्या हुशार आर्ट एडिटर चार्लस् एच् मॅटर्स् यांच्या व आणखी दुसऱ्या हुशार मंडळीच्या सर्व अटी मान्य करून, त्यांच्या देखरेखीखालीं फोटो काढून त्यांत खोटा पैशाचिक देखावा उठवून दाखविल्याबद्दल त्या एडिटरचा प्रतिज्ञालेख दाखल केला आहे. परंतु ती खुबी मात्र लुच्चे लोकांचा अधिक फैलाव होऊं नये, म्हणून सांगितली नाहीं. ते म्हणतातः " मंडळीच्या अटी खालीलप्रमाणें होत्या. १ फोटो घेण्याच्या प्लेटी आम्ही मागवून आणून देऊं. त्याप्रमाणें त्यांनीं परभारें पोष्टांतून नामांकित कंपनीकडून प्लेटींचें बंडल आणवून तें आयत्या वेळीं फोडलें. २ डार्क स्लाईड (भिंग ठेवण्याची चौकट) आम्ही तपासूं. त्याप्रमाणें ती तपासली व त्यांनीं आपल्या जवळ घेतली. ३ त्यांत प्लेटी आम्ही ठेवूं. त्याप्रमाणें आयत्या वेळीं बंडल फोडून प्लेटी आपल्या हातें ठेविल्या. ४ कॅमेरा लेन्स वगैरे बरोबर तपासूं. त्याप्रमाणें सर्व बरोबर तपासून घेतले. ५ डार्क स्लाईड आम्ही कॅमे-

त्यांत ठेवूं. त्याप्रमाणें त्यांनीं ठेविली. ६ एक्सपोजर झाल्यावर त्या आह्मी काढूं. त्याप्रमाणें काढल्या. ७ प्लेट वाढवितांना स्वतः पहारा करूं. त्याप्रमाणें स्वतः केला. ८ निगेटिव्हवरून ब्रोमाईड लगेच काढूं. त्याप्रमाणें काढले. ९ कॅमेरा व डार्कस्लाईड सदा आमच्या ताब्यांत ठेवूं. त्याप्रमाणें ताब्यांत असून सर्व अटींप्रमाणें फोटो काढूनही त्या एडिटर जवळ पिशाचाचा फोटो उठवून दाखविला."

लबाड माणसांच्या अशा तऱ्हेच्या लबाड्या जरी जगांत उघडकीस आल्या, तरी त्यावरून साध्या माणसाला व सहज तऱ्हेनें आलेले किंवा येणारे, फोटोचे आकस्मिक अनुभव सुद्धां खोटे व लबाडीचे आहेत, असें मात्र म्हणतां येणार नाहीं. तर या वरील हकीकतीवरून अनुभव घेणारानें विशेष सावधगिरी व दक्षता ठेवून आपल्या खात्रींत चूक राहणार नाहीं, अशी खबरदारी घेऊन मगच त्या अनुभवाला सत्य पैशाचिक चमत्कारांत घालावें, हा धडा शिकला पाहिजे.

एकंदरींत सार.

आपण भूत पिशाचासंबंधानें उपलब्ध असलेल्या गप्पासप्पाही ऐकिल्या, खोटे अनुभव कसे येतात त्याचीं कारणेंही शोधलीं, आधुनिक शास्त्रीय पुराव्याचें पर्यालोचनही केलें; निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळीं मतें, जुन्यानव्यांचे अनुभव, व स्वतःच्या खात्रीसाठीं पद्धतशीर प्रयोग, इतक्या सामग्रीनिशीं पिशाचाचा तपास केला असतांही, 'भीतीची कल्पना हेंच भीतीचें मूळ आहे, यासाठीं कोणासही भूत पिशाचाची भीति बाळगण्याचें कारण नाहीं,' हाच सिद्धांत ठाम झाला. याला "जिवंत माणसाच्या इच्छाशक्तीचें—मानसिक शक्तीचें—सामर्थ्य या पिशाच शक्तीवर—मेलेल्या माणसाच्या इच्छाशक्तीवर—आपला ताबा ठेवण्याला समर्थ आहे," हा या शास्त्रांतील व मानसशास्त्रांतील एक मोठा सिद्धांत आपण सदोदित ध्यानांत ठेवला पाहिजे.

साधारण लोकांत **पिशाच व भूत** यांबद्दल वाटतील तशा गप्पा गोष्टी चालत असून, भुताच्या स्वरूपाबद्दलची काल्पनिक भीति बाळगणाराच सर्व समाज असून भूत पिशाचाच्या ह्मणून अनुभवास येणाऱ्या शेकडों चमत्कारांत थोतांड, लुच्चेगिरी, भ्रम, भास, व अज्ञानच भरलेलें असतें, हें निःसंशय खरें आहे. आणि क्वचित् आपल्या कल्पनेबाहेर असलेल्या एका अदृष्ट शक्तीचें अस्तित्व सिद्ध करणारा पैशाचिक चमत्काराचा एखादा सत्य, पण अद्भुत, अनुभव येतो, ही गोष्टही कांहीं खोटीं नाहीं. तरी पण या सृष्टींत प्रत्यक्ष अनुभवास येणारा हा पैशाचिक अद्भुतचमत्कार कांहीं नियमांविरहित घडत असेल, आणि तोही सृष्टशास्त्रनियमाला सोडून घडत असेल, असें मात्र नाहीं. या जगांत घडणारी कोणतीही अद्भुत गोष्ट असो, अगर क्रिया असो, ती केव्हांही नियमबद्धच असते. पण जोंपर्यंत आपणास तिच्या नियमाचें ज्ञान झालेलें नसतें, तोंपर्यंत तिचे नियम उपलब्ध आधिभौतिक सृष्टशास्त्राच्या नियमाला बाध आणतात, असें दिसतें, इतकेंच. पण हे सर्व चमत्कार आध्यात्मिक सृष्टशास्त्राच्या नियमानेंच घडत असतात.

ज्याप्रमाणें आधिभौतिक सृष्टशास्त्राचें ज्ञान होण्याबरोबर भ्रम, भास, सृष्टचमत्कार, अज्ञान, व खोट्या कल्पना, यांच्या पायावर उभारलेली भूतपिशाचाची भीतिदायक खोटी इमारत ढासळून पडते, त्याचप्रमाणें सत्य—पिशाच—चमत्कारांतील आध्यात्मिक सृष्टशास्त्रनियमांचें शास्त्रसिद्ध ज्ञान झालें, ह्मणजे तर पिशाचाबद्दलची भीति समूळच नाहींशीं होते; आणि त्या बरोबरच या जगांतील स्थूळ देहाशिवाय आपणास सूक्ष्म व सामर्थ्यवान असे आणखी देह असून, या स्थूळ जगाशिवाय अदृश्य अशा एका महान जगांतील महत्त्वाच्या कार्यासाठीं, नीतीच्या व धर्माचरणाच्या द्वारानें, आपणास अपरिमित सामर्थ्याचा सांठा करून घेतला पाहिजे, अशी खात्री पटून नास्तिकपणाचा नायनाट होतो, आणि पवित्राचरणाची प्रवृत्ति होते. असा हा पिशाचविषयाचा विचार पिशाच बनविणाऱ्या स्वार्थी वासनेपासून पराङ्मुख करणारा उपकारी आहे. या पिशाचशास्त्राचा

विचार याच दृष्टीनें अतिमहत्त्वाचा आहे. या विषयाच्या वाचनापासून व विचारापासून शेवटीं आपल्या अंतःकरणांत पवित्र व उच्च उन्नतीची परमावधीची सीमा ह्मणजे **आपण शाश्वत आहों, आपण अमर आहों, आपणच सर्वसत्ताधारी सत्-चित्-घन राम आहों**, अशी सर्वांतर्यामीं दृढ सामर्थ्याची भावना उत्पन्न होवो, असें त्या श्रीप्रभूजवळ मागणें मागून,

श्रीराम राम रघुनंदन राम राम ॥
श्रीराम राम भरताग्रज राम राम ॥
श्रीराम राम रणकर्कश राम राम ॥
श्रीराम राम शरणं भव राम राम ॥

अर्थः—हे रघुनंदना रामा, हे भरताग्रज रामा, हे रणधुरंधरा श्रीरामा, आपणच आमचें रक्षण करणारे व्हा;

अशी त्या दयाघनाची प्रार्थना करितों.

समाप्त.

१४५५

शुद्धिपत्र.

पृष्ठांक.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१९	२८	डब्डब्	डब्डुब
२२	२६	माती	माशी
३२	२८	वर्तन	नर्तन
३८	१८	आपल्या	माझ्या
४७	२२	वं	...
६१	१३	किंवा	....
७१	३	पुष्कळ	पुष्कळ दिवस
७६	२१	वैद्यनिरीक्षण	वैधनिरीक्षण
८०	१३	सूक्ष्मदेहांतून	स्थूलदेहांतून
९५	६	कांहींतर	कांहींतरी
१२३	२७	तीनहीं	दोनहीं
१२९	२	श्रम	भ्रम
१३३	१५	व्यापारास	व्यापारांत
१३३	२५	जड	नड
१३९	१४	लोइ	लोह
१४२	१५	घडूनहि	घडून ही
१५१	६	मंत्रावर	यंत्रावर
१५४	२	दर्शनस्पर्शानें	दर्शनस्पर्शन –

रामचंद्र विनायक कुलकर्णी, तासगांव,

यांनीं लिहिलेलीं

शास्त्रीय पुस्तकें

स्वप्नमीमांसा.

किं० ८८.

या पुस्तकांत स्वप्नाच्या माहितीबद्दल अनुभव व शास्त्र यांचा मेळ दाखवून स्वप्नें कां व कशीं पडतात, आणि त्यांचीं फळें येतात तीं कां व कशीं येतात, याबद्दल अधिभौतिक, मानसिक व अध्यात्म शास्त्रांच्या दृष्टीनें विचार करून, पडलेल्या स्वप्नांचीं फळें कशीं ओळखावीं, निजलेल्या दुसऱ्या माणसास स्वप्नें कशी पाडावीं, आपणाला भूत किंवा भविष्य काळाची एखादी गोष्ट समजविणारें सूचक स्वप्न कसें पाडून घ्यावें, दृष्टांत कसे व केव्हां होतात, इत्यादि गोष्टींचें विवेचन चांगल्या प्रकारें केलें असून मराठींत स्वप्न या विषयावर सप्रयोग, सानुभव, व सशास्त्र पद्धतीनें लिहिलेलें असें हें पुस्तक पहिलेंच आहे. यावर पुष्कळ चांगले अभिप्राय आले आहेत. केसरीकारांच्या अभिप्रायांतील एक दोन वाक्यांवरून याची थोडी कल्पना येईल. ते ह्मणतातः “ रा. कुलकर्णी यांनीं हें पुस्तक दुसऱ्या कोणत्या पुस्तकाचें भाषांतर अगर रूपांतर केलेलें नसून सर्व विवेचन प्रयोग, अनुभव, मनन, व तत्त्वशोधन यांवर उभारलेलें आहे. गूढ व मानसिक शास्त्राच्या प्रांतांत घुसून तेथें सतत शोध करीत राहण्याची

अभिरुचि आमच्या विद्वानांत फारच कमी आहे. पण या बाबतींत रा. कुलकर्णी यांनीं केलेला व्यासंग, अभ्यास, व परिश्रम कौतुक करण्यासारखे आहेत. इ० इ० " या वरून या पुस्तकांतील विषय-विवेचनाची थोडीशी कल्पना येईल.

उपासनाशास्त्र.

किं० ८७.

या पुस्तकास रा. त्र्यंबक गुरुनाथ काळे यांनीं प्रस्तावना लिहिलेली आहे. या पुस्तकांत तीन भाग असून पहिल्यांत सोवळें ओवळें व विटाळ हें काय प्रकरण आहे, यांतील तत्त्व काय, रूढि काय, त्याज्य काय व कां, आणि अवश्यक पाळलेंच पाहिजे असें ग्राह्य काय व तें कां, याचा शास्त्र व अनुभव या दृष्टीनें विचार करून उन्नतीस शरीर व मन कसें तयार असावें, हें सांगून दुसऱ्या भागांत पूजा ह्मणजे काय, व तिची अवश्यकता कां आहे, उपासना कां करावी व ती कशी करावी, ईश्वर ह्मणून सृष्टींत सामर्थ्यवान् अदृष्ट शक्ति कशी आहे व तिचा स्वरूपसाक्षात्कार, ह्मणजे प्रत्यक्षरूपदर्शन, होणें

कसें शक्य आहे, तें दर्शन कसें होतें, व तें कसें करून घ्यावें, याचें सप्रयोग व सशास्त्र विवेचन केलें असून, तिसऱ्या भागांत हीच सर्व जगांत घडामोड करीत असलेली दिव्यशक्ति आपणास स्थूल स्वरूपानें आपलें दर्शन देईल, अशी उपासनासिद्धीची गुरुकिल्ली जी निष्ठा ती कशी असावी, त्या निष्ठेच्या योगानें आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तें तें कसें प्राप्त करून घ्यावें, आणि अखेर मनुष्यानें मनुष्यच न राहतां परमावधीचें सामर्थ्य व सत्ता प्राप्त करून घेऊन त्याचा अनुभव घेत ईश्वरच कसें व्हावें, याबद्दल सृष्टशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, मानसशास्त्र, व आध्यात्मिक सृष्टशास्त्र, यांतील नियमांसह माहिती दिलेली आहे. यावरही उत्तम अभिप्राय आलेले आहेत. या पुस्तकांतील विवेचन नवीन पद्धतीचें असून, नव्यांना व जुन्यांना, अस्तिकांना व नास्तिकांना, तत्त्व व अनुभव या बाबतींत समाधान देणारें आहे.

स्वभावपरिज्ञान.

किं० ८८.

या जगांत मनुष्याला हरघडी निरनिराळ्या माणसांशीं व्यवहार करण्याची पाळी येते, आणि अशा वेळीं सर्वां-

च्याच स्वभावाची आपणास माहिती असतेच, असें नाहीं. कोणाबद्दल चांगलें ऐकलेलें असतें, तर आरंभीं कोणी चांगला आहे असा ग्रह झालेला असतो; पण पुढें कोणाचें पटत नाहीं, तर कोणी फसवून चालता होतो! यासाठीं मनुष्य पाहिल्याबरोबर त्याच्या स्वभावाचें ज्ञान कसें करून घ्यावें, हें या पुस्तकांत सांगितलें आहे. या ज्ञानाच्या योगानें मनुष्य पाहिला कीं, तो नीतिमान आहे का गुन्हे करणारा आहे हें समजतें. आपल्या मुलाची बुद्धि कोणत्या विषयांत चांगली चालेल व त्याचा स्वभाव कसा बनेल, हे जाणतां येऊन दुर्गुण व सद्‌गुण समजून वेळींच दुर्गुणांचा मोड आणि सद्गुणांची वाढ करण्याचा मार्ग समजतो. मुलाच्या स्वभावाला जमणारी वधू व मुलीच्या स्वभावाला जमणारा वर निवडून काढतां येतो. इमानी नोकर, सचोटीचीं गिऱ्हाइकें, व सन्मार्गी मित्र, यांची पटकन पारख करतां येते. एकंदरींत या पुस्तकांत मनुष्याच्या शरीरबांध्यावरून व मस्तकाच्या आकारावरून त्या मनुष्याचा स्वभाव कसा ओळखावा ही माहिती सोप्या तऱ्हेनें आणि शास्त्रीय (सायंटिफिक) व व्यावहारिक विवेचनपद्धतीनें दिली असून शेवटीं समजुतीकरितां आकृति दिल्या आहेत.

मेस्मेरिझम

अथवा

मोहिनीविद्या.

किं० १ रु.

व

मोहिनीविद्येचा शिक्षक.

किं० १८४.

अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, इत्यादि पाश्चात्य देशांत ज्या विद्या अद्भुतसामर्थ्यवान् ह्मणून पुढें आल्या आहेत, व ज्या विद्यांनीं मनुष्याला मोहिनी घालून बेशुद्ध करतां येतं; आपल्या ताब्याखालीं घेऊन आपल्या हुकुमाप्रमाणें उठतां येणार नाहीं, चालतां येणार नाहीं, बसतां येणार नाहीं, बोलतां येणार नाहीं, असें करतां येतें; अगर भ्रम उत्पन्न करून जें नाहीं तें दाखवितां येऊन त्याला रड-वितां येतें, हसवितां येतें, नाचवितां येतें, बायको ह्मणून बायकांसारखे हावभाव, मूल ह्मणून रांगण्यास लावणें, कुत्रा ह्मणून भुंकण्यास लावणें, इत्यादि करवितां येतें;

त्याच्या शरीरांतील नानातऱ्हेचे दुःसाध्य रोग बरे करतां येतात; त्याचीं व्यसनें सोडवितां येतात; व त्याला अंतर्ज्ञान दृष्टि उत्पन्न होऊन भूत भविष्य काळची अगर वर्तमान काळची एखादी माहिती मिळवितां येते; अशा तऱ्हेच्या अद्भुत व गूढ विद्या ज्या १ मेस्मेरिझम (मोहिनी), २ हिप्नॉटिझम (भुरळ), ३ सजेशन (सूचनाशास्त्र), इत्यादि नांवांच्या आहेत, त्या विद्यांची या पुस्तकांत (मेस्मेरिझम अथवा मोहिनीविद्या. व मोहिनीविद्येचा शिक्षक या दोहोंत) साग्र माहिती दिली आहे. अगदीं थोड्या अभ्यासांत हे प्रयोग करण्याचें सामर्थ्य कसें आणावें, प्रयोगाचा अम्मल कसा बसवावा, बेशुद्ध कसें करावें, भ्रम कसा उत्पन्न करावा, अंतर्ज्ञान कसें उत्पन्न होतें, रोग कसे कमी करावे, पशुपक्ष्यांवर व झाडांवर कसे प्रयोग करतात, सार्वजनिक जागीं कसे प्रयोग करतात, इत्यादि स्पष्ट तऱ्हेनें, पुस्तकावरून अनुभव घेतां येतील, असेंच विवेचन केलें असून या प्रत्येक गोष्टीच्या कार्यकारणांची मीमांसा शारीरशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, व मानसशास्त्र, यांतील नियमांनीं दाखवून देऊन प्रत्यक्ष प्रमाणानें उपपत्तीसह अनुभव घेण्यायोग्य सर्व माहिती, रहस्य व गुरुकिल्या, हें सर्व सांगितले आहे. इतक्या थोड्या किंमतींत इतकी साग्र व सत्य माहिती देणारीं फक्त हीच पुस्तकें आहेत, अशी अनुभवाअंतीं खात्री पटेल.

ब्रह्मचर्य.

किं० ८४.

या पुस्तकांत ब्रह्मचर्य ह्मणजे काय, ते कां राखावें, व कसें राखावें, वीर्य ह्मणजे काय, वीर्यनाश कां होतो, वाईट सवयीं कां व कशा लागतात, ही माहिती सांगून शेवटीं वाईट संवयींनें, स्वप्नावस्थेनें, मैथुनातिरेकानें, आनुवंशिक अशक्ततेनें, एकंदरींत कोणत्याही कारणानें, ज्यांचा वीर्यनाश झाला असेल व होत असेल, त्यांनीं वीर्यनाशकता कशी थांबवावी, आणि वीर्यवृद्धि कशी करावी, याबद्दलचें सर्व ज्ञान पद्धतशीर रीतीनें दिलेलें आहे. एकंदरींत हें पुस्तक हल्लींच्या काळीं विद्यार्थी, तरुण, वृद्ध, प्रापंचिक, व विरक्त या सर्वांनाच वीर्यनाशावर व वीर्यवृद्धीवर वैद्यशास्त्र, शारीरशास्त्र, आणि मानसशास्त्र या तिहींच्या दृष्टीनें सर्वोत्कृष्ट उपाय दाखवून देऊन अमोघवीर्यवान् होण्याची गुरुकिल्ली सांगणारें आहे.

पिशाच.

किं० ०।१२.

भूत किंवा पिशाच म्हणजे काय, त्यासंबंधानें लोकांच्या समजुती, अज्ञानामुळें भूतांच्या म्हणून समजण्यांत येणाऱ्या गोष्टींचीं व अनुभवांचीं दुसरीं कारणें, इत्यादि दाखवून भूत, पिशाचांची भीति ही केवळ कल्पनेनेंच कशी निर्माण झालेली आहे, हें सानुभव, सोपपत्तिक, व सोदाहरण दाखवून देऊन खरोखरी पिशाच शब्दाच्या अर्थानें निर्दिष्ट केलेली अदृष्ट-शक्ति–व्यक्ति–असणें शक्य आहे का, या प्रश्नाच्या विचारासाठीं प्राचीन काळच्या लोकांचीं मतें, अर्वाचीन काळच्या लोकांची मतें, आणि विद्वानांचे अनुभव देऊन त्यावरून पिशाच स्वरूपाचा विचार करून आधिभौतिक शास्त्रीय पुराव्यानें, पिशाचशक्ती व्यक्त रूपाला येणें कसें शक्य आहे, व तिचे अद्भुत चमत्कार कोणत्या नियमांनीं, कां, व कसकसे होत असतील, हें दाखवून देऊन, पैशाचिक शक्तीचा व त्यांच्या चमत्काराचा स्वतः अनुभव कसा पाहवा, याबद्दल प्रयोगांची माहिती, सूचना, व नियम सांगून, पिशाचाचे खरे, खोटे, व भ्रामक त्रास, बालग्रहाचे भेद, उन्मादाच्या सर्व तऱ्हा, दहा तऱ्हेचीं वेडें, पांच तऱ्हेचे भ्रम, इत्यादिकांवर प्रत्येकीं डाक्टरी, होमिओपाथी, नेटिव्ह (वैद्यकी), जटेली,

जीवनरासायानिक, व जलोपचारिक, असे सर्व उपचार सांगून सत्यपैशाचिक त्रासांतून सुटण्यासाठीं त्याला प्रतिबंध करणें, त्याचा संबंध तोडणें, त्याला गाडणें, व त्याला मुक्ति देणें, या क्रिया कोणत्या पद्धतीनें करितात, व त्या कां कराव्या, हें आधुनिक शास्त्रीय विवेचनपद्धतीनें सांगून, मनुष्याला पिशाचाची भीति बाळगण्याचें कारण केव्हांही नाहीं, तें कां व कसें, हा मानसशास्त्रांतील सिद्धांत शेवटीं सांगितला आहे. एकदंरींत हें पुस्तक भूतपिशाच-संबंधानें सर्व तऱ्हेच्या व्यावहारिक, व शास्त्रीय विचारांनीं आणि सप्रयोग व सोपपत्तिक माहितीनें भरलेलें आहे.

हीं वरील सर्व पुस्तकें खालील पत्त्यावर कर्त्याकडे मिळतात.

रामचंद्र विनायक कुलकर्णी,

तासगांव, ता० व पोस्ट तासगांव, जि. सातारा.

